नोव्हेंबर २०१३। किंमत ₹ १०

# लोकराज्य




RABHA

## व्यापक जनहित
## आणि
## दीर्घकालीन विकासाचे
# कृतिबिंब

११ नोव्हेंबर २०१० ते ११ नोव्हेंबर २०१३




# आघाडी आणि प्रगती



- ★ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत अल्प उत्पन्न असलेल्या व्यक्तींना विमा योजनेद्वारे विमा संरक्षण मिळण्याची व्यवस्था. योजना गडचिरोली, अमरावती, नांदेड, धुळे, सोलापूर, रायगड, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांमध्ये जुलै २०१२ पासून सुरू.
- ★ नवजात शिशू मृत्यूदर कमी करण्यासाठी राष्ट्रीय पारितोषिक – देशात पहिले.
- ★ सुरक्षित प्रसूती सुधारणेसाठी राष्ट्रीय पारितोषिक– देशात पहिले.
- ★ अल्पसंख्याकांसाठी १२ तंत्रनिकेतने आणि ४२ आय. टी. आय. संस्थांमध्ये खास दुसरी पाळी. दोन नवीन शासकीय आय. टी. आय. दरवर्षी ६,००० विद्यार्थ्यांना लाभ.
- ★ विदर्भातून हज यात्रेला प्रवास करणाऱ्यांसाठी नागपूर येथे हज हाऊस
- ★ घरगुती कामगार मंडळाच्या सन्मानधन योजनेंतर्गत ५५ वर्षे पूर्ण झालेल्या घरगुती कामगारांना रु.१०,००० चे आर्थिक साहाय्य.
- ★ आधार (युआयडी–युनिफाईड आयडेंटिटी कार्ड) कार्यक्रम अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात अग्रेसर.
- ★ मुंबई महानगर प्रदेशात १७ उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले.
- ★ बंद गिरण्यांच्या म्हाडाकडे आलेल्या जमिनीवर बांधलेल्या ६,९४८ सदनिकांचे प्रत्येकी रु. ७.५० लाख किमतीला वाटप.
- ★ म्हाडा या संस्थेला नोडल एजन्सी ठरवून राज्य शासन राजीव आवास योजना राबवित आहे. या योजनेतील पहिल्या टप्प्यासाठी ३ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यातील २५ शहरांची निवड.
- ★ स्कूल बस धोरण २०११ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी.
- ★ २ जानेवारी २०१२ रोजी राज्याचे वस्त्रोद्योग धोरण जाहीर. वस्त्र उद्योगामध्ये रु. ४० हजार कोटींची नवी गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट, २०१६–१७ पर्यंत ११ लाख रोजगार निर्मिती.
- ★ क्रीडा धोरण, ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर.
- ★ २००७–०८ ते २०११–१२ या पाच वर्षात ५.९५ लाख हेक्टर अतिरिक्त जलसिंचन क्षमतेची निर्मिती. गेल्या ३ वर्षात ५०० हून अधिक प्रकल्प पूर्ण.
- ★ शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा. शिक्षण आणि इतर शुल्क संस्थेच्या बँक खात्यात जमा. या योजनेला ई–इंडिया पारितोषिक.







वर्ष ६५ वे | अंक ८ | नोव्हेंबर २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- सहसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम
- मुखपृष्ठ — राभा
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

**संपादकीय पत्ता**
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६

**email :** lokrajya2011@gmail.com
lokrajya@dgipr.maharashtra.gov.in

ई-लोकराज्यसाठी
**Website :** http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२६१६९७६

**e-mail :** lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग

| | | |
|---|---|---|
| परिवर्तनाचे कृतिबिंब | संपादकीय | ४ |
| दीर्घकालीन विकास आणि व्यापक जनहित | मुख्यमंत्री | ५ |
| श्रेय जनतेचेच... | उपमुख्यमंत्री | १२ |
| महा-उद्योग-राष्ट्र | उद्योग | १९ |
| विकासाची पायाभरणी | सार्वजनिक बांधकाम | २१ |
| अपूर्व आणि अमर्याद | पर्यटन | २३ |
| विकासाभिमुख सुरक्षा | गृह | २५ |
| समता आणि समृद्धी | सामाजिक न्याय | २८ |
| परिवर्तनाच्या दिशेने | आदिवासी विकास | ३० |
| टंचाईवर यशस्वी मात | मदत व पुनर्वसन | ३२ |
| वैभवशाली वन-व्यवस्थापन | वने | ३३ |
| नवी ऊर्जा नवी आशा | अपारंपरिक ऊर्जा | ३४ |
| दुसरी हरितक्रांती | कृषी | ३६ |
| हायटेक प्रगतीचे पर्व | ग्रामविकास | ३८ |
| सहकाराचे सामर्थ्य | सहकार | ४० |
| सागरी सेतू ते द्रुतगती मार्ग | सार्वजनिक उपक्रम | ४२ |
| सुरक्षित औषधे-सुरक्षित आरोग्य | अन्न व औषध प्रशासन | ४४ |
| अन्न सुरक्षा : जीवन सुरक्षा | अन्न व नागरी पुरवठा | ४६ |
| फळबागांचा बहर | फलोत्पादन | ४८ |
| जलव्यवस्थापनाची गंगोत्री | जलसंपदा | ५० |
| ऑनलाइन गतिमानता | महसूल | ५२ |
| जागतिक गुणवत्तेच्या दिशेने... | उच्च व तंत्रशिक्षण | ५४ |
| शिक्षण हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी | शालेय शिक्षण | ५६ |
| सगळे मिळून पुढे जाणार | अल्पसंख्याक | ५८ |
| शेतकऱ्यांना लाभ.. रोजगारात वाढ | वस्त्रोद्योग | ६० |
| उपेक्षेकडून प्रतिष्ठेकडे | कामगार व विशेष साहाय्य | ६२ |
| सुदृढ महाराष्ट्र | आरोग्य | ६५ |
| परिवर्तनाचे नवे पर्व | रोजगार हमी | ६७ |
| क्रीडा संस्कृतीची नवी दिशा | क्रीडा | ६९ |
| महिला विकासाचा जाहीरनामा | महिला व बालविकास | ७१ |
| गतिमान बदलांचा कालखंड | पशुधन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय | ७३ |
| पर्यावरण रक्षण..संस्कृती संवर्धन | पर्यावरण व सांस्कृतिक कार्य | ७६ |
| सुजल आणि निर्मल | पाणीपुरवठा आणि स्वच्छता | ७८ |
| आपली कृष्णा:आपले पाणी | कृष्णा खोरे | ८० |
| प्रगतीचे मानदंड | महत्त्वाचे निर्णय | ८१ |
| जुने लोकराज्य एका क्लिकवर | किरण केंद्रे | ९१ |
| ई-गव्हर्नन्स | टीम लोकराज्य | ९२ |
| महानगर : प्रगतीच्या नव्या वळणावर | दिलीप कवठकर | ९४ |

# परिवर्तनाचे कृतिबिंब

दीपपर्वाचे आगमन हे नव्या सकारात्मक ऊर्जेला घेऊन येते. यंदाच्या उत्तम पावसाने हा आनंद द्विगुणित केला आहे. या महिन्यात मोहरम, गुरुनानक जयंती साजरी केली जाते. पंडित नेहरू आणि इंदिरा गांधी यांची जयंती याच महिन्यात येते. २८ नोव्हेंबरला महात्मा जोतिबा फुले यांची पुण्यतिथी येते. ही सर्व महान व्यक्तिमत्त्वे आपणास कायम प्रेरणा देत असतात. २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन असून २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी राज्यघटनेचा स्वीकार करण्यात येऊन भारतीय प्रजासत्ताकाची पायाभरणी झाली.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कोरडवाहू शेती शाश्वत करणे, राज्याला टंचाईमुक्त करणे, राज्याचा संतुलित औद्योगिक विकास करणे, सुनियोजित नागरीकरण आणि शिक्षणाचा दर्जा वाढवणे ही पंचसूत्री शासनाने घोषित केली आहे. यंदा महाराष्ट्राने १९७२ नंतरच्या सर्वाधिक टंचाई आणि दुष्काळी परिस्थितीचा सामना विशिष्ट ध्येय ठेवून केला. टंचाईग्रस्त भागात पाण्याची समस्या भेडसावू नये, पिण्याच्या पाण्याचे संकट ओढवू नये यासाठी सिमेंट बंधारे बांधण्याला सर्वोच्च प्राथमिकता देण्यात आली. दुष्काळग्रस्त भागात पहिल्या टप्प्यात १४८७ बंधारे बांधले गेले.

महाराष्ट्र हे कायम पहिल्या क्रमांकाचे गुंतवणूकदारांना आकर्षित करणारे राज्य आहे. केंद्र सरकारने मान्यता दिलेल्या थेट विदेशी गुंतवणुकीच्या एकूण प्रस्तावांपैकी २३ टक्के प्रकल्प महाराष्ट्रातील आहेत. यंदाच्या वर्षात एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत १८ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. विशाल धोरणांतर्गत जनरल मोटर्स, वोल्क्सवॅगन, सॅनी हेवी इंडस्ट्रीज, ब्रिज स्टोन, एल. जी. इलेक्ट्रॉनिक्स, मायको बॉश यासारख्या मोठ्या कंपन्यांनी गुंतवणूक केली आहे.

शेतकऱ्यांना ६ टक्के दराने पीक कर्ज देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना राबवली जाते. ज्या शेतकऱ्यांनी कर्ज रक्कम वेळेवर परत केली, त्यांना शून्य टक्के व्याजदराने पीककर्ज दिले जाते. गेल्या वर्षभरात १४५ कोटी इतकी रक्कम शासनाने वितरित केली आहे.

ग्रामविकासाला हायटेक चेहरा देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. २८ हजार ग्रामपंचायतींपैकी २५ हजार ग्रामपंचायतींमध्ये संगणक पोहचले आहेत. महाराष्ट्रात आरोग्य विभागामार्फत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अतिशय प्रभावीपणे राबवली जात आहे. आतापर्यंत २ लाख ३४ हजार इतक्या लोकांनी या योजनेचा फायदा घेतला आहे.

राज्यातील गोरगरिबांची दोन वेळेच्या जेवणाची भ्रांत कायमस्वरूपी मिटावी म्हणून अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी या डिसेंबरपासून करण्याची संपूर्ण तयारी शासनाने केली आहे. प्रशासनाचा चेहरा हा मानवी असावा ही शासनाची मुख्य भूमिका असल्याने, सामाजिक क्षेत्राचा विचार हा अनेक धोरणांच्या केंद्रस्थानी असतो. याच हेतूने मुलींना स्व-विकासाची परिपूर्ण संधी मिळावी म्हणून **सुकन्या योजना** राबवण्यात येणार आहे. मुलींची शैक्षणिक पातळी व आरोग्यात सुधारणा, त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक तरतूद, स्त्रीभ्रूणहत्येला कठोरपणे प्रतिबंध घालून मुलींच्या जन्मदरात वृद्धी या बाबी धोरणात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. **मनोधैर्य योजने**द्वारे पीडित, अन्यायग्रस्त महिला आणि बालकांना आर्थिक साहाय्य देऊन पुनर्वसन केले जाते. समाजातील उपेक्षित घटकांच्या शैक्षणिक, आर्थिक विकासाच्या विविधांगी योजना राबवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या प्रयत्नांना आणखी गती देण्यात आली आहे.

स्वर्णजयंती राजस्व अभियानाने सर्वसामान्यांच्या जीवनात अत्यंत आवश्यक असलेली प्रमाणपत्रे तातडीने मिळणे सुलभ झाले. २०१२-१३ मध्ये ७७ लाख २६ हजार २८८ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. ८.७ लाख प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढली गेली आहेत.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ही महाराष्ट्राची यथार्थ अशी भावना आहे. मराठीचे प्राचीनत्व सिद्ध करणारे पुरावे मान्यवर साहित्यिक, अभ्यासक आणि संशोधक यांच्या सहकार्याने अत्यंत परिश्रमाने प्राप्त करण्यात आले आहेत. त्यानुसार केंद्र शासनाला अहवाल सादर करण्यात आला आहे. मुंबईत भाषा भवन बांधण्यात येणार असून शासकीय संस्थांची महत्त्वाची पुस्तके ई-बुकमध्ये रूपांतरित करण्यात येत आहेत. दर्जेदार मराठी पुस्तकांचे ऑडिओ बुक्ससुद्धा तयार करण्यात येत आहेत.

गेल्या ३ वर्षात नवीन औद्योगिक धोरण, वस्त्रोद्योग धोरण, युवा आणि क्रीडा धोरण, जेष्ठ नागरिक धोरण, हवामानावर आधारित फळ पीक योजना, १०० कोटी वृक्षारोपण कार्यक्रम, कोकण आणि मराठवाडा विदर्भातील दुग्धविकास गतिमान करण्यासाठी एकात्मिक दुग्ध शेती प्रकल्प, घरगुती कामगारांसाठी सन्मानधन योजना, अभिमत हस्तांतरणासाठी (डिम्ड कन्व्हेयन्स) विशेष अभियान कार्यान्वित करण्यात येऊन विविध घटकांना विकास आणि प्रगतीची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

महाराष्ट्राने विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केल्याने केंद्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांनी महाराष्ट्राला सन्मानित करण्यात आले. यामध्ये नवजात शिशू मृत्युदर कमी करण्यासंदर्भातील प्रथम राष्ट्रीय पुरस्कार, सुरक्षित प्रसूती सुधारणेसाठी प्रथम राष्ट्रीय पुरस्कार, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमधील नागरिक केंद्र उत्कृष्ट सेवा पूर्तीसाठी रौप्य पारितोषिक, ३३ व्या स्कॉच शिखर परिषदेत ई-गव्हर्नन्ससाठी १८ पारितोषिके, यूआयडीच्या नवीनतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार, यांचा समावेश आहे. यंदा पंचायत सक्षमीकरण आणि उत्तरदायितत्व योजनेंतर्गत महाराष्ट्रास २.५ कोटी रुपयांच्या प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

विविध योजना, उपक्रम, निर्णय, धोरणे, पुरस्कार याद्वारे महाराष्ट्राचे विकासाच्या वाटेवरील आघाडीचे कृतिबिंब या विशेष अंकातून मांडण्याचा हा प्रयत्न आहे. हा प्रयत्न आमच्या वाचकांना निश्चित आवडेल असा विश्वास वाटतो.

आमचे वाचक व वर्गणीदार यांना दिवाळीच्या मन:पूर्वक शुभेच्छा.



**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
dg@dgipr.maharashtra.gov.in

# दीर्घकालीन विकास आणि व्यापक जनहित




**तात्पुरत्या उपायांबरोबरच दीर्घकालीन विकासाची कामे आणि वैयक्तिक लाभाच्या कामांपेक्षा व्यापक जनहिताची कामे हेच माझ्या कामाचे सूत्र राहिले आहे आणि पुढेही राहणार आहे. पुढची वाटचाल कशी करायची, याचाही रोडमॅप मी तयार केला आहे. कोरडवाहू शेती शाश्वत करणे, राज्याला पाणीटंचाईमुक्त करणे, संतुलित औद्योगिक विकास, सुनियोजित नागरीकरण आणि शैक्षणिक दर्जावाढ या पाच सूत्रांवर आधारित पुढची वाटचाल आम्ही करणार आहोत.....मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे मनोगत.**

राज्यातील आघाडी सरकारच्या कारकिर्दीला चार वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर आपणाशी संवाद साधताना मला खूप आनंद वाटतो आहे. याचे एक महत्त्वाचे कारण आहे, ते म्हणजे सलग दोन वर्षांच्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर यावर्षी राज्यात सर्वदूर पडलेला समाधानकारक पाऊस. त्याचबरोबर सर्वसामान्य माणूस डोळ्यासमोर ठेवून आम्ही जे महत्त्वाचे निर्णय घेतले आणि ज्या ताकदीने राबवले, त्यामुळे जागतिक मंदीच्या काळातही आपल्या राज्याचे आघाडीचे स्थान कायम राखण्यात आम्हाला मिळालेल्या यशाचा आनंदही आहे. राज्याचा विकास करताना त्याला मानवी चेहरा असला पाहिजे, हे सूत्र आम्ही घेतलेल्या प्रत्येक निर्णयामागे आहे. तात्पुरत्या उपायांबरोबरच दीर्घकालीन विकासाची कामे आणि वैयक्तिक लाभाच्या कामांपेक्षा व्यापक जनहिताची कामे हेच माझ्या कामाचे सूत्र राहिले आहे आणि पुढेही राहणार आहे. पुढची वाटचाल कशी करायची याचाही रोडमॅप मी तयार केला आहे. कोरडवाहू शेती शाश्वत करणे, राज्याला पाणीटंचाईमुक्त करणे, संतुलित औद्योगिक विकास, सुनियोजित नागरीकरण आणि शैक्षणिक दर्जावाढ या पाच सूत्रांवर आधारित पुढची वाटचाल आम्ही करणार आहोत.

आपण गेली सलग दोन वर्षे दुष्काळाचा सामना करीत होतो. मात्र यंदा राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने दुष्काळाचे संकट दूर झाले आहे. पावसाच्या अनियमिततेचा कायमस्वरूपी मुकाबला कसा करायचा, याचा आराखडा आपण तयार केला आहे. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, पावसाची अनियमितता ही जरी निसर्गावर अवलंबून असली, तरी पाणीटंचाईवर नियोजनपूर्वक मात करता येते. विकेंद्रित पाणीसाठा करून पाणीटंचाई कायमस्वरूपी संपवण्याचा निर्धार आम्ही केला आहे.

मुळात आपल्याकडे पडणारा मोसमी पाऊस हा बेभरवशाचा. त्यात जागतिक तापमानवाढ, निसर्गाचे बदललेले चक्र अशा अनेक कारणांमुळे पावसाची अनियमितता वाढली आहे. आपल्या राज्याचा नागरीकरणाचा वेग मोठा असला तरी अद्यापही राज्याची निम्म्याहून अधिक जनता शेती आणि शेतीपूरक उद्योगांवर अवलंबून आहे. सिंचनाची क्षमता वाढवण्याचे पुष्कळ प्रयत्न करूनही सिंचनक्षमता अद्याप १८ टक्क्यांच्या पुढे गेलेली नाही. त्यामुळे अजूनही बहुसंख्य शेतकरी हा कोरडवाहू आहे आणि त्याची कोरडवाहू शेती शाश्वत करणे, हे मोठे आव्हान आमच्यासमोर आहे.

**सिमेंट बंधाऱ्यांची जलक्रांती**

पाणी अडवा, पाणी जिरवा हा मंत्र फार जुना आहे. मात्र तो आचरला जात नाही. यासाठी यावर्षीच्या पावसाळ्याआधी दुष्काळप्रवण तालुक्यांमध्ये सिमेंटचे साखळी पक्के बंधारे बांधण्याचा कार्यक्रम आम्ही राबवला. साधारण ८ ते १२ लाख रुपये खर्चाचे हे बंधारे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून, ८ जूनला राज्यात एकाच दिवशी १,४२६ बंधाऱ्यांचे उद्‌घाटन झाले. बाब तशी छोटी असली तरी या बंधाऱ्यांनी दुष्काळी भागात नवी जलक्रांती घडवली.

सातारा तालुक्यातील खटाव, गोंदवले, सांगली जिल्ह्यातील मायणी, जत, कवठेमहांकाळ, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा आदी भागात या बंधाऱ्यांमुळे जलाशय निर्माण झाले. बऱ्याच वर्षांनी नदीपात्रात साठलेल्या या पाण्यामुळे परिसरातील भूस्तरांचे मोठ्या प्रमाणात

पुर्नभरण (रिचार्जिंग) होऊ लागले आहे. याचा परिणाम विहिरी व कूपनलिकांची पाण्याची पातळी वाढण्यात होऊ लागला आहे. हा कार्यक्रम आता राज्यात अन्यत्रही मोठ्या प्रमाणात राबवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. याचे दीर्घकालीन फायदे नक्कीच दिसतील.

**अतिवृष्टीशी सामना**

सलग दोन वर्षांच्या दुष्काळातून सावरत असतानाच अतिवृष्टीचे संकट राज्यावर आले. जुलैमध्ये विदर्भात आणि राज्याच्या इतर काही जिल्ह्यात अतिवृष्टीने थैमान घातले. या कठीण प्रसंगी लोकांना तात्कालिक मदत आणि त्याचबरोबर कायमस्वरूपी पूरप्रतिबंधक योजनांसाठी सुमारे २००० कोटी रुपयांची तरतूद पूरग्रस्त भागासाठी केली. गोसीखुर्द, लोअर वर्धा आणि बेंबळा प्रकल्प लवकर पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. यामुळे विदर्भातील पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होणार आहे.

मोठी धरणे बांधणे हे अनेक कारणांमुळे अडचणीचे ठरू लागले आहे. बांधकाम साहित्याचा प्रचंड खर्च, प्रकल्पासाठी पुरेसा निधी देण्यात येणाऱ्या अडचणी, परिणामी प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लागणारा अधिकचा कालावधी, प्रकल्पाचा वाढलेला सुधारित खर्च, भूसंपादन, विस्थापन, पुनर्वसन असे अनेक प्रश्न या प्रकल्पांमुळे निर्माण होतात. त्यामुळे यापुढच्या काळात कमी खर्चात व लवकर पूर्ण होणार छोटे प्रकल्प आणि कालव्यांचे जाळे हेच उपाय हाती घ्यावे लागणार आहेत. या सर्वातून राज्याला पाणीटंचाईमुक्त करण्याचे आणि कोरडवाहू शेती शाश्वत करण्याचे ध्येय गाठायचे आहे.

**समतोल औद्योगिक विकास**

महाराष्ट्रात उद्योगवाढीसाठी अनुकूल असे वातावरण राज्याच्या स्थापनेपासूनच आहे. त्याचे श्रेय स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची दूरदृष्टी आणि नियोजन याला द्यावे लागेल. यशवंतरावजींनी पदाची सूत्रे हाती घेताच अवघ्या चार महिन्यांत 'बोर्ड ऑफ इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट' या नावाचे मंडळ स्थापन करून राज्याला उद्योगाभिमुख बनवण्याचा पाया घातला. एका सुवर्णयुगाच्या प्रवासाची ती सुरुवात होती. महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या हितासाठी यशवंतरावजींनी १९५७ ते १९६२ या काळात अनेक निर्णय घेतले. त्यात उद्योग क्षेत्राच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी, मुंबई राज्य फायनान्शियल



## नवे औद्योगिक धोरण



देशातील औद्योगिक गुंतवणुकीतील महाराष्ट्राचे अग्रस्थान कायम राखतानाच मागासभागात गुंतवणुकीचा ओघ वाढविणे आणि जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे, या उद्देशाने नवीन औद्योगिक धोरण तयार करण्यात आले आहे. २० लाख इतकी नवीन रोजगारनिर्मिती, ५ लाख कोटींची गुंतवणूक आणि राज्यातील एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये (जीडीपी) निर्मिती क्षेत्राचा वाटा २८ टक्केपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट हे धोरणाचे वैशिष्ट्य आहे. उद्योजक, औद्योगिक संस्था आणि सर्व संबंधितांशी चर्चा करून, त्यांच्या अडीअडचणी, अपेक्षा लक्षात घेऊन आखण्यात आलेले राज्याचे नवे औद्योगिक धोरण जागतिक आर्थिक मंदीच्या वातावरणातही महाराष्ट्रात मोठी औद्योगिक गुंतवणूक खेचून आणेल. विशाल उद्योगांप्रमाणे अतिविशाल उद्योगांना प्रोत्साहन, एक खिडकी योजनेचे सक्षमीकरण, एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची तरतूद यामुळे हे धोरण महाराष्ट्राचे उद्योगातील क्रमांक एकचे स्थान आणखी मजबूत करेल.

कार्पोरेशन म्हणजेच आताच्या महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाची स्थापना आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची निर्मिती हे दोन निर्णय खूप महत्त्वाचे आहेत.

महाराष्ट्राची स्पर्धा अन्य कुठल्याही राज्याबरोबर नाही. आपली स्पर्धा आपल्याशीच आहे. उद्योग-व्यवसाय यांचा विकास व्हावा म्हणून प्रत्येक राज्य आज नवनवीन मार्गाने मार्केटिंग करत आहे. प्रत्येक मोठा उद्योग महाराष्ट्रातच आला पाहिजे असा आग्रह असू शकत नाही. महाराष्ट्र हे उद्योगाच्या बाबतीत 'लीडर स्टेट' होते आणि पुढेही राहील, यात मला शंका वाटत नाही. मात्र केवळ आहे त्या स्थितीमध्ये समाधानी न राहता अधिकाधिक गुंतवणूक महाराष्ट्रात यावी आणि त्याचबरोबर राज्याचा समतोल औद्योगिक विकास व्हावा, यासाठी आम्ही अलीकडेच नवे औद्योगिक धोरण जाहीर केले.

**गुंतवणूकदारांची पहिली पसंती**

उत्कृष्ट पायाभूत सुविधा, विकसित जमीन, वीज, पाणी याबरोबर महामार्ग, विमानतळ, बंदरे या सुविधांमुळे महाराष्ट्रात उद्योगांच्या वाढीसाठी पोषक वातावरण आहे. २००६च्या औद्योगिक धोरणातील विशाल प्रकल्प धोरणामुळे राज्यात २ लाख ८० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली. यापैकी ७५ टक्के उद्योग मागासभागात सुरू झाले. आजही देशी-विदेशी गुंतवणूकदारांची महाराष्ट्र हीच पहिली पसंती आहे. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉर (डीएमआयसी) आणि नॅशनल इंडस्ट्रिअल मॅन्युफॅक्चरींग झोन (एनआयएमझेड) मुळे राज्यातील औद्योगिक विकासाला अधिक चालना मिळणार आहे. बंदर विकासाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राज्य सरकार राबवत आहे. या मोक्याच्या वेळी अत्यंत महत्त्वाकांक्षी असे औद्योगिक धोरण आम्ही सादर केले आहे. उद्योगांना अखंडित वीजपुरवठा करण्याच्या धोरणामुळे महाराष्ट्रात उद्योगांना चालना मिळाली आहे,

केंद्र सरकारने मान्यता दिलेल्या विशेष औद्योगिक क्षेत्रांमधून बाहेर पडू इच्छिणाऱ्या सेझ विकासकांना, अधिक कडक अटी घालून त्यांना एकात्मिक औद्योगिक क्षेत्र सुरू करण्याची परवानगी देण्याचा या धोरणात समावेश आहे. विशेष आर्थिक क्षेत्रांच्या (स्पेशल इकॉनॉमी झोन-सेझ) जमिनीवर एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची तरतूद आणि या क्षेत्रापैकी निव्वळ औद्योगिक वापराच्या जागेचे प्रमाण ५० टक्क्यांवरून ६० टक्के केल्यामुळे, औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढच होईल. उरलेली ४० टक्के जमीन ही या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या निवासासाठी गृहबांधणी व आनुषंगिक कारणासाठीच वापरली जाईल. यामुळे हे धोरण उद्योगांचे नसून गृहनिर्माणासाठी असल्याची समजूत पूर्णत: चुकीची आहे.

केंद्र शासनाच्या विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम २००५ अंतर्गत राज्यामध्ये अनेक विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचित करण्यात आली. जागतिक बाजारपेठेतील प्रतिकूल परिस्थितीत तसेच केंद्र शासनाकडून सवलती कमी केल्यामुळे काही विशेष आर्थिक क्षेत्रे ना-अधिसूचित किंवा रद्द करण्यात आली. ही परिस्थिती विचारात घेऊन ना-अधिसूचित किंवा रद्द करण्यात आलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राला बाहेर पडण्यासाठी आणि राज्याच्या सुनियोजित औद्योगिक विकासासाठी एकात्मिक औद्योगिक क्षेत्रे विकसित करण्यासाठी धोरण आखण्यात आले आहे.

**मागास भागात ७५ टक्के प्रकल्प**

राज्यातील सर्व विभागांचा संतुलित विकास व्हावा या दृष्टीने आम्ही नियोजन सुरू केले आहे. त्याचा परिणाम म्हणून उद्योगाच्या बाबतीत बोलायचे तर राज्यासाठी एकूण मंजूर ३२४ विशाल प्रकल्पांपैकी १११ प्रकल्प मागासभागामध्ये उभारण्यात येत आहेत. एकूण विशाल प्रकल्पांपैकी ७५ टक्के प्रकल्प मागासभागात स्थापन झाले पाहिजेत, असा आमचा आग्रह आहे.

विशाल प्रकल्पांमुळे मिळणारे फायदे लक्षात घेऊन, त्यांची गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी एकत्रित प्रोत्साहने देण्याचे ठरवण्यात आले आहे. विशाल प्रकल्पांसाठी, तालुक्याच्या वर्गवारीनुसार

असलेल्या रोजगारनिर्मितीच्या किमान मर्यादेपेक्षा, दुप्पट रोजगारनिर्मिती करणाऱ्या उद्योगांना, अतिरिक्त प्रोत्साहन कालावधी आणि अतिरिक्त औद्योगिक विकास अनुदान देण्यात येणार आहेत.

**तीन नवे इंडस्ट्रिअल कॉरिडॉर**

राज्यात उद्योगाच्या वाढीसाठी, औद्योगिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी समिती, प्रशासकीय कार्यपद्धतीचे सुलभीकरण, कौशल्य विकास कार्यक्रम, आजारी उद्योगांचे पुनर्वसन, दिल्ली-मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉर आणि मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि मुंबई-पुणे-सोलापूर तसेच मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे दुय्यम वाढीचे कॉरिडॉर तयार करण्यात येणार आहेत.

पुणे जिल्ह्यातील चाकण व तळेगाव या औद्योगिक क्षेत्रात जनरल मोटर्स, व्होक्सवॅगन, बजाज ऑटो, मर्सिडिज बेंझ, महिंद्रा अॅण्ड महिंद्रा, हुंडाई, ब्रिजस्टोन, चिनी आंतरराष्ट्रीय ट्रक उत्पादक कंपनी फोटॉन या राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पूर्ण क्षमतेने स्वत:चे प्रकल्प उभारले आहेत. आज या ठिकाणी सुमारे १८ लाख वाहनांची दरवर्षी निर्मिती होणार आहे. या ठिकाणचे बहुतेक प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. देशातील सर्वाधिक वाहनांची निर्मिती करणारे शहर म्हणून चाकण-तळेगावचा गौरव केला जातो.

**विदेशी गुंतवणुकीत देशात प्रथम**

विदेशी गुंतवणुकीत राज्याचे उद्योग विश्वातील स्थान संपूर्ण देशात क्रमांक एकवर आहे, त्याला कारण आहे राज्यातील उद्योगांचा विभागनिहाय विकास. उद्योगांचे हब निर्माण करणाऱ्या औद्योगिक वसाहती विकसित झाल्या. त्यामध्ये उद्योगांना सवलती आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्याचे सकारात्मक परिणाम आज दिसत आहेत. शासकीय व निमशासकीय उद्योगात रोजगाराच्या संधी वाढण्यास मर्यादा पडताहेत. परंतु खाजगी उद्योगक्षेत्रात मात्र रोजगारांच्या विपुल संधी उपलब्ध होत आहेत. या कारणामुळे राज्यात नामवंत उद्योगसमूहांनी मोठी आर्थिक गुंतवणूक करून, प्रकल्प सुरू करण्यास सुरुवात केल्यानंतर मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ लागला आहे.

**सुनियोजित नागरीकरण**

महाराष्ट्र हे सर्वाधिक वेगाने नागरीकरण होणारे राज्य आहे. मुंबई, पुणे, नागपूर अशा मोठ्या शहरांकडे नोकरी, रोजगाराच्या चांगल्या संधीमुळे ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने येतात. याचा परिणाम या शहरांच्या नागरी सुविधांवर होतो.या सुविधा कितीही वाढविल्या तरी त्या अपुऱ्या पडू लागतात. निवास, पाणी, कचरा, सांडपाणी, आरोग्य, कायदा व सुव्यवस्था अशा अनेक समस्यांची मालिका सुरू होते. याचबरोबर ग्रामीण भागाचेही निमशहरी भागात रूपांतर मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे. घरांची बांधकामे, वस्त्या वाढू लागल्या आहेत. हा सर्व विकास नियंत्रित आणि नियमबद्ध झाला पाहिजे, तरच भविष्यकाळात वाढत्या वस्त्यांना पुरेशा नागरी सुविधा देता येतील. यासाठी प्रत्येक शहराचा विकास नियोजन आराखडा अद्ययावत करण्यावर आम्ही भर दिला आहे.

शहरी भागात घरांची समस्या तीव्र असते. यामुळे अनधिकृत बांधकाम व झोपडपट्ट्यांचा प्रश्न निर्माण होतो. हे प्रश्न सोडवण्याचा एकच पर्याय हा आहे की, ते निर्माण होऊ द्यायचे नाहीत. त्यामुळेच यापुढे सुनियोजित नागरीकरणावर भर दिला जाणार आहे. जुन्या आणि दाटीवाटीच्या इमारतींच्या सामूहिक विकासाचे (क्लस्टर) धोरण आम्ही तयार केले आहे. झोपडीमुक्त मुंबईच्या दिशेने प्रयत्न करण्यात येत आहेत. धारावीच्या पुनर्विकासाचा महत्त्वांकाक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

**महामुंबईत पायाभूत सुविधा**

मुंबईसारख्या महानगराचे प्रश्न वेगळे आहेत. मुंबईचा विस्तार आता महामुंबईत झाला आहे. महामुंबईमध्ये पायाभूत सुविधा निर्मितीची




हजारो कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे, तशीच ती देशाची आर्थिक राजधानीही आहे. म्हणूनच हे शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे, या दिशेने आम्ही प्रयत्न करीत आहोत. 'मुंबई महानगर प्रदेश' म्हणजेच (एमएमआर) भविष्यातील महामुंबईचा चेहरा, पायाभूत सुविधा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या राहतील, यावर आमचा कटाक्ष राहणार आहे. यासाठी आणि एकंदरच नागरी विकासासाठी आम्ही अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मेट्रो, मोनो, प्रस्तावित मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सहारा एलिव्हेटेड रोड, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, नुकताच पूर्ण झालेला पूर्व मुक्तमार्ग हे प्रकल्प मुंबईच्या वाहतूक व दळणवळण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवणार आहेत.

नगररचनेच्या अनुषंगाने आम्ही चटईक्षेत्र निर्देशांक, पर्यावरणपूरक इमारती यासंदर्भात महत्त्वाच्या सुधारणा केल्या. गरीब, सर्वसामान्यांना परवडणारी घरे मिळावीत, म्हणून आम्ही विविध प्रकल्प राबवत आहोत. नुकतीच ७००० गिरणी कामगारांना माफक दरात घरे उपलब्ध

करून देण्याचे आमचे वचन आम्ही पूर्णत्वास नेले असून सदनिका देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. येत्या तीन ते चार वर्षात मुंबईचे रूप पूर्णत: पालटून जगाच्या नकाशावर हे ऐतिहासिक, व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे शहर सन्मानाने झळकू लागेल, असा मला विश्वास वाटतो.

सदनिकाधारकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम २०१२ नुसार गृहनिर्माण नियामक आयोगाची स्थापना करण्यात येत आहे. सदनिकाधारकांना दिलासा देणारा अशा प्रकारचा निर्णय घेणारे, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. वीस हजार चौरस मीटरपेक्षा मोठे भूखंड विकसित करून उभारण्यात येणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये अल्प उत्पन्न गटांसाठी २० टक्के सदनिका राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**विशेष पटपडताळणी मोहीम**

शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकारांना आळा बसावा व सामाजिक बांधिलकीने काम करणा-या संस्थांना प्रोत्साहन मिळावे, या दृष्टीने मागील वर्षी प्रथमच पट पडताळणी मोहीम हाती घेण्यात आली. राज्यात एकूण १,०३,४८७ शाळा असून त्यापैकी ८८,५०९ शाळा अनुदानित आहेत. अनेक शाळांमधून बोगस विद्यार्थी दर्शवून जास्तीच्या शिक्षकांच्या नियुक्त्या करीत असल्याच्या तक्रारी विचारात घेऊन संपूर्ण राज्यात विशेष पटपडताळणीची ही मोहीम जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राबवण्यात आली. यातून शिक्षणक्षेत्रातील गैरप्रकारांना आळा बसणार असून भविष्यात आवर्ती स्वरूपाची मोठी बचत साध्य होणार आहे.

**शिक्षण हक्काचा कायदा**

भारत सरकारने शिक्षण हक्काचा कायदा आणला आहे. या कायद्यांतर्गत सर्व बालकांना गुणात्मक शिक्षण घेण्याचा मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ हा १ एप्रिल २०१० पासून देशात लागू करण्यात आला. राज्यात या अधिनियमाची अंमलबजावणी प्रभावीरीत्या करण्यासाठी या अधिनियमांतर्गत नियमावली तयार करण्यात आली आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आम्ही ठरवले आहे.

राज्यातील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण नजीकच्या शाळेत



## शिक्षणाचा गुणात्मक विकास



राज्यात सर्वदूर शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्या तरी शिक्षणाचा गुणात्मक विकास साधण्यासाठी विद्यार्थी केंद्रीभूत शिक्षण व्यवस्था जाणीवपूर्वक राबवण्याची आवश्यकता आहे. शिक्षणव्यवस्था कालसुसंगत राहिली नाही, तर ती कुचकामी ठरते, ही वस्तुस्थिती आहे. भविष्यातील आव्हाने पेलावयाची असतील तर जागतिक बदलाचे प्रतिबिंब अभ्यासक्रमात व शिक्षण व्यवस्थेत उमटणे आवश्यक आहे. आजच्या संगणक युगातील व २१व्या शतकातील आव्हाने पेलण्यास एक सक्षम पिढी घडवायची असेल तर आम्हाला या सर्व बदलांना सामोरे जावेच लागेल. म्हणूनच शिक्षणाच्या दर्जात वाढ करण्यासाठी जाणीवपूर्वक पावले उचलण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

शिक्षणाचा दर्जा उंचवावा, यासाठी अभ्यासक्रम आराखडयामध्ये बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही घेतला आहे. यासाठी प्रथमच इयत्ता पहिली ते बारावीसाठीचा सलग विचार करणारा राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार केला. इयत्ता पहिली ते आठवीच्या अभ्यासक्रमामध्ये पुढील तीन वर्षात टप्प्याटप्प्याने बदल करण्यात येणार आहे. तसेच यावर्षी इयत्ता नववी व अकरावीचा अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमाशी समकक्ष करण्यात आलेला असून पुढीलवर्षी इयत्ता दहावी व बारावीच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात येणार आहे.

**कौशल्य वृद्धी अभियान**

शिक्षण रोजगाराभिमुख हवे, असे आपण म्हणतो, तेव्हा विद्यार्थ्याने घेतलेल्या शिक्षणामध्ये रोजगारविषयक कौशल्यांचा समावेश असणे आवश्यक असते. याच उद्देशाने अत्यंत महत्त्वाकांक्षी असे कौशल्य वृद्धी अभियान हाती घेण्यात आले आहे. आजच्या युगात युवकांना तंत्रशिक्षण देणे रोजगाराच्या दृष्टीने आवश्यक ठरते. त्यामुळे राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या विकास व सुधारणांचा मोठा कार्यक्रम आम्ही राबवत आहोत. सार्वजनिक - खाजगी सहभाग (पब्लिक - प्रायव्हेट - पार्टीसिपेशन - पीपीपी) तत्त्वावर राज्यात २५० औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत करण्यात आल्या आहेत. २८ शासकीय आदिवासी निवासी आश्रमशाळा या आदिवासी निवासी व्यवसायाभिमुख तंत्रशाळांमध्ये रूपांतरित (मिनी आयटीआय) करण्यात आल्या आहेत.





मिळावे म्हणून शासनाने मराठी शाळांच्या परवानगीसाठी बृहतआराखडा तयार केला. त्यानुसार २,३७२ गावांमध्ये शाळा सुरू करण्यात येत आहेत. तसेच इतर माध्यमांच्या शाळा आवश्यकतेनुसार मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण मिळावे, या दृष्टीने शाळांमध्ये ३००० संगणक प्रयोगशाळा उभारण्यात आल्या आहेत. तसेच यावर्षी आणखी नव्याने ५००० संगणक प्रयोगशाळा सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त शिक्षण व प्रशिक्षणामध्ये E-learning d Virtual Class Room चा भावी काळात प्रभावी वापर करण्याचा शासनाचा मानस आहे.

**इंग्रजीत सुधारणा**

'English Improvement' चा कार्यक्रम–

शालेय शिक्षण विभाग व ब्रिटिश कौन्सिल यांच्यामार्फत राज्यातील काही शाळा इंग्लंडमधील (United Kingdom) शाळांसोबत Global School Partnership तसेच Connecting Classroom या उपक्रमांतर्गत जोडण्यात आल्या आहेत. ब्रिटिश कौन्सिलच्या मदतीने शाळांमध्ये 'English Improvement'चा कार्यक्रम राबवण्यात येत आहे.

आदिवासी विकास, अल्पसंख्याकांचा विकास, महिला व बालविकास, आरोग्य, क्रीडा, युवक कल्याण अशा अनेक विभागांमध्ये गेल्या चार वर्षांच्या काळात अतिशय महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. विकास ही केवळ काही दिवसांत घडणारी गोष्ट नसते, तर ती एक निरंतर प्रक्रिया आहे.

आपण कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहे. सर्वसामान्य माणूस हाच विकासाचा केंद्रबिंदू असला पाहिजे, हीच आमची धारणा आहे. त्यामुळेच सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे तात्कालिक फायद्याच्या योजनांपेक्षा कायमस्वरूपी हिताचे निर्णय घेण्यावरच आम्ही भर दिला.

शेतकरी हा या राज्याचा खरा मालक आहे. लाखोंचा पोशिंदा असणाऱ्या या बळीराजावर जेव्हा आर्थिक, नैसर्गिक संकटे आली तेव्हा त्याला पुन्हा जोमाने उभा करण्यासाठी राज्य सरकार नेहमीच तत्पर राहिले आहे. राज्यातील शेतकरी आणि उद्योजक हे दोन महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या अडचणींकडे आम्ही नेहमीच प्राधान्याने लक्ष दिले आहे. सर्वसामान्य माणसाच्या, कष्टकऱ्याच्या व शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरील हास्य हेच विकासाचे खरे निदर्शक आहे. त्यासाठीच आम्ही आमची सारी शक्ती पणाला लावली आहे. सुप्रशासन, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या माध्यमातून, आम्ही देशातील आघाडीवरचे, सुखी व संपन्न राज्य हा आमचा लौकिक कायम टिकवू, असा आमचा ठाम विश्वास आहे.



**सतीश लळीत,**
मुख्यमंत्र्यांचे मुख्य
जनसंपर्क अधिकारी




# मराठीचा विकास : मराठीचा सन्मान

⇨ मराठी भाषा विभागाचे marathibhasha.maharashtra.gov.in स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती. त्यामध्ये शासन व्यवहार कोश हे भाषा संचालनालयाचे प्रकाशन ई बुक स्वरूपात उपलब्ध. मराठी भाषेशी संबंधित उपयुक्त माहिती उपलब्ध. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या ई गव्हर्नन्स स्पर्धेत उत्कृष्ट संकेतस्थळ या प्रकारामध्ये रौप्य पुरस्कारासाठी मराठी भाषा विभागाच्या संकेतस्थळाची निवड.

राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची प्लॅटिनम पुरस्कारासाठी निवड. संकेतस्थळ वेळावेळी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू.

⇨ मराठी भाषेतील साहित्यविषयक उपक्रम एकत्रितपणे राबवण्यासाठी मुंबईस्थित धोबीतलाव, रंगभवन येथील जागेत भाषा भवन बांधण्यास तत्त्वत: मान्यता. त्यानुसार या संदर्भातील नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक तयार. जमिनीचे हस्तांतरण, वारसा जतन विषयक परवानगी इ. बाबतची कार्यवाही सुरू.

⇨ मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाच्या निकाषानुसार प्रस्ताव तपासणीसाठी समिती स्थापन. या समितीमार्फत प्राप्त. अहवाल केंद्र शासनास पाठवण्यात आला.

⇨ मराठीतील राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त साहित्यकृतीतील निवडक कलाकृती त्याचप्रमाणे संत वाङ्मय श्राव्य पुस्तकांच्या स्वरूपात जतन करण्याच्या हेतूने संत रामदास स्वामी रचित दासबोध, स्व. यशवंतराव चव्हाण यांचे कृष्णाकाठ, कवी कुसुमाग्रजांच्या प्रवासी पक्षी व रसयात्रा आणि विंदा करंदीकर यांच्या आदिमाया व संहिता या पुस्तकांचे श्राव्य पुस्तकात रूपांतर करून त्यांचे लोकार्पण करण्यात आले. या पुस्तकांच्या श्राव्य सिडीज तयार. तुकाराम गाथा व ज्ञानेश्वरी या ग्रंथांचे श्राव्य पुस्तकामध्ये रूपांतर करण्याचे काम सुरू.

⇨ मराठी भाषा विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची ४४४, भाषा संचालनालयाची ४८ व राज्य मराठी विकास संस्थेची ८ अशा ५०० महत्त्वाच्या प्रकाशनांची ई- पुस्तके तयार करण्याचा निर्णय. त्या अनुषंगाने सी- डॅक या संस्थेमार्फत काम सुरू.

⇨ दुर्मीळ ग्रंथांतून ग्रंथित होणारा खूप मोठा वाङ्मयीन आणि सामाजिक इतिहास जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचे स्कॅनिंग करून तो जनतेला उपलब्ध करून देण्याचा निर्णय. या प्रकल्पाद्वारे ९५६ दुर्मीळ ग्रंथ/नियतकालिके यांचे स्कॅनिंग करून जनतेला एकाच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

- मराठी भाषेतील साहित्यविषयक उपक्रम एकत्रितपणे राबवण्यासाठी मुंबईस्थित धोबीतलाव, रंगभवन येथील जागेत भाषा भवन बांधण्यास तत्त्वत: मान्यता.
- राज्य साहित्य संस्कृती मंडळाची ४४४, भाषा संचालनालयाची ४८ व राज्य मराठी विकास संस्थेची ८ अशा ५०० महत्त्वाच्या पुस्तकांची ई- पुस्तके तयार करण्याचा निर्णय.
- ४ ते ५ सुरेख युनिकोड आधारित टंक मुक्तस्रोत स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा निर्णय. सी-डॅकमार्फत कार्यवाही सुरू.

⇨ तंजावूर येथील सरस्वती महाग्रंथालय तसेच तमीळ विद्यापीठ येथे उपलब्ध असलेल्या एकूण ४,५०,००० मोडी लिपीतील कागदपत्रांचे देवनागरीकरण करून ते प्रकाशित केले जातील.

⇨ महाजालकावर आणि संगणकावर युनिकोड ही संकेतप्रणाली वापरून मराठीचा वापर वाढत असला तरी मराठी मजकूर दिसण्यासाठी आवश्यक असलेल्या युनिकोड आधारित टंकांची कमतरता व उपलब्ध असलेल्या सध्याच्या टंकांमध्ये असलेल्या त्रुटी विचारात घेऊन ४ ते ५ देखणे व सुरेख युनिकोड आधारित टंक (Fonts) तयार करून जनतेला मुक्तस्रोत स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा निर्णय. त्यानुसार सी-डॅकमार्फत टंक तयार करण्याचे काम सुरू.

⇨ महाराष्ट्र-कनार्टक सीमा भागामध्ये मराठी भाषा व संस्कृतीचा वारसा टिकविण्यासाठी तसेच समृद्ध करण्यासाठी झटत असलेल्या १३ मराठी भाषिक संस्थांना आर्थिक पाठबळ. त्या संस्थेमार्फत मराठी भाषा आणि साहित्यविषयक उपक्रम राबवण्यासाठी २०१२-१३ मध्ये रुपये ५० लक्ष इतके अनुदान वितरित.

⇨ मराठी विश्वकोश खंड १९प्रकाशित. खंड ७ ते १९ विश्वकोश निर्मिती मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध. विश्वकोश खंड २० चे संपादकीय काम सुरू.

⇨ भारतीय संविधानाच्या सहाव्या आवृत्तीच्या २००० प्रतींची छपाई करून विक्रीसाठी उपलब्ध.

⇨ दलित-ग्रामीण साहित्य पहिला भाग, वैद्यकीय व्यवहारात मराठी, वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड-४, मराठी ग्रंथसूची, मराठी भाषिक टप्पे-सीडी, संस्थेकडून प्रकाशित झालेल्या प्रकाशनांचे पुनर्मुद्रण व ई- पुस्तके, मानव्य विद्याविषयक पुस्तकांचा अनुवाद इत्यादी कामे सुरू.

⇨ मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी नेमलेल्या भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ समीक्षक डॉ. नागनाथ कोतापल्ले यांची नियुक्ती. पुढील २५ वर्षांसाठी मराठी भाषेचे धोरण ठरविणे भाषा विकासासाठी नवे उपाय, कार्यक्रम ठरविणे यासाठी शासनाला ही समिती मार्गदर्शन करेल.


**ललिता देठे**
उपसचिव, मराठी भाषा विभाग

# श्रेय जनतेचे



राज्यातील जनतेचा आशीर्वाद, विश्वास आणि पाठिंब्याच्या बळावर आघाडी शासन राज्यात सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आल्याच्या घटनेला  नोव्हेंबर महिन्यात चार वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या चार वर्षांच्या कालावधीत राज्यात अनेक पायाभूत सुविधा आपण निर्माण केल्या. कृषी, उद्योग, शिक्षण, सहकार, सिंचन, ऊर्जा अशा क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली. राज्याच्या विकासाला, प्रगतीला नवी दिशा आणि गती देण्यात, नागरिकांचे जीवनमान उंचावण्यात आपल्याला बऱ्यापैकी यश मिळाले.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष याच कालावधीत आपण साजरे केले. त्या माध्यमातून या थोर नेत्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न केला. समाजातील महिला, युवक, विद्यार्थी यांच्या तसेच दुर्बल, वंचित उपेक्षित घटकं च्या सर्वांगीण विकासासाठी, अनेक क्रांतिकारी निर्णय या चार वर्षांच्या कालावधीत घेतले. त्याचे सकारात्मक परिणाम आता पाहायला मिळत आहेत.

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्व घटकांना सामावून घेण्यात येत आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या आपल्या माता-भगिनींची आहे. महिलांची ही मोठी शक्ती जर सामाजिक क्षेत्रात आणि निर्णयप्रक्रियेत सहभागी झाली, तर राज्याच्या विकासप्रक्रियेला निर्णायक दिशा मिळेल; या उद्देशाने राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांमध्ये ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला आणि त्याची तातडीने अंमलबजावणी केली. विविध स्थानिक स्वराज्यसंस्थांवर दीड लाखांहून अधिक महिला प्रतिनिधी निवडून आल्या आहेत. सरपंचपदापासून, जिल्हा परिषद अध्यक्ष, नगराध्यक्ष, महापौर अशा जबाबदाऱ्या त्या आत्मविश्वासाने पार पाडत आहेत.

### सिंचनक्षमतेत वाढ

राज्याच्या कृषिउत्पन्न वाढीसाठी सिंचनक्षमतेत वाढ आवश्यक होती. त्यासाठी जलसंपदा विभागाने सातत्याने प्रयत्न केले. २००७-०८ ते २०११-१२ या पाच वर्षांच्या कालावधीत राज्याच्या सिंचन क्षमतेत ५.९५ म्हणजे जवळपास ६ लाख हेक्टरने वाढ झाली. बांधकाम सुरू असलेल्या १०९२ प्रकल्पांपैकी जवळपास निम्म्या प्रकल्पांची कामे पूर्ण झाली असून ५८९ प्रकल्पांची कामे सुरू आहेत. सिंचन व्यवस्थापनात प्रशासकीय आणि वित्तीय सुधारणांची अंमलबजावणी, वार्षिक सिंचन, जललेखा आणि प्रकल्पांच्या बेंच मार्किंग अहवालांचा नियमित आढावा, अशा विविध माध्यमातून निर्मित सिंचन क्षमतेनुसार पाणीवापर वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. केंद्राच्या वेगवर्धित सिंचन लाभ

कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्राला ६९ मोठ्या आणि मध्यम प्रकल्पांसाठी तसेच १८६ लघुप्रकल्पांसाठी ११ हजार ६९ कोटींचा देशात सर्वाधिक निधी मिळाला आणि त्यातून ४० मोठे-मध्यम आणि १८६ लघुप्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत.

सिंचनक्षमता वाढीसाठी २०१२ मध्ये राज्यात सिमेंट काँक्रिट नाला बांध हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला. पहिल्या टप्प्यात १५० कोटी खर्चून सहा जिल्ह्यांच्या १५ तालुक्यात हा कार्यक्रम राबवण्यात आला. प्रत्येक बंधाऱ्यावर सरासरी १० लाख रुपये खर्च करून ४७४ गावांमध्ये १५०४ बंधाऱ्यांचे काम सुरू केले. आजमितीला जवळपास १,४९० बंधारे बांधून पूर्ण झाले. यातून ८०० दशलक्ष घनफूट पाणीसाठा आणि १० हजार ३०३ हेक्टर संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. यामुळे खटाव, मान तालुक्यासारख्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढून विहिरींच्या पाणीपातळीतही वाढ झाली आहे. दुसऱ्या टप्प्यात ६६५ कोटी रुपये खर्च करून १,५६० बंधारे बांधण्याचे नियोजन आहे. पुढील वर्षापर्यंत ही कामेदेखील पूर्ण होतील, अशी अपेक्षा आहे. अशा विविध उपाययोजनांमधून महाराष्ट्राची सिंचन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न असून कृषी उत्पन्नवाढीला आणि कृषी प्रगतीला हातभार लागत आहे.

**तंबाखूजन्य उत्पादनांवर बंदी**

युवक आपल्या राज्याचे भविष्य आहेत. युवकांची ही शक्ती निरोगी, व्यसनमुक्त आणि सुदृढ असावी, असे मला वाटते. त्यासाठी गुटखा, पानमसाला, जर्दा, तंबाखयुक्त सुगंधी सुपारी अशा तंबाखुजन्य उत्पादनांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आणि ही बंदी प्रभावीपणे राबवली. या निर्णयामुळे राज्याचा १०० कोटींहून अधिकचा महसूल बुडाला. तरी राज्याच्या व्यापक हितासाठी आपण या निर्णयावर ठाम राहिलो. या माध्यमातून व्यसनमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने एक आश्वासक पाऊल आपण टाकले आहे.

गेली काही वर्षे राज्यात विजेच्या भारनियमनाचा प्रश्न गंभीर होता. तो सोडवण्यासाठी चार वर्षांपूर्वी संपूर्ण राज्य भारनियमनमुक्त करण्याचा संकल्प सोडून त्या दिशेने प्रयत्न सुरू करण्यात आले. आज राज्य

## महिलांचे सक्षमीकरण

महिलांचे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक सक्षमीकरण हा आघाडी शासनाचा सर्वोच्च प्राधान्याचा विषय राहिला आहे. शिक्षण, विज्ञान, माहिती-तंत्रज्ञान, संशोधन, बँकिंग, क्रीडा अशा सर्व क्षेत्रात महिलांनी मोठ्या संख्येने पुढे यावे यासाठी शासन त्यांना प्रोत्साहन देत आहे. महावितरणामध्ये लाइन वुमन म्हणून २,५०० मुलींची भरती करण्यात आली. कुठलीही लेखी किंवा तोंडी परीक्षा न घेता केवळ दहावी आणि आयटीआय परिक्षेतील गुणांवर या सर्वसामान्य कुटुंबातील मुलींना ही नोकरी मिळाली. हे संपूर्णपणे नवीन क्षेत्र मुलींसाठी पहिल्यांदा खुले करण्याचा मान आपल्या राज्याला मिळाला आहे.



महिलांनी क्रीडाक्षेत्रात पुढे यावे, यासाठी आपण महिला खेळाडूंनाही प्रोत्साहन देत आहोत. कबड्डीचा विश्वकप जिंकणाऱ्या भारतीय संघातील महाराष्ट्राच्या तीन महिला खेळाडू तसेच विश्वविजेती नेमबाज राही सरनोबत यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी त्यांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची रोख बक्षिसे देऊन शासनातर्फे त्यांचा गौरव करण्यात आला. एवढे मोठे बक्षीस यापूर्वी कोणत्याही महिला खेळाडूला मिळाले नव्हते.

महिला बचत गटांची चळवळ ही स्त्रीशक्तीचं द्योतक बनली आहे. या चळवळीला शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्यात येत आहे. बचत गटांना अत्यल्प दराने वित्तपुरवठा करण्यासह अनेक योजना राबवण्यात येत आहेत.

महिलांचे संरक्षण आणि सक्षमीकरणासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. त्यासाठी अनेक नवीन योजना सुरू करण्यात आल्या. स्त्रीभ्रूण हत्या रोखणे, मुलींच्या शिक्षणाची सोय करणे, त्यांचे आरोग्य सुधारणे, बालविवाह रोखणे, मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक तरतूद करणे, मुलींच्या जन्माबाबत सकारात्मक विचार रुजवणे आणि वाढवणे अशा व्यापक दृष्टिकोनातून 'सुकन्या' योजना सुरू केली. या योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात मुलीच्या जन्मानंतर एक वर्षाच्या आत तिच्या नावे २१ हजार २०० रुपये गुंतवण्यात येणार असून १८ वर्षांनंतर त्या मुलीला १ लाख रुपये देण्यात येणार आहेत. बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार किंवा ॲसिड हल्ल्याच्या घटनेनंतर मानसिकदृष्ट्या खचलेलल्या महिला आणि बालकांना धीर देण्यासाठी 'मनोधैर्य योजना' ही नवी योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत पीड्ति व्यक्तीला दोन ते साडेतीन लाखांपर्यंत मदत करण्याचा निर्णय घेतला. महिलांवरील अत्याचार रोखण्याचे प्रयत्न करीत असताना पीडित महिलांना दिलासा देण्याचा हा एक प्रयत्न आहे.

समाजातील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे ज्येष्ठ नागरिक. समाजातील अनुभवी आणि मार्गदर्शक ठरेल असा हा फार मोठा वर्ग आजवर उपेक्षित राहिला होता. या वर्गाचा मान, सन्मान अबाधित रहावा, त्यांच्या जीविताचे, मालमत्तेचे, आरोग्याचे रक्षण व्हावे, त्यांना निवासाची किंवा वैद्यकीय उपचारांची समस्या भेडसावू नये, सामाजिक सुरक्षेच्या बरोबरीने त्यांना आर्थिक सुरक्षिततादेखील मिळावी, अशी अनेक उद्दीष्टे डोळ्यासमोर ठेवून राज्याचे स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्यात आले आहे.

संपूर्णपणे भारनियमनमुक्त आहे. या चार वर्षांच्या काळात राज्याची वीजनिर्मिती आणि उपलब्धतेची क्षमता वाढवणे, वीजचोरी आणि वीजगळती रोखण्यासारख्या उपाययोजनांच्या माध्यमातून राज्य भारनियमनमुक्त करण्यात यश मिळाले आहे. राज्याच्या एकूण १२ हजार मेगावॅट मागणीइतकी वीज आज उपलब्ध केली जात आहे. मात्र, ज्या वीभागात वीजगळती आणि वीजचोरीचे प्रमाण अधिक आणि बिले भरण्याचे प्रमाण कमी आहे, केवळ अशाच भागात तोटा आटोक्यात ठेवण्यासाठी आज भारनियमन करावे लागत आहे. जवळपास ८२ टक्के महाराष्ट्र आज भारनियमनमुक्त आहे. रमजान ईद, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दिवाळीसारखे सण आणि उत्सवांच्या काळात तर कुठेही भारनियमन न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

### शेतकऱ्यांना साहाय्य

शासनाचा प्रत्येक निर्णय हा शेतकरी हिताचाच राहील याची पूर्ण काळजी आम्ही घेतली. राज्यातल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी १ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, तर तीन लाखांपर्यंतचं पीक कर्ज २ टक्के व्याजानं देण्याचा निर्णय आपण घेतला. आजमितीला राज्यात सुमारे अडीच लाख कृषिपंपांना सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून दिली जात आहे. त्याचा फायदा कृषिउत्पन्न वाढीसाठी होत आहे. वादळ, वारा, महापूर, दुष्काळ, पिकांना रोग-किडींची लागण अशा प्रत्येक संकटाच्या वेळी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन नेहमीच पुढे राहिले आहे.



गेली तीन वर्षे राज्यातील काही जिल्ह्यांना पावसाअभावी तीव्र दुष्काळाचा सामना करावा लागला. २०११ मध्ये १५ जिल्ह्यातल्या जवळपास ८ हजार गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती होती. गेल्या वर्षी १२३ तालुक्यांना आणि तितक्याच गावांना दुष्काळाची झळ बसली. यावर्षी तर १९७२ नंतरच्या सर्वात भीषण दुष्काळाचा सामना करावा लागला. दुष्काळाच्या प्रत्येक वेळी राज्यशासन सर्व शक्तीनिशी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी खंबीरपणे उभे राहीले. यावर्षीचा विचार केला तर, यावर्षी राज्यातील ४,५५९ गावे आणि ११,३३३ वाड्या अशा साधारण १५,८९२ वस्त्यांमध्ये ५ हजार ५४१ टँकरच्या माध्यमातून आपण पाणीपुरवठा केला. दुष्काळग्रस्त भागात १३१७ चारा छावण्या सुरू करून ८ लाख ५२ हजार ७३३ मोठी जनावरे आणि १ लाख २७ हजार २६६ छोटी अशा साधारणपणे ९ लाख ७९ हजार ९९९ जनावरांच्या चारा-पाण्याची सोय केली. एका वेळी जवळपास दहा लाख जनावरे छावणीत सांभाळली. चारा छावण्यांसाठी १ हजार ४३४ कोटी रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करून दिला. अगदी २२ सप्टेंबर २०१३ पर्यंत चारा छावण्या सुरू ठेवून शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आपण यशस्वी ठरलो. शेतकऱ्यांच्या मदतीत शासनाने कधीच हात आखडता घेतला नाही, हे याठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे.

### अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना दिलासा

यंदा पाऊसपाणी चांगले होऊन राज्य दुष्काळाच्या छायेतून बाहेर पडत असताना, विदर्भाला मात्र अतिवृष्टीमुळे नुकसान सहन करावे लागले. विदर्भातल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना दिलासा देण्यासाठी १९३४ कोटी ५० लाख रुपयांची मदत शासनाने जाहीर केली. यापैकी ३७४ कोटी ५० लाख रुपये शेतकऱ्यांना तसेच वैयक्तिक नुकसान भरपाईसाठी मिळणार आहेत. रस्ते आणि सार्वजनिक मालमत्तेच्या दुरुस्तीसाठी ७२० कोटी रुपये, दीर्घकालीन पूर नियंत्रण उपाययोजनांसाठी ८४० कोटी रुपये खर्च करण्याचे नियोजन आहे.

### तीर्थक्षेत्र विकास

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. त्यामुळे इथल्या तीर्थक्षेत्रांच्या विकासाचा व्यापक कार्यक्रम राबवण्यात येत आहे. तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, पालखीतळ क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या निर्मितीसाठी साडेसातशे कोटींचा आराखडा अमलात येत असून त्यातील सर्व कामे पुढील वर्षापर्यंत पूर्ण होतील, अशी अपेक्षा आहे. शेगावच्या संत गजानन महाराज समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त शेगाव येथे मूलभूत सुविधांच्या ३६० कोटींच्या विकास आराखड्याची अंमलबजावणी सुरू आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मशताब्दीच्या निमित्ताने अमरावती जिल्ह्यातील श्रीक्षेत्र मोझरी परिसराच्या १२५ कोटींच्या आराखड्यानुसार विकासकामांना सुरुवात झाली आहे. श्री क्षेत्र जेजुरी, परशुराम तीर्थक्षेत्र-रत्नागिरी, संत गाडगेबाबा निर्वाण भूमी, वलगाव, ता. जि. अमरावती, कविवर्य मोरोपंतांचा बारामती येथील वाडा, काशीविश्वेश्वर मंदीर-बारामती, श्रीक्षेत्र कौंडिण्यपूर (ता. तिवसा, जि. अमरावती) अशा अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद केली आहे.

### चैत्यभूमी परिसराचा विकास

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्राचे आणि देशाचे भूषण आहेत. त्यांचे जागतिक दर्जाचे भव्य स्मारक चैत्यभूमी परिसरात उभे राहावे यासाठी दादरच्या इंदू मिलची जागा केंद्राकडून मिळवण्यात आपण यशस्वी ठरलो. त्या जागेवर लवकरच डॉ. बाबासाहेबांचे भव्य स्मारक उभे राहावे, असे आपले प्रयत्न आहेत. मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकास हे आपले प्रमुख ध्येय आहे. मागासवर्गीय समाजाचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकास वेगाने होण्यासाठी अनेक निर्णय घेतले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती, वसतिगृहांची सोय, शिष्यवृत्ती आदी सुविधांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. मागासवर्गीय विकासासाठी काम करणाऱ्या विविध महामंडळांचा निधी ५०० कोटींपर्यंत वाढवण्यात आला आहे. यातून मागासवर्गीय बांधवांच्या आर्थिक विकासाला मोठा हातभार लागेल, असा मला

विश्वास आहे.

**अल्पसंख्याकांचा विकास**

अल्पसंख्याक समाजाला सोबत घेतल्याशिवाय राज्याचा विकास निरर्थक आहे, हे लक्षात घेऊन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अधिकृत भांडवल २५० कोटींवरुन ५०० कोटी करण्याचा निर्णय घेतला. त्यातून अल्पसंख्याकाच्या आर्थिक प्रगतीला गती मिळेल. अल्पसंख्याक विद्यार्थी-युवकांना विकासाची व्यापक संधी मिळावी म्हणून शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षणाची सोय, मुलींसाठी वसतिगृहाची सोय, नोकरीसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण, कौशल्यविकास प्रशिक्षण अशा अनेक योजना आपण सुरू केल्या. मुस्लीम समाजाच्या नव्या पिढीला मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळावी म्हणून मदरशांना १० कोटी रुपयांचे अनुदान देण्याचा, तसेच मुंब्रा-ठाणे येथे २५ कोटी रुपये खर्चून जागतिक दर्जाचे आणि देशातील दुसरे इस्लामिक कल्चरल सेंटर स्थापन करण्याचा निर्णय आपण घेतला.

**आरोग्यसेवा**

आरोग्यसेवा हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे. अनेकदा वैद्यकीय उपचार विशेषत: गंभीर आजारांवरील उपचार हे महागडे आणि सर्वसामान्यांना न परवडणारे असतात. ही अडचण लक्षात घेऊन, राज्यातील गरीब आणि मध्यम उत्पन्न गटातील नागरिकांना गंभीर आजारांमध्ये मोफत उपचार मिळावेत यासाठी 'राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना' राबवण्यात येत आहे. याअंतर्गत ५० लाख कुटुंबातील अडीच कोटींहून अधिक नागरिकांना मोफत शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय उपचारांची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. सुरुवातीला ८ जिल्ह्यात राबवलेल्या या कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत २५६ कोटी १३ लाख रुपये खर्चून ९३ हजारांहून अधिक व्यक्तींवर मोफत शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आले. लवकरच संपूर्ण राज्यात ही योजना लागू होत असून राज्यातील दोन कोटी कुटुंबांना तिचा फायदा मिळेल.

इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिस ही नवीन रुग्णवाहिका सेवा सुरू करीत आहोत. अपघातग्रस्त व्यक्तींना तातडीने रुग्णालयात नेण्यासाठी ॲडव्हान्स लाइफसपोर्ट सिस्टिम किंवा अद्ययावत उपचार सुविधा असलेल्या ९३७ रुग्णवाहिका या योजनेंतर्गत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामुळे अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने उपचार मिळून त्यांचा जीव वाचण्यास मदत होणार आहे. यासाठी येत्या ५ वर्षांत १ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, राज्य शासन ६०० कोटी, तर केंद्र ४०० कोटी रुपये देणार आहे.

**महाराष्ट्राची आघाडी**

पायाभूत सुविधांच्या विकासात महाराष्ट्र आज आघाडीवर आहे. राज्यात रस्ते, पूल, परिवहन, मेट्रो आणि मोनो रेल अशा आधुनिक परिवहन सुविधांची निर्मिती, ग्रामविकास, गृहनिर्माण, उद्योग, सांस्कृतिक विकास अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या सर्वच क्षेत्रात राज्याची आघाडी कायम आहे. मुंबई, नवी मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, कोल्हापूर, नागपूर अशा मोठ्या आणि मध्यम शहरांचा विकास तसेच ग्रामीण भागातील सुधारणांचा वेग बघितला तर विकसित राज्याच्या दिशेने सुरू असलेली महाराष्ट्राची वाटचाल आता निर्णायक टप्प्यावर पोहचली असल्याचे लक्षात येईल. मुंबईत मोनो आणि मेट्रो रेल्वेचे काम वेगाने सुरू आहे. लवकरच या दोन्ही सेवा सुरू होतील. पुण्यातही पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट आणि वनाझ ते रामवाडी या दोन मेट्रो रेल्वे मार्गांच्या सुधारित प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. तिथेही कामाला लवकर सुरुवात होईल. ग्रामस्वच्छता, निर्मलग्राम, तंटामुक्त अभियान अशा आगळ्यावेगळ्या अभियानांच्या माध्यमातून राज्याने देशात आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे.

राज्याची प्रगती केवळ भौतिक असून चालणार नाही, तर समाजातील सर्व घटकांना, विशेषत: सर्वात तळाच्या वर्गापर्यंत विकासाचे फायदे पोहचले पाहिजेत, असा आपला प्रयत्न आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचे ध्येय ठेवण्यात आले आहे. सर्वांना शिक्षण, आरोग्यसेवा, कौशल्यवृद्धी, रोजगाराची संधी, मागास घटकांना न्याय, अपूर्ण प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करणे, विकास व नियोजन प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करणे, प्रादेशिक असमतोल दूर करणे, मानव विकास निर्देशांकात सुधारणा घडवून आणणे अशी अनेक उद्दिष्टे पूर्ण करायची आहेत. त्यादिशेने नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत.

राज्याच्या विकासात शासनाची भूमिका, निर्णयक्षमता आणि प्रामाणिक प्रयत्न महत्त्वाचे असतात, परंतु शासनाचे यश हे सर्वस्वी जनतेचा सहभाग आणि पाठिंब्यावर अवलंबून असते. राज्यातील जनतेच्या भरभक्कम पाठिंब्यामुळेच आपण आजवरचे हे यश मिळवू शकलो. राज्याच्या विकासप्रक्रियेला योग्य दिशा आणि गती देऊ शकलो, त्यामुळे विकासाचे संपूर्ण श्रेय हे राज्यातील जनतेचे आहे.

**- संजय देशमुख,**
उपमुख्यमंत्र्यांचे
जनसंपर्क अधिकारी



ऊर्जा

# उजळणारी वीज : घडणारा महाराष्ट्र

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे महानिर्मिती, महावितरण आणि विद्युत पारेषण या तीन कंपन्यांमध्ये रूपांतर झाल्यावर वीज निर्मितीला चालना मिळाली. महानिर्मितीच्या माध्यमातून १२ व्या पंचवार्षिक योजनेत ९३८५ मेगावॅट अतिरिक्त वीज निर्मितीची क्षमता उपलब्ध होणार आहे.

भुसावळ येथे ५०० मेगावॅटचे दोन, खापरखेडा येथे ५०० मेगावॅटचा एक प्रकल्प सुरू झाले असून वीज निर्मितीला सुरुवात झाली आहे. राज्यात नवीन वीज प्रकल्प उभारणीचे काम युध्दपातळीवर सुरू असून या प्रकल्पातून ३२३० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे.

भुसावळ येथील ५० मेगावॅटच्या जुन्या प्रकल्पाऐवजी ६६० मेगावॅटचा प्रकल्प सुरू होणार आहे. नाशिक येथील १२५ मेगावॅटच्या औष्णिक वीज प्रकल्पाऐवजी ६६० मेगावॅटचा बदली संच बसविण्यात येणार आहे. पारस येथे २५० तर धुळे जिल्ह्यातील दोडांई येथे ६६० मेगावॅटचे ५ संच उभारण्याचे नियोजित करण्यात आले आहे.

**सौर ऊर्जा**

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे एकूण ५ मेगावॅट क्षमतेचे सौर संच उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे. साक्री, शिवाजीनगर, जिल्हा धुळे येथील सौर प्रकल्प उभारणीची कामे नुकतीच पूर्ण झाली असून मार्च २०१३ च्या अखेरीपासून त्यातील १२५ मेगावॅट प्रकल्पातून प्रत्यक्ष वीजनिर्मिती सुरू झाली आहे. हा देशातील एकाच ठिकाणी १२५ मेगावॅट इतकी क्षमता असलेला तसेच आशियातील महाकाय सौर ऊर्जा प्रकल्प आहे.



भविष्यात परभणी व उस्मानाबाद , बारामती येथेही संयुक्त भागिदारीच्या नव्या तत्त्वाचा अंगीकार करून जमिनीच्या उपलब्धतेनुसारही सौर प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित आहे. या प्रयत्नांमुळे नजीकच्या काळात महानिर्मितीची सौरऊर्जा क्षमता ५०० मेगावॅटचे ध्येय गाठू शकेल.

महानिर्मितीने संपादित केलेल्या ओरिसातील मच्छकट्टा कोळसा क्षेत्रातून २० दशलक्ष मेट्रिक टन इतक्या कोळशाचे अतिरिक्त उत्खनन करण्यासाठी शासन मान्यता देण्यात आली असून, या योगे एकूण ५० दशलक्ष मेट्रिक टन कोळसा आगामी काळात महानिर्मितीच्या विस्तारित प्रकल्पांना मिळण्यास मदत होणार आहे.

महानिर्मितीने आपल्या कार्यपध्दतीत अत्याधुनिक SAP-ERP प्रणालीची अंमलजबावणी यशस्वीपणे सुरू केली आहे. महानिर्मितीच्या जुन्या २१० मेगावॅट क्षमतेच्या संचांमधून या क्षमतेएवढी वीजनिर्मिती व्हावी यासाठी, तसेच या संचाचे आयुष्यमान वाढण्यासाठी नूतनीकरण व आधुनिकीकरण केले जात आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत चंद्रपूर येथील दोन संच, तसेच कोराडी, भुसावळ, परळी व नाशिक येथील प्रत्येकी एक संच यांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे.

**भारनियमनाला फाटा**


राज्यात सध्या सर्वत्र वाहिनीनिहाय भारनियम करण्यात येत असून ज्या वाहिनीवर वीजबिल वसुली जास्त व वीज वितरण हानी कमी आहे अशा वाहिन्यांवरील भारनियम कमी अथवा मुक्त करण्यात आले आहे. महावितरणाची सध्याची विजेची मागणी सुमारे ११००० ते १२००० मेगावॅट आहे. विजेची उपलब्धता सुमारे ११००० ते १२००० आहे.

वीज उपलब्धतेत वाढ करण्याचा कालबद्ध कार्यक्रम योग्यरीतीने अमलात आणल्याने तसेच वीज वितरणसाठी सक्षम प्रणाली उभारल्याने महावितरणाच्या वीज उपलब्धतेत वाढ झाली आहे. सद्य:स्थितीत वितरण व वाणिज्य हानीवर आधारित अ,ब,क,ड गटातील भारनियमन मागे घेण्यात आले आहे. राज्यातील औद्योगिक वाहिन्यांवरील औद्योगिक ग्राहकांना भारनियमनमुक्त करण्यात आले आहे.

राज्यातील ग्राहकांना रात्रीच्या वीज वापरासाठी २.५० रु प्रति युनिट सूट देण्यात येत आहे. मागणी व्यवस्थापन योजनेंतर्गन सिंगल फेजिंग व कृषी पंप विलगीकरण वाहिन्यांवरील ५० टक्के कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व उर्वरित ५० टक्के कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने देण्यात येत आहे.

अ,ब,क,ड गटात येणाऱ्या सिंगल फेजींग व

- जुलै २०१३ अखेर गावठाण फिडर सेपरेशन योजनेंतर्गत १६४८० इतक्या गावांना फायदा.
- सिंगल फेजिंग योजनेंतर्गत १४९४७ इतक्या गावांना फायदा.
- वर्षाला १,२०,०० कृषिपंपांना वीज पुरवठा केला जातो.



## वीज वितरण हानी मागील चार वर्षात २०.६० टक्क्यांवरून ६ टक्क्याने कमी. देशात सर्वात कमी

एस.डी.टी. असणाऱ्या कृषी वाहिन्यांना २४ तास सिंगल फेज वीज पुरवठा देण्यात येत आहे. स्वतंत्र वाहिन्यांवरील उपसा जलसिंचन योजनांना १६ तास, ३ फेज वीज उपलब्ध करण्यात येत आहे. नक्षलग्रस्त विभागात सायंकाळी ६ ते सकाळी ६ या कालावधीत भारनियमन करण्यात येत नाही. १० वी व १२ वीच्या परीक्षांच्या कालावधीत भारनियमन संध्याकाळी ६.३० ते १० पर्यंत राज्यात सर्वत्र भारनियमन रद्द करण्यात आले होते.

अधिक वितरण वाणिज्य हानी असलेल्या वाहिन्यांवर वीज बिल वसुली वाढवण्याची व चोरी शोधण्याची मोहीम युद्धपातळीवर घेण्यात आली आहे. सर्व उपाययोजनांमुळे सद्य:स्थितीत सुमारे ८२ टक्के महाराष्ट्र भारनियमन मुक्त झाला आहे. त्याचप्रमाणे वाहिन्यांवरील वीज बिल वसुली जास्त व वीज वितरण हानी कमी होत आहे.

राज्यातील वीज वितरण हानी मागील चार वर्षात २०.६० टक्क्यांवरून ६ टक्याने कमी करून १४.६७ टक्के एवढी आहे. ही देशातील इतर वितरण कंपन्यांपेक्षा सर्वात कमी वितरण हानी आहे.

जुलै २०१३ अखेर गावठाण फिडर सेपरेशन योजनेंतर्गत १६४८० इतक्या गावांना फायदा करून देण्यात आला. सिंगल फेजिंग योजनेंतर्गत १४९४७ इतक्या गावांना फायदा झाला आहे. मंडळाची पुनर्रचना होण्याअगोदर साधारणत: वर्षाला ६५००० कृषिपंपांस वीजपुरवठा केला जात होता परंतु कंपनी स्थापनेनंतर वर्षाला १,२०,०० कृषिपंपाना वीजपुरवठा केला जातो.

सध्याच्या, विजेच्या झपाट्याने वाढणाऱ्या मागणीचा विचार करता २०१२-१३ ते २०१५-१६ या वर्षामध्ये येणाऱ्या घरगुती, वाणिज्य, औद्योगिक व कृषी वर्गवारीतील नवीन वीज जोडणी देण्यासाठी सद्य:स्थितीतील वीज वितरण प्रणाली अधिक विकसित, विस्तारित, सक्षम व तिचे वृद्धीकरण व आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. यासाठी महावितरण कंपनीच्या रु. ५,५५६.५ कोटी रकमेचा पायाभूत आराखडा योजना -२ प्रकल्प तसेच रु.९,४३५ कोटी इतक्या रकमेचा पायाभूत आराखडा वितरण प्रणाली वृद्धीकरण व आधुनिकीकरण प्रकल्पास महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली आहे.

**राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना**

केंद्र शासनाने एप्रिल २००५ मध्ये राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना जाहीर केली. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा वाढवून सर्व कुटुंबांना वीज देणे व २००१ च्या जणगणनेनुसार सर्व गावांचे (ज्या गावांची लोकसंख्या १०० पेक्षा जास्त आहे) विद्युतीकरण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबीयांच्या घरांना वीज पुरवठा करताना कोणताही सेवा जोडणी आकार घेण्यात येत नाही. फक्त १५ रु अनामत रकमेचा भरणा करून वीज जोडणी देण्यात येते. नवीन जोडणीसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा सर्व ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्राहकांसाठी सोयीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात ATP (Any Time Payment) मशीन्सद्वारे वीज बिलाचा भरणा करता यावा यासाठी आजतागायत १०१ ATP मशीन्सद्वारे वीज बिल वसुलीचे काम कार्यरत करण्यात आले आहे. सध्या या सुविधेचा ६.०५ लाख ग्राहक वापर करीत आहे.

आतापर्यंत महाऊर्जा प्रकल्पांतर्गत राज्यात ४६०८.८० मेगावॅट वीज निर्माण करण्यात यश आले असून देशात महाराष्ट्र या क्षेत्रात दुसऱ्या क्रमांकावर आहे.



**ग्राहकांना चांगली सेवा देणे, विद्युत वितरण प्रणालित वीज हानी कमी करण्याकरिता तसेच ग्राहकांना सुरळीत व पुरेशा दाबाने वीज पुरवठा व्हावा म्हणून, पायाभूत सुविधा आराखडा-१ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प, मागील तीन वर्षे राबवण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत ६०६ नवीन उपकेंद्रे व ३७६ उपकेंद्रांची क्षमतावाढ तसेच ६९,८७० नवीन वितरण रोहित्रे, उच्चदाब वाहिनी ४,२८९ कि.मी., लघुदाब वाहिनी १२,१२७, कि.मी. इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली.**

**हेमंत खैरे**

# तंत्रज्ञानाचा वापर-पारदर्शकतेवर भर

विक्रीकर विभाग हा राज्याला मिळणाऱ्या महसुलाच्या ६० टक्के महसूल गोळा करणारा महत्त्वाचा विभाग आहे. विभागाचे संगणकीकरणापूर्वीचे काम, कर गोळा करणारे अधिकारी आणि करदाता यांच्या प्रत्यक्ष संपर्कावर आधारित होते. त्यामुळे करदात्यांना छोट्या आणि क्षुल्लक कामाकरिता विक्रीकर कार्यालयात यावे लागत असे. त्यांचा त्रास वाचावा आणि विक्रीकर गोळा करण्यात सुलभता यावी म्हणून, विभागाच्या कामकाजात गतिमानता आणून कर प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी; विभागाचे संगणकीकरण करण्यात आले. www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर करदात्यांना ई-सेवा उपलब्ध करण्यात आली. या संकेतस्थळावर सेवा मिळण्यास व्यापाऱ्यांना काही अडचणी आल्यास सर्व कार्यालयांमध्ये मदत कक्षाची स्थापना करण्यात आली .

**विक्रमी महसूल गोळा करण्याचे उद्दिष्ट**

विक्रीकर विभागाने अनेक यशस्वी उपक्रम राबवले असून वर्ष २०१२/१३ मध्ये ६५ हजार ३८३ कोटी रुपयांचा विक्रमी महसूल गोळा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून यावर्षी सप्टेंबर अखेर ३३ हजार ९६६ कोटींचा महसूल जमा करण्यात आला आहे. खोटे बिल देणाऱ्या व घेणाऱ्यांविरुद्ध मोहीम राबवण्यात आली. २,०५९ व्यापाऱ्यांचा शोध घेण्यात येऊन ४१ हजार ८३२ लाभार्थी व्यापाऱ्यांवर १,६०० कोटी रुपयांच्या वसुलीसाठी कारवाई सुरू करण्यात आली . अशा व्यापाऱ्यांवर कडक कारवाईची आवश्यकता म्हणून कायद्यात सुधारणा करून बिल देणाऱ्या व घेणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी किमन एक वर्षाची सक्षम कारावासाची तरतूद करण्यात आली. या अंतर्गत जुलै महिनाअखेर ८०६ कोटी रुपये वसूल झाले. व्यापाऱ्यांना व काही शासकीय विभागांना खरेदी-विक्री इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करणे अनिवार्य करण्यात आले. इकॉनॉमिक इंटलिजन्स युनिटची स्थापना करण्यात आल्यामुळे डाटा विश्लेषण व्यवस्थित होते. त्यामुळे करचोरी, करचुकवेगिरीची प्रकरणे उघडकीस आणण्यास मदत होते. विक्रीकर कायद्याचे अनुपालन या तत्त्वावर आधारित राज्यातील सर्व व्यापाऱ्यांचे स्टार रेटिंग करण्यात आले आहे. राज्यात सर्व व्यापाऱ्यांना १०० टक्के ई-पेमेंट करणे अनिवार्य करण्यात आल्यामुळे महसूल अविलंब कोषागारात जमा होतो. इ-पेमेंटसाठी २५ बँकांना अधिकृत करण्यात आले आहे. व्यापाऱ्यांना सर्व नोंदीत ई-मेल सुविधा पुरवण्यात आली आहे.

**आंतरराज्यीय कर चुकवेगिरीचा छडा**

विक्रीकर विभागाने टाइल्स व्यापाऱ्यांच्या आंतरराज्यीय कर चुकवेगिरीचा छडा लावला. या करचुकवी करणाऱ्या व्यापारी आणि सल्लागारांविरुद्ध कडक फौजदारी कारवाई करून ६५ व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. दक्षता विभागाद्वारे भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा तपास करून पालघर परतावा घोटाळा प्रकरण उघडकीस आले. यात सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून या व्यापाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. असे विविध उपक्रम यशस्वीपणे राबवल्यामुळे विक्रीकर विभागाला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान-२०११ हा प्रथम पुरस्कार मिळाला आहे.






- विभागीय कामकाजासाठी २२ संगणकीकृत मोड्युल्स भारतात सर्वप्रथम राबवण्यात आले. ही सुविधा लागू करण्यात महाराष्ट्र विक्रीकर विभाग देशात प्रथम.
- सर्व व्यापाऱ्यांना १०० टक्के ई-पेमेंट अनिवार्य करण्यात आल्याने महसूल अविलंब कोषागारात जमा.
- केंद्रीय विक्रीकर कायद्यामुळे दररोज तीन हजार व्यापाऱ्यांनी इलेक्ट्रॉनिक अर्ज केल्याने कार्यालयात येणाऱ्या भेटी टाळण्यात यश. आंतरराज्यीय व्यवहारांची तपासणी शक्य.

**भविष्यातील नियोजन**

महसुलांच्या स्रोतांचा शोध, महसूल वृद्धीसाठी प्रयत्न, कौशल्य प्रशिक्षण व विशेष करून व्यापाऱ्यांना सोई-सुविधा पुरवून उद्योगधंद्यांच्या वाढीच्या दृष्टीने महाराष्ट्रात पोषक वातावरण निर्मिती हे विभागाचे भविष्यातील मोठे उपक्रम आहेत.

कौशल्य प्रशिक्षणास प्राधान्य देऊन विभागात संगणक साक्षरता निर्माण करण्यात येईल. राज्याच्या महसूल वाढीसाठी योग्य वातावरण निर्माण करावयाचे असेल, तर करविषयक त्रुटी व्यापाऱ्यांच्या नजरेत वेळेवर आणून देणे यासाठी योग्य खबरदारी घेण्यात येत आहे. व्यापाऱ्यांनी केलेल्या अपिलांचा त्वरित निपटारा करण्याचे धैर्य आखण्यात आले असून विक्रीकराच्या प्रलंबित मागणीची वसुली १०० टक्के करण्याचा विभागाचा मानस आहे.

**हेमंत खैरे**

# महा-उद्योग-राष्ट्र



नारायण राणे
मंत्री, उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार

## उद्योग

महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य आहे. सर्वाधिक रोजगारनिर्मिती करणारे उद्योग महाराष्ट्रात आहेत. देशात उद्योजकांची पहिली पसंती असणारे राज्य असल्याने महाराष्ट्राचा गतिमान आणि समतोल विकास व्हावा यासाठी नवीन औद्योगिक धोरण तयार करण्यात आले. उद्योग विकासाच्या सोयी-सुविधांना चालना देऊन, पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन व नव्या उद्योगांची निर्मिती यांची योग्य सांगड घालण्याचे उद्दिष्ट ठेवून; उद्योगमंत्री नारायण राणे यांनी ३ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ जाहिर केले.

### गुंतवणुकीतील अग्रस्थान

या औद्योगिक धोरणाच्या माध्यमातून, देशातील औद्योगिक गुंतवणुकीतील, महाराष्ट्राचे अग्रस्थान कायम ठेवण्यासाठी मदत होणार आहे. राज्यातील औद्योगिकदृष्ट्या मागासभागात गुंतवणुकीचा ओघ वाढवण्यास चालना मिळणार आहे. मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या धोरणामध्ये दरवर्षी उत्पादन क्षेत्रातील १२ ते १३ टक्के वाढ साध्य करणे, राज्याच्या स्थूल उत्पन्नामध्ये (State GDP) उत्पादन क्षेत्राचा सहभाग २८ टक्क्यांपर्यंत वाढवणे, २० लाख रोजगार निर्माण करणे, ५ लाख कोटींची गुंतवणूक आकर्षित करणे, विशाल गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे, औद्योगिक विकासासाठी जमीन उपलब्ध करून देणे, राज्यातील औद्योगिक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागांमध्ये गुंतवणुकीचा ओघ वाढविणे, गुंतवणूकदारांना विविध सुविधा उपलब्ध करून देऊन व्यापार करण्यासाठी पूरक वातावरण निर्माण करणे, कुशल मनुष्यबळ विकसित करणे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या (एमएसएमई) विकासावर भर देणे, रोजगाराभिमुख विशाल प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, राज्य व केंद्रांच्या कुशल मनुष्यबळ विकिसित करणाऱ्या विविध योजनांचा वापर करणे, जे आजारी उद्योग चालू ठेवणे व्यवहार्य नाही त्यांना बाहेर पडण्यासाठी मदत करणे आणि पुनरुज्जीवनक्षम उद्योगांचे पुनर्वसन करणे. अशा विविध बाबींचा या सर्वसमावेशक नवीन धोरणात समावेश करण्यात आला आहे.




हिंजेवाडी, आयटी उद्योग

### ॲडव्हान्टेज विदर्भ

देशाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या विदर्भाच्या औद्योगिक विकासाला, पोषक

- विशाल प्रकल्प धोरणानुसार आतापर्यंत ३९७ विशाल प्रकल्पांना मान्यता.
- विशाल प्रकल्पांमध्ये आश्वासित गुंतवणूक रु. ३,१८,७९१ कोटी व ३.५३ लाख व्यक्तींना रोजगार अपेक्षित.
- ११४ विशाल प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरू.



वातावरण निर्माण करण्यासोबतच विशाल प्रकल्प आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने ॲडव्हॉन्टेज विदर्भ ही औद्योगिक विकासाला चालना देणारी पहिली परिषद आयोजित करण्यात आली. यामुळे स्थानिक लोकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील. या परिषदेच्या पहिल्याच दिवशी १८ हजार ४६१ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. या परिषदेच्या निमित्ताने पुढील पाच वर्षांत ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे.

### थेट विदेशी गुंतवणूक

राज्यात सर्वात जास्त थेट गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. १९९१ पासून मार्च २०१२ पर्यंत केंद्र शासनाने एकूण ४,२४६ थेट विदेशी गुंतवणुकीच्या प्रस्तावास मंजुरी दिलेली असून त्यामध्ये रू. ८७,७९९ कोटी एवढी गुंतवणूक अपेक्षित आहे. केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या एकूण गुंतवणूक प्रस्तावात राज्याचा २३ टक्के वाटा आहे. राज्यातील मंजूर प्रकल्पांपैकी १,९२८ प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरू झाले आहे. त्याद्वारे ४९,७७६ कोटी गुंतवणूक झाली आहे.

### सूक्ष्म व लघु उपक्रम समूह विकास योजना

देशातील रोजगार निर्मिती आणि आर्थिक सर्वसमावेशकतेमध्ये लघुत्तम; छोट्या व मध्यम उद्योग क्षेत्राचे महत्त्वाचे स्थान आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र शासनाने 'सूक्ष्म व लघु उपक्रम समूह विकास योजना' सुरू केली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील ३० समूह विकास प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. यातून ४५० कोटींची गुंतवणूक व ८०,००० लोकांना रोजगार उपलब्ध होईल.

### डीएमआयसी प्रकल्प

या प्रकल्पामध्ये शेंद्रा-बिडकीन व दिघी इंडस्ट्रियल एरिया या दोन क्षेत्राचा विकास पहिल्या टप्प्यामध्ये करण्याचे ठरवण्यात आले आहे. औरंगाबाद जिल्ह्यात शेंद्रा येथे ६००

## देशातील थेट विदेशी गुंतवणूक प्रस्तावात राज्याचा २३ टक्के वाटा. देशात आघाडी

हेक्टर जमीन आणि बिडकीन येथील २००० हेक्टर जमीन एमआयडीसीने ताब्यात घेतली आहे. केंद्र शासनाच्या वतीने औरंगाबाद औद्योगिक क्षेत्रात ३०० कोटींची नवीन पाणीपुरवठा योजना, एक्झिबिशन कम कव्हेन्शन सेंटर व करमाड येथे लॉजिस्टिक पार्क करण्यात येईल.

**'दिल्ली- मुंबई इंडस्ट्रियल कॅारिडॅार'**

दिल्ली-मुंबई औद्योगिक कॅारिडॅार हा विशाल पायाभूत सुविधा निर्माण करणारा एक प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत दिल्ली आणि मुंबई यांच्यामधील १,४८३ कि.मी. लांबीचे क्षेत्र असून, दोन शहरांना जोडणारा रेल्वेचा डेडिकेटेड फ्रेट कॅारिडॅार हा प्रकल्प, भविष्यात औद्योगिक क्रांती घडवून आणेल.



**२००१ मधील सामूहिक प्रोत्साहन योजनेत सुधारणा करून २०१३ मध्ये त्यात अतिविशाल प्रकल्प हा नवीन संवर्ग निर्माण करण्यात आला. राज्यातील विकसित भागाच्या तुलनेत मागास भागाला प्राधान्य देण्याच्या दृष्टीने विशाल प्रकल्पाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. विशाल प्रकल्प धोरणास चांगला प्रतिसाद मिळाला. या धोरणानुसार आतापर्यंत ३९७ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यातील आश्वासित गुंतवणूक रु. ३,१८,७९१ कोटी व ३.५३ लाख व्यक्तींना रोजगार अपेक्षित आहे. त्यापैकी ११४ प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरू झाले आहे. यंदाच्या वर्षात एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत १८ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्या प्रकल्पात एकूण रु. ७,३०३ कोटी एवढी गुंतवणूक व १०,४०३ व्यक्तींना रोजगाराच्या संधी प्रस्तावित आहेत. या धोरणांतर्गत जनरल मोटर्स, वोल्क्स वॅगन, डेमलर क्रायसलर, सॅनी हेवी इंडस्ट्रीज, ब्रिज स्टोन, एल.जी. इलेक्ट्रॉनिक्स, मायको बॉश, बोईंग इम्सोफर मॅन्युफॅक्चरिंग, हुंदाई हेवी इंडस्ट्रीज, पियो पियो व्हेइकल्स, पोस्को लि. कपंन्यांनी राज्यात गुंतवणूक केली आहे.**

या प्रकल्पाच्या प्रभावित क्षेत्रापैकी सुमारे १७ टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे. यात सुमारे २० टक्के क्षेत्राचा आणि २६ टक्के लोकसंख्येचा समावेश होतो. फ्रेट कॅारिडॅारच्या क्षेत्रामधील दोन्ही बाजूकडील १५० कि. मी. चे क्षेत्र औद्योगिक विकासासाठी प्रभाव क्षेत्र म्हणून निश्चित करण्यात आले आहे.

या कॉरिडॅारमध्ये समाविष्ट असलेल्या प्रमुख जिल्ह्यामध्ये मुंबई, मुंबई उपनगर , ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर धुळे, नंदुरबार आणि रायगड या जिल्ह्याचा समावेश होतो. हा फ्रेट कॅारिडॅार उत्तरप्रदेश, दिल्ली,हरियाणा, राजस्थान, गुजरात,मध्यप्रदेश व महाराष्ट्र या सहा राज्यांतून प्रवास करून जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या ठिकाणी येऊन मिळतो. यामुळे मुंबई दिल्लीला जोडली जाईल.

महाराष्ट्रात या प्रकल्पांतर्गत येऊ घातलेली उद्योगक्षेत्रे आंतरराष्ट्रीय दर्जाची असतील यातून साधारणत: तीन लक्ष कोटी रोजगार निर्मिती होऊ शकेल. यांअंतर्गत राज्य शासनाने पुढील उपक्रमाची आखणी केली आहे.

★ औरंगाबाद जिल्ह्यातील शेंद्रा - बिडकिन येथे विशाल औद्योगिक उद्यान स्थापना ★ औरंगाबाद जिल्ह्यातील अतिरिक्त शेंद्रा येथे प्रदर्शन व व्यापारी केंद्र (कन्व्हेंशन सेंटर).★ रायगड जिल्ह्यातील दिघीचा औद्योगिक क्षेत्र म्हणून विकास ★ नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे विशाल औद्योगिक उद्यानाची उभारणी ★पुणे जिल्ह्यातील सिन्नर येथे विशाल औद्योगिक उद्यानाची स्थापना ★ डीएमआयडीसीमार्फत रायगड जिल्ह्यातील विले -भागड आणि पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे १००० मेगावॅट क्षमतेचा विद्युत प्रकल्प .

**सेकंडरी ग्रोथ कॅारिडॅार**

शासनाने दिल्ली- मुंबई इंडस्ट्रिअल कॅारिडॅारला पूरक ठरणाऱ्या राष्ट्रीय आणि राज्यातील महत्त्वाच्या मुख्य द्रुतगती मार्गांवर सेकंडरी ग्रोथ कॅारिडॅारची आखणी केली आहे. मुंबई-नाशिक- औरंगाबाद-अमरावती-नागपूर, मुंबई-पुणे -सातारा-सांगली - सोलापूर, मुंबई-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या दुय्यम कॅारिडॅार्समुळे विदर्भ, मराठवाडा आणि कोकण भागातील प्रदेश, मुंबई, पुणे यासारख्या औद्योगिक केंद्रांप्रमाणे विकसित होतील. त्याशिवाय अन्न व कृषी प्रक्रिया उद्योग,अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स आणि लॉजिस्टिक व वेअरहाऊसिंग यांसारख्या पूरक उद्योगांच्या विकासावर अधिक भर देण्यात येणार आहे. प्रगती, समतोल विकास आणि महाराष्ट्राला उद्योगराष्ट्र करण्याचे उद्दिष्ट, नवीन औद्योगिक धोरणात ठेवण्यात आले आहे. औद्योगिकदृष्ट्या मागास भागांवर जास्त लक्ष केंद्रीत करून त्यांना औद्योगिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले जाईल. विशाल व अतिविशाल उद्योगांना एकत्रित प्रोत्साहन दिले जाईल. रोजगारक्षम उद्योगांना उत्तेजन देण्यासाठी पुढाकार घेतला जाईल. गुंतवणूकदारांसाठी सर्व प्रकारच्या सोयी सुविधा देण्याकरिता पुढाकार व मदतीसाठी स्वतंत्र गुंतवणूक कक्ष स्थापन केले जातील.

**काशीबाई थोरात**



# विकासाची पायाभरणी

## सार्वजनिक बांधकाम

**छगन भुजबळ**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन

एखाद्या राज्याच्या विकासाची गती ही, त्या राज्यात निर्माण झालेल्या दळणवळणाच्या आणि पायाभूत सुविधांवरून लक्षात येते. महाराष्ट्रामध्ये रस्त्यांचे जाळे निर्माण करून, ग्रामीण भाग शहरे आणि महानगरांशी जोडल्याने दळणवळणाच्या सोयी निर्माण होण्याबरोबरच विकासाची गती वाढली आहे. राज्यातील रस्ते उभारणी, पुनर्बांधणी, तसेच विविध महामार्ग, शासकीय इमारतींची उभारणी करण्याचे महत्त्वाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग करीत आहे.

रस्त्यांना नवसंजीवनी देतानाच शासकीय प्रकल्पांसाठी वास्तू निर्माण करून, राज्याच्या विकासाला हातभार लावण्यासाठी गेल्या ४ वर्षात महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्यांची यशस्वी अंमलबजावणी केली गेली. जून २०१२ मध्ये मंत्रालयाला आग लागली. या दुर्घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने, रात्रीचा दिवस करून अवघ्या काही तासात मंत्रालयास पूर्वीचे रूप देवून कामकाजाला सुरुवात केली होती. आता मंत्रालय नवनिर्माणाचे काम वेगाने सुरू असून नागरिकांना लवकरच कॉर्पोरेट लूक असलेले 'मंत्रालय' पाहावयास मिळणार आहे.



- ४०,८६८ खेड्यांपैकी ४०५७७ (९९ टक्के) खेडी बारमाही रस्त्याने जोडण्यात आली
- नक्षलग्रस्त भागामध्ये ४६८.८६ कि.मी.रस्ते लांबीची सुधारणा व ६ मोठ्या पुलांची कामे नियोजित आहेत.
- खाजगीकरणांतर्गत आतापर्यंत रु. एकूण ४,६९० कि.मी रस्ता लांबीचे १३७ प्रकल्प घेण्यात आले .




### चार वर्षातील महत्त्वपूर्ण निर्णय

२००१ च्या जनगणेनुसार ३१ मार्च २०१२ अखेर एकूण ४०,८६८ खेड्यांपैकी ४०५७७ (९९ टक्के) खेडी बारमाही रस्त्याने जोडण्यात आली आहेत. (वनजमीन, भूसंपादन, नक्षलग्रस्त भाग इत्यादी कारणांमुळे २९१ खेडी रस्त्याने जोडणे शिल्लक आहेत.)

२०१२- १३ मध्ये राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्गावरील रु. २,१६१ कोटी इतक्या अंदाजित किमतीची १,७०५ नवीन कामे घेण्यात आली आहेत.

२०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागासाठी रु. २,७१६.६७ कोटी एवढा नियतव्यय मंजूर झाला. रस्ते विकास महामंडळासाठी रु. १२० कोटी एवढा नियतव्यय मंजूर झाला. अशा प्रकारे रस्ते विकास उपक्षेत्रासाठी एकूण रु. २,८३६.६७ कोटी एवढा नियतव्यय सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झाला आहे.

जुलै, २०१३ च्या पुरवणी अर्थसंकल्पात १,२७६.५६ कोटी इतक्या अंदाजित किमतीची ३,१३९ नवीन कामे घेण्यात आली आहेत.

राज्यातील नक्षलग्रस्त भागामध्ये रु. ८१०.३१ कोटी एवढ्या अंदाजित किमतीची २९ कामे मंजूर असून यामधून ४६८.८६ कि.मी.रस्ते लांबीची सुधारणा व ६ मोठ्या पुलांची कामे नियोजित आहेत. त्यापैकी १३ कामे पूर्ण असून १३ कामे प्रगतिपथावर आहेत.

**केंद्रीय मार्ग निधी** – या योजनेंतर्गत आतापर्यंत रु. २,५०७ कोटी इतक्या अंदाजित किंमतीची ६८६ कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी ६६१ कामे पूर्ण झाली आहेत.

**नाबार्ड कर्ज साहाय्य** – या योजनेंतर्गत ८० टक्के कर्ज नाबार्डकडून उपलब्ध करून दिले जाते व २० हिस्सा राज्य शासनाचा असतो. या योजनेंतर्गत आतापर्यंत ५,६६७ कोटी इतक्या अंदाजित किंमतीची १२,२८६ कामे मंजूर करण्यात आली आहेत. मंजूर कामांपैकी १०३६४ कामे पूर्ण झाली आहेत.

तेराव्या वित्त आयोगांतर्गत दुर्गम भागातील रस्ते जोडणी हा केंद्रपुरस्कृत रस्ते विकासाचा कार्यक्रम सन २०११-१२ या वर्षापासून सुरू करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत सन २०११-१२ ते २०१४-१५ या चार वर्षांकरिता रु. ५० कोटी प्रतिवर्षी या प्रमाणे रु. २०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यापैकी सन २०११-१२ व सन २०१२-१३ मध्ये प्रतिवर्षी रु. ५० कोटी याप्रमाणे रु १०० कोटी अंदाजित किंमतीची १३८ कामे अर्थसंकल्पित करण्यात आली आहेत.

- राज्यात राष्ट्रीय महामार्गाची एकूण ५४६९ कि. मी. लांबी आहे. त्यापैकी एकूण

## १,६४८ कि. मी. रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण

१६४८ कि. मी.चे चौपदरीकरण झाले असून १४२२ किमी लांबीच्या चौपदरीकरणाचे काम प्रगतिपथावर आहे. पनवेल- महाड-पणजी राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ वरील पळस्पे ते इंदापूर या ८४ कि.मी भागाचे चौपदरीकरण भारतीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले असून सद्य:स्थितीत प्रगतीत आहे. तसेच, रा.म-१७ वरील झाराप ते पत्रादेवी (कि.मी. ४५०/१७० ते ४७५ / २१०) या लांबीतील २५ कि.मी. चौपदरीकरणही प्रगतीत आहे. उर्वरित इंदापूर ते झाराप या ३६६.१७ कि.मी भागाच्या चौपदरीकरणासाठी सुसाध्यता अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

प्रकल्पातील पूर्ण करण्यात आलेल्या कामांच्या पथकर स्थानकावर, इलेक्ट्रॉनिक पद्धतीचे फलक लावण्यात आले आहेत. दोन पदरी रस्त्यांकरिता ८ पदरी व चार पदरी रस्त्यांकरीता १६ पदरी पथकर स्थानक करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे पथकर स्थानकावरील वाहतूक कोंडी कमी होईल. पथकर स्थानकावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह, प्रथमोपचार पेटी, तक्रार नोंदवही ठेवण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

- खाजगीकरणांतर्गत घेण्यात आलेल्या प्रकल्पांवरील पथकर वसुली पूर्ण झाल्यानंतर, ५३ पथकर स्थानके बंद करण्यात आली आहेत. अर्थसंकल्पीय



**खाजगीकरणांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आतापर्यंत रु. १५,२२० कोटींचे एकूण ४,६९० कि.मी लांबीचे १३७ रस्ते प्रकल्प घेण्यात आले आहेत. त्यापैकी रु. ३,३३७ कोटींचे १०६ प्रकल्प पूर्ण करण्यात आले. यामधून २,४४७ कि.मी. लांबीचे रस्ते पूर्ण करण्यात आले आहेत. रु. ६,१८९ कोटींचे चौपदरीकरणाचे १७ प्रकल्प प्रगतिपथावर असून यामधून १,१६३ कि.मी. लांबीचे चौपदरीकरण होणार आहे. रु. ४,४२० कोटींचे चौपदरीकरणाचे १० प्रकल्प निविदेच्या विविध स्तरावर आहेत. याद्वारे ७८४ कि.मी. लांबीचे चौपदरीकरण होणार आहे.**

विभागाने खाजगीकरणांतर्गत कामामध्ये सुधारणा व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने समित्या स्थापन केल्या आहेत. या समितींनी केलेल्या शिफारशीनुसार, खाजगीकरणांतर्गत कामावरील सुरू असलेली सर्व पथकर स्थानके बंद करण्यात आलेली आहेत.

- पथकर वसुली सुरू असलेल्या खाजगीकरणांतर्गत रस्त्यांवर खड्डे असतील अथवा निविदेतील अटी व शर्तीनुसार नुतनीकरण केले नसेल, तर पथकर वसुली तात्पुरती बंद करण्याचे अधिकार संबंधित मुख्य अभियंता यांना देण्यात आलेले आहेत.

**इमारती**

राज्यातील ३५५ (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता) तालुक्यांपैकी ८६ तालुक्यांच्या ठिकाणी सुमारे ३४५ कोटी किमतीची प्रशासकीय इमारतींची बांधकामे पूर्ण झाली असून सुमारे ४९० कोटी किंमतीची प्रशासकीय इमारतींची बांधकामे प्रगतिपथावर आहेत.

**विधी व न्याय विभाग-** न्यायालयाची रुपये ८०० कोटी रक्कमेची एकूण १५५ पैकी ६६ कामे पूर्ण झाली असून ६० कामे प्रगतिपथावर आहेत. आदिवासी विकास विभाग- आश्रमशाळेची रुपये २००० कोटी रक्कमेची एकूण ४६९ पैकी ८२ कामे पूर्ण झाली असून १८८ कामे प्रगतिपथावर आहेत.

**अन्न व नागरी पुरवठा विभाग-** गोदामाची रुपये २००.६३ कोटी रक्कमेची एकूण १५६ पैकी ११ कामे पूर्ण झाली असून ५० कामे प्रगतिपथावर आहेत.

सामाजिक न्याय विभागाची रुपये ८०० कोटीची १३४ कामे मंजूर असून त्यापैकी ८९ कामे पूर्ण व ४५ कामे प्रगतिपथावर आहेत.

**खाजगीकरणांतर्गत इमारती:-** राज्यातील रस्त्यांच्या बांधकामासोबतच शासनातर्फे खाजगी सहभागातून इमारतींच्या बांधकामांचा कार्यक्रमदेखील हाती घेण्यात आला आहे. त्यानुसार रु. ५१७१ कोटीचे १७ प्रकल्प मंजूर आहेत. त्यापैकी रु. २७.८२ कोटीचे ४ प्रकल्प पूर्ण झाले असून रु. १७०२. ४२ कोटी इतक्या रक्कमेचे ८ प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. त्यामध्ये मुंबईमध्ये हायमाऊंट राज्य अतिथीगृह बांधणे, अंधेरी येथे प्रशासकीय भवन तसेच चेंबूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन ही बांधकामे हाती घेण्यात आली आहेत. दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनाचे काम पूर्ण झाले आहे.

**अजय जाधव**

# अपूर्व आणि अमर्याद पर्यटन

महाराष्ट्रातील पर्यटनक्षेत्राचा गतिमान विकास करण्यावर पर्यटनमंत्री छगन भुजबळ आणि राज्यमंत्री रणजित कांबळे यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून गेल्या चार वर्षात त्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

देशांतर्गत पर्यटकांना आकर्षित करण्याबरोबरच, परदेशातील पर्यटकांचे महाराष्ट्राकडे लक्ष वेधून घेण्यासाठी परदेशातही भव्यदिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. न्यूयॉर्कच्या टाईम्स स्क्रेअरमध्ये साजरी झालेली दिवाळी, जपान आणि कॅनडातील वेगवेगळ्या प्रांतासोबत पर्यटनवृद्धिसाठी झालेला सामंजस्य करार, आदी बाबींमुळे परदेशी पर्यटक महाराष्ट्रात अधिक संख्येने येण्यास मदत होणार आहे.

पर्यटन क्षेत्राचा चौफेर विकास व्हावा म्हणून पर्यटन धोरण, २००६ मध्ये आखण्यात आले.

किल्ले मालिकेंतर्गत शिवनेरी, राजगड, तोरणा, सिंहगड, लोहगड, राजमाची या किल्ल्यांचा पहिला पथदर्शी प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. या कामांमध्ये पर्यटकांना पायाभूत सुविधा देण्यात येणार आहेत.

**सी वर्ल्ड प्रकल्प**

सी वर्ल्ड हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. हा प्रकल्प भारतातीलच नव्हे तर दक्षिण आशियातील जागतिक दर्जाचा अभूतपूर्व असा प्रकल्प असेल. या कामाचा विस्तृत आराखडा व तांत्रिक प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पामुळे अंदाजे रु. ४००० कोटीची गुंतवणूक अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे पुढील १० वर्षात २.५ लक्ष एवढी रोजगारनिर्मिती होणार आहे. या प्रकल्पात मेट्रो, मोनोरेल अशा दळणवळणांच्या अद्ययावत सुविधांसह थिम पार्क, अॅक्वेरिअम, पंचतारांकित हॉटेल व विविध मनोरंजन सुविधा निर्माण होणार आहेत. प्रकल्पाच्या १३९० एकर जागेच्या भूसंपादनाकरिता २२५ कोटी एवढी रक्कम शासनाने या आर्थिक वर्षात मंजूर केली. भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे.

खंडाळा



सागरी किनाऱ्यावरील सुरक्षा व सुविधा प्रायोगिक तत्त्वावर २२ किनाऱ्यांवर प्रस्तावित करण्यात आली आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे रिसॉर्ट असणाऱ्या समुद्रकिनाऱ्यांसाठी उदा. तारकर्ली, गणपतीपुळे, मुरुड-जंजिरा, श्रीवर्धन, बोर्डी येथे जलक्रीडेकरिता गेलेल्या पर्यटकांना प्रायोगिक तत्त्वावर सुरक्षा देण्याचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहेत.

- सिंधुदुर्ग व विजयदुर्ग या किल्ल्यांच्या संवर्धन व देखभालीसाठी ७.०६ कोटी भारतीय पुरातत्त्व विभागास वितरित.
- सी वर्ल्ड या प्रकल्पामुळे ४००० कोटींची गुंतवणूक अपेक्षित. या प्रकल्पामुळे पुढील १० वर्षांत २.५ लक्ष रोजगारनिर्मिती.
- प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत रामटेक येथे साहसी क्रीडाप्रकल्प. त्यासाठी ५ कोटींची तरतूद.



**क्रूझ सेवा**

मुंबई-दिघी, दिघी-जयगड, जयगड-विजयदुर्ग, विजयदुर्ग-गोवा या मार्गावर आरामदायक क्रूझ सेवा सुरू करण्यात येणार आहे.

किनारपट्टी तसेच थंड हवेच्या पर्यटनस्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी धोक्याच्या सूचना व दिशादर्शक, मार्गदर्शक फलक व माहिती फलक लावण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. हे काम डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

कोकणातील मिठबाव, जि. सिंधुदुर्ग येथे नवीन पर्यटक निवास असून त्यात पर्यटकांना आकर्षित करण्याकरिता साहसी खेळांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पात एका भागावर पर्यटक निवास बांधले जाईल. उर्वरित भागात रस्ते, पाणी, ड्रेनेज या पायाभूत सुविधा तयार करून विकसित भूखंड खाजगीकरणाच्या सहभागातून (Revenue Sharing Model) कार्यान्वित करण्यात येतील. अजिंठा व वेरूळ येथील पर्यटन केंद्र जेआयसीए (JICA) च्या सहकार्याने पूर्ण करण्यात आला आहे. लोणार सरोवराचा एकात्मिक विकास करण्यात येत आहे.

**विदर्भातील इको पर्यटन**

विदर्भातील इको पर्यटनांतर्गत मेळघाट-नवेगाव-नागझिरा-पेंच-ताडोबा या क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. या वनक्षेत्रात निसर्ग पर्यटनासाठी सुविधा विकसित करण्यात येत असून ७ ठिकाणी पर्यटक संकुल उभारण्यात येतील.

नांदेड, औरंगाबाद, सोलापूर, सातारा येथील कामे प्रगतिपथावर आहेत.

**कन्व्हेन्शन सेंटर**

नाशिक येथे राज्यातील पहिले आंतराष्ट्रीय दर्जाचे शासकीय कन्व्हेन्शन सेंटर प्रस्तावित

आहे. केंद्र शासनामार्फत नाशिक जिल्ह्यातील गंगापूर डॅम (साहसी क्रीडा संकुल), गोंदेश्वर येथील प्राचिन मंदिराचे सुशोभिकरण व पर्यटकांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे तसेच नाशिक शहरामध्ये कलाग्राम बांधण्याकरिता मंजुरी प्राप्त झाली आहे.

**पर्यटक निवास नूतनीकरण**

पर्यटक निवासांच्या नूतनीकरण /विस्तारीकरणाचा कार्यक्रम राबवण्यात आला आहे. त्याकरिता प्रथम टप्प्यात माथेरान, माळशेज घाट, हरिहरेश्वर, पानशेत, बोर्डी, गणपतीपुळे, भंडारदरा व ताडोबा येथील पर्यटक निवासांचा समावेश करण्यात आला आहे.

पर्यटन विकास महामंडळाच्या जागांवर मिठबाव, कुणकेश्वर, रामटेक, साकोली, चिखलदरा, नाशिक-गंगापूर डॅम, अंभोरा, दाजीपूर या ठिकाणी अद्ययावत व नवीन पर्यटक निवासांची कामे सुरू आहेत.

राज्य शासन व भारतीय रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या डेक्कन ओडिसीचा सर्वसाधारण पर्यटकांना लाभ घेता यावा यासाठी, मुंबई -शिर्डी-त्र्यंबकेश्वर-मुंबई या मार्गावर स्थानिक पर्यटकांसाठी सहली सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी एका तिकीटावर एक तिकीट मोफत अशी योजना सुरू करण्यात आली आहे.

**नाशिक विशेष निवड मंडळ**

प्रत्येक राज्यास पर्यटन विकासासाठी, केंद्र सरकार राज्य शासनांना विशेष निधी देणार आहे. त्यासाठी राष्ट्रीय सल्लागारांमार्फत विशेष क्षेत्र निवडले जाणार आहे. यंदा राज्य शासनाने मुंबई-पुणे-गोवा, औरंगाबाद, नाशिक व नागपूर-अमरावती असे विशेष मंडळ निवडले आहे. या आर्थिक वर्षाकरिता नाशिक विशेष मंडळाची निवड करण्यात आली. या विशेष मंडळामध्ये नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार व अहमदनगर या जिल्ह्यांतील पर्यटनस्थळांचा समावेश आहे.

मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली मुंबई पर्यटन विकास समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती, मुंबई व मुंबई परिसरातील पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक पर्यटनस्थळांचा विकास करण्याबाबतचा, विस्तृत प्रकल्प अहवाल शासनास सादर करेल. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर स्थळ निहाय/प्रकल्प निहाय निधी वितरित करण्यात येईल.

**निसर्ग पर्यटन**

निसर्ग पर्यटनासाठी (Eco-Tourism) सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्यात निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी पर्यटन महामंडळ व वन महामंडळ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. निसर्ग पर्यटनाचे सर्व प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण व्हावे हे समितीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

राज्यात गुंतवणूक करणाऱ्या उपहारगृह उद्योगांना मान्यता देण्यासाठी, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आतिथ्य व्यवस्थापन विकास आणि प्रचालन उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त मंडळ स्थापन करण्यात आले आहे. राज्यात पर्यटनासाठी अधिकाधिक गुंतवणुकीस चालना देणे, हे समितीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अन्य राज्यांमध्ये महाराष्ट्रातील पर्यटकांविषयी माहिती मिळावी त्यासाठी दिल्ली व हैद्राबाद येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माहिती केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले.

**नव्या योजना**

**पर्यटन विभागामार्फत धार्मिक स्थळांचा विकास** - माहूरगड, सप्तश्रृंगी, तुळजापूर, कोल्हापूर, अंबेजोगाई, अष्टविनायक, कोल्हापूर सर्कीट, शिर्डी, शनिशिंगणापूर.

**मुंबई येथे बॉलिवूड टुरिझम** - बॉलिवूड टुरिझमसाठी चित्रनगरी गोरेगांव यांचेकडून प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.




**महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचा विदेशात प्रसार व्हावा आणि परदेशी पर्यटक आकर्षित व्हावेत यासाठी न्यूयॉर्कच्या जगविख्यात टाइम्स स्क्वेअर या भागात, दिवाळी ॲट टाइम्स स्क्वेअर हा ऐतिहासिक समारंभ, पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून २१ सप्टेंबर २०१३ रोजी पार पडला. या भागात महाराष्ट्राच्या संस्कृतीची पताका डौलाने फडकवण्यात आली. महाराष्ट्राच्या लोककलांचे सादरीकरण आणि पर्यटन स्थळांची माहिती, या उपक्रमाद्वारे सुमारे साडेतीन लाख पर्यटकांपर्यंत पोहोचवण्यात आली. न्यूयॉर्कमधील या महोत्सवानंतर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत कॅनडातील क्युबेक प्रांतासोबत पर्यटन वृध्दीसाठी करार करण्यात आला. जपानच्या वाकायामा प्रांतांच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात येऊन पर्यटन वृध्दीसाठी करार केला.**

**अजय जाधव**



# विकासाभिमुख सुरक्षा

आर. आर. पाटील
गृहमंत्री

महाराष्ट्राच्या विकासाच्या कायद्याच्या सुव्यवस्थेशी अत्यंत जवळचा संबंध असून राज्यात कायदा-सुव्यवस्थेचे राज्य निर्माण करण्यात गृह विभागाला गेल्या चार वर्षात चांगले यश आले आहे. कायदा-सुव्यवस्थेबरोबरच दहशतवाद, नक्षलवाद, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, जातीय दंगली अशा विविध आघाड्यांवर राज्याचे पोलीस दल संपूर्ण ताकदीने लढत आहे. गृहमंत्री म्हणून काम करताना आर. आर. पाटील यांनी आधुनिकीकरण-सक्षमीकरणाबरोबरच पोलीस दलाला लोकाभिमुख उपक्रमांद्वारे सामाजिक चेहरा मिळवून दिला आहे.

देशाचे शक्तिस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला सीमेपलीकडून लक्ष्य करण्याचे प्रकार अनेकदा झाले. कधी अतिरेकी हल्ला तर कधी बॉम्बस्फोट अशा विविध विध्वंसक कारवाया करण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र इथल्या पोलिसांनी जशास तसे उत्तर दिले. नक्षलवादाचे संकट गडचिरोलीच्या दोन तालुक्यांपर्यंत मर्यादित ठेवण्यात महाराष्ट्र पोलीस यशस्वी झाले आहेत.

राज्यात गेल्या वर्षभरात विविध घटनांचे अधिकृत गुप्तचर संस्थांकडून २२७ अॅलर्ट मिळाले त्यातील बहुतांश अॅलर्ट हे अतिरेकी हल्ल्यांशी संबंधित होते. मात्र, पोलिसांनी सजग राहून एकही दुर्घटना होऊ दिली नाही हे राज्यातील पोलीस दलाचे यश आहे. पोलिसांबरोबरच दहशतवादविरोधी पथक (एटीएस), शीघ्र कृती दल (क्यूआरटी), फोर्सवन आणि सर्व सुरक्षा यंत्रणांचे यात मोलाचे योगदान आहे.



**महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य**

महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी सरकारने विविध उपाययोजना केल्या आहेत. प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला साहाय्य कक्ष, महिला सुरक्षा समिती कार्यरत करण्यात आली असून, महिला अत्याचार प्रकरणातील पीडित महिलांच्या मानसिक आधारासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत समुपदेशन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. अत्याचार व बलात्काराचे खटले त्वरित निकाली काढण्यासाठी १३ विशेष न्यायालये स्थापन झाली असून १०० जलदगती न्यायालये पुढील पाच वर्षांसाठी सुरू ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विनाशुल्क हेल्पलाइन (मुंबई, नवी मुंबई, ठाण्यासाठी १०३ क्रमांक तर उर्वरित महाराष्ट्रासाठी १०९१ क्रमांक) सुरू करण्यात आली आहे. महिला अत्याचार प्रतिबंधासाठी प्रचलित कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करून त्यात सुधारणा सुचविण्यासाठी नेमलेल्या न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी समितीने विविध विभागांशी संबंधित १३५ शिफारशी सुचविणारे चार अंतरिम अहवाल, सरकारला सादर केले आहेत. यातील बहुतांश शिफारशींवर सरकारने अंमलबजावणी सुरू केली आहे. न्या. धर्माधिकारी समितीला ३० नोव्हेंबर २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महिलांशी संबंधित संवेदनशील गुन्ह्यांच्या तपासासाठी स्वतंत्र महिला अत्याचार प्रतिबंधक कक्षाची निर्मिती मुंबईत करण्यात आली आहे. संपूर्ण महिला अधिकारी-कर्मचारी असलेल्या या कक्षाचे कामकाज मार्च महिन्यापासून सुरू झाले असून महत्त्वाचे १०० पेक्षा अधिक गुन्हे या कक्षाकडे तपासासाठी देण्यात आले आहेत. रेल्वेतील महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीस, होमगार्डची नियुक्ती करण्याबरोबरच पोलीस ठाण्यांच्या दक्षता समित्यांमध्ये महाविद्यालयीन युवतींना प्रतिनिधित्व देण्यात येणार आहे.

- महिलांशी संबंधित संवेदनशील गुन्ह्यांच्या तपासासाठी मुंबईत स्वतंत्र महिला अत्याचार प्रतिबंधक कक्षाची निर्मिती.
- नक्षलवाद्यांना नामोहरम करण्यात गडचिरोली मॉडेल प्रभावी ठरल्याने नक्षलग्रस्त अन्य राज्यांतही त्याची अंमलबजावणी केंद्र सरकार करणार.
- अत्याचार व बलात्काराचे खटले त्वरीत निकाली काढण्यासाठी १३ विशेष न्यायालयांची स्थापना.



**गुन्हे सिद्ध होण्याच्या प्रमाणात वाढ**

पुराव्याअभावी आरोपींची मुक्तता होत असल्याने गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण १० टक्क्यांहून कमी होते, याची दखल घेत गृहमंत्र्यांनी संख्ये समिती नेमली. या समितीने सुचवलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू केली. कोर्टातील खटल्यांवर सीआयडीच्या अधिकाऱ्यांना देखरेख करायला सांगितले. सीआयडी अधिकाऱ्यांनी कोर्टात सिद्ध न झालेल्या गुन्ह्यांचा सविस्तर अभ्यास केला असता, पुरावा गोळा करण्याची चुकीची पद्धत

पुढे आली. साक्षीदार फितूर झाल्याने खटल्यावर उलटा परिणाम झाल्याच्या सर्वाधिक घटना पुढे आल्या. त्यामुळे सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले. साक्षीदार तसेच पंचांना विश्वासात घेऊन त्यांना धीर दिला. अन्यायाविरोधात उभे राहण्यासाठी मानसिक पाठिंबा दिला, पोलिसांना मार्गदर्शन केले. त्याचा चांगला परिणाम पाहायला मिळाला. २०११ साली ८.२ टक्के आणि २०१२ साली ९.४ टक्के असलेले, गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण २०१३च्या जानेवारी महिन्यात १०.१ टक्क्यांवर पोहोचले. फेब्रुवारीत १०.४ टक्के आणि मार्चमध्ये हेच प्रमाण १५.६ टक्क्यांवर पोहोचले आहे. साक्षीदार आणि पंच फितूर होण्याचे प्रमाणही निम्म्यावर आले. गुन्हे सिद्ध होण्याचे सर्वाधिक प्रमाण नवी मुंबई, मुंबई तसेच रायगडमध्ये आहे.

**'आर्थिक', 'सायबर' गुन्ह्यांसाठी सक्षम शाखा**

महाराष्ट्रात आर्थिक गुन्हे शाखा सक्षम होत असून आर्थिक फसवणूक करणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई केली जात आहे. ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणारा कायदा सर्वप्रथम महाराष्ट्राने केला असून या कायद्यांतर्गत लवकरच मुंबईतील ८९१ कोटी रुपयांच्या जप्त केलेल्या मालमत्तेचा लिलाव करण्यात येणार आहे. यासाठी प्राधिकृत अधिकारी नेमले जाणार असून या मालमत्तांची विल्हेवाट लावून फसवणूक झालेल्या ठेवीदारांना दिलासा देण्यात येणार आहे. त्याशिवाय सायबर क्राईम शाखा सक्षम केली असून तज्ज्ञ अधिकारी सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी कार्यरत केले आहेत.

**सागरी सुरक्षेवर विशेष लक्ष**

सागरी सुरक्षेसाठी केंद्र व राज्य सरकारने दिलेल्या बोटींच्या माध्यमातून पेट्रोलिंग सुरू असून पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून दिले आहे. सागरी सुरक्षेसाठी नव्याने १२ पोलीस ठाणी आणि ३२ चेकपोस्ट निर्माण केले असून, त्यापैकी ९ पोलीस ठाणी आणि २७ चेकपोस्टचे बांधकाम पूर्ण झाले आहे. २४ पैकी २३ बॅरेक्स पूर्ण झाले असून सागरी सुरक्षेसाठी केंद्र व राज्यसरकारच्या मिळून ७६ बोटी कार्यरत करण्यात आल्या आहेत. सागरी पोलीस ठाण्यांसाठी नव्याने सागरी पोलीस आयुक्तालय निर्मितीचा प्रस्ताव विभागाने तयार केला आहे. केंद्र सरकारच्या वतीने सागरी सुरक्षेसाठी स्थापन होणाऱ्या प्रशिक्षण संस्थेकरिता राज्याने केंद्राला तीन जागा सुचविल्या आहेत त्यापैकी एक जागा केंद्र सरकारकडून लवकरच निश्चित केली जाण्याची शक्यता आहे.

**डान्सबार बंदीसाठी लवकरच वटहुकूम**

राज्यातील डान्सबारबंदीचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर, आता राज्यात पुन्हा नव्याने डान्सबार बंदी करण्यासाठी गृहमंत्र्यांनी तयारी सुरू केली आहे. राज्यात कामगार, राज्यउत्पादन शुल्क, महिला बालविकास, नगरविकास, महसूल अशा विविध विभागांच्या प्रचलित नियमांचा अभ्यास करून परस्परविरोधी असलेले नियम, कायदे परस्परपूरक करून नवा सक्षम कायदा करण्यात येईल. त्यासाठी महाअधिवक्त्याकडून मसुदा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सर्व गटनेत्यांची बैठक घेऊन नंतर मंत्रिमंडळामध्ये डान्सबार बंदीचा वटहुकूम काढण्याची सरकारची तयारी आहे.

**पोलिसांचा सामाजिक चेहरा....**

गुन्हेगारांमध्ये जरब बसवणाऱ्या पोलिसांनी विविध सामाजिक उपक्रमांत स्वत:ला झोकून दिले आहे. ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणारी ज्येष्ठ नागरिक भेट योजना असो किंवा विसंवादातून घटस्फोटाकडे जाणाऱ्या दाम्पत्यांना, बंधनात गुंफणारा संवाद-तुझा माझा उपक्रम असो, पोलिसांचे हे सामाजिक उपक्रम लोकप्रिय ठरले आहेत. दर शनिवारी मुंबईत प्रत्येक पोलीस घटकात होणारा जनता दरबार सर्वसामान्यांना गाऱ्हाणे मांडण्यासाठी हक्काचा दिवस मिळाला आहे. मुंबईतील तक्रारपेट्यांचा उपक्रम पोलिसांपर्यंत निनावी माहिती पोहोचवण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. आतंकवाद्यांचे मनसुबे उधळून लावण्यासाठी प्रत्येकाने आपले एक मिनिट द्यावे असे आवाहन करणारा 'मुंबई के लिए एक मिनिट' उपक्रम सामान्य जनतेला सुरक्षेबरोबरच कर्तव्याची जाणीव करून देणारा आहे.

**गृहमंत्र्याचे पालकत्त्व**

नक्षलवाद हे राज्यासमोरचे एक मोठे



**राज्यात कायदा आणि सुव्यवस्था प्रभावी करण्यासाठी पोलीस दलात ६१ हजार पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. गेल्या पाच वर्षात ५५ हजार पोलिसांची भरती करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरले. मोठ्या प्रमाणात महिला पोलिसांची भरती करण्यात आली आहे. पोलिसांबरोबरच तुरुंगातील १५३९ आणि सहायक सरकारी अभियोक्त्यांची २९९ रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली. पोलीस भरतीमध्ये निवृत्त पोलिसांच्या मुलांना आरक्षण देण्याचे गृह विभागाने तत्त्वत: मान्य केले असून, आरक्षणाचे प्रमाण सामान्य प्रशासन विभाग आणि मंत्रीमंडळाने निश्चित केल्यानंतर आगामी भरतीमध्ये हे आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. पोलिसांना अत्याधुनिक शस्त्रे व प्रशिक्षणातून पोलीस दलाची गुणवता वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**

आव्हान असल्याने नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात विकासाची अनेक कामे सुरू झाली आहेत. नक्षल हा कायदा-सुव्यवस्थेचा विषय आहे तशी ती सामाजिक-आर्थिक समस्या आहे आणि त्यावर या भागाचा विकास हाच एकमेव उपाय आहे, हे लक्षात घेऊन गृहमंत्र्यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारले. दौरे, बैठका या पलीकडे जाऊन त्यांनी विविध विभागांच्या विकास योजनांची यशस्वी अंमलबजावणी सुरू केली.

रस्ते, आरोग्य, शिक्षण, सिंचन, रोजगार अशा विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून देतानाच पोलिसांचे मनोधैर्य वाढवण्यावर त्यांनी भर दिला. यातून नक्षलविरोधी मोहिमा अधिक गतिमान केल्या. घरोघरी जाऊन पोलिसांनी केलेल्या जागृतीमुळे अनेक युवकांनी दल सोडून आत्मसमर्पण केले. अत्याधुनिक शस्त्रे, सुविधा, प्रशिक्षण पोलिसांना उपलब्ध करून दिले. पोलिसांची रिक्त पदे भरली. महिला पोलीस अधिकारी हिरिरीने नक्षलविरोधी कारवायांमध्ये उतरू लागल्या. नक्षलच्या समूळ उच्चाटनासाठी पोलिसांनी विशेष मोहिमा राबवल्यामुळे गेल्या आठ-दहा महिन्यांत कुठलीही हिंसक घटना घडू न देण्यात पोलीस यशस्वी झाले आहेत. नक्षलवाद्यांना नामोहरम करण्यात गडचिरोली मॉडेल प्रभावी ठरल्याने नक्षलग्रस्त अन्य राज्यांतही त्याची अंमलबजावणी करण्याचे, आता केंद्र सरकारने ठरवले आहे, हा महाराष्ट्र पोलिसांचा गौरव समजायला हवा.

नक्षल अभियानात स्वतंत्र विशेष माहिती व



जनसंपर्क कक्ष निर्माण केल्यामुळे, लोकजागृतीबरोबरच स्थानिकांशी संवाद अधिक प्रभावी होणार आहे. गडचिरोली जिल्ह्यातल्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना प्रगत महाराष्ट्राचे दर्शन घडवण्यासाठी, महाराष्ट्र दर्शन उपक्रम सुरू केला. सामाजिक सुरक्षा अभियानामुळे दुर्गम भागातील लोकांना विविध विकास योजनांच्या लाभासाठी आवश्यक प्रमाणपत्रे मिळाली. रुग्णालयांमधील सुविधांमुळे घरगुती बाळंतपणे कमी झाली. त्यामुळेच बाल-मृत्यूचा दरही कमी झाला. दुर्गम गावांमध्ये पहिल्यांदा केलेल्या वीजजोडण्यांमुळे घरे प्रकाशमान झाली. जिल्ह्याच्या वार्षिक बजेटमध्ये गेल्या चार वर्षांत भरीव तरतूद केली. निधीची कमतरता भासू न देता पालकमंत्र्यांनी विकासाची मोठी चळवळ या जिल्ह्यात सुरू केली.

मुंबईवर झालेल्या २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यातील एकमेव जिवंत दहशतवादी अजमल कसाब याला, २१ नोव्हेंबर २०१२ रोजी येरवडा तुरुंगात फाशी देण्यात आले. न्यायालयाने कसाबला दिलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस आणि तुरुंग यंत्रणांनी जी गोपनीयता राखली, तिचे जगभरातून कौतुक झाले.

एकूणच, गृहमंत्री आर.आर. पाटील यांनी गृह विभागाच्या माध्यमातून भरीव उपाययोजना करतानाच पोलीस दलाला नवे रूप दिले आहे. पोलिसांचा सामाजिक दृष्टिकोन वाढविण्याबरोबरच सक्षम, आणि अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज पोलीस दल महाराष्ट्राच्या विकासासाठी कायदा-सुव्यवस्था प्रस्थापित करण्यात महत्त्वपूर्ण ठरले आहे, हे निश्चित.

**किशोर गांगुर्डे**





# समता आणि समृद्धी


शिवाजीराव मोघे

मंत्री, सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती


## सामाजिक न्याय

महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर समाजसेवकांच्या लोककल्याणाचा आणि पुरोगामी विचारांचा वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. या समाजसुधारकांच्या सामाजिक समतेच्या विचारातून सामाजिक न्याय विभागामार्फत समाजातील दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा. यासाठी शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध स्तरावर विविध योजना राबवण्यात येत आहेत.

अज्ञानावर आधारित अनिष्ट व दुष्ट प्रथा, नरबळी व अघोरी प्रथेपासून सर्वसामान्य माणसाचे रक्षण व्हावे यासाठी, राज्यपालांनी जादूटोणाविरोधी कायद्याचा अध्यादेश जारी केला आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक तेथे अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रकारचा कायदा देशभरात लागू करावा, अशा प्रकारच्या मागण्या होत आहेत. पुरोगामी महाराष्ट्र राज्य याबाबतीत आघाडीवर राहिले आहे.

### शैक्षणिक सोयी-सुविधा

समाजातील अनुसूचित जातीमधील मुला-मुलींना चांगले शिक्षण घेता यावे यासाठी तालुका राज्यात वसतिगृहे सुरू केली आहेत. जिल्हा स्तरावर २७१ शासकीय वसतिगृहे होती. त्यामध्ये २०११ ला १०० नवीन वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. याशिवाय प्रत्येक महसूल विभागात मुला-मुलींसाठी नवीन वसतिगृहे बांधण्यात येतील.




काही वसतिगृहांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. वसतिगृहात राहणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या, परिपोषण आहारात वाढ करण्यात आली आहे. मॅट्रिकोत्तर शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना वेळेत मिळावी, यामध्ये पारदर्शकता यावी याकरिता ही शिष्यवृत्ती देण्यासाठी ऑनलाइन कार्यपद्धती स्वीकारण्यात आली. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात त्यांची शिष्यवृत्ती आता थेट जमा होत आहे. देशात उत्कृष्ट काम केल्यामुळे या अभिनव योजनेला २०११ मध्ये केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे पारितोषिक मिळाले. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीही ऑनलाइन विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

### परदेशात शिक्षण

अनुसूचित जातींच्या ज्या विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन उच्च शिक्षण घ्यायचे आहे त्यांच्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. सुरुवातीला २५ विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येत होता. त्यामध्ये वाढ करून आता ५० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जात आहे. आतापर्यंत १५० विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

अनुसूचित जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना, शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. यूपीएससी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी ५० विद्यार्थ्यांना नामांकित संस्थेत प्रशिक्षण देण्यात येते. आयआयटी परीक्षेच्या तयारीसाठी पेस संस्थेमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.

### रमाई घरकूल योजना

अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबाला हक्काचे घर मिळावे यासाठी विभागाने रमाई आवास योजना राबवण्यास सुरुवात केली. यामध्ये २६९ चौ.फुटाचे घर, अनुसूचित जातीच्या कुटुंबाला स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या जागेवर बांधून देण्यात येते. मागील दोन वर्षात १ लाख ५० हजार घरे बांधून पूर्ण झाली. ६९ हजार घरकुले प्रगतिपथावर आहेत.

### दलित वस्ती धोरणात बदल

दलित वस्ती सुधारणा योजनेच्या नावात बदल करण्यात आला असून, तिचे नाव आता अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास असे करण्यात आले आहे. पूर्वी ५० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी या योजनेत निधीची तरतूद करण्यात येत नव्हती. आता १० ते २५ इतकी लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी २ लाख, २६ ते ५०

- मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ऑनलाइन पद्धतीने त्यांच्या बँक खात्यात थेट जमा.
- रमाई आवास योजनेंतर्गत मागील दोन वर्षात १ लाख ५० हजार घरे बांधून पूर्ण.
- नोकरीमधील अपंगाचा अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष मोहीम. १० हजार पदे भरली आहेत.



## अनुसूचित जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

लोकसंख्येसाठी ५ लाख, ५१ ते १०० लोकसंख्येसाठी ८ लाख, १०१ ते १५० लोकसंख्येला १२ लाख, १५१ ते ३०० पर्यंतच्या लोकसंख्येसाठी १५ लाख आणि ३०१ च्या पुढे लोकसंख्या असलेल्या वस्तीच्या विकासासाठी रुपये २० लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**विमुक्त भटक्या समाजाकरिता विशेष प्रयत्न**

भटक्या जाती व भटक्या जमाती या घटकास मूळ प्रवाहात आणण्यासाठी, शासनाने यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती क्षेत्रातील विमुक्त या घटकास २६९ चौ.फू. क्षेत्र फळाची पक्की घरे बांधून देण्यात येणार आहेत. तसेच या वस्त्यांमधील लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**व्यसनमुक्तीसाठी धोरण**

व्यसनामुळे माणसाची व्यक्तिगत आणि सामाजिक हानी रोखण्यासाठी राज्य शासनाने व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले. त्याची अंमलबजावणी सुरू केली. गेल्या वर्षी पुणे येथे सामाजिक न्याय मंत्री आणि राज्यपाल यांच्या उपस्थितीत पहिले व्यसनमुक्ती साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या वर्षी नागपूर येथे २ व ३ ऑक्टोबर रोजी हे संमेलन पार पडले. यात १५ ते २० हजार युवकांचा सहभाग होता. व्यसनमुक्तीसाठी लोकसहभाग आणि जनजागृती व्हावी हा त्यामागचा प्रमुख उद्देश होता. व्यसनमुक्तीसाठी सल्ला, समुपदेशन, उपचार व पुनर्वसन यासारखे कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**रोजगार व स्वयंरोजगार**

सामाजिक न्याय विभाग आधिपत्याखाली कार्यरत असलेल्या महामंडळामार्फत स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. या महामंडळाचे भागभांडवल वाढवण्यासाठी मागच्या वर्षी ३३० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. ही महामंडळे सक्षम व्हावी या करिता ४२१ कोटी रुपयांचे २००८ पूर्वीचे थकीत कर्ज व्याजासह माफ करण्यात आले.



**अंपगांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. अंपगासाठी सुरू करण्यात आलेल्या शाळांना १०० टक्के अनुदान देण्यात येते. ६३७ विशेष शाळा सुरू आहेत. शासकीय वसतिगृहात सामाजिक न्यायमंत्र्यांच्या १५ टक्के कोट्यापैकी ५ टक्के जागा अपंगांसाठी ठेवण्यात येत आहेत. अपंग युवकांना स्वंयरोजगार करता यावा यासाठी, अपंग कल्याण विकास महामंडळामार्फत कर्ज देण्यात येते. पूर्वी २५ हजार कर्ज मिळत होते ते आता १ लाख रुपये करण्यात आले आहे. यामध्ये ३० टक्के सबसिडी देण्यात येते. देशातील पहिले अपंग साहित्य संम्मेलन नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.**

**खाजगी जमीन वाटप**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजनेंतर्गत जमीन देण्यात येते. ४८७२ भूमिहीनांना जमीन देण्यात आली आहे. परंतु सध्या जमीन मिळण्यास अडचण येत आहे. त्यामुळे या योजनेत पात्र व्यक्तींनी जमीन पसंत केल्यावर खाजगी जमीन, रेडिरेकनर दरानुसार रुपये ३ लाख प्रतिएकर विकत घेऊन देण्यात येईल. शेतीसाठी पॉवर टिलर देण्यात येत होते. त्यात आता बदल करून मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने देण्याचा निर्णय घेतला आहे. व्यक्तीऐवजी स्वयंसाहाय्यता बचत गटाला हे मिनी ट्रॅक्टर देण्यात येत आहेत. नुकतेच ५०० मिनी ट्रॅक्टरचे यवतमाळ येथे वाटप करण्यात आले.

**सामाजिक सुरक्षा व प्रगतीसाठी**

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेली विविध घटकांची कार्यालये एका छताखाली येऊन कार्यपद्धती सोपी व्हावी. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन बांधण्यात येत आहे.

अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटले लवकर निकाली लागावेत यासाठी, प्रत्येक विभागीय स्तरावर स्वतंत्र न्यायालये सुरू करण्यात येतील. जातप्रमाणपत्राची पडताळणी गतीने व्हावी यासाठी, जातपडताळणी समित्या वाढवण्यात आल्या आहेत. तसेच जातप्रमाणपत्राची पडताळणी ऑनलाइन करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या विविध सामाजिक, आर्थिक, आरोग्य, निवास सुरक्षाविषयक समस्या विचारात घेऊन राज्य शासनाने सर्व समावेशक असे ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर केले आहे. नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावे कनव्हेशन सेंटरचे बांधकाम सुरू असून, त्यांचे साहित्य जतन करण्याचे काम करण्यात येत आहे. दीक्षाभूमी येथे ई- लायब्ररी सुरू करण्यात येत आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे.

**विष्णू काकडे**



# परिवर्तनाच्या दिशेने

**मधुकरराव पिचड**
मंत्री, आदिवासी विकास

## आदिवासी विकास

दऱ्याखोऱ्यात व समाजापासून अलिप्त राहणाऱ्या आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने अनेक उपाययोजना राबवल्या. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दुर्गमस्थळी राहणाऱ्या आदिवासी जमातींच्या सर्वंकष विकासासाठी अनेक निर्णय घेतले. बदलत्या परिस्थिती आणि गरजेनुसार या समाजाचा सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांची निर्मिती केली.

### अर्थसंकल्प

राज्याच्या अर्थसंकल्पात आदिवासींच्या विकासाकरिता लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात येतो. त्याद्वारे आदिवासी गावे, वाड्या-पाडे, वस्त्या, या ठिकाणी रस्ते, वीज, पिण्याचे पाणी या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राबवण्यात येतात.

स्थानिक पातळीवर काही महत्त्वाच्या योजना राबवणे आवश्यक असते. या योजनांचा अर्थसंकलपात समावेश नसतो. त्यामुळे स्थानिक पातळीवरील या योजनांचा तांत्रिक कारणांमुळे स्थानिक आदिवासींना लाभ देता येत नाही. अशा योजनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) ही योजना राबवण्यात येत आहे. या योजनेत लाभार्थ्याला दिल्या जाणाऱ्या अनुदानाची मर्यादा १५,००० रुपये होती ती ५०,००० रुपयांपर्यंत करण्यात आली आहे.

### आर्थिक तरतूद



यंदाच्या अर्थसंकल्पात आदिवासी उपयोजनेसाठी ४ हजार १७७ कोटी इतकी तरतूद केली आहे. आदिवासी आश्रमशाळा, वसतिगृहे व इतर बांधकामांसाठी ५०१ कोटी ३८ लाख, सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजनेसाठी २०३ कोटी ६८ लाख, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेसाठी २४५ कोटी २३ लाख, आदिवासी भागातील विद्युतिकरणासाठी ८२ कोटी ८९ लाख, आदिवासी भागांतील आरोग्यविषयक कार्यक्रमांसाठी २४४ कोटी २३ लाख अशी तरतूद करण्यात आली आहे.

### शिक्षण

आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे आश्रमशाळा या बरोबरच आदिवासी मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून राज्यात चार ठिकाणी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सी.बी.एस.सी.) धर्तीवर पब्लिक स्कूल सुरू करण्यात आली आहेत. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची शाळेतील गळती रोखण्यासाठी इयत्ता पहिली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

- यंदाच्या अर्थसंकल्पात आदिवासी उपयोजनेसाठी ४ हजार १७७ कोटी ४८ लाख रुपयांची तरतूद.
- आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची शाळेतील गळती रोखण्यासाठी इयत्ता पहिली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजना लागू.
- १ लाख आदिवासी युवकांना रोजगारक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित.




### ई-शिष्यवृत्ती

विद्यार्थी व शिक्षण संस्थांना शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत उपलब्ध होण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याकरिता etribal.gov.in ही वेबसाइट सुरू करण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या ४३७ आश्रमशाळांच्या इमारतींच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. आतापर्यंत २९२ इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे. चालू वर्षी आश्रमशाळा व वसतिगृह व इतर बांधकामासाठी ५०१ कोटी ३८ लाख रुपयांची तरतूद आहे.

### आरोग्य

दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी महिलांची आरोग्यविषयक मुख्य समस्या कुपोषण ही आहे. ही समस्या हाताळण्यासाठी शासनाने उत्तम उपाययोजना केल्या आहेत. यामध्ये गर्भवती मातांची नियमित तपासणी, कुपोषित बालकांचे सर्वेक्षण करून त्यांना रुग्णालयात, प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्याची सोय, दुर्गम भागातील आदिवासींना वेळेवर व तात्काळ आरोग्यविषयक वैद्यकीय सेवा, पौष्टिक आहाराचा पुरवठा या बाबींचा समावेश आहे.

### घरकूल

आदिवासींना कायमस्वरुपी हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाने शबरी आदिवासी घरकूल योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ठक्कर बाप्पा वस्तीसुधार कार्यक्रमांतर्गत प्रति गाव अनुदान मर्यादा ७० हजार रुपयांवरून १

## संस्कृती

विविध योजनांमुळे आदिवासींचा आर्थिक विकास घडत आहे. त्याचबरोबर त्यांच्याकडे असलेल्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी आदिवासींच्या हस्तकला, वारली चित्रकला आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचवण्यासाठी शासनामार्फत प्रदर्शने आयोजित केली जातात. अशाप्रकारे शासनाने आदिवासी कलावंताना मदतीचा हात दिला आहे.



लाख रुपये एवढी वाढविण्यात आली आहे. राज्यातील २ लाख ६६ हजार अदिवासी कुटुंबांना याचा लाभ मिळणार आहे.

**खावटी कर्ज**

आदिवासींना पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत रोजगार मिळावा यासाठी त्यांना ७० टक्के वस्तू आणि ३० टक्के रोख स्वरुपात खावटी कर्ज दिले जात होते. या निर्णयात बदल करण्यात येऊन आदिवासी लाभार्थ्याला खावटी कर्जाची रक्कम धनादेशाद्वारे देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच कुटुंबातील महिला सदस्याच्या नावाने बँकेत खाते उघडण्यात येणार आहे.

**कौशल्य विकास**

आदिवासी जमातीच्या युवक युवतींमधील उद्यमशीलता तसेच अन्न प्रक्रिया उद्योगांना असलेला वाव हे लक्षात घेऊन नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात येत आहे. या अंतर्गत १ लाख आदिवासी युवकांना रोजगारक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**८ लाख ४२ हजार एकर जमिनीचे वाटप**

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम (२००६), ३ डिसेंबर २००७ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आला. या अधिनियमाची अंमलबजावणी करत असताना राज्यात मे २०१३ अखेर ग्रामसभेकडे प्राप्त झालेल्या वैयक्तिक ३ लाख ४१ हजार २० व सामूहिक ५ हजार ११२ अशा एकूण ३ लाख ४६ हजार १३२ वन हक्क दाव्यांपैकी ३ लाख ४३ हजार १२५ दावे निकाली काढण्यात आले आहेत. त्याचे प्रमाण सुमारे ९९.१३ टक्के एवढे आहे. राज्यात आतापर्यंत प्राप्त झालेल्या प्रकरणांपैकी एकूण १ लाख ४६ हजार ५५९ दावे अंतिमत: मंजूर करण्यात आले आहेत. मंजूर केलेल्या १ लाख ४६ हजार ५५९ वनहक्क दाव्यांपैकी १ लाख ३८ हजार ९८८ दाव्यांमध्ये टायटल्सचे वाटप करण्यात आले आहे. वनहक्क वाटप केलेल्या टायटल्समधील एकूण वनक्षेत्र ८ लाख ४२ हजार एवढे आहे.

आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या पूर्वीच्या निर्णयांमध्ये गेल्या ३/४ वर्षात या समाजाच्या गरजेनुसार शासनाने काही नावीन्यपूर्ण घेतलेल्या निर्णयांमुळे आणि शासनाच्या अथक प्रयत्नांमुळे या समाजात मोठ्या प्रमाणात बदल होताना दिसत आहेत.

**अर्चना शंभरकर**



बहुतांशी आदिवासी कृषी व्यवसायाशी निगडित असल्यामुळे त्यांच्या कृषी-विकासाच्या योजनांना प्राधान्य देण्यात येत आहे. शासनाच्या सहकार्याने जव्हार, पाडा या भागातील आदिवासी हळद, मोगरा यांसारखे नगदी पिक घेण्याचे प्रयोग करीत आहेत.



# टंचाईवर यशस्वी मात

**मदत व पुनर्वसन**

**पतंगराव कदम**
मंत्री, वने, मदत व पुनर्वसन आणि भूकंप पुनर्वसन

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षापासून या ना त्या रूपाने भेडसावणाऱ्या नैसर्गिक आपत्तीने चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. राज्यात समाधानकारक पाऊस पडत असला तरी, तो विषम स्वरूपाचा असल्याने आणि काही भागात त्याने सतत हुलकावणी दिल्याने राज्यात टंचाईग्रस्त परिस्थिती जाहीर करण्यात आली. केंद्र सरकारकडून दुष्काळ निवारणासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून घेण्यात राज्य शासनास यश आले. खरीप २०११, रब्बी २०११-१२ व खरीप २०१२ हंगामातील बाधित शेतकऱ्यांना २१८३.०४ कोटी रुपये निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आला. टंचाई निवारण्यास साहाय्यभूत ठरणारा, शेततळी निर्माण करण्याचा कार्यक्रम राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून राबवण्यात आला. कोरेगाव, मान, खटाव, खंडाळा तालुक्यांमध्ये ३,३०० शेततळी निर्माण करण्यात आली. टंचाईग्रस्त जनतेस टँकरद्वारे पिण्याचे पाणी, ९ लाख जनावरांसाठी १,०२२ चारा छावण्या, साडे सात हजार हेक्टर चारा उत्पादन कार्यक्रम व नरेगातून (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ) ५० कोटींची कामे घेऊन जनतेच्या हाताला काम दिले.

भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी जलमुक्त गाव अभियानांतर्गत २१० सिमेंट बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले. राज्यात १० हजार अतिरिक्त शेततळी निर्माण करणे व त्यांची देखभाल करणे ही कामे रोजगार हमी माध्यमातून करण्यात येत आहेत. जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे रूपांतरण, वीज बिलात ३३.५ टक्के इतकी सूट, परीक्षा शुल्कात माफी, शेतांशी निगडित कर्जाच्या तरतुदीस स्थगिती, स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांच्या वीज देयकांच्या ६७ टक्के रक्कमेचे वाटप, स्थलांतरित कुटुंबाला शिधापत्रिका अशा विविध स्वरूपांच्या उपाययोजनांमधून राज्य शासनाला दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यात यश आले.

- दुष्काळ निवारणासाठी राज्यात १० हजार अतिरिक्त शेततळ्यांची निर्मिती व देखभालीची कामे रोजगार हमी योजनेद्वारे.
- जलमुक्त गाव अभियानांतर्गत २१० सिमेंट बंधाऱ्याचे काम पूर्ण.
- अतिवृष्टी व पूर परिस्थितीत जीवित व वित्तहानीसाठी मदत थेट आपद्ग्रस्तांच्या बँक खात्यात जमा करण्याचे शासनाचे आदेश.



### तातडीने निधीची उपलब्धता

जून, जुलै २०१३ मध्ये राज्यात झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीत जीवित व वित्तहानीसाठी आपद्ग्रस्तांना मदत व पुनर्वसन विभागातर्फे तातडीने मदत उपलब्ध करून देण्यात आली. ही मदत संबंधितांच्या थेट बँक खात्यात जमा करण्याचे आदेश शासनाने दिले. नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी २८ ऑगस्ट २०१३ पर्यंत पुणे, कोकण, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद या सहा विभागांना ४५ कोटी ५८ लक्ष रुपये निधी वितरित करण्यात आला. या ४५ कोटी ५८ लक्ष रुपये निधीमधून मृत व्यक्तींच्या कुटुंबांना साहाय्य यासाठी सहा विभागांना १० कोटी ७१ लक्ष रुपये अनुदान वितरित करण्यात आले. ११३ घरांची दुरुस्ती व पुनर्बांधणी यासाठी ३१ काटी ४७ लक्ष रुपये तर पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना साहाय्य व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना साहाय्य करण्यासाठी २ कोटी ७६ लाख रुपये तसेच मदत केंद्रात निवारा, अन्न, वस्त्र, औषधे इत्यादींच्या पुरवठ्यासाठी ६ कोटी ४० लक्ष या प्रमाणे सहा विभागांना निधी उपलब्ध करुन देण्यात आला. मदतीच्या रकमेतून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसुली करू नये यासाठी सहकार विभागाने योग्य ते आदेश निर्गमित केले. विदर्भातील सर्व जिल्ह्यात जुलै २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूर यामुळे उदभवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत निराधार झालेल्या कुटुंबांना विशेष बाब म्हणून प्रति कुटुंब २० किलो अन्नधान्य (१० किलो गहू अथवा ज्वारी व १० किलो तांदूळ) तसेच १० लीटर केरोसीन मोफत देण्यात आले.



# वैभवशाली वन-व्यवस्थापन

वनखात्याची जमीन असलेल्या १५ हजार गावांपैकी १२ हजार ७६० गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन व वन संरक्षण समित्या स्थापन करून महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली. संयुक्त वन व्यवस्थापन समितीत ५० टक्के महिलांचा समावेश करण्यात आला.

शासनाने पुढील दोन वर्षात १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून दुष्काळी परिस्थितीतही मागील वर्षात १६ कोटी झाडे लावण्यात आली आहेत. या झाडांच्या संवर्धनाची जबाबदारी स्थानिक लोकांवर असून कुऱ्हाड बंदी, चराई बंदी, अवैध वृक्षतोड बंदीचा ठराव करणाऱ्या गावकऱ्यांना ७५ टक्के अनुदान तत्त्वावर गॅस शेगडी देण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला.

३० हजार आदिवासी कुटुंबांना चुलीऐवजी गॅस मिळाला आहे. ताडोबांच्या गाभा क्षेत्रातील (कोअर एरिया) गावांचे पुनर्वसन करून तिथे वाघांचे निवासस्थान संरक्षित करण्यावर भर देण्यात आला आहे. मेळघाटात १५ ते २८ खेड्यांना गाभा क्षेत्रात कायम ठेवून सहअस्तित्व वाढीस प्रोत्साहन देण्यात येत आहे.

ताडोबाला भेट देणाऱ्या पर्यटकांमुळे दरवर्षी ४५ लाख रुपये मिळतात. संवर्धनावर आधारित पर्यावरणपूरक पर्यटन व्यवसायात स्थानिक ग्रामस्थांना थेट सहभाग मिळत असल्याने, वाघ संरक्षणात ते सक्रिय भाग घेत आहेत. यातून त्यांना शाश्वत स्वरूपाचे जीवनमान उपलबध होत आहे.

वन विभागात सुरक्षा रक्षकांची भरती करण्यात येत आहे. वन विभाग अधिक सक्षम करण्यात आला आहे. वन क्षेत्रातील गुन्ह्यांची माहिती देण्यासाठी खबऱ्यांचे जाळे मजबूत केले आहे. त्यासाठी ५० लक्ष रुपयांचा गुप्त सेवा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**आदिवासींना जमीन**

गेली शेकडो वर्षे विकासाच्या प्रवाहापासून दूर राहिलेल्या आदिवासींना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने अनेकविध योजना कार्यान्वित केल्या. जे आदिवासी वर्षानुवर्षे ज्या जमिनीवर कसत आहेत त्यांना त्यांच्या जमिनीची सरकार दप्तरी नोंदी करून ७/१२ त्यांच्या नावावर करून देण्याचा कायदा अमलात आला आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

४,७७, ३३६ हजार एकर वन जमिनीवर १५७१ अधिकारपत्रे, तसेच गडचिरोली, गोंदिया, अमरावती या जिल्ह्यांव्यतिरिक्त २५,१७२ एकर जमिनीवर ३०१ अधिकारपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. राज्यातील अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, अन्य वन प्रकल्प यामुळे बाधित झालेल्या व्यक्तींना पुनर्वसित करण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या नवीन धोरणानुसार प्रति कुटुंब एक रकमी १० लाख रुपये इतकी रक्कम देण्यात येणार आहे.

**बोर अभयारण्य**

वर्धा जिल्हयातील बोर अभयारण्य पर्यटकांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करीत आहे. या अभयारण्यात १८५ प्रकारच्या विविध पक्षांची नोंद करण्यात आली आहे. नागपूर व वर्धा जिल्ह्यातील ६१ चौरस किलोमीटरची जागा या अभयारण्यात समाविष्ट करण्यात आली आहे. केंद्राने या अभयारण्याला वाघाचे आश्रयस्थान म्हणून घोषित केले आहे .



राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने १५ ऑक्टोबर २०१२ रोजी व्याघ्र प्रकल्प व त्याच्या सभोवतालच्या क्षेत्राकरिता मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली. वन्यप्राणी संरक्षणाच्या उपयायोजनाही केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचनेत नमूद केल्या आहेत. व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्राचे जास्तीत जास्त २० टक्के क्षेत्र पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले. निसर्ग पर्यटनाची जास्तीत जास्त कामे बफर क्षेत्रात घेण्यात येणार आहेत. बफर झोनमधील रहिवाशी असलेल्या स्थानिक गावकऱ्यांनी, त्यांच्या राहत्या घरात पर्यटन निवास व्यवस्था केल्यावर त्यांच्याकडून फी आकारण्यात येणार नाही. स्थानिक जनतेला चिरस्थायी उपजीविकेचा मार्ग यामुळे उपलब्ध होणार आहे. गडचिरोली जिल्हयातील ७६ टक्के वनक्षेत्र जंगलाने व्यापले आहे. या जिल्हयातील आदिवासींच्या उपजीविकेसाठी तेंदू पत्ता संकलन, जलसंधारण कामे, कूप तोड यामधून त्यांना रोजगार उपलब्ध होतो. अगरबत्ती उत्पादन प्रकल्प, हिरडा- बेहडा औषधी बी संकलन प्रक्रिया विक्री , मोहफुले खरेदी विक्री, डिंक-मध खरेदी प्रक्रिया प्रकल्प, बांबूपासून कलाकुसर व फर्निचर प्रकल्प तसेच जैवविविधता केंद्र निर्मिती देखभाल यामुळे आदिवासी तरुणांना रोजगार उपलब्ध झाला आहे.




- १२ हजार ७६० गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन व वन संरक्षण समित्या स्थापन करून महाराष्ट्राची देशात आघाडी.
- पुढील दोन वर्षात १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट. दुष्काळी परिस्थितीतही मागील वर्षात १६ कोटी झाडे लावण्यात आली.
- वन प्रकल्पामुळे बाधित व्यक्तींना प्रति कुटुंब एकरकमी १० लाख रुपये देण्याचा निर्णय.


सुबोधिनी घरत



गणेश नाईक
मंत्री, राज्य उत्पादन शुल्क आणि अपारंपरिक ऊर्जा

# नवी ऊर्जा नवी आशा

## अपारंपरिक उर्जा


राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा प्रचार, प्रसार व विकास तसेच ऊर्जा संवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ची स्वायत्त मूलाधार शासकीय संस्था म्हणून स्थापना केली. महाऊर्जामार्फत नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मिती करणारी साधने/योजना/प्रकल्प यांचा विकास करणे, अपारंपरिक स्त्रोतापासून वीज निर्मितीस प्रोत्साहन देणे, ऊर्जा बचतीचे कार्यक्रम हाती घेऊन त्यांचा प्रचार व प्रसार करण्यात येत आहे .

### दुप्पट वाढ

राज्याची अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता मार्च २००९ अखेर २५०६.२३५ मे.वॅ. एवढी होती. तर मार्च २०१३ अखेर हीच क्षमता ४६०८.८१ मे.वॅ. एवढी झाली. या केवळ चार वर्षात जवळपास दुपटीने (८४%) वाढ झाली आहे. मार्च २०१३ अखेरपर्यंत अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचा स्थापित क्षमतेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

पवन ऊर्जा प्रकल्प-३००५.६६, ऊसाच्या चिपाडावर आधारित सहजीव निर्मिती प्रकल्प-१०८८.००, कृषी अवशेषावर आधारित प्रकल्प- १७०.००, औद्योगिक कचऱ्यापासून वीज निर्मितीचे प्रकल्प-२४.००, सौर ऊर्जा प्रकल्प-५०.१५, लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प-२७१.०० असे एकूण ४६०८.८१ मे.वॅट एवढी क्षमता आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य अपारंपरिक ऊर्जा निर्मिती स्थापित क्षमतेच्या बाबतीत देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. राष्ट्रीय कृती आराखड्यानुसार सन २०१५ पर्यंत बृहत वीज निर्मितीच्या १० टक्के वीज अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. राज्यात सन २००८-०९ या वर्षामध्ये ३.९४ टक्के इतकी वीज अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून उपलब्ध होती. सन २०१०-११ मध्ये ती ५.७५ टक्के व सन २०११-१२ मध्ये ६.८६ टक्के इतकी असून याप्रमाणे राष्ट्रीय आराखड्यानुसार उद्दिष्ट गाठण्याची वाटचाल सुरु आहे.

- राज्याची अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता ४६०८.८१ मे.वॅ. आहे.
- २०१५ पर्यंत बृहत वीज निर्मितीच्या १० टक्के वीज अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्याचे उद्दिष्ट.
- आशिया खंडातील सर्वात मोठा ५४५ मे.वॅट पवन ऊर्जा प्रकल्प धुळे जिल्ह्यातील ब्राम्हणवेल येथे



राज्यात सन २००९-१० मध्ये २०४.८५ मे.वॅ. क्षमतेचे व सन २०१०-११ मध्ये ५०१.१७५ मे.वॅ. क्षमतेचे असे एकूण ७०६.०२५ मे. वॅ. क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा निर्मिती प्रकल्प आस्थापित करण्यात आले. त्या आधीच्या वर्षाच्या तुलनेत ही कामगिरी जवळपास दीडपटीने जास्त झाली. सन २०११-१२ मध्ये एका वर्षात ७२१.७५ मे.वॅ. एवढी भरीव क्षमता स्थापित करून उच्चांक गाठण्यात आला. सन २०१२-१३ मध्ये ५३९.२० मे.वॅ. क्षमतेची आस्थापना करण्यात आली असून त्यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्प-२८८.५५ मे.वॅ., ऊसाच्या चिपाडावर आधारित सहजीव निर्मिती प्रकल्प-१९५.५० मे.वॅ., औद्योगिक कचऱ्यापासून वीज निर्मितीचे प्रकल्प-४.०० मे.वॅ., सौर ऊर्जा प्रकल्प-३०.१५ मे.वॅ. आणि लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प-६.०० मे.वॅ. अशा विविध स्रोतांपासून वीज निर्मिती प्रकल्पांचा समावेश आहे. या कालावधीत अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून ऊर्जा निमितीच्या धोरणांतर्गत अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प उभारणेविषयीची सुटसुटीत व पारदर्शक कार्यपद्धती जाहीर करण्यात आली.

अपारंपरिक ऊर्जा स्रोतांच्या विकासासाठी राज्य शासनाची यापूर्वी विविध कार्यक्रम/योजनांकरिता अर्थसंकल्पीय तरतूद प्रतिवर्षी सरासरी रु.७.७० कोटी असे. आता विशेष प्रयत्न करून गेल्या तीन वर्षात रु ९३.७८ कोटी इतक्या मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे.

### दुर्गम भागात वीज

गेल्या चार वर्षांच्या कालावधीत दुर्गम व आदिवासी भागांमधील ६४ गावे व १७१ पाड्यांमध्ये अपारंपरिक साधनांद्वारे विद्युतीकरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात आला तसेच नक्षलग्रस्त भागातील १०५ गावांचे विद्युतीकरणाचे काम प्रगतिपथावर. मागील चार वर्षात



**महाराष्ट्र अपारंपरिक ऊर्जा निर्मिती स्थापित क्षमतेच्या बाबतीत देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे.**

ग्रामपंचायतीमध्ये पथदिव्यांसाठी साध्या बल्बऐवजी एकूण ५६,६०३ ऊर्जा कार्यक्षम पथदिवे बसवण्यात आले असून यामुळे ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात लक्षणीय ऊर्जा बचत झालेली आहे.

### महाऊर्जास पुरस्कार

आशिया खंडातील सर्वात मोठा ५४५ मे.वॅट पवन ऊर्जा प्रकल्प धुळे जिल्ह्यातील ब्राम्हणवेल येथे विकसित करण्यात आला आहे. राज्यात आजवर ४४ पवनऊर्जा निर्मितीक्षम घोषित करण्यात आली असून आणखी ११२ स्थळांवर वाऱ्याचे मोजमाप करण्यात येत पवनऊर्जा प्रकल्पांसाठी पवन क्षेत्र वर्गीकरण करण्यासाठी कार्यप्रणाली तयार करण्यात आली. अशा प्रकारे कार्यप्रणाली तयार करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले. राज्यात २०११-१२ या वर्षात १.९८ लक्ष चौ.मी. (१२४.०४ लक्ष लिटर प्रतिदिन) क्षमतेची सौर उष्णजल संयंत्रे विविध क्षेत्रात आस्थापित करण्यात आली आहेत. त्यामध्ये महाऊर्जाबरोबरच राज्यातील सौर उष्णजल संयंत्राचे उत्पादक व वितरक तसेच महानगरपालिका यांचे भरीव योगदान घेण्यात आले . आतापर्यंत एकूण आस्थापित करण्यात आलेल्या ८.०४ लक्ष चौ.मी. (५०२ लक्ष लीटर प्रतिदिन) एवढ्या सौर उष्णजल विजेच्या उच्चतम मागणीच्या वेळी ५०२ मे.वॅ. वीजेची बचत झाली असून ७.५३ लाख टन कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन कमी करण्यासही मदत झाली आहे. गेल्या तीन वर्षातील प्रगती पाहता सौर उष्णजल संयंत्र आस्थापनेसाठी देशात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी राज्याची मूलाधार संस्था म्हणून केंद्र शासनाने महाऊर्जास राष्ट्रीय पातळीवर प्रथम पुरस्कार प्रदान केला आहे.

### पवनसौर संकरित ऊर्जा

देशात सर्वात जास्त म्हणजे १७५१ किलोवॅट क्षमतेची पवन-सौर संकरित संयंत्रांची स्थापना राज्यात झाली असून आणखी ४७४ कि.वॅ. क्षमतेची संयंत्रे आस्थापित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. शिवाय ८९४ कि.वॅ. क्षमतेची संयंत्रे आस्थापित करण्यासाठीचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वाधिक पवन-सौर संकरित संयंत्रे आस्थापनेसाठी म्हणून महाऊर्जास वाईज्, पुणे या संस्थेला पारितोषिक प्रदान केले आहे.



**राज्यात भारनियमनाच्या कालावधीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होऊ नये या उद्देशाने मागील तीन वर्षात एकूण १५,०६२ गावांतील सार्वजनिक ठिकाणी सौर अभ्यासिका योजना घेण्यात आली आहे.**

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प व्हावे म्हणून सौर प्रारणाचे अचूक मोजमाप करण्यासाठी आणि गुंतवणूकक्षम माहिती मिळण्यासाठी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून सौर प्रारण मापन केंद्रांची आस्थापना करण्याच्या नवीन योजनेस मंजुरी देण्यात आली आहे. अशा प्रकारे राज्याच्या निधीतून प्रारण मापन केंद्रे उभारणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले आहे.

ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांतर्गत मागील चार वर्षात शासकीय/निमशासकीय १४ इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन/ऊर्जा कार्यक्षमता पथदर्शी प्रकल्प घेण्यात आले. तसेच १९ नगरपालिका /महानगरपालिकांमधील पथदिवे व पाणीपुरवठा योजनांमध्ये ऊर्जा बचत संयंत्रे बसविण्याचा कार्यक्रम राबवण्यात आला.

### नवीन योजना

राज्यात गेल्या चार वर्षात अपारंपरिक ऊर्जा क्षेत्र व ऊर्जा संवर्धन/ऊर्जा कार्यक्षमता क्षेत्र यामध्ये जाहीर केलेल्या नवीन योजना:-

१. शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान योजना राबवणे.

२. राज्यातील नगरपालिकेतील पथदिवे व पाणीपुरवठा योजना यामध्ये ऊर्जा बचत संयंत्रे आस्थापित करणे.

३. आदिवासी क्षेत्रातील विविध आश्रमशाळांमध्ये सौर ऊर्जा साधने आस्थापित करणे.

४. आदिवासी विभागातील विविध शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहे येथे पवन सौर संकरित संयंत्रे आस्थापित करणे.

भूगर्भीय औष्णिक ऊर्जेच्या (geothermal energy) विकासासाठी सर्वेक्षण करणे व व्यापारी तत्वावर वीजनिर्मिती करणे याबाबत महाराष्ट्र मॉडेल तयार करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे.

**विष्णू काकडे**

कृषी

# दुसरी हरितक्रांती




राधाकृष्ण विखे-पाटील
मंत्री, कृषी व पणन


देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा मोठा वाटा आहे. या क्षेत्राच्या उत्पादन वाढीसाठी व शाश्वत विकासासाठी मागील अनुभव आणि सांप्रतकालीन समस्यांचा विचार करून सातत्याने प्रयत्न चालू ठेवणे आवश्यक आहे. याकरिता कृषी व्यवसायावर अवलंबून असलेल्या लोकसंख्येच्या उत्पन्नात वाढ करून त्यांचे जीवनमान उंचावणे आवश्यक आहे. सिंचनाच्या उपाययोजना, माती परीक्षण, जमिनीचे आरोग्य, कोरडवाहू क्षेत्र अधिकाधिक सिंचनाखाली आणणे, यांत्रिकीकरण, माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर, कृषी विद्यापीठाचे व प्रयोगशाळांचे सक्षमीकरण आदी बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शासनाचे प्रयत्नही सुरू आहेत.

यावर्षी राज्याने १० टक्के कृषी विकास दर गाठण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी खतांचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. गेल्या वर्षीपासून कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांचे गट स्थापन करून, त्यांच्या मागणीनुसार त्यांना बांधावर खत उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे खताची अधिक दराने विक्री तसेच इतर खतांबरोबर होणारे लिंकिंग थांबले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिळवणुकीस आळा बसला.

दुष्काळ आणि टंचाई परिस्थितीमुळे पिकांच्या उत्पादकतेवर परिणाम झाला. दुष्काळ आणि पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या माध्यमातून साखळी सिमेंट नाला बांध, शेततळ्यांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.

### कृषी हवामान अभ्यासगटाची स्थापना



राज्याच्या नऊ कृषी हवामान विभागातील भौगोलिक परिस्थितीनुसार पीकरचना निश्चित करणे आणि त्यांच्या विकासासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी कृषी विद्यापीठात कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीत त्या विभागातील कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय, पाटबंधारे विभाग, वखार महामंडळ, पणन मंडळ, महाबीज, कृषी उद्योग, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी व प्रगतिशील शेतकरी, यांचा समावेश राहणार आहे.


### जिल्हास्तरीय खरीप आढावा सभा

राज्यात खरीप हंगामपूर्व बैठका मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यापूर्वी विभागीय स्तरावर घेण्यात येत होत्या. मात्र प्रत्येक जिल्ह्यातील कृषी विकासाचे सूक्ष्म नियोजन आणि अंमलबजावणी होण्यासाठी, जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अध्ययक्षतेखाली खरीपपूर्व हंगामी सभांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### शेतकऱ्यांबरोबर कृषी धोरणाबाबत चर्चा

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील २०० ते २५० प्रयोगशील शेतकऱ्यांची निवड करून त्यांच्याशी कृषी धोरणाबाबत चर्चा करण्यात येत आहे. या शेतकऱ्यांमध्ये जिल्ह्यातील कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी प्राधान्याने असून पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, फळपिके, भाजीपाला, कृषिप्रक्रिया या क्षेत्रातील शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व राहील याची दक्षता घेण्यात येत आहे.

- यंदा १० टक्के कृषी विकास दर गाठण्याचे उद्दिष्ट.
- गेल्यावर्षी दुष्काळी स्थितीत चारा उत्पादन प्रकल्पांद्वारे ५० लाख टन चाऱ्याचे उत्पादन.
- राज्यातील २०६१ महसूल मंडलात स्वयंचलित हवामान केंद्रे



### कोरडवाहू शेती अभियान

राज्यातील ८३ टक्के कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता वाढवण्यासाठी, अभ्यास व विशेष उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याच्या हेतूने कोरडवाहू शेती अभियान राबवण्यात येत आहे. पाच वर्षांसाठी रु. १०,००० कोटी गुंतवणूक केली जाईल.

### स्वयंचलित हवामान केंद्र

जागतिक हवामान बदल व त्याअनुषंगाने शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी, पीक पद्धतीत करावयाचा बदल यासाठी मार्गदर्शन करणे व पीक विमायोजना प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्यातील २०६१ महसूल मंडलात स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येतील. स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे दैनंदिन पर्जन्यमान, कमाल व किमान तापमान, सापेक्ष आर्द्रता, हवेचा दाब, वाऱ्याचा वेग व दिशा इत्यादी हवामानविषयक घटकांच्या नोंदी घेण्यात येतील. हवामान बदलास अनुसरून पीक उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाईल.

### फळबागांसाठी हवामान आधारित विमा

राज्यात प्रयोगिक तत्त्वावर साधारण १ लाख हेक्टर क्षेत्रावर फळपिकांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना द्राक्ष, केळी, संत्रा, मोसंबी, डाळिंब, आंबा , काजू या फळांसाठी कार्यान्वित करण्यात आली आहे. २०११-१२ मध्ये

## कोरडवाहू शेती अभियानांतर्गत पाच वर्षांसाठी १०,००० कोटींच्या गुंतवणुकीचे नियोजन

४५,०५५ शेतकऱ्यांनी यात सहभाग घेतला. त्याअंतर्गत रु. ५१.०८ कोटी विमा हप्ता जमा होऊन १०,१३३ शेतकऱ्यांना रु. ४०.५८ कोटी नुकसानभरपाई मिळाली. २०१२-१३ साठी २ लाख हेक्टर क्षेत्राचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना**

राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत रब्बी हंगाम २०१२-१३ मध्ये गहू, ज्वारी, हरभरा, सूर्यफूल व करडई या पिकांसाठी जोखीम स्तरात ६० टक्क्यांहून ८० टक्के वाढ केली व पिकांच्या विमा संरक्षित रकमेत ३३ ते ३५ टक्के वाढ केली. यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची जास्त संधी उपलब्ध झाली आहे.

**शेततळ्यास प्लॅस्टिक अस्तरीकरण**

शेतकऱ्यांना संरक्षित पाणी देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन २०१२-१३मध्ये १०००० शेततळयांस ७५ टक्के अनुदानावर प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी रु.७५ कोटी अनुदान देण्यात आले आहे.

खाजगी कंपन्यांनी वाण विक्रीसाठी आणण्यापूर्वी कृषी विद्यापीठांकडे किमान २ वर्षे चाचणीनंतर आणि त्यांची शिफारस प्राप्त झाल्यावर या वाणांच्या विक्रीस परवानगी देण्याचा निर्णय घेतल्यामुळे, शेतकऱ्यांच्या फसवणुकीला आळा बसला आहे.

**बांधावर खत**

पीक उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा जवळपास ७३ लाख मे.टन प्रतिवर्ष वापर होतो. हे खत थेट शेतावर पोहोचवण्यात येत आहे. त्यामुळे वाहतूक खर्चात बचत होते व शेतकऱ्यांना मागणीनुसार खते वाजवी दराने उपलब्ध होतात.

**टोल फ्री क्रमांक १८००-२३३-४०००**

रासायनिक खत व बियाणे यांची उपलब्धता, वितरण व त्याची प्रत या संदर्भात शेतकऱ्यांना माहिती मिळण्यासाठी टोल फ्री क्रमांक सुविधा जून २०११ पासून उपलब्ध करून दिली आहे.

**निविष्ठा गुणनियंत्रण**

बियाणे, खत, कीटकनाशक, यांच्या गुणनियंत्रणासाठी राज्यात ३९३ भरारी पथकांची निर्मिती आणि टोल फ्री क्रमांक या सारखी सुविधा उपलब्ध केल्यामुळे २०१०-११ च्या तुलनेत २०११-१२ कारवाईत वाढ झाली.

**महाकृषी संचार**

भारत संचार निगम लिमिटेड व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. याअंतर्गत १२.५० लाख भागधारक सहभागी झाले आहेत. यात सहभागी लाभार्थ्यांमधील संवाद मोफत असून जवळपास प्रति महिना ५०० कॉल्स मोफत, ४०० एसएमएस मोफत इत्यादी सुविधा आहेत. त्यासाठी नाममात्र रुपये १०० पर्यंत खर्च येतो.

**शेतकऱ्यांचे परदेश अभ्यास दौरे**

शेतकऱ्यांचे जर्मनी, हॉलंड, स्वित्झर्लंड, मलेशिया, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इस्त्राईल इत्यादी देशांमध्ये अभ्यास दौरे आयोजित करण्यात येत आहेत.

**ऑनलाइन कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्प**

राज्यात कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्पांतर्गत कीड व रोगाची तीव्रता तपासणी तत्काळ करून, कृषी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ व इतर संबंधितांपर्यंत पोहोचवली जाते. कीड व रोगावरची उपापययोजना कृषी शास्त्रज्ञ शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे कळवतात. तसेच ही माहिती ग्रामपंचायतीच्या फलकावर लावण्यात येते. हा प्रकल्प यशस्वीरीत्या राबवल्यामुळे यास राष्ट्रीय स्तरावरील २०११-१२ चे सुवर्णपदक मिळाले आहे.

**बियाणे डीएनए तपासणी प्रयोगशाळा**

राज्यात पुणे, परभणी व नागपूर या ठिकाणी बियाणे डीएनए तपासणी प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांमुळे बियाण्यांची जैविक शुद्धता चाचणी (Gentic Purity Test) घेतल्यामुळे बियाणांचे गुणनियंत्रण प्रभावीरीत्या करणे शक्य झाले.

**राज्य सेंद्रिय शेती धोरण**

अधिकाधिक उत्पादन (पान ४५ वर )



**राज्यातील सूक्ष्म सिंचनाची मागणी लक्षात घेता जागतिक पातळीवरील कंपन्यांच्या सहभागातून ठिबक सिंचनाचे पीक, क्षेत्र व प्रकारनिहाय दर निश्चितीसाठी जागतिक निविदा प्रक्रिया राबवण्यात आली, यात ६५ कंपन्यांनी भाग घेतला. पैकी २० कंपन्या तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या असून या प्रक्रियेमुळे ठिबक सिंचनाच्या किंमतीमध्ये ३० ते ४० टक्के बचत झाली. सूक्ष्म सिंचन संचाचे अनुदान आता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा करण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यास नक्की किती आणि केव्हा अनुदान मिळाले, याची माहिती मिळणे शक्य झाले. सूक्ष्म सिंचन कंपनीकडून संच बसवल्यानंतरची सेवा चांगल्यारीतीने मिळून योजनेतील अनियमिततेला पायबंद बसला आहे.**



# हायटेक प्रगतीचे पर्व

जयंत पाटील
मंत्री, ग्रामविकास

ग्रामविकास

पंचायतराज व्यवस्थेत आणि ई-पंचायत कार्यक्रमात देशात प्रथम आलेल्या महाराष्ट्राच्या ग्रामविकास विभागाने राज्यातील २० हजार ग्रामपंचायतींमध्ये ई-बँकिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे ग्रामपंचायती गावातील आर्थिक व्यवहाराचे केंद्र होतील. ग्रामपंचायतींचे एकात्मिक सुविधा केंद्रात रूपांतर करण्यात येत असल्याने गावकऱ्यांना अनेक प्रकारचे दाखले आणि इतर सुविधा गावातच उपलब्ध होतील. मागील चार वर्षात पंचायतराज व्यवस्था पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यावर भर दिला आहे.

राज्यात आजमितीस २८ हजार ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी फक्त साडे पाच ते सहा हजाराच्या आसपास ग्रामपंचायतींमध्ये बँकांच्या शाखा आहेत. उर्वरित जवळपास २२ हजार ग्रामपंचायतींमध्ये बँकिंगची सुविधा उपलब्ध नाही.

इंटरनेट जोडणीने राज्यातील जवळपास २५ हजार ग्रामपंचायती ऑनलाइन झाल्या आहेत. याचा लाभ घेत इ-बँकिंगची सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अशा प्रकारची बँकिंग सेवा उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील सावकारांकडून, पतपेढ्यांकडून होणारी फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार या प्रकारांना आळा बसेल आणि ग्रामपंचायती गावातील आर्थिक व्यवहाराचे केंद्र बनतील. यासाठी राष्ट्रीयकृत बँकांबरोबर करार करण्यात येत असून लवकरच या निर्णयाची अंमलबजावणी सुरू होईल.



**लोकसहभागातून इको व्हिलेज...**

लोकसहभागाशिवाय कोणतीच योजना यशस्वी होत नाही हे पुन्हा एकदा पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेने सिद्ध केले आहे. राज्यातील १६,४४३ ग्रामपंचायतींनी योजनेतील पहिल्या वर्षीचे निकष पूर्ण केले तर ९२९० ग्रामपंचायतींनी दुसऱ्या वर्षीचे निकष पूर्ण केले आहेत. तिन्ही वर्षांचे निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या ४,१७४ इतकी आहे. या गावांचा सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) अंतर्गत विकास करण्याचे विभागाने ठरवले आहे.

- २० हजार ग्रामपंचायतींमध्ये ई-बँकिंगची सेवा उपलब्ध करून देणार.
- सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत २ लाख ६० हजार बचतगटांची स्थापना
- ग्रामपंचायतींचा एकात्मिक सुविधा केंद्र म्हणून विकास. गावकऱ्यांना गावातच १९ प्रकारचे दाखले उपलब्ध.



याअंतर्गत प्रत्येक विभागात एक याप्रमाणे ६ व राज्यस्तरावर एक अशा सात एमबीए पदवीधारक प्रतिनिधींची ११ महिन्यांच्या करारावर नियुक्ती करण्यात येणार आहे. हे प्रतिनिधी त्यांच्या विभागातील कंपन्यांना भेटून संकेत स्थळाच्या माध्यमातून, गावाने केलेली विकास कामे दाखवतील. गावांच्या भविष्यातील विकासामध्ये सहभाग नोंदवण्याचे आवाहन करतील. कंपन्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे गाव निवडण्याचे स्वातंत्र्य राहील.

नावीन्यपूर्ण पद्धतीने योजना राबवून तिन्ही वर्षांचे निकष पहिल्याच वर्षी पूर्ण करणाऱ्या ८३३ ग्रामपंचायतींना या वर्षी पर्यावरण विकासरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. योजनेत जवळपास १५ कोटी वृक्षलागवड झाली आहे. या लावलेल्या झाडांपैकी जगलेल्या झाडांची टक्केवारी ७० ते ८० टक्के इतकी आहे. ग्रामपंचायतीची करवसुली ८० ते ९० टक्क्यांपर्यंत वाढली आहे. गावात घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधा निर्माण होत असतांना राज्याने नुकत्याच अनुभवलेल्या दुष्काळात सांडपाण्याचा पुनर्वापर करीत, अनेक गावांनी लावलेली झाडे चांगल्या पद्धतीने जगवली आहेत. योजनेला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.

**एकात्मिक सुविधा केंद्र**

पारदर्शक, लोकभिमुख आणि तत्पर सेवेसाठी ग्रामपंचायतींचा एकात्मिक सुविधा केंद्र म्हणून विकास केला जात आहे. या माध्यमातून गावकऱ्यांना गावातच १९ प्रकारचे दाखले उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शिवाय रेल्वे आरक्षण, वीज देयक, दूरध्वनी देयक भरणा यासारख्या सेवाही अल्प शुल्कात ग्रामपंचायतींमार्फत मिळू शकतील.

**रस्ते विकास**

गावांमधील रस्त्याचा दर्जात्मक विकास व्हावा, यासाठी सातत्याने विभागाच्यावतीने ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात आला.

त्यानंतर या वर्षीच्या अर्थसंकल्पात सुमारे २६०० कि.मी.च्या रस्त्यांच्या कामाला पंतप्रधान ग्राम सडक योजना टप्पा-२ अंतर्गत मंजुरी देण्यात आली. याचा महाराष्ट्रालाही लाभ होईल. ही कामे लवकरच सुरू होतील. ग्रामविकास विभागाने रस्त्यांच्या कामासाठी आता स्वत:चे लेखाशीर्ष निर्माण केल्याने कामाला वेग येईल. जवळपास ४५० कोटी रुपयांचा निधी थेट ग्रामविकास विभागाकडे येईल.

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामपंचायतीला नागरी सुविधांसाठी देण्यात येणाऱ्या, अनुदानात एक कोटी रुपयाची वाढ करून तो पाच वर्षाच्या प्रकल्पकाळात २ कोटी रुपयेइतका करण्यात आला आहे.

**गाव विकासाचे नियोजन**

इको व्हिलेजच्या तिन्ही वर्षांचे निकष पूर्ण करणाऱ्या १,७१५ गावांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये गावाची जमीन, हवा, पाणी, पूरपरिस्थिती, सांडपाणी-घनकचरा व्यवस्थापन, जलस्रोतांचे जतन आणि व्यवस्थापन यासारख्या सर्व महत्त्वाच्या गोष्टी विचारात घेण्यात आल्या आहेत. पर्यावरण विकास विभागाच्या मदतीने यासाठी देशभरातील २४ नामांकित संस्थांची निवड करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात या संस्थांकडून १९५ गावांचे विकास आराखडे तयार करण्याचे काम सुरू झाले आहे.

**हायटेक ग्रामपंचायती**

भारतातील महाराष्ट्र असे एकमेव राज्य आहे की, ज्या राज्याच्या २८ हजार ग्रामपंचायतीमध्ये संगणक पोहोचला आहे.




**पर्यावरण संतुलित समृद्ध ग्रामयोजनेंतर्गत राज्यातील १६,४४३ ग्रामपंचायतींनी योजनेतील पहिल्या वर्षीचे निकष पूर्ण केले तर ९२९० ग्रामपंचायतींनी दुसऱ्या वर्षीचे निकष पूर्ण केले आहेत. तिन्ही वर्षांचे निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या ४,१७४ इतकी आहे. तिन्ही वर्षांचे निकष पहिल्याच वर्षी पूर्ण करणाऱ्या ८३३ ग्रामपंचायतींना या वर्षी पर्यावरण विकासरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल. योजनेत जवळपास १५ कोटी वृक्षलागवड झाली आहे. यापैकी जगलेल्या झाडांची टक्केवारी ७० ते ८० टक्के आहे. ग्रामपंचायतींची करवसुली ८० ते ९० टक्क्यांपर्यंत वाढली आहे. गावात घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधा निर्माण झाल्या. दुष्काळात सांडपाण्याचा पुनर्वापर करीत अनेक गावांनी लावलेली झाडे चांगल्या पद्धतीने जगवली आहेत.**

गावांची पुढील २० वर्षाची वाढ लक्षात घेऊन गावांचे सूक्ष्म तसेच पर्यावरण विकास आराखडे तयार केले जात आहेत. यासाठी ५ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या आणि

जिल्हा परिषद आणि पंचायतसमित्यांमध्ये विभागाने ई-टेंडरिंग बंधनकारक केले आहे. ग्रामसभेच्या आयोजनाचे निमंत्रण आता गावकऱ्यांना त्यांच्या भ्रमणध्वनीवरील संदेशाद्वारे देण्यात येत आहे.

केंद्र सरकारने आपल्याला १० प्रकारच्या संगणकीय प्रणाल्या उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचीही राज्यात अंमलबजावणी सुरू आहे. यातील प्रिया सॉफ्ट नावाच्या संगणकीय प्रणालीमुळे, सर्व पंचायत संस्थांच्या लेखे लिहिण्याच्या पद्धतीत एकसूत्रता आली असून, या संस्थांच्या कामकाजावर राज्य पातळीवरून नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे.

**देशात प्रथम**

केंद्र सरकारच्या ई- पंचायत कार्यक्रमात राज्य देशात पहिले आहे. पंचायतराज उत्तरदायित्व आणि प्रोत्साहन योजनेंतर्गत राज्य सलग चार वर्षांपासून पुरस्कार मिळवत असून गेली दोन वर्षे दुसरा क्रमांक मिळवणाऱ्या महाराष्ट्राने यावर्षी २.५ कोटी रुपयांचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवला आहे.

**महत्त्वाचे निर्णय**

**गौरव ग्रामसभा :** ग्रामसभेचे उत्कृष्ट आयोजन करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार दिले जातात. या ग्रामसभांच्या माध्यमातून गाव विकासात लोकांचा सहभाग वाढवला जात आहे. जुन्नर तालुक्यातील ठिकेकर वाडी ग्रामपंचायत, राष्ट्रीय स्तरावर गौरवण्यात आली आहे. आम ग्रामसभेआधी महिला सभा, वॉर्ड सभा घेणे आणि या सभेत घेतलेले निर्णय ग्रामसभेत विचारात घेणे बंधनकारक करण्यात आले आहेत.

गुणवत्तापूर्ण शैक्षणिक विकासाला चालना देण्यात आली आहे.

**गुणवत्तेचा ध्यास**

राज्यात जिल्हा परिषदेच्या ६८ हजार शाळा आहेत. या शाळांचे मूल्यांकन करून प्राप्त गुणांनुसार अ,ब,क,ड,इ असे श्रेणीकरण करण्याचा आणि प्राप्त श्रेणीचा मोठा फलक शाळांबाहेर लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत पंचायतराज संस्थांचे ग्रेडेशन केले जाते. त्यामुळे गावातील शाळा किंवा शासकीय कार्यालय कोणत्या दर्जाचे आहे हे गावकऱ्यांच्या लक्षात **(पान ४५ वर)**

# सहकाराचे सामर्थ्य



हर्षवर्धन पाटील
मंत्री, सहकार व संसदीय कार्य

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सहकार रुजला व वाढला. सर्वसामान्यांच्या विकासात सहकाराचा मोठा वाटा आहे. या माध्यमातून साखर कारखानदारी, पतसंस्था, सूतगिरण्या, सहकारी बँका, कुटिर उद्योग, विविध संस्था यांच्या रूपाने राज्यात व्यापक काम झाले. सहकाराच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात नेतृत्त्व करणारी व्यक्तिमत्त्वे निर्माण झाली. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था खेळती राहाण्यात सहकार क्षेत्राचा हातभार लागला आहे. सर्वसामान्यांचा सर्वंकष विकास हा सहकाराचा पाया आहे.

**९७ वी घटना दुरुस्ती**

सहकार क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची व क्रांतीकारक गोष्ट घडली, ती म्हणजे ९७ वी घटना दुरुस्ती. सहकारी संस्था स्थापण्यास मूलभूत अधिकाराचा दर्जा प्राप्त करून देणारी ९७ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या. या संदर्भात नेमण्यात आलेल्या संयुक्त समितीच्या शिफारशी विचारात घेऊन या अधिनियमातील सुधारणांना विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी मान्यता दिली. त्यानंतर नुकताच महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम २०१३ संमत करण्यात आला. या अधिनियमाच्या अनुषंगाने सहकारी संस्थेची निवडणूक घेण्यासाठी निवडणूक नियमावली तयार करण्याची कार्यवाही देखील अंतिम टप्प्यात आहे. या कायद्याने सहकारी संस्थांना स्वायत्तता मिळणार आहे.



प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था नोंदणीबाबत नवीन धोरण राबविण्यात येत आहे. राज्य सहकारी बँक, जिल्हा बँका व प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था यांच्यामार्फत कर्ज पुरवठा करण्यात येतो. या माध्यमातून कृषी पतपुरवठ्याच्या सुमारे ६० टक्के कर्जपुरवठा करण्यात येतो. २०११-१२ मध्ये सहकारी पतसंस्थेकडून ९ हजार ३८५ कोटी रुपयांचे वाटप झाले. पुढील दोन वर्षात म्हणजे २०१५ पर्यंत सहकार अंतर्गत २० हजार कोटी रुपयांचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट आहे. राज्यात प्रा. वैद्यनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी ५ मार्च २००७ पासून नवीन प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्थेच्या नोंदणीस स्थगिती देण्यात आली होती. या समितीच्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर राज्याने नव्याने प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्था नोंदणी करण्याबाबत तसेच कार्यरत असलेल्या प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्थेचे सक्षमीकरण करण्याबाबत निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार राज्यात प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची नोंदणी करण्यात येणार आहे.

**अवैध सावकारीवर नियंत्रण**

राज्यातील अवैध सावकारी नियंत्रित करण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन)२०१० विधेयक राष्ट्रपती यांच्या मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठवण्यात आले होते. तथापि, केंद्र शासनाने या विधेयकात सुचवलेल्या सुधारणा समाविष्ट करून या सुधारणांसह अध्यादेश राष्ट्रपती यांच्या मान्यतेसाठी केंद्र शासनास पाठवण्यात येणार आहे. १९४६ च्या कायद्याच्या तुलनेत या प्रस्तावित कायद्यात अधिक कडक तरतूदी करण्यात आल्या आहेत.

**सहकारी संस्थांना पुरस्कार**

सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करीत असलेल्या सहकारी संस्थांना पुरस्कार देऊन गौरविण्याचा निर्णय शासनाने २०१२ मध्ये घेतला. या उपक्रमामुळे सहकारी संस्थांना अधिक चांगले काम करण्यासाठी निश्चितपणे प्रोत्साहन मिळेल. २०१३ पासून या पुरस्काराची संख्या ३१ वरून ४५ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

**मानीव अभिहस्तांतरण**

सहकारी गृहनिर्माण संस्थेला जमिनीचा मालकी हक्क प्राप्त व्हावा यासाठी शासनाने मानीव अभिहस्तांतरणाची विशेष मोहीम राबविली. या मोहिमेअंतर्गत संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांना विकासकाकडून जमिनीचे कायदेशीर हक्क प्रदान करण्याचा उद्देश होता. इमारत संस्थेची, जमिनीची मालकी देखील संस्थेचीच या धोरणानुसारच महाराष्ट्रातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या

- २०११-१२ मध्ये सहकारी पतसंस्थेकडून ९ हजार ३८५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप.
- सहकारी गृहनिर्माण संस्थेला जमिनीचा मालकी हक्क मिळण्यासाठी मानीव अभिहस्तांतरणाची विशेष मोहीम.
- शेती कर्जमाफी आणि कर्ज मदत योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ४,००८ कोटींची कर्जमाफी



## शेती कर्जमाफी आणि कर्ज मदत योजना २००९ अंतर्गत ३४ लाख २,५८१ शेतकऱ्यांना लाभ

इमारतीखालील जमिनीचे कायदेशीर हक्क मिळवून देण्यात येईल.

राज्यात सुमारे ८८,४७२ गृहनिर्माण संस्था आहेत. मानीव अभिहस्तांतरणाची विशेष मोहीम राबवण्यापूर्वी ९४३७ गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण झाले आहे. मानीव अभिहस्तांतरणाच्या मोहिमेनंतर ३७७३ अर्ज गृहनिर्माण संस्थांकडून प्राप्त झाले. त्यापैकी २०२१ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

**साखर कारखानदारी**

साखर उद्योगामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास हातभार लागला. त्यामुळे साखर उद्योगाला अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. शासनाने त्यासाठी विविध उपाय योजले आहेत.

राज्यातील ज्या सहकारी साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती कमकुवत असून कर्ज थकीत आहे, असे कारखाने खाजगी क्षेत्राकडे अथवा लिलावात काढण्यात येणार नाहीत. अशा कारखान्यांची राज्य सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती बँका यांनी परस्पर विक्री न करता दीर्घ मुदतीसाठी भागीदारी/सहभागी अथवा भाडेतत्त्वावर सहकारी कायद्यातील तरतुदीप्रमाणे आणि शासन निर्णयाप्रमाणे आर्थिकदृष्ट्या सक्षम सहकारी कारखान्यांना चालविण्यास देण्यात येईल, असे आजारी वा बंद साखर कारखाने आर्थिकदृष्ट्या पुन्हा सक्षम झाल्यानंतर ते मूळ शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांना देण्यात येतील.

**व्याज सवलत योजना**

शासनाने शेतकऱ्यांना ६ टक्के वार्षिक व्याज दराने पीक कर्ज देण्याचे धोरण तयार केले आहे. या योजनेमुळे रु. १ लाखापर्यंत पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना मूळ कर्ज रकमेवर ३ टक्के सवलत (इन्सेन्टिव्ह) मिळते आणि १ लाखाहून अधिक आणि ३ लाखांपर्यंत कर्ज रकमेवर २ टक्के सवलत मिळते. केंद्र शासनाच्या व्याजासंबंधीच्या शासकीय आर्थिक अनुदानाचा विचार करता ज्या शेतकऱ्यांनी कर्जरक्कम वेळेवर परत केली, अशांना पीक कर्ज शून्य टक्के व्याजदराने मिळते. गेल्या वर्षात राज्य शासनाने या योजनेखाली राज्यात रु. १४५ कोटींची रक्कम वितरित केली.




**राज्यात सुमारे ८८,४७२ गृहनिर्माण संस्था आहेत. मानीव अभिहस्तांतरणाची विशेष मोहीम राबवण्यापूर्वी ९४३७ गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण झाले आहे. मानीव अभिहस्तांतरणाच्या मोहिमेनंतर ३७७३ अर्ज गृहनिर्माण संस्थांकडून प्राप्त झाले. त्यापैकी २०२१ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.**

**पीक कर्जाचे रूपांतरण**

राज्यातील १६ दुष्काळप्रवण जिल्ह्यांमधील एकूण रु. ७,५८८ कोटींच्या पीक कर्जाचे (खरीप ७,१४५ कोटी आणि रब्बी ४४३ कोटी) रूपांतर मध्यम कालावधीच्या कर्जामध्ये केले गेले. यामुळे या जिल्ह्यांमधील शेतकरी आता २०१३-१४ मध्ये पीक कर्ज मिळवण्यासाठी पात्र झाले.

**शेती कर्जमाफी आणि कर्ज मदत योजना**

पीक कर्ज मिळवणाऱ्या राज्यातील ३४,०२,५८१ शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला असून एकूण कर्जमाफीची रक्कम रु. ४,००८ कोटी रुपये इतकी आहे.

**नागरी सहकारी पतपेढ्यांना पॅकेज**

आर्थिक तणावाखाली असणाऱ्या सहकारी पतपेढयांना मदत करण्यासाठी शासनाने रु. २०० कोटींचे एक पॅकेज मंजूर केले आहे. ४६९ सहकारी पतपेढयांमधील १,९१,२५५ ठेवीदारांना या पॅकेजच्या अंतर्गत रु. १६१.५२ कोटींची रक्कम दिली गेली. नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतपेढयांसाठी एकरकमी समझोता (सेटलमेंट) योजना कार्यक्षम नसलेल्या कर्ज प्रकरणांमध्ये परिणामकारक वसुली होण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतपेढयांसाठी एकरकमी समझोता (सेटलमेंट) योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेची मुदत ३१ मार्च २०१४ पावेतो वाढविली आहे.

**ऊस हंगामामध्ये यांत्रिकीकरण**

शुगरकेन हार्वेस्टरच्या खरेदीसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत २५ टक्के सबसिडी. २०११-१२ या वर्षापासून पुढे १३१ लाभार्थ्यांना रु. ३२.४८कोटींची सबसिडी दिली गेली आहे.

**दोन साखर उद्योगांमधील अंतर**

दोन साखर उद्योगामधील हवाई अंतर १५ किलोमीटर्सवरून २५ किलोमीटर्सपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यात किमान ३९२ साखर कारखाने उभारले जाऊ शकतील. त्यामुळे गळित क्षमतेनुसार २० लाख हेक्टर क्षेत्र उसाच्या लागवडीखाली आणणे शक्य होईल.

**(पान ७५ वर)**



# सागरी सेतू ते द्रुतगती मार्ग

## सार्वजनिक बांधकाम

जयदत्त क्षीरसागर
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना १९९६ साली करण्यात आली. हे महामंडळ राज्याच्या वाहतूक सुविधेचा पायाभूत विकास व दर्जा सुधारण्यासाठी गेली १६ वर्षे सातत्याने गुणवत्तापूर्ण कामगिरी करीत आहे. सागरी सेतू पासून द्रुतगती मार्गापर्यंत अनेक प्रकल्पांची निर्मिती करून महामंडळाने राज्याच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. महामंडळाने आतापर्यंत ७,९६६ कोटी रुपयांचे १५ महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण केले आहेत.

**अभियांत्रिकी प्रतिभा**

वरळी ते वांद्रे जोडणारा राजीव गांधी सागरी सेतू (१६६४ कोटी) म्हणजे महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी -स्थापत्यकलेचे आणि रस्ते विकास महामंडळाच्या उत्तम कामाचे एक प्रतीक आहे. ४.७ कि.मीटरचा हा समुद्र सेतू ८ मिनिटांत ओलांडला जातो. या सागरी सेतूने राज्याच्या लौकिकात भर घातली असून यामुळे एका नव्या मानदंडाची निर्मिती झाली आहे.

यशंवतराव चव्हाण द्रुतगती मार्ग (२१३६ कोटी) म्हणजे एक्सप्रेस हायवे महामंडळाने पूर्ण केलेला आणखी एक महत्त्वाचा प्रकल्प. वाहतुकीच्या कोंडीतून सुटका करण्यासाठी या महामार्गाची निर्मिती झाली. या द्रुतगती मार्गामुळे वेळ आणि इंधनाची बचत झाली आहे.

मुंबईतील वाहतूक समस्यांवर प्रभावी उपाय म्हणजे मुंबईत झालेले ५० उड्डाणपूल. (१६१७ कोटी), याशिवाय उर्वरित महाराष्ट्रात सातारा-कागल चौपदरी रस्ता (७५० कोटी), पायाभूत रस्ते विकास योजनेंतर्गत बारामती, लातूर, सोलापूर येथील रस्ते (१५७ कोटी), ठाणे घोडबंदर (११७ कोटी), सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर प्रोजेक्टसाठी (९० कोटी), महाराष्ट्रातील आरओबीसाठी (१९५ कोटी) तर बांधा, वापरा आणि हस्तांतर करा (बिल्ट-ऑपरेट-ट्रान्सफर-बीओटी) तत्त्वावर तयार झालेल्या प्रकल्पांमध्ये भिवंडी-कल्याण- शिळफाटा (२०० कोटी), वरोरा आरओबीसाठी (२०कोटी), नागपूर-औरंगाबाद-सिन्नर-घोटी-मुंबई रस्त्यासाठी (६४० कोटी) तर जुने राष्ट्रीय महामार्ग चार साठी (४०२ कोटी) महामंडळाने पूर्ण केले आहेत.



**प्रस्तावित प्रकल्प**

भविष्यातील अडचणींचा विचार करून रस्ते विकासासंदर्भात महामंडळाने विचार केला असून त्यासाठीही काही प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. यात प्रामुख्याने

➲ वेस्टर्न फ्री वे सी लिंक प्रकल्प- वरळी ते हजीअली ४.५ कि.मी आणि हाजीअली ते नरीमन पॉईट ९ कि.मी., वर्सोवा ते बांद्रा सी लिंक प्रकल्प यात ९.८ कि.मी. अशी मुख्य पुलांची लांबी असणार आहे. यासाठी पर्यावरण विभागाची मंजुरी मिळाली आहे.

➲ पुणे शहरासाठी बाह्य वळण रस्ता हा वळण रस्ता झाल्यानंतर पुणे शहरात होत असलेली वाहतुकीची कोंडी मोठया प्रमाणात दूर होऊन काही अंशी अपघाताचे प्रमाण कमी होईल.


➲ एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत नागपूर- अचलपूर, अकोला, अंबेजोगाई, दौड, पंढरपूर, तुळजापूर, सांगली, सोलापूर याठिकाणी रस्त्यांचा विकास होईल.त्यामुळे पर्यायाने या भागातील नागरिकांना वाहतुकीच्या चांगल्या सोयी मिळतील.

➲ यशवंतराव चव्हाण मुक्त द्रुतगती मार्गावरील जमिनीचे व्यावसायिकीकरण झाल्याने महामंडळास निधी मिळून त्याचा विनियोग विकास कामांसाठी होईल.

➲ रेसिंग ट्रॅकचा व थीम पार्कचा विकास- राज्यात करमणुकीसाठी असलेल्या या क्षेत्राचा विकास झाल्यावर नागरिकांची करमणूक आणि पर्यटनाला चालना मिळेल.

➲ पूणे-मुंबई द्रुतगती मार्ग क्षमतावृद्धी करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे जवळपास ६ कि.मी. अंतर कमी होईल. यामुळे मोठी इंधन बचत अपेक्षित आहे. खोपोली आणि सिंहगड इन्स्टिट्यूट कुसगाव असा हा मार्ग असून यामुळे जवळपास २० ते २५ मिनिटाचे अंतर

- महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत ७,९६६ कोटी रुपयांचे १५ महत्वाचे प्रकल्प पूर्ण
- पूर्ण-मुंबई द्रुतगती मार्ग क्षमतावृद्धी करण्याचे प्रस्तावित. यामुळे जवळपास ६ कि.मी. अंतर कमी होईल.
- महामंडळामार्फत नागरी भागात रस्त्यांचे जाळे.



## महामंडळामार्फत सध्या जवळपास चार हजार कोटी रुपयांचे प्रकल्प कार्यान्वित

कमी होऊ शकते. या मार्गाला ८ कि.मी लांबी असलेले ४+४ मार्गी टनेल आहेत. तर १.६ कि.मी लांब रस्ताविस्तार आहे.

**आश्वासक वाटचाल**

महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट पायाभूत सुविधा विकसित करणे हे महामंडळाचे उद्दिष्ट आहे. त्याच्या पूर्तीसाठी मंत्री जयदत्त क्षीरसागर व राज्यमंत्री रणजित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळाची वाटचाल सुरू आहे. हे महामंडळ राज्यातील द्रुतगती मार्ग, सागरी रस्ते, पूल, उड्डाणपूल, बंदर, विमानतळ, रेल्वे प्रकल्प तसेच नागरी भागात रस्त्यांचे जाळे निर्माण करीत आहे.

**महामंडळामार्फत सध्या जवळपास चार हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू असून यात एकात्मिक रस्ते विकासांतर्गत नांदेड, अमरावती, नंदुरबार, सोलापूर, औरंगाबाद, पुणे आणि नागपूर येथील रस्ते विकास तसेच पेडर रोड उड्डाणपूल आणि पूर्व व पश्चिम भागासाठी जल वाहतुकीची (वॉटर ट्रान्सपोर्ट) कामे सुरू आहेत. यात दक्षिण मुंबई ते नवी मुंबई, दक्षिण मुंबई ते मांडवा रायगड आणि नरीमन पॉईंट ते बोरीवली या कामांचा समावेश आहे. राज्यातील सीमेवरील तपासणी नाक्यांचे अत्याधुनिकीकरण सुरू आहे.**

याशिवाय महामंडळाने नावीन्यपूर्ण अशी कामे सुरू केली आहेत. यात प्रामुख्याने वाहतूक संदर्भात बस, ट्रक टर्मिनलचा विकास, करमणूक संदर्भात थीम पार्क, रेसिंग ट्रॅक व वॉटर स्पोर्ट्स निर्मिती. व्यावसायिक संदर्भात आयटी पार्क व तत्सम विकास, धार्मिक व पर्यटन संदर्भात पर्यटन स्थळ व तीर्थक्षेत्र विकास, बंदर संपर्क क्षेत्रात छोट्या छोट्या बंदराचा विकास व त्यांना रस्ते व रेल्वे सुविधा देणे अशा बाबींचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे उपलब्ध असलेला अनुभव, तांत्रिक मनुष्यबळ व सागरी सेतू सारखे प्रकल्प उभारण्याची ख्याती लक्षात घेऊन अन्य राज्यात तसेच परदेशात महामंडळाची वेगळी एम.एस.आर.डी.सी. इंडिया इंटरनॅशनल कंपनी स्थापन करण्याची बाब विचाराधीन आहे. त्यानंतर महामंडळाची ही आंतरराष्ट्रीय झेप राज्याच्या विकासासाठीही महत्त्वाची ठरू शकेल.

**राजू पाटोदकर**

लालबाग, उड्डाणपूल, मुंबई





# सुरक्षित औषधे-सुरक्षित आरोग्य

**मनोहर नाईक**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन

अन्न व औषध प्रशासन ही ग्राहकाच्या हिताचे रक्षण करणारी प्रमुख संस्था आहे. राज्य शासन जनतेच्या आरोग्याबाबत अत्यंत संवेदनशील असून नागरिकांच्या आरोग्यावर कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याकरिता कायमस्वरूपी सतर्क आहे. त्यामुळेच राज्यामध्ये गुटखा, पानमसाला व तत्सम पदार्थांच्या सेवनामुळे महाभयंकर दुष्परिणाम व कॅन्सरसारखे दुर्धर आजार वाढीस लागल्याचे दिसून आल्याने राज्यात या पदार्थांवर यावर्षीही बंदी घालण्यात आली आहे. देशात यावर बंदी घालणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या पदार्थांच्या विक्रीद्वारे मिळणाऱ्या प्रचंड उत्पन्नाचा तोटा सहन करूनही, ही बंदी घालण्याचा निर्णय नागरिकांच्या हितासाठी शासनाने घेतला आहे.

### सुरक्षित, निर्भेळ व सकस अन्न

राज्यातील जनतेला सुरक्षित, निर्भेळ व सकस अन्न उपलब्ध व्हावे म्हणून संपूर्ण राज्यात अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करून, अन्न व्यवसायिकांवर नियंत्रण ठेवणारा निर्णय घेण्यात आला. या व्यावसायिकांना नोंदणी आणि परवाने सक्तीचे करण्यात आल्याने प्रशासनाने १ लाख २७ हजार ५२८ परवाने मंजूर केले. २ लाख ८१ हजार ३८७ जणांना नोंदणी देण्यात आली. यामुळे राज्य शासनाला ३७.८२ कोटी रुपयांचा महसूल मिळाला. हे कार्य संपूर्ण देशातील कामाच्या एक तृतीयांश असल्याने महाराष्ट्र देशात अग्रेसर ठरला आहे.

### नोंदणीकृत फार्मासिस्टची सेवा

किरकोळ औषध विक्री दुकानात नोंदणीकृत फार्मासिस्टची सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने त्याला आरोग्य सेवेतील डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील महत्त्वाचा दुवा समजून, त्याच्या



देखरेखेखाली औषधांची विक्री करणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र, गेल्या कित्येक वर्षापासून किरकोळ औषधविक्री दुकानात नोंदणीकृत फार्मासिस्ट नसणे ही प्रथा झाली होती. त्याच्या देखरेखेखाली औषध विक्री होणे व त्यांच्या निर्देशानुसार रुग्णद्वारा औषध घेतले जाणे, हे औषधांचे अनिष्ट परिणाम टाळण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने विभागाने राज्यभर धडक मोहीम राबवली. ज्यांच्याकडे नोंदणीकृत फार्मासिस्ट नाही अशा औषध विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले किंवा दीर्घ मुदतीसाठी निलंबित करण्यात आले. संघटनांनी बराच विरोध केला, परंतु त्या विरोधाला न जुमानता ती कारवाई सुरू ठेवण्यात आली आहे आणि रुग्णांना बनावट औषधे, भेसळयुक्त औषधे, गैरमार्गाने प्रमाणात अर्थार्जन करून रुग्णांची आर्थिक पिळवणूक केली. या विक्रेत्यांविरूध्द कडक कारवाई करण्यात येऊन सुमारे ४७ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. राज्यात औषध किंमत नियंत्रण अध्यादेश २०१३ लागू करण्यात येऊन ३४८ औषधांच्या किमती नियंत्रित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अत्यावश्यक औषधांच्या किमती कमी झाल्या. औषधांच्या आक्षेपार्ह जाहिरातींवर बंदी घालण्यात आली आहे. औषधे व सौंदर्य प्रसाधने यांच दर्जा योग्य प्रमाणात राखला गेला. नाही तर त्यांच्यावरही कारवाई करून न्यायालयात खटले दाखल करण्यात येतात. तसेच जनस्वास्थ्याच्या दृष्टीने विचार करून, अप्रमाणित औषधे आढळल्यास त्याची विक्री थांबवण्यात येते.

- गुटखा, पानमसाला व तत्सम पदार्थांवर बंदी घालणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.
- सुरक्षित, निर्भेळ व सकस अन्न उपलब्ध व्हावे म्हणून राज्यात अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करून अन्न व्यवसायिकांवर नियंत्रण.
- राज्यात औषध किंमत नियंत्रण अध्यादेश २०१३ लागू करण्यात येऊन ३४८ औषधांच्या किंमती नियंत्रित करण्यात आल्या.

**अन्न व औषधी प्रशासन**




विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या औषधांपासून संरक्षण देण्याच्या दृष्टीने औषध विक्री बिलाद्वारे औषधांची विक्री केली जावी अशी तरतूद करण्यात येऊन, तिची प्रभावीपणे अंमलबजावणी चालू आहे.

### वैधानिक तरतूद

औषध हे जीवनावश्यक वस्तू म्हणून अधिसूचित करण्यात आले असून त्याद्वारे औषधांच्या निर्मिती, ठोक विक्री व विक्री यामध्ये कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची वैधानिक तरतूद झाली असून, त्याप्रमाणे विक्रेत्याने आपला व्यवसाय चालवावा अशी अपेक्षा आहे. परंतु गेल्या ३०/४० वर्षात औषध विक्रेता संघटनांच्या माध्यमातून एक अनिष्ट आणि बेकायदेशीर घटनाबाह्य मक्तेदारी उदयाला आली. त्यामुळे औषधे जीवनावश्यक वस्तू असूनसुद्धा औषधांच्या विक्रीत अडथळा निर्माण झाला. या अडथळ्यामुळे काही संघटनांनी मोठ्या

### संगणकीय कार्यप्रणाली

संगणकीय कार्यप्रणालीमुळे औषधांची विक्री व परवाने, चाचणी याबाबत प्रशासनात एनआयसीद्वारे स्थापित कार्यप्रणाली अवलंबण्यात आली. त्यामुळे अर्जदारांना त्वरित परवाना मिळणे सोयीचे झाले व भ्रष्टाचारासारख्या गैरमार्गास प्रतिबंध झाला. या संगणकीय प्रणालीला प्रधानमंत्री यांचे गोल्ड ॲवॉर्ड मिळाले आहे. विभागाच्या पुढील वर्षासाठी अनेक प्रस्तावित योजना आहे. यामध्ये औषधांच्या निर्यातीत भर पाडण्यासाठी उपाय योजना करणे, औषध उत्पादक राज्याकडे कसे आकर्षित होतील, यावर लक्ष केंद्रीत करणे, अन्न सुरक्षा व्यवस्थापन करणे, विभागीय स्तरावर अन्न व औषधे प्रयोगशाळा पुरवणे, अन्न व व्यावसायिकांना परवाना आणि नोंदणीचे कामकाज संपूर्ण राज्यासाठी ऑनलाइन करणे, आदी बाबींचा समावेश आहे.

## दुसरी हरितक्रांती



(पान ३७ वरून)

सेंद्रीय पद्धतीने घेण्यासाठी राज्याचे सेंद्रीय शेती धोरण ८ जानेवारी २०१३ रोजी शासनाने घोषित केले. यामुळे सेंद्रीय शेती उत्पादनास प्रोत्साहन मिळेल.

**शेत मालाला शाश्वत बाजारपेठ**

शेती उत्पादनाला शाश्वत बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा पणन व्यवस्थापकाची नियुक्ती, बाजार समित्यांचे व्यवसाय विकास आराखडे (बिझनेस प्लॅन), बाजार समित्यांमध्ये आडत आकारणी प्रकरणी कठोर कार्यवाही, दिल्ली, कलकत्ता, चेन्नई व दुबई येथे पणन कार्यालयांची स्थापना, शहरांमध्ये कृषी उत्पादनाच्या प्रभावी विक्रीसाठी पणन मंडळाच्या कार्यालयांची स्थापना, शहरांमध्ये शेतकरी गटांना थेट भाजीपाला विक्रीसाठी प्रोत्साहन, भात, ज्वारी, मका, उडीद, तूर व कापूस खरेदी केंद्र सुरू करणे यांचा समावेश आहे.

**वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी**

बाजार समित्यांची संख्या २९५ वरून ३०२ झाली असून, बाजार समित्यांची वार्षिक उलाढाल रु. ३८,७४३ कोटींवरून रु.४६,२८७ कोटींपर्यंत वाढली, उत्पन्न रु.४३९.४७ कोटींवरून रु.५४२.८५ कोटीपर्यंत वाढले आहे. राज्य शासनाच्या पाठपुराव्यामुळे केंद्राने कांदा निर्यात बंदी मागे घेतली . २०१० पूर्वी राज्यात १३ निर्यात सुविधा केंद्रे होती शीतगृह क्षमता- ६०५ मे.टन, प्रशीतकरणगृह क्षमता- ५५ मे.टन, रायपनींग चेंबर क्षमता- ७० मे.टन. होती. तर गुंतवणूक रु.५६.५२ कोटी होती. २०१० नंतर ६ निर्यात सुविधा केंद्र, ३ फुले निर्यात सुविधा केंद्र, १ विकिरण प्रकल्प, २० मॉडर्न मार्केट उभारणी प्रगतिपथावर असून शीतगृह क्षमता- ९७५ मे.टन, प्रशीतकरणगृह क्षमता- १३५ मे.टन, रायपनींग चेंबर क्षमता- ७५ मे.टन. आहे. तर १३३.११ कोटीची गुंतवणूक करण्यात येईल.

पायाभूत पणन सुविधा उभारणीसाठी खाजगी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात येत आहे. आंबा व काजू बोर्ड स्थापन करण्यात आलेल्या अभ्यासगटाने अंतिम अहवाल शासनास सादर केला आहे. शेतमाल तारण योजनेंतर्गत रु. २० कोटीचे अर्थसाहाय्य देण्यात आले आहे. ४० वखार केंद्रे विकसित करण्यात येतील.

**मुंबई शहरात थेट भाजीपाला विक्री केंद्र**

मुंबई शहरात ग्राहकांना किफायतशीर दरामध्ये भाजीपाला उपलब्ध व्हावा व शेतकऱ्यांना शेतमालाची वाजवी किंमत मिळावी यासाठी कृषिमंत्र्यांच्या संकल्पनेतून उत्पादक ते ग्राहक हे अभियान सुरू करण्यांत आले. या अभियानाचा एक भाग म्हणून मुंबई शहरामध्ये थेट भाजीपाला विक्री व्यवस्था निर्माण करण्यात आली. ही व्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वी किरकोळ विक्रीचे दर व या व्यवस्थेच्या अंतर्गत सुरू केलेल्या विक्री केंद्रावरील भाजीपाल्याचे दर यात ३० ते ५० टक्के पर्यंत फरक आढळून आला. ग्राहकांना दर्जेदार भाजीपाला मिळू लागल्यामुळे, मुंबईतील ग्राहकांनी या योजनेचे मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देऊन स्वागत केले. सर्वसाधारण १२० हून अधिक ठिकाणी ही विक्री केंद्रे कार्यान्वित झाली असून, प्रत्येक विक्री केंद्रावर जवळपास ३४ प्रकारचा भाजीपाला उपलब्ध असतो. प्रत्येक विक्री केंद्रावर सर्वसाधारण ७०० ते १००० किलोपर्यंत दररोज भाजीपाल्याची विक्री होते.

**अर्चना शंभरकर**

---

## हायटेक प्रगतीचे पर्व

**(पान ३९ वरून)**

येऊन त्याच्या गुणवत्तापूर्ण विकासाचा आग्रह वाढीस लागण्यास आणि गाव विकासासाठी समाजाचा दबावगट निर्माण होण्यास मदत होत आहे.

**पंचायतराज व्यवस्थेचे बळकटीकरण**



स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देताना पंचायतराज संस्था, या संस्थेतील पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे राजीव गांधी पंचायतराज सशक्तीकरण अभियानांतर्गत, सक्षमीकरण करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम विभागाने आखला आहे.

यासाठी एकूण २२१ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे. पंचायतराज संस्थांमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या या समपुदेशनातून ऑनलाइन पद्धतीने केल्या जात असून, यासाठी विभागाने एक बदली पंचांगही निश्चित केले आहे. पंचायतराज महिला सशक्तीकरण अभियानाची कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंटने दखल घेतली असून, या प्रकल्पाला गती येण्यासाठी त्यांनी विशेष निधी देण्याचे मान्य केले आहे.

**सामाजिक विकास**

इंदिरा आवास योजनेतील प्रति घरकुलाची रक्कम केंद्र शासनाने ७० हजार इतकी केली असून, योजनेतील राज्य शासनाचा अतिरिक्त हिस्सा रू. २५,००० इतका निश्चित करण्यात आला असून, प्रति घरकुलाची किंमत एक लाख एवढी करण्यात आली आहे.. हे घरकूल प्रामुख्याने महिला कुटुंब प्रमुखाच्या नावे करण्याला विभागाने प्राधान्य दिले आहे. जवळपास १ लाख १५ हजाराच्या आसपास घरे महिलांच्या तर ५ लाख ८१ हजाराच्या आसपास घरे नावावर करण्यात आली आहेत. ग्रामीण तीर्थक्षेत्र योजनेंतर्गत द्यावयाच्या निधीत दुप्पट वाढ केली असून आता तो दोन कोटी रुपये इतका करण्यात आला आहे. राज्यात १० जिल्ह्यात पथदर्शी स्वरूपात राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी सुरू आहे. याअंतर्गत नवोपक्रम मंच स्थापन करण्यात आला असून खाजगी-सार्वजनिक संस्था, व्यक्ती, कॉर्पोरेट मंडळे यांच्या सहभागातून दारिद्र्य निर्मूलनाच्या कामाला वेग देण्यात येत आहे. पंचायतराज संस्थांमधील पदाधिकाऱ्यांना निवडणूक लढवतांना असणारी शौचालयाची अट ही सामाजिक विकासाच्या जाणिवेतून घालण्यात आली आहे.

**डॉ. सुरेखा मुळे**

# अन्न सुरक्षा : जीवन सुरक्षा



अनिल देशमुख
मंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण

जनसामान्यांच्या जीवनावश्यक अन्नाच्या गरजेची पूर्तता करण्याच्या दृष्टीने अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने विविध लोकोपयोगी महत्त्वपूर्ण निर्णय प्रभावीरीत्या राबवले जात आहे. यामध्ये गरजू व गरीब जनतेला सवलतीच्या दराने धान्य मिळण्याबाबतचा हक्क देणारा राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा केंद्र शासनाने मंजूर केला असून राज्यात डिसेंबर २०१३ पासून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

### कायद्याची उपयुक्तता

हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर राज्यातील ७.१७ कोटी जनतेला याचा लाभ होणार आहे. या कायद्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत सुरू असलेल्या अंत्योदय, बी.पी.एल., केशरी, अन्नपूर्णा व शुभ्र अशा वेगवेगळ्या शिधापत्रिकांऐवजी प्राधान्य (अंत्योदय) व प्राधान्य (इतर) अशा दोन शिधापत्रिकांचे प्रकार रहाणार आहेत. या कायद्यानुसार कुटुंबातील महिलेच्या नावाने तिचे छायाचित्र असलेली बारकोड शिधापत्रिका वितरित केली जाणार आहे. तसेच नवीन शिधापत्रिका देण्याची आवश्यकता असल्यास त्या ठिकाणच्या महिला बचत गटांना नवीन दुकाने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या शिधापत्रिकेनुसार प्राधान्य-अंत्योदयच्या लाभार्थ्यांना प्रति कुटुंब ३५ किलो धान्य तर प्राधान्य- इतरच्या लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्याला प्रती व्यक्ती ५ किलो धान्य वितरित केले जाणार आहे. दोन्ही लाभार्थ्यांना एकसमान दराने धान्य वितरित केले जाईल. यामध्ये गहू प्रति किलो २ रु., तांदूळ ३ रु. तर भरड धान्य १ रु. प्रति किलो याप्रमाणे दर आकारले जातील.



जर काही कारणास्तव त्या महिन्यांमध्ये लाभार्थ्यांना धान्य वितरित करता आले नाही तर अन्न सुरक्षा कायद्याने त्यांना अन्न सुरक्षा भत्ता देय राहील. या कायद्याचे सामाजिक अंकेक्षणही करण्यात येणार आहे.

लोकोपयुक्त असलेल्या या कायद्याच्या अंमलबजावणीकरिता प्रत्येक जिल्ह्यात उप जिल्हाधिकारी किंवा अप्पर जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येणार आहे. तसेच राज्यस्तरावर ५ सदस्यीय राज्य अन्न आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे. या कायद्याची अंमलबजावणी करताना संबंधित यंत्रणेतील कोणताही अधिकारी, कर्मचारी दोषी आढळल्यास त्याला ५ हजार रुपयांपर्यंत दंड करण्याची महत्त्वपूर्ण तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

या कायद्यान्वये अन्न धान्याचे वितरण हे घरपोच वितरण योजनेंतर्गत करण्यात येणार असून राज्यास केंद्राकडून धान्य मिळाल्यापासून विविध घटकातील लाभार्थ्यास त्याचा लाभ होईपर्यंतच्या सर्व नोंदी या संगणकीकृत स्वरूपात ठेवल्या जाणार आहेत.

## अन्न व नागरी पुरवठा

### साठवणूक क्षमतेत वाढ

राज्यात सध्या शासनाची ५.५० लाख मेट्रिक टन साठवणूक क्षमता असलेली १,०२४ धान्य गोदामे असून नाबार्ड योजनेंतर्गत सुमारे ५०० कोटी रु. खर्च करुन ५८३ नवीन गोदामे बांधण्याची योजना राज्य शासनाने कार्यान्वित केली असून, त्याद्वारे सुमारे ६.५० लाख मे.टन नवीन साठवणूक क्षमता निर्माण होणार आहे.

याव्यतिरिक्त भारतीय अन्न महामंडळ, केंद्रीय वखार महामंडळ, राज्य वखार महामंडळ यांचेमार्फत सुमारे १५०० कोटी रुपयांची ६.५० लाख मे.टन साठवणूक क्षमता असलेली नवीन गोदामेसुद्धा बांधण्यात येत आहेत. उपरोक्त सर्व गोदामांमुळे राज्यात १३ लाख मे.टन नवीन साठवणूक क्षमता निर्माण होणार आहे.

### पारदर्शक वितरणासाठी

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने निर्धारित दराने योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशीररीत्या उपलब्ध होईल याची हमी देणारी सुधारित धान्य वितरण पद्धत राबविण्यात येईल. या अंतर्गत संपूर्ण राज्याकरिता प्रत्येक महिन्याची ७ तारीख हा दिवस अन्नदिन म्हणून पाळण्यात येणार आहे.

संपूर्ण राज्यात शिधापत्रिकाधारकांना

- सवलतीच्या दराने धान्य मिळण्याबाबतचा हक्क देणाऱ्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याची राज्यात डिसेंबर २०१३ पासून अंमलबजावणी.
- हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर राज्यातील ७.१७ कोटी जनतेला लाभ
- कायद्याच्या अंमलबजावणीकरिता राज्य स्तरावर ५ सदस्यीय राज्य अन्न आयोग.



## गोदामांमुळे राज्यात १३ लाख मे.टन नवीन साठवणूक क्षमतेची निर्मिती



**योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशीररीत्या उपलब्ध होईल याची हमी देणारी सुधारित धान्य वितरण पद्धत राबवण्यात येईल. संपूर्ण राज्याकरिता प्रत्येक महिन्याची ७ तारीख हा दिवस अन्नदिन म्हणून पाळण्यात येत आहे. शिधापत्रिकाधारकांना महिन्यात किमान ८ दिवस स्वस्तधान्य दुकानातून हमखास धान्य मिळेल. घरपोच धान्य योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय योजनेमध्ये येणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य दिले जाते. शिधापत्रिकाधारकांना वाटप केलेल्या जीवनावश्यक वस्तूंचे दर आणि उपलब्धसाठा यांचा फलक लावणे स्वस्त धान्य दुकानदारांना बंधनकारक आहे.**

महिन्यात किमान ८ दिवस स्वस्त धान्य दुकानातून हमखास धान्य मिळणार आहे. या घरपोच धान्य योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय योजनेमध्ये येणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना, अन्नधान्य दिले जाते. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना त्यांना पुढील तीन महिन्यात मिळणाऱ्या धान्याची एकत्रित रक्कम चालू महिन्याच्या २० तारखेपर्यंत स्वस्त धान्य दुकानाकडे जमा करावी लागत असून, धान्याचे वाटप पुढील अन्नदिनाच्या दिवशी गावपातळीवर करण्यात येणार आहे.

अन्नदिन किंवा अन्नसप्ताहात शिधापत्रिका धारकाला धान्याचे वाटप होऊ शकले नाही तर त्याच महिन्यातील इतर दिवशी धान्य वाटप करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अन्नदिन व अन्नसप्ताह या काळात सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत धान्याचे वाटप सुरू ठेवणे बंधनकारक आहे. स्वस्त धान्य दुकानदाराने तसे केले नाही तर त्याला दंड ठोठावला जाईल.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या धान्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर प्रायोगिक तत्त्वावर जीपीएस यंत्रणा बसवण्यात येणार आहे. याद्वारे तालुका पातळीवरून स्वस्तधान्य दुकानापर्यंत या वाहनांवर नियंत्रण ठेवले जाईल.

शासकीय गोदामातून स्वस्त दुकानाकडे धान्य रवाना केल्यानंतर लगेचच त्या दुकानांच्या परिसरातील लोकांना ग्रुप एसएमएसद्वारे पाठविण्यात आलेल्या धान्याच्या आकडेवारीची व वाहनाची माहिती शासकीय गोदाम वा तालुका कार्यालयात दिली जाणार आहे. यामुळे रेशनिंगवरील धान्याचा अपहार टाळण्यासाठी निश्चित मदत होईल. यात सरकारी गोदामातून रेशनिंगच्या दुकानाकडे धान्य रवाना केल्यानंतर लगेचच त्या दुकानाच्या परिसरातील किमान २५ लोकांना याबाबतची माहिती दिली जाईल. त्यामुळे रवाना करण्यात आलेले धान्य पूर्ण आले किंवा नाही याची खात्री दुकानात जाऊन करता येईल. या पद्धतीने अन्नधान्याची वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना हिरवा रंग दिला जाणार आहे. तसेच वाहनांवर, सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारित वितरण पद्धत, महाराष्ट्र शासन असे ठळक अक्षरात लिहिलेले असेल. केरोसिन वितरणातील गैरव्यवहार दूर करण्यासाठी यापुढे केरोसिनवरील अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ही योजना प्रायोगिक तत्त्वावर नाशिक जिल्ह्यासाठी तयार करून मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठवण्यात आली होती. ही योजना केंद्र शासनाने स्वीकारली असून संपूर्ण देशात ही योजना राबवण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील मुंबई, मुंबई उपनगर शिधावाटपक्षेत्र, अमरावती, नाशिक, वर्धा, पुणे व नंदुरबार या सहा जिल्ह्यात ही योजना राबवण्यात येणार आहे.

### ग्राहकांच्या सुविधेसाठी

सार्वजनिक वितरण व्यवस्थेची माहिती देण्यासाठी तसेच या अनुषंगाने काही तक्रारी असल्यास त्या नोंदवण्यासाठी १८००२२४९५०/ १८००२२२२६२ या टोल फ्री क्रमांकावर महाराष्ट्र दिनापासून हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. या विभागाचे www.mahafood.gov.in हे संकेतस्थळही महाराष्ट्र दिनापासून कार्यान्वित करण्यात आले आहे.

ग्राहकांच्या तक्रारीची दखल घेण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग तर राज्य पातळीवर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच या यंत्रणा कार्यरत आहेत. या अंतर्गत प्रामुख्याने ग्राहकांना अनुचित व्यापारी पद्धतीमुळे नुकसान झाल्यास किंवा वस्तूमध्ये दोष आढळल्यास, घेतलेल्या सेवेमध्ये उणीवा भासल्यास किंवा अधिक किंमत आकारल्यास ग्राहक; ग्राहक सेवा संघटना, केंद्र सरकार, राज्य शासन किंवा संघराज्य क्षेत्र प्रशासन यांच्याकडे एका ग्राहकास अनेक ग्राहकांच्या वतीने एकाच कारणासाठी तक्रार करता येते.

यामध्ये ग्राहकांना नुकसान भरपाईपोटी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे २० लाखांपर्यंत तर राज्य ग्राहक आयोगाकडे २० ते १ कोटींपर्यंत आणि राष्ट्रीय आयोगाकडे १ कोटीपेक्षा जास्त किंमत नुकसान भरपाईपोटी मागता येते.

**वंदना थोरात**

# फळबागांचा बहर




विजयकुमार गावित
मंत्री, वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन


## फलोत्पादन

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय फलोत्पादन योजनेंतर्गत राज्याने फलोत्पादन क्षेत्रात राबवलेल्या विविध योजना, फळपिकांच्या लागवडीतील विविधता व उत्पादन, फळबागांचे उत्कृष्ट नियोजन, बाजारपेठांची उपलब्धता व प्राथमिक सोयींमधील नियोजन, सूक्ष्म जलसिंचनाचा फळपीक क्षेत्रवाढीसाठी वापर, शासकीय व खाजगी समन्वयातून भरघोस उत्पादन वाढीसाठी प्रयत्न यामुळे देशात फलोत्पादन क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे. या सर्व गोष्टींमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात व ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यास मोठी मदत झाली आहे.

नुकताच महाराष्ट्राला फलोत्पादन क्षेत्रातील अत्युकृष्ट कामगिरीबद्दल, केंद्र शासनाचा ॲग्रीकल्चर लीडरशीप ॲवार्ड २०१३ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. २०१३ या वर्षासाठी महाराष्ट्र शासनाने फलोत्पादन क्षेत्र विस्तार निर्यात आणि नवीन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारामध्ये राज्यातील शेतकरी व इतर विभागाचे योगदान मोठे आहे.

**रोहयोंतर्गत फळबाग लागवड**

राज्यातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीद्वारे रोजगार व या माध्यमातून त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्याच्या दृष्टिकोनातून १९९० पासून रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड ही महत्त्वाकांक्षी योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत १८ लाख हेक्टर क्षेत्रावर फळबागांची लागवड करण्यात आली. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत ५ लाख हेक्टरवर फलोत्पादन क्षेत्रविस्तार करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त १४ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत फळबाग पुनरुज्जीवनासाठी रु. ३० हजार याप्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली आहे.



**सूक्ष्म सिंचनात अग्रेसर राज्य**

- रोजगार हमी योजनेंतर्गत आतापर्यंत १८ लाख हेक्टर क्षेत्रावर फळबागांची लागवड.
- शेतकऱ्यांना नुकसानीचा योग्य मोबदला मिळावा यासाठी २०११-१२ मध्ये हवामानावर आधारित फळपीक विमायोजना सुरू.
- फलोत्पादन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल केंद्राचा 'ॲग्रिकल्चर लीडरशीप ॲवार्ड २०१३' पुरस्कार



राज्यातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनाचे महत्त्व कळले आहे. या पद्धतीचा वापरही राज्यात मोठ्या प्रमाणात होत आहे. देशात महाराष्ट्र हे सूक्ष्म सिंचनाचा वापर करणारे अग्रेसर राज्य आहे. राज्यात आतापर्यंत ठिबक सिंचनाखाली ११.७७ लाख हेक्टर, तर तुषार सिंचनाखाली ४.२६ लाख हेक्टर असे एकूण १६.०३ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणले गेले आहे. राज्याला मिळालेल्या पहिल्या क्रमांकामध्ये सूक्ष्म सिंचन वापराचे महत्त्व अधिक आहे.

फळझाड लागवड कार्यक्रमात शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. राज्यातील विविध फळझाडांखाली १९९० पूर्वी असलेले २.४२ लाख हेक्टर धरून २०१२-१३ अखेर हे क्षेत्र १८.३४ लाख हेक्टरपर्यंत पोहोचले आहे. लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांची संख्या २१.०९ लाख आहे. या योजनेत सुरुवातीच्या काळात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना फळझाडांपासून उत्पन्न मिळू लागले आहे. यामुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होत आहे.

**हवामान आधारित फळपीक विमा योजना**

फलोत्पादन पिकाखालील क्षेत्रविस्तारास प्रोत्साहन दिल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात फळबाग लागवड करण्यात आली. परंतु बदलत्या वातावरणामुळे दरवर्षी फळपिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होते. शेतकऱ्यांना नुकसानीचा योग्य मोबदला मिळावा यासाठी शासनाने २०११-१२ मध्ये हवामानावर आधारित फळपीक विमायोजना सुरू केली. ही योजना द्राक्षे, संत्रा, मोसंबी, केळी, पेरू, आंबा, काजू, चिकू, डाळिंब या फळपिकांसाठी राबवण्यात येत आहे. या योजनेत शेतकऱ्यांस विमा हप्त्यांमध्ये ५० टक्के अनुदान देण्यात येते. अतिवृष्टी, अवेळी पाऊस, कमी पाऊस, जास्त वा कमी तापमान, सापेक्ष आर्द्रता या हवामान धोक्याचा या योजनेत समावेश करण्यात आला असून, त्याचा लाभ रु.३० हजार ते रु १.५० लाख प्रति हेक्टरपर्यंत विमा संरक्षण शेतकऱ्यांना मिळते. आजपर्यंत ४५,७५१ शेतकऱ्यांना रु. ८० कोटी इतकी रक्कम नुकसान भरपाईपोटी वाटप करण्यात आली आहे.


**द्राक्ष निर्यात**

युरोपियन देशांना द्राक्ष निर्यातीकरिता

कीडनाशक उर्वरित अंश योजनेची, ग्रेपनेट या ऑनलाइनद्वारे अंमलबजावणी करण्यात येते. यामध्ये द्राक्षबागांची नोंदणी, तपासणी, उर्वरित अंश तपासणी, एगमार्क प्रमाणीकरण व फ्रायटोसॅनेटरी प्रमाणीकरण ही सर्व कामे ऑनलाइन करून युरोपियन देशांना निर्यात होणाऱ्या द्राक्षामधील उर्वरित अंशाची हमी दिली जाते. देशातील एकूण निर्यातीपैकी ९८ टक्के द्राक्षे महाराष्ट्रातून निर्यात केली जातात. २०१२-१३ मध्ये एकूण १७२२७५ मे.टन द्राक्षाची निर्यात झाली. यामध्ये युरोपियन देशांना ५६५८५ मे.टन निर्यात झाली आहे. द्राक्षाप्रमाणेच डाळिंबाकरिता अनारनेट व द्राक्षांकरिता वाइननेट ही ऑनलाइन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. भाजीपाल्याकरिता व्हेजनेट ही ऑनलाइन प्रक्रिया करण्याचे काम सुरू आहे. या सर्व प्रणालीचा फायदा निर्यातीबरोबरच स्थानिक बाजारपेठेतील ग्राहकांना कीडनाशक उर्वरित अंशमुक्त फळे व भाजीपाला पुरवठा करण्यासाठी होणार आहे. याचा फायदा राज्यातील ग्राहकांबरोबरच उत्पादकांनाही होणार आहे.



# वैद्यकीय शिक्षण




## परीघ विस्तारला

- मागील ५० वर्षात राज्यात एकूण १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत होती. परंतु मागील ४ वर्षात गोंदिया, चंद्रपूर, बारामती (जि.पुणे), अलिबाग (जि. रायगड), नंदुरबार, सातारा, मुंबई या सात ठिकाणी नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची निर्मिती.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एम.बी.बी.एस प्रवेशाच्या २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून एकूण ४०० जागांची वाढ करून राज्याची वैद्यकीय विद्यार्थ्यांची क्षमता १६०० वरून २००० करण्यात आली.
- भारतात प्रथमच पॅरामेडिकलची निर्मिती करण्यासाठी विधिमंडळात कायदा संमत.
- निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात रु. ५०००/- इतकी वाढ .
- भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या एकूण आठ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रत्येकी ५० विद्यार्थी क्षमतेची वाढ. या वाढीव प्रवेश क्षमतेवर शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.
- राज्यातील निमवैद्यकीय व परिचर्या संस्थांच्या नियमनासाठी पॅरावैद्यक व परिचर्या मंडळाची स्थापना.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये निवासी डॉक्टरांव्यतिरिक्त सर्वसामान्य जनतेस रुग्णसेवा पुरविण्यासाठी वरिष्ठ निवासी व ट्यूटर या सेवा देणाऱ्या पदांची निर्मिती करण्याची बाब विचाराधीन.

शांताराम शेरवाडे



# जलव्यवस्थापनाची गंगोत्री

सुनील तटकरे
मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ वगळून)

## जलसंपदा

पाणी ही मौल्यवान नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. माणसाची ती मूलभूत गरज असून विकासातील अत्यावश्यक बाब आहे. पृथ्वीच्या सुमारे ५१० दशलक्ष चौ.कि.मी. पृष्ठभागाच्या सुमारे सत्तर टक्के भाग हा पाण्याने व्यापला आहे. मात्र माणसाला प्रत्यक्ष एकूण पाण्याच्या केवळ ०.६७ टक्के इतके अल्प पाणी उपलब्ध होत असते.

### जलसंपत्ती

महाराष्ट्रात सरासरी पाणी उपलब्धता १,६३,८२० घनमीटर इतकी आहे. राज्यातील कोकणातील पश्चिमवाहिनी नद्या वगळता इतर ४ प्रमुख नद्यांची खोरी आंतरराज्यीय आहेत. आंतरराज्यीय लवाद व आंतरराज्यीय करारानुसार १,२५,९३६ द.ल.घ.मी. पाणी वापरासाठी राज्याला अनुज्ञेय आहे. राज्याच्या वाट्याला आलेल्या पाण्यापैकी ६९,२१० द.ल.घ.मी (५५ टक्के) पाणी कोकणातील पश्चिमवाहिनी नद्यांतून उपलब्ध होते. परंतु विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे त्याचा पूर्ण वापर शक्य नाही.

### जलनियोजन

राज्याच्या स्थापनेपासून सर्वच राज्यकर्त्यांनी जलसंपदा विभागाच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. १९९६ ते १९९८ या काळात राज्यात जलसंपदा विभागाची ५ महामंडळे स्थापन करण्यात आली.

राज्यात योजनापूर्व काळात केवळ २.७४ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती.



त्यात वाढ होऊन सिंचनाच्या बाबतीत जलदगतीने विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने अंगीकारलेल्या धोरणानुसार सिंचन क्षमतेत लक्षणीय वाढ होऊन सन, २०११ अखेर राज्यस्तरीय प्रकल्पातून ४८.२५ लक्ष हेक्टर पर्यंत पोहोचली आहे व ३३,३८५ दलघमी पाणीसाठा निर्माण झाला आहे.

सन २००२-०३ ते २०११-१२ या दहा वर्षाच्या कालावधीत ११.६३ लक्ष हेक्टर (अस्थायी) अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. सन २०१२-१३ मध्ये १.६० लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट आहे.

राज्याच्या एकूण वीजनिर्मितीपैकी सुमारे १८ टक्के निर्मिती पाण्यापासून होते. पाण्यापासून वीजनिर्मिती कमीत कमी खर्चात, प्रदूषणविरहित व आवश्यकतेनुसार हवी तेव्हा चालू-बंद करता येत असल्याने अतिशय फायद्याची ठरते.

राज्यात ३६०५.६२५ मेगावॅट स्थापित क्षमतेच्या ५८ जलविद्युत प्रकल्पातून वीजनिर्मिती सुरू आहे. वीजेची वाढती मागणी विचारात घेऊन लहान जलविद्युत प्रकल्प खाजगी प्रवर्तकामार्फत विकसित करण्याचे धोरण राज्य शासनाने जाहीर केले आहे. त्या अंतर्गत २८३.१५ मेगावॅट क्षमतेच्या एकूण १०४ प्रकल्पांकरिता प्रवर्तक निश्चित करण्यात आले असून आतापर्यंत ७७.८० मेगावॅट क्षमतेचे १७ प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. उर्वरित २०५.३५ मेगावॅट क्षमतेचे ८७ प्रकल्प विकासाच्या विविध स्तरावर आहेत.

कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा-४ अंतर्गत लेक टॅप प्रक्रियेद्वारे विस्तारित अधिजल भुयारात पाणी सोडण्याचा ऐतिहासिक क्षण मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते व मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या लेक टॅपिंग मुळे कोयना टप्पा-४ची वीजनिर्मिती होणार आहे. यामुळे कोयना टप्पा-४ या जलविद्युत प्रकल्पाची वीजनिर्मिती पूर्ण वर्षभर अखंडित सुरू ठेवणे शक्य होणार आहे.

कामांच्या निविदा प्रक्रियेत पारदर्शकता येऊन सुदृढ स्पर्धेद्वारे न्यूनतम देकार प्राप्त होऊन शासनावरील आर्थिक उत्तरदायित्व कमी होण्याच्या दृष्टीने शासनाने रु. ५० लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या सर्व निविदांमध्ये ई-टेंडरिंगचा वापर अनिवार्य केला आहे. कोलाग्राऊट बांधकामांचे तंत्रज्ञान विकसित करण्यात येऊन हे राज्यातील ३४ प्रकल्पांच्या बांधकामात वापरण्यात आले आहे.

### राज्याची आघाडी

राज्याकरिता स्वतंत्र जलनीती स्वीकारणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. संपूर्ण देशातील पाहिले असे महाराष्ट्र जलसंपत्ती

- ५० लक्ष रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या सर्व निविदांमध्ये ई- टेंडरिंगचा वापर अनिवार्य
- स्वतंत्र जलनीती स्वीकारणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य
- वाघाड पाणी वापर संघाला आंतरराष्ट्रीय वॉटरसेव्ह पुरस्कार



## जून २०१२ अखेर ४९.२६ लक्ष हेक्टर सिंचन क्षमतेची निर्मिती

नियमन प्राधिकरण २००५ मध्ये स्थापित करण्यात आले. उपलब्ध जलसंपत्तीचे पाण्याच्या हक्कदारांमध्ये समन्यायी वाटप करणे, पाणी हक्काचा कोटा निर्धारित करणे व पाणी वापराचे ठोक दर ठरवणे इत्यादी कार्ये प्राधिकरणाच्या कक्षेत येतात.

महाराष्ट्रात सिंचन पद्धतीचे व्यवस्थापन अधिनियम-२००५ मध्ये पारित करण्यात आला आहे. त्यानुसार सिंचन व्यवस्थापनात लाभधारकांचा सहभाग अनिवार्य करण्यात अला असून पाणीवापर संस्थांना सिंचन व्यवस्थापन हस्तांतरित करण्याचे धोरण निश्चित केले आहे.

**समन्यायी पाणीवाटप**

समन्यायी पाणी वाटपासाठी, सिंचन व्यवस्थांना सुव्यवस्थित ठेवण्यासाठी, पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी व सिंचन प्रकल्पाबाबत आपलेपणा निर्माण होण्याकरिता पाणी वापर संस्था स्थापन करण्याचे राज्याचे धोरण आहे. पाण्याचे वाटप समन्यायी व शेतीला फायदेशीर होईल असे वेळेवर आणि पारदर्शक तज्ज्ञाने वितरित करणे हे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यापैकी जून २०१२ अखेर सुमारे ४९.२६ लक्ष हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

पाण्याचे समन्यायी वाटप व्हावे यासाठी सरकारने प्रकल्पांच्या पूर्णतेनंतर त्याचे सिंचन व्यवस्थापन पाणीवापर संस्थांकडे हस्तांतरित करण्याचा लोकहिताचा निर्णय घेतला आणि अभिनव राज्य म्हणून पुढचे पाऊल टाकले. त्यानंतर तर पाणीवापर संस्था स्थापन करणे ऐच्छिकच नव्हे तर अनिवार्य झाले. संबंधित लाभक्षेत्रातील लाभधारकाला सक्तीचे सभासदत्वही बहाल झाले.

पाणी वापर संस्थांच्या व्यवस्थापनामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने शासनाने वर्ष २००९-१० पासून महात्मा फुले पाणीवापर संस्था अभियानांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणीवापर संस्था पुरस्कार स्पर्धा सुरू केली. याअंतर्गत राज्यस्तरीय तीन, तर प्रदेशनिहाय दोन पुरस्कार प्रत्येक वर्षी पाणीवापर संस्थांना देण्यात येतात.

**देशपातळीवर गौरव**

राज्याचे पाणीवापर संस्थांचे मॉडेल देशपातळीवर आदर्श असे आहे. पाणीवापर संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या संस्थांनी जमा केलेल्या पाणीपट्टीपैकी ९३ टक्के पर्यंत रक्कमेचा परतावा देण्यात येतो. अशाप्रकारे परतावा देणारे महाराष्ट्र राज्य देशपातळीवरील प्रथम राज्य आहे. याची दखल योजना आयोग तसेच १३ व्या वित्त आयोगाने घेतली आहे. गोसीखुर्द प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्पाचा दर्जा मिळवून देण्याचे कामही खात्याने निर्धारपूर्वक केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील २५० मे. वॅट क्षमतेच्या घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पातील धरणाचे बांधकाम रोलर कॉम्पॅक्टेड काँक्रिट तंत्रज्ञानाचा भारतात प्रथमच वापर करून पूर्ण करण्यात आले आहे.

**आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचपावती**

जागतिक बँकेच्या मदतीचा योग्य विनियोग करीत महाराष्ट्र जलसुधार कार्यक्रमातूनही खात्याने सतत पुढे जाण्याचा प्रयत्न अविरत चालू ठेवला आहे. राज्यात पूर्ण झालेल्या २८६ प्रकल्पांच्या धरणसुरक्षिततेच्या कामांसह २३६ प्रकल्पांवरील ६.६८ लक्ष हेक्टर लाभक्षेत्र पुन:स्थापित करून सिंचन व्यवस्थापनासाठी पाणीवापर संस्थांना हस्तांतरण करण्यासाठी जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने रु. १,८६० कोटीचा महाराष्ट्र जलसुधार प्रकल्प राबवण्यात येत आहे.

कोयना धरणाच्या सुमारे ९५ मीटर उंचीच्या भागाचे जे मजबुतीकरण केले आहे, त्यात तापमान नियंत्रित संधानकाचा वापर करण्यात आला आहे. हा आशिया खंडातील पहिला यशस्वी प्रयोग आहे. वाघाड पाणी वापर संघाला आंतरराष्ट्रीय वॉटरसेव्ह पुरस्कार मिळण्यामागे जलसंपदा खात्याच्या प्रयोगशील धोरणांचा मोलाचा वाटा आहे, हे निश्चित.

**व्हिजन २०२०**

महाराष्ट्र राज्याने जलक्षेत्रामध्ये पुरोगामी सुधारणा अंमलात आणून त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. प्रकल्पांचे बांधकाम हाती घेताना अत्याधुनिक तंत्राचा वापर करून धरणांचे मातीचे, दगडी, काँक्रिट असे सर्व प्रकार राज्याने हाताळले. वैशिष्ट्यपूर्ण बोगदे, लेक टॅपिंग प्रक्रियेद्वारे विस्तारित अधिजल भुयारात सोडणे, प्रिस्ट्रेस काँक्रिटचा वापर, २५ मेगावॅटपेक्षा कमी क्षमतेच्या लहान जलविद्युत प्रकल्पांना प्राधान्य इ. अभिनव योजना जलसंपदा विभागाने यशस्वीरित्या राबवल्या आहेत.



**कालबद्ध उद्दिष्टे निश्चित करून भावी काळातील पाण्यासंबंधीच्या आव्हांनाना सक्षमपणे सामोरे जाण्याकरिता व्हिजन २०२० चा कार्यक्रम विभागाने जाहीर केला आहे. त्रुटीरहित व्यवस्था निर्माण करण्यासाठी उच्चाधिकाऱ्यांचे आठ अभ्यासगट स्थापन करून शेतीच्या उत्पन्न व उत्पादनाचा आलेख चढता ठेवण्यासाठी विभागाने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.**

**मीनल जोगळेकर**

# ऑनलाइन गतिमानता

महसूल



**बाळासाहेब थोरात**
मंत्री, महसूल व खार जमीन

महसूल प्रशासन पारदर्शक, अत्याधुनिक आणि गतिमान असावे अशी जनतेची अपेक्षा असते या दृष्टीने नावीन्यपूर्ण उपक्रम या विभागामार्फत घेण्यात आले आहेत. महसूल विभाग ऑनलाइन करण्यावर भर देण्यात आला आहे. सध्या अनेक दाखले ऑनलाइन दिले जात आहेत. 'सेतू' योजना त्याचाच एक भाग आहे. एका क्लिकमध्ये स्वत:चा दाखला मिळविण्याची संधी राज्यातील जनतेला मिळवून देण्यासाठी शासनाचे प्रयत्न आहेत.

### सुवर्ण जयंती राजस्व अभियान

राज्यातील काही जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या लोकोपयोगी कामांना राज्यव्यापी स्वरूप मिळावे म्हणून सुवर्ण जयंती राजस्व अभियान राज्यात १ मे २०११ पासून लोकांच्या सहभागातून राबवण्यात आले. त्यातून वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या पाणंद रस्त्यांचे शेकडो प्रश्न सुटले. वादात अडकलेले रस्ते मोकळे झाले. त्याचप्रमाणे अधिवास (रहिवासी) प्रमाणपत्रांचा व इतर दाखल्यांचा प्रश्न सुटला. दाखल्यावरील जन्मतारीख पाहून महाराष्ट्राचे रहिवासी गृहीत धरावे, एवढ्या एकाच ओळीने अनेक पालक आणि विद्यार्थी चिंतामुक्त झाले. इतर दाखले देण्यासाठी ही गतिमान पद्धती हाती घेतली असून तिची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

९ वीच्या विद्यार्थ्यांना शाळेतून दाखले देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. एक महिन्याच्यावर प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढण्याकरिता मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत घेण्यात आल्या. प्रत्येक जिल्हयात महसूल विभागाशी संबंधित माहिती मिळण्यासाठी व तक्रार निवारणासाठी ई लोकशाही प्रणाली (हेल्पलाइन) उपलब्ध करून देण्यात आली. नागरिकांना एका छत्राखाली, मंडळपातळीवर सर्व सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'समाधान' योजना राबवण्यात आली. ई-चावडी योजनेंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात तलाठी लॅपटॉप आणि प्रिंटरच्या साहाय्याने सर्व महसूलविषयक सेवा प्रदान करीत आहेत. सर्व जिल्ह्यात ही योजना सुरू करण्यात येणार आहे.

- दाखले वाटप उपक्रमाची दखल 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस'ने घेतली
- जमीन मोजणीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यास प्राधान्य. सुमारे ७२ हजार खटले आतापर्यंत निकाली.
- केंद्रीय वनहक्क अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी. आदिवासींचे ३,३३,२३७ वनजमिनीवरील हक्कांचे दावे मंजूर.



सुवर्ण जयंती राजस्व या अभियानांतर्गत १ एप्रिल २०१३ ते ३० एप्रिल २०१३ या कालावधीत विविध दाखले देण्याकरिता शिबिरे आयोजित करून ७७ लाख दाखले वितरित करून विक्रम केला आहे. शेतातून जाणाऱ्या रस्त्यांना लोकसहभागातून तयार करण्यात आले, असे १८ हजार ३६० कि.मी.चे रस्ते तयार झाले .

विविध शासकीय कामांसाठी मोबाइल, इंटरनेट, व्हीडिओ कॉन्फरन्स, जीपीएस., सॅटेलाइट ईमेजचा मोठ्या प्रमाणात वापर, प्रत्येक जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयात नागरिकांना सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करून देणे व सर्वतोपरी मदत करणे यासाठी सुविधा कक्ष यासारख्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या.

राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम हा कार्यक्रम नव्याने सुरू करण्यात आला आहे. संगणकाचा व माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून भूमी अभिलेखांचे आधुनिकीकरण व व्यवस्थापन करणे या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्रात हा कार्यक्रम ई-महाभूमी (एकात्मीक भूमी अभिलेख आधुनिकीकरण व व्यवस्थापन कार्यक्रम) राबवण्यात येत आहे. ई-महाभूमी कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येत आहे.

### खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटप

खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटपाबाबतचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयातील स्थगितीमुळे

तांदूळजा टाकळ शेतरस्ता (पूर्वी )





तांदूळजा टाकळ शेतरस्ता (आता)

## राजस्व अभियानांतर्गत फेरफार अदालतीमध्ये ८ लाख ७० हजार फेरफार मंजूर

बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित होता. शासनाने विशेष विधिज्ञ नेमून या प्रकरणी पाठपुरवा केला. त्यामुळे शासनाच्या बाजूने निर्णय झाला. त्यामुळे खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटपाचा मार्ग खुला झाला. सुमारे ४,०१५ इतक्या खंडकरी शेतकऱ्यांना व त्यांच्या वारसांना ५० वर्षांनंतर न्याय मिळाला.

**बेदखल कुळे**

कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बेदखल कुळांना मालकी हक्क देण्याबाबतचे प्रलंबित दावे विशेष मोहीम आखून निकाली काढण्यात आले. यामुळे महसूल यंत्रणेकडे दाखल केलेल्या दाव्यांपैकी सुमारे ६० टक्के प्रकरणांमध्ये बेदखल कुळांना मालकी हक्क प्राप्त झाले आहेत.

**विदर्भातील नझूल धोरण**

नागपूर व अमरावती विभागात सुमारे ४०,००० मिळकती नझूल प्रकाराच्या आहेत. या मिळकतींचा भाडेपट्टा ठरविणे, हस्तांतरणास परवानगी देताना आकारावयाचे शुल्क ठरवणे व या पूर्वी विनापरवानगी झालेली हस्तांतरणे नियमानुकूल

**(पान ९१ वर)**

# पुनर्मोजणी आणि ई-मोजणी

राज्यात राबवण्यात येत असलेल्या मोजणी प्रक्रियेचे संगणकीकरण व राज्यातील जमिनींची पुनर्मोजणी करणे हे दोन्ही कार्यक्रम भूमी अभिलेख विभागाच्या आधुनिकीकरणाचे विशेष कार्यक्रम आहेत.

मोजणी विषयीच्या कामकाजाचे राज्यात संगणकीकरण करून ऑनलाइन सेवा पुरवण्यासाठी 'ई मोजणी' कार्यक्रम राज्यात १ जानेवारी २०१२ पासून राबवण्यात येत आहे. मोजणीप्रकरण कार्यालयात दाखल झाल्यापासून ते निकाली होईपर्यंतच्या विविध टप्प्यांचे नियंत्रण या आज्ञावलीतून केले जाते. प्रकरणातील प्रत्येक टप्प्यावरची कार्यवाही खातेदारांना घरबसल्या पाहण्याची सोय या आज्ञावलीतून केली आहे.

ई-मोजणी आज्ञावलीतूनच मोजणी प्रकरणांच्या सर्व टप्प्यांचे नियंत्रण केले जात असल्याने मोजणी प्रकरणे निश्चित वेळेत निकाली करण्यासाठी सुयोग्य नियोजन करणे सोपे झाले आहे. राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने ई-मोजणी आज्ञावलीचा गौरव केला आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्मार्ट ई-गव्हर्नन्सबाबत दिला जाणारा स्कॉच वॉर्डने ई-मोजणी आज्ञावलीस गौरवण्यात आले आहे.

**भविष्यातील वाटचाल**

ई-मोजणी आज्ञावली वित्त विभागाच्या ग्रास (Government Receipt Accounting System) आज्ञावलीशी संलग्न केली जाणार आहे. त्यामुळे खातेदारांना कोषागाराऐवजी तालुक्यातील निवडक राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांमध्ये पैसे भरून घेण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जे खातेदार इंटरनेट बँकिंगचा वापर करतात अशा खातेदारांना मोजणी फी घरबसल्या भरता येणार आहे. यापुढील काळात खातेदारांना इंटरनेटच्या माध्यमातून मोजणीचा अर्ज घरातून भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

**ई- पुनर्मोजणी**

महाराष्ट्र राज्याच्या जमिनीचा सर्व्हे सुमारे १०० वर्षापूर्वी ब्रिटिश कालावधीमध्ये प्रथमत: झाला आहे. त्यानंतर जमिनीचे मोठया प्रमाणावर पोटविभाजन झाल्याने प्रत्यक्ष वहिवाट, भूमी अभिलेख नकाशे आणि अधिकार अभिलेख यात मेळ राहिलेला नाही. त्यामुळे जमिनीविषयक वाद निर्माण होऊन विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. म्हणून राज्याची पुनर्मोजणी करण्याची बाब शासनाच्या



**जमीन मोजणी अत्याधुनिक पद्धतीने करण्यास सुरुवात झाली आहे. मुळशी तहसील क्षेत्रातून या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात झाली आहे. या ठिकाणाला राज्याचा मध्यबिंदू मानून सॅटेलाइट आणि जी.पी.आर एस तंत्रज्ञानाच्या आधारे जमिनींची मोजणी सुरु आहे. राज्यातील जमिनीचे नवीन नकाशे बारकाईने आणि अचूक पद्धतीने तयार केले जाणार आहेत. ही सर्व मोजणी वेबसाइटवर प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात राज्यातल्या कोणत्याही जमिनीचा नकाशा, मालकी, गट आणि सर्व्हे क्रमांक कायमस्वरूपी नोंदविला जाणार आहे. तो कोणालाही आणि कोठेही पाहता येईल व वाद उपस्थित होणार नाहीत.**

विचाराधीन आहे. राज्याची पुनर्मोजणी हाय रिझोल्युशन सॅटेलाइट इमेजरी व इटीएस/जीपीएस या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी ग्राऊंड कंट्रोल पॉईन्ट नेटवर्क तयार करण्यात येईल. प्रत्यक्ष पुनर्मोजणीचे काम खाजगी संस्था नेमून करण्यात येईल भूमी अभिलेख विभागात नव्याने अधिकारी व कर्मचारी नेमून त्यांच्यामार्फत तपासणीचे आणि प्रमाणिकरणाचे काम करण्यात येईल. पुनर्मोजणीच्या अनुषंगाने प्रचलित कायद्यामध्ये करावयाचे बदल आणि पुनर्मोजणीचे नियम करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

राज्यात पुनर्मोजणी प्रकल्प यशस्वीरीत्या राबवण्यासाठी भूमी अभिलेख व उपलब्ध सर्व्हे नंबरचे अभिलेख, हिस्सानंबरचे अभिलेख उदा. टिपण, फाळणी, पोटफाळणी, गटबूक, पोटहिस्सा मोजणी नकाशे यांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करून घेण्यात येणार आहे.

**चंद्रकांत दळवी, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख**

# जागतिक गुणवत्तेच्या दिशेने...



राजेश टोपे
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

भारत हा तरुणांचा देश आहे असे म्हटले जाते. या तरुण हातांचा उपयोग देशाच्या जडणघडणीत आणि विकासासाठी करून घेण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्र शिक्षण विभागात काही मूलभूत बदल करण्यात येत आहेत. युवकांना रोजगार-स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शिक्षण अधिकाधिक रोजगाराभिमुख करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. नजीकच्या भविष्यात राज्यातील विद्यापीठांना जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान मिळावे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राज्यातील विद्यापीठे केवळ परीक्षा केंद्रे न राहता रोजगाराभिमुख ज्ञान देणारी केंद्रे बनावीत यासाठी विभागाने अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत.

**कायद्यात सुधारणा**

जागतिक स्पर्धेत चमकू शकतील, असे विद्यार्थी घडवण्याचे आव्हान विद्यापीठांना पेलावे लागणार आहे. त्यादृष्टीने उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी शासनाने डॉ. अनिल काकोडकर, डॉ. अरुण निगवेकर आणि डॉ. राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या तिन्ही समित्यांचे अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत. या अहवालांच्या अनुषंगाने प्रचलित विद्यापीठ कायद्यात कराव्या लागणाऱ्या सुधारणांच्या मसुद्यास अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मांडण्यात येईल. या नवीन कायद्यामुळे विद्यापीठांच्या आधुनिकीकरणाचा मार्ग सुकर होणार आहे.




राज्यातील सर्व महाविद्यालयांना नॅकचे मानांकन घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेता यावे यासाठी काही शिक्षण संस्थांशी करार करण्यात आले आहेत. या सर्व प्रयत्नांमुळे राज्यातील उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा सुधारण्याला मदत होणार आहे.

**कौशल्य विकास**

राज्यातील विद्यापीठांनी पारंपरिक चौकटीतून बाहेर पडून नवीन संशोधनाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. नव्या विद्याशाखांमध्ये अधिक संशोधन व्हावे यासाठी विद्यापीठात अत्याधुनिक पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पीएचडी करणाऱ्यांच्या संख्येत वाढ व्हावी म्हणून त्यांना अनुदान दिले आहे. तसेच या विद्यार्थ्यांना मासिक ६५०० रुपये शिष्यवृत्ती देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. पंतप्रधानांनी दिलेल्या कुशल मनुष्यबळाबाबतचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उद्योजकांना स्थानिक लोकांमधूनच कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी 'रोजगार कौशल्य विकास कार्यक्रम' राबवला जाणार आहे. यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च परिषद, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती व राज्य कौशल्य विकास संस्था या मध्यवर्ती संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी सुरू करण्यात आली आहे. तसेच तंत्रशिक्षण संस्थांत 'शिका आणि कमवा' ही योजना सुरू करण्यात आली आहे. राज्यात व्यवसाय प्रशिक्षण विद्यापीठाची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे.

राज्यातील ९५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांत माहिती तंत्रज्ञान साक्षरता वाढावी म्हणून 'स्मार्ट क्लास रूम' तयार करण्यात आल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात संपूर्ण जगात राज्यातील तंत्रज्ञ आघाडीवर आहेत. मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे न्यायसाहाय्य विज्ञान महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत.

- ९५७ व्यवसाय प्रशिक्षण प्रवर्तकांमार्फत 'रोजगार सुलभ कौशल्य कार्यक्रम' राबवण्यास प्रारंभ.
- उत्तम शैक्षणिक दर्जासाठी शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्याचे धोरण.
- मुलींसाठी नवी १४ वसतिगृहे बांधण्यास मान्यता. यामुळे वसतिगृहांच्या प्रवेश क्षमतेत २२५० इतकी वाढ.



**सर्वसमावेशक शिक्षण**

आदिवासी व डोंगराळ क्षेत्रातील २८ शासकीय निवासी शाळांचे, निवासी व्यवसाय प्रशिक्षण आश्रमशाळात रूपांतर करण्यात येणार आहे. अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आल्या आहेत. शिक्षणातील मुलींची गळती थांबवण्यासाठी उच्च शिक्षण सहसंचालनालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी विद्यार्थिनीसाठी वसतिगृहे बांधण्यात येतील.

दुर्बल घटक, अल्पसंख्याक व वंचित

**राज्यात केवळ मुलींसाठी १५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.**

गटातील विद्यार्थी यांच्यासाठीही विद्यापीठ आवारात वसतिगृहे बांधण्यात येणार आहेत. अल्पसंख्याक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येत आहे. प्रवेश प्रक्रियेत मुलींसाठी ५० टक्के जागा राखीव आहेत.

**महत्त्वाचे निर्णय**

सर्व विधी अभ्यासक्रम एका छत्राखाली आणण्यासाठी राज्यात तीन विधी विद्यापीठांची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी औरंगाबाद व मुंबई येथील विद्यापीठे स्थापन झाली असून नागपूर येथील विद्यापीठ प्रस्तावित आहे.

गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल आणि नक्षलग्रस्त जिल्ह्यात गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करून विभागाने या परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या भागात शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाल्यामुळे नक्षलवादाकडे आकर्षित होणाऱ्या तरुणांचे प्रमाण कमी होण्यास निश्चित मदत होणार आहे.

प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन आणि केंद्रीभूत करून ती अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्यात आली आहे. ऑनलाइन प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी महाविद्यालयात माराव्या लागणाऱ्या फेऱ्या कमी झाल्या आहेत.

राज्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांचा केंद्रीय नागरी सेवेमध्ये समावेश व्हावा या उद्देशाने मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर व नागपूर या ठिकाणी प्री-आयएएस ट्रेनिंग सेंटर पूर्वी सुरू करण्यात आली आहेत. आता नाशिक व अमरावती येथे ही केंद्रे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या भागातील विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम व परीक्षेसंबंधी मार्गदर्शन मिळून राज्याची भारतीय प्रशासकीय सेवेतील टक्केवारी वाढण्यासाठी या केंद्रांची निश्चितच मदत होईल.

निवासाची संरक्षित व्यवस्था नसणे हे मुलींच्या उच्च शिक्षणातील गळतीचे एक महत्त्वाचे कारण आहे. राज्यात सध्या मुलींची १३ प्रियदर्शनी वसतिगृहे सुरू आहेत. आणखी १४ वसतिगृहे बांधण्यास मान्यता देण्यात आली असून यामुळे वसतिगृहांच्या प्रवेश क्षमतेत २२५० इतकी वाढ झाली आहे. काही वसतिगृहांची प्रवेश क्षमता वाढवण्यात येणार आहे. हे काम येत्या दोन वर्षांत पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे.



**राज्यातील तंत्र शिक्षणाचा दर्जा व गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी जागतिक बँक आणि केंद्र शासनाच्या सहकार्याने तांत्रिक शिक्षण गुणवत्ता कार्यक्रम राबवला जात आहे. तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात १० शासकीय आणि खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांची निवड करण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यात चार शासकीय आणि खाजगी स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाची आणि तीन शासकीय तंत्रनिकेतनांची निवड करण्यात आली आहे.**

विद्यार्थ्यांना थोर विचारवंतांचे विचार समजावेत, त्यांची पुस्तके वाचता यावीत, भाषणे ऐकता यावीत यासाठी मुंबई विद्यापीठात प्रवीणचंद गांधी अध्यासनाची निर्मिती करण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठात नुकतीच व्हर्च्युअल क्लासरूमची सुरुवात करण्यात आली. व्हर्च्युअल क्लासरूममुळे नामवंत प्राध्यापकांची व्याख्याने इतर विद्यापीठातील अगदी ग्रामीण भागातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंतही पोहचू शकणार आहेत.

**ग्रंथालयांना साहाय्य**

राज्यात १२,८५८ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये असून, या ग्रंथालयांच्या व्यवहाराबाबत कुठलेही गैरसमज राहू नयेत यासाठी या सर्व ग्रंथालयांची पटपडताळणी करण्यात आली आहे. ग्रंथालय कर्मचाऱ्यांना सेवाशर्ती व सेवानियम लागू करण्यात आले आहेत. ग्रंथालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानात ५० टक्के वाढ करण्यात आली आहे. नांदेड आणि जालना येथे डिजिटल ग्रंथालये सुरू करण्यात आली असून रायगड येथे डिजिटल ग्रंथालये सुरू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

**प्रस्तावित निर्णय**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे आणि राज्यमंत्री डी.पी. सावंत यांनी राज्यात उच्च व तंत्रशिक्षणाचा अधिकाधिक विस्तार व्हावा, विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणातील गळती कमी व्हावी आणि उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. हेच उद्दिष्ट समोर ठेवून व्यवसाय प्रशिक्षण आणि क्रीडा विद्यापीठांची स्थापना, खाजगी विद्यापीठ कायदा, राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान राज्यात राबवणे, चांगल्या दर्जाच्या प्राध्यापकांची गरज पूर्ण करण्यासाठी यशदामध्ये दोन हजार शिक्षकांना प्रशिक्षण, प्रत्येक जिल्ह्यात डिजिटल ग्रंथालय आदी प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत.

**सुधा महाजन**



# शिक्षण हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

राजेंद्र दर्डा
मंत्री, शालेय शिक्षण

## शालेय शिक्षण

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने गेल्या चार वर्षांत शिक्षणाच्या सक्षमीकरणासाठी झपाट्याने निर्णय घेतले. शिक्षण हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षकांना इंग्रजी प्रशिक्षणासाठी ब्रिटिश कौन्सिलची मदत, आयआयटी आणि मुंबई विद्यापीठाच्या साहाय्याने खास सॉफ्टवेअरची निर्मिती, सर्वांना शिक्षण या उद्देशासाठी बृहत आराखड्याची निर्मिती. कॅापी मुक्त अभियान असे अनेक निर्णय शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा यांनी राज्यमंत्री फौजिया खान यांच्या सहकार्याने घेतले.

जागतिकीकरणाच्या युगात शिक्षणाला माहिती- तंत्रज्ञानाची जोड देऊन राज्यामध्ये माहिती तंत्रज्ञान संबंधीचे प्रशिक्षण कार्यक्रम (ICT योजना) माध्यामिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबवण्यात येत आहेत. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील ५०० शाळांमध्ये पहिल्या टप्यात तर २५०० शाळांमध्येही आगामी वर्षात राबवण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. पुढच्या टप्प्यात तो ५००० शाळांमध्ये राबवण्यात येणार आहे.

आपली मुले इंग्रजी भाषेत मागे राहू नयेत म्हणून विभागाने ब्रिटिश कौन्सिलसोबत सामंजस्य करार केला आहे. या उपक्रमामुळे शिक्षकांना इंग्रजी भाषेतून संवाद साधण्यासाठी तसेच त्यांचे कौशल्य विकसित करण्यास मदत होणार आहे. गेल्या वर्षी जवळपास ६७ हजार प्राथमिक शिक्षकांना हे प्रशिक्षण देण्यात आले आहे. यावर्षी ५५० अनुभवी प्रशिक्षकांद्वारे माध्यमिक शाळांमधील २० हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



गणित, इंग्रजी, विज्ञान या विषयात गुणवत्ता वाढविण्यासाठी आयआयटी आणि मुंबई विद्यापीठाच्या मदतीने विद्यार्थांना गणित विषय कमीत कमी वेळेत कसा शिकवायचा, यासाठी अमरिता विद्यापीठ आणि भारत सरकारने विकसित केलेल्या एव्ह्यू (AVIEW) या सॉफ्टवेअरचा उपयोग करून राज्यातील २८ हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

राज्यातील ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व जाती धर्मांतील मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी शिक्षण हक्क कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. या माध्यमातून सर्व बालकांना पहिली ते आठवीपर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले आहे.

मुलांना एक किलोमीटरच्या आत प्राथमिक शाळा, तीन किलोमीटरच्या आत उच्च प्राथमिक शाळा आणि पाच किलोमीटरच्या आत माध्यमिक शाळा उपलब्ध करून देण्यासाठी जिऑग्राफिकल इन्फर्मेशनचा उपयोग करून घेतला जात आहे. त्यानुसार प्राथमिक ६५१ उच्च प्राथमिक १५७९ आणि माध्यमिक शाळा १४५ अशा एकूण २३७५ शाळांचा बृहत आराखडा मंजूर करण्यात आला आहेत. या शिक्षण हक्क कायद्यामुळे राज्यातील वंचित, दुर्बल, मागासवर्गातील बालकांना शिक्षणाचा हक्क मिळाला आहे.

- राज्यातील शाळांना देण्यात येणारे वेतनेतर अनुदान १ एप्रिल २०१३ पासून सुरू
- १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षांचे वेळापत्रक वर्षाच्या सुरुवातीला
- मुले इंग्रजी भाषेत मागे राहू नयेत म्हणून ब्रिटिश कौन्सिल सोबत सामंजस्य करार




### महत्त्वपूर्ण निर्णय

**विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबद्दल विशेष पटपडताळणी मोहीम**

राज्यात एकूण १,०३,४८७ शाळा असून त्यापैकी ८८,५०९ शाळा अनुदानित आहेत. अनेक शाळांमधून बोगस विद्यार्थी दर्शवून जास्तीच्या शिक्षकांच्या नियुक्त्या करीत असल्याच्या तक्रारी विचारात घेऊन संपूर्ण राज्यात विशेष पटपडताळणीची मोहीम जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राबवण्यात आली. या मोहिमेला सर्वांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्कविनियम) विधेयक २०११-**

राज्यातील शाळांमध्ये अवाजवी शुल्क आकारले जाऊ नये, शिक्षणाचे व्यापारीकरण रोखले जावे आणि विद्यार्थी व पालकांच्या हिताचे रक्षण व्हावे या व्यापक भूमिकेतून हे विधेयक मंजूर करण्यात आले.

**शिक्षणसेवकांच्या मानधनात वाढ व पदनामात बदल**

राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०००-०१ पासून प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांमधील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. तसेच 'शिक्षण सेवक' हे पदनाम बदलून त्याऐवजी साहाय्यक शिक्षक

(परिवीक्षाधीन) करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

**५००० शाळांच्या मूल्यांकनास मान्यता**

इंग्रजी माध्यम वगळता कायम विनाअनुदान तत्त्वांवर परवानगी दिलेल्या प्राथमिक व माध्यमिक ५ हजार शाळांचा कायम शब्द वगळण्याचा निर्णय १६ जून २००९ रोजी घेण्यात आला होता.

**स्वयंअर्थसाहाय्यित शाळा विधेयक**

ज्या संस्था शासनाच्या कोणत्याही आर्थिक मदतीशिवाय शाळा सुरू करू इच्छितात त्यांना बृहत आराखड्याबाहेर शाळा परवानगी देण्यासाठी शासनाने स्वयंअर्थसाहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक तयार केले आहे. त्याच्या अंतिम मसुद्यास संयुक्त समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार इच्छुक संस्थांकडून प्रस्ताव मागवले आहेत.

**वाढीव तुकड्यांना मान्यता**

वाढीव विद्यार्थी संख्येनुसार अतिरिक्त तुकड्या देण्याचा विषय गेल्या आठ वर्षापासून प्रलंबित होता. यावर्षी शासनाने माध्यमिक शाळांकरिता ५९७२ जादा वाढीव तुकड्या १६ ऑगस्ट २०१२ पासून मंजूर केल्या आहेत.

**कॉपीमुक्ती अभियान**

शिक्षणाचा गुणात्मक विकासाचा भाग म्हणूनच इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्याठी शालेय शिक्षण विभाग, महसूल विभाग व गृह विभागाच्या समन्वयातून गेल्या दोन वर्षांपासून राज्यभर कॉपीमुक्ती अभियान यशस्वीपणे राबवण्यात येत आहे.

**वेळापत्रक आता प्रारंभीच**

विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासाचे नियोजन व पालकांना सुट्ट्यांचे नियोजन व्यवस्थितपणे करता यावे या दृष्टीने चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १० वी व १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षांचे वेळापत्रक वर्षाच्या सुरुवातीला देण्यात आले.

**शाळांकरिता मूलभूत सुविधा**

१३ व्या वित्त आयोगाच्या मदतीतून सुमारे ३४० कोटी किमतीचे ८ लक्ष डेक्स बेंच, ९० कोटी किंमतीचे १.५ लक्ष ग्रीन बोर्ड, २० कोटीचे वॉटर फिल्टर, ५० कोटीचे खेळाचे साहित्य इ.शाळांना पुरविण्यात आले आहे.

**ऑनलाइन अर्जाची प्रक्रिया**

अल्पसंख्याक समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा, वेळेची बचत व्हावी, अर्जांची प्रक्रिया सुलभतेने व्हावी याकरिता शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन करण्याचा निर्णय.



**इ.४ थी व ७ वी शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थ्यांना पूर्वी धनादेशाद्वारे शिष्यवृत्ती दिली जात असे. यामध्ये बदल करून आता शासनाने या शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याचा निर्णय घेतला आहे.**

**प्रत्येक तालुक्यापर्यंत व्हिडीओ कॉन्फरसिंग**

राज्य स्तरापासून ते तालुकास्तरापर्यंतच्या ४४८ शिक्षण विभागाची कार्यालये व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या सुविधेने जोडण्यात आली.

**रिक्त जागा भरणे**

शालेय शिक्षण विभागातील गट-ब च्या ३२५ जागा पदोन्नतीने आणि ९३ जागा सरळ सेवेने अशा एकूण ५१८ रिक्त जागा भरण्यात आल्या. तसेच गट-अ मध्ये मागासवर्गीय अनुशेषांतर्गत ३४ पदे, अभावित अंतर्गत ५४ अशी ८८ पदे पदोन्नतीने भरण्यात आली. तसेच विभागीय उपसंचालकांची १७ व सहसंचालकांची ८ पदे भरण्यात आली. याव्यतिरिक्त जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमधील अधिव्याख्याता, व्याख्याता, व प्राचार्याची पदेही भरण्यात आली.

**अभ्यासक्रमात बदल**

इ. ९ वी ते १२ वी चा अभ्यासक्रम राष्ट्रीय अभ्यासक्रमाशी समकक्ष करण्याचा निर्णय घेण्यात आलाअसून त्यापैकी इ.९ वी व ११ वी चा अभ्यासक्रम सन २०१२-२०१३ मध्ये सुधारित करण्यात आला. तर इ.१० वी व १२ वी चा अभ्यासक्रम सन २०१३-१४ मध्ये सुधारित करून सदरचा अभ्याक्रम राष्ट्रीय अभ्यासक्रमाशी समकक्ष करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) नुसार अभ्यासक्रमाची मांडणी**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत, राज्यस्तरीय अभ्यासक्रम आराखडा तयार केलेला असून या आराखड्याद्वारे १ ली ते ८ वी च्या अभ्यासक्रमाचे उद्बीकरण होणार आहे.

**इ.११ वी ऑनलाईन प्रवेश पद्धतीमधील त्रुटी दूर**

मुंबई विभागात इ.११ वी चे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने दिले जातात. त्यामध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीने दिलेल्या अहवालानुसार या त्रुटी दूर करून ही प्रक्रिया सुधारण्यात आली आहे.

**काशीबाई थोरात**

# सगळे मिळून पुढे जाणार

## अल्पसंख्याक



**मोहम्मद आरिफ (नसीम) खान**
मंत्री, वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ

अल्पसंख्याक विकास विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत. राज्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री मोहम्मद आरिफ (नसीम) खान यांच्या नेतृत्वाखाली मागील ४ वर्षात या विभागाने मोठी आघाडी घेतली असून अल्पसंख्याकांच्या हितासाठी अनेक नवीन योजना आणल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या योजनांची आखणी, अंमलबजावणी आणि यशस्वितेमध्ये अल्पसंख्याक विकास विभागाच्या राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांचे योगदान लाभले.

**शिक्षणावर भर**

अल्पसंख्याक समाजातील मुलांचे शाळा गळतीचे प्रमाण तसेच उच्च शिक्षणातील प्रमाण चिंताजनक असल्याचे सच्चर समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शासनाने अल्पसंख्याक समाजाच्या शिक्षणावर विशेष भर दिला असून यासाठी विविध योजना राबवल्या आहेत.

**शाळांना पिण्याचे पाणी, संगणक खोली**

अल्पसंख्याकबहुल शाळांमध्ये मूलभूत सुविधांसाठी २ लाख रुपये निधीची योजना राबवली जात आहे. या योजनेतून २०१२-१३ मध्ये राज्यातील १ हजार ८५० शाळांना ३७ कोटी रुपयांच्या निधीचे वितरण करण्यात आले आहे. या निधीतून या शाळांमध्ये पिण्याचे पाणी, शौचालय, प्रयोगशाळा, संगणक खोली, ग्रंथालय अशा सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



अल्पसंख्याक समाजातील महिला उद्योजकांसमवेत मंत्री महोदय नसीम खान आणि फौजिया खान.

**८ लाख विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती**

विविध शिष्यवृत्ती योजना अल्पसंख्याक समूहासाठी राबवल्या जात आहेत. मागील वर्षी सुमारे ८ लाख विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक शिष्यवृत्तीचे तर सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तींचे वितरण करण्यात आले आहे. प्राथमिक शाळेत राबवल्या जात असलेल्या मोफत गणवेश वाटपासारख्या योजनांमुळे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा शाळेकडे ओढा वाढत आहे. या योजनेतून राज्यातील ४ हजार ४३४ अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना आयटीआयमध्ये तर १ हजार ९२० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश मिळाला आहे. अल्पसंख्याक मुलींसाठी जिल्हा पातळीवर वसतिगृहे निर्माण करण्यात येणार असून याबाबत कार्यवाही सुरू आहे. यासाठी शासनाने ९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

- मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत शैक्षणिक कर्ज योजनेसाठी ५०० कोटी रुपयांचे भागभांडवल उपलब्ध करून दिले.
- राज्यातील २०० मदरशांना १० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याचा निर्णय.
- पोलीस भरतीच्या पूर्व तयारीसाठी आतापर्यंत १० हजार ८८० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.



**मदरशांना अनुदान**

शासनाने नुकताच मदरशांमधील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने राज्यातील २०० मदरशांना १० कोटी रुपयांचा निधी वितरित केला जाणार आहे. मदरशांमधील विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान, भाषा, समाजशास्त्र इ. क्रमिक अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाणार आहे. यासाठी मदरशांमध्ये शौचालय, पिण्याचे पाणी, वर्ग खोली, प्रयोगशाळा, ग्रंथालय आदींची उभारणी करण्यासाठी २ लाख रुपये निधी दिला जाणार आहे. डीएड तसेच बीएड झालेल्या शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. डीएड शिक्षकाला ६ हजार रुपये तर बीएड शिक्षकाला ८ हजार रुपये वेतन दिले जाणार आहे. यंदाच्या वर्षी मदरशांमधील ९वी किंवा १० चे शिक्षण घेणाऱ्या ६०० विद्यार्थ्यांना वार्षिक प्रत्येकी ४ हजार तर ११ वी किंवा १२ चे शिक्षण घेणाऱ्या ४०० विद्यार्थ्यांना वार्षिक प्रत्येकी ५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

**शासकीय यंत्रणेत अल्पसंख्याक**

विविध शासकीय यंत्रणांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे प्रमाण कमी असल्याने शासकीय नोकऱ्यांमध्ये अल्पसंख्याकांचे प्रमाण वाढावे यासाठी राज्यात भरीव प्रयत्न केले जात आहेत.

**पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण**

पोलीस भरतीच्या पूर्वतयारीसाठी आतापर्यंत १० हजार ८८० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रशिक्षण घेतलेल्या सुमारे १३०० विद्यार्थ्यांची पोलीस दलात निवड झाली आहे.

## विदर्भ, मराठवाड्यातून हज यात्रेसाठी जाणाऱ्या मुस्लीम बांधवांसाठी नागपूर येथे हज हाऊसची उभारणी.

**स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन**

राज्य शासनाची नागरी सेवा प्रशिक्षण केंद्रे तसेच पुण्यातील यशदामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राबवली जात असलेली नागरी सेवा परीक्षा (सिव्हील सर्व्हिस एक्झामिनेशन) पूर्व परीक्षा प्रशिक्षण योजनाही यशस्वी झाली आहे. या योजनेतून प्रशिक्षण घेतलेल्या परवेज नायकवडी (सातारा) या विद्यार्थ्याने यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. या योजनेतून दरवर्षी ५० विद्यार्थ्यांना नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय केंद्र शासनाच्या अखत्यारीतील मुंबई हज समिती येथील आयएएस प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेतलेल्या शकील मेहमूद अन्सारी (शहादा, जि. नंदुरबार) या विद्यार्थ्यानेही यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

एमपीएससीसह, मेडीकल, इंजिनिअरींग, एमबीए आदी व्यावसायिक अभ्यासक्रमात निवडीसाठी, तसेच १०, १२ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठीही राज्य शासनामार्फत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या योजनेतून राज्यातील ४ हजार अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार असून यासाठी ५ कोटी ५० लाख रुपये इतका निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

**आयोगामार्फत अल्पसंख्याकांना न्याय**

अल्पसंख्याकांच्या हितरक्षणासाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग कार्यरत आहे. राज्यात अल्पसंख्याक समाजावर अन्याय झाल्यास हा आयोग पुढाकार घेऊन आवश्यक कार्यवाही करतो. अल्पसंख्याकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात.

अल्पसंख्याक आयोगाला नुकतेच दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे आयोगाला कोणत्याही बाबतीत पुरावा गोळा करणे, शपथेवर पुरावा घेणे, साक्षीदारांना समन्स काढून हजर राहण्यास भाग पाडणे असे अधिकार देण्यात आले आहेत.



**अल्पसंख्याक समाजामधील तरुणांना रोजगारक्षम बनवण्याच्या दृष्टीने राज्यातील ४४ आयटीआय तसेच अल्पसंख्याकबहुल क्षेत्रातील १२ पॉलिटेक्निकमध्ये दुसऱ्या पाळीतील विशेष वर्ग सुरू करण्यात आले. या योजनेचे केंद्र शासनाने कौतुक केले आहे. या योजनेतून राज्यातील ४ हजार ४३४ अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना आयटीआयमध्ये तर १ हजार ९२० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश मिळाला आहे. अल्पसंख्याक मुलींसाठी जिल्हा पातळीवर वसतिगृहे निर्माण करण्यात येणार असून याबाबत कार्यवाही सुरू आहे. यासाठी शासनाने ९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.**

**उर्दू अकादमीचा निधी १ कोटी**

राज्यात उर्दू भाषेचे जतन आणि संवर्धनासाठी महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीचा निधी १ कोटी रुपयांपर्यंत वाढवून उर्दू भाषेच्या जतन आणि संवर्धनास प्रोत्साहन दिले आहे.

**अल्पसंख्याकांना हक्काचे घर**

राज्यात केंद्र शासनाच्या बहुउद्देशीय विकास कार्यक्रमांतर्गत परभणी, बुलढाणा, वाशिम व हिंगोली या ४ अल्पसंख्याकबहुल जिल्ह्यांत ११ हजार ६७० इतक्या अल्पसंख्याक समुदायातील नागरिकांची इंदिरा आवास घरकुलासाठी लाभार्थी म्हणून निश्चिती करण्यात आली आहे. यातील बहुतांश लाभार्थ्यांना निधीचे वाटप झाले आहे. या योजनेंतर्गत या ४ जिल्ह्यात अल्पसंख्याक समुदायातील नागरिकांना इंदिरा आवास घरकूल, अंगणवाडी केंद्रे, मुलींसाठी वसतिगृहे आदी सुविधा पुरवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत आतापर्यंत साधारण १२० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे.

**वस्त्रोद्योगासाठीही प्रोत्साहन**

राज्यात वस्त्रोद्योग क्षेत्रात अल्पसंख्याक समूह मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. अल्पसंख्याक विकास विभागाकडून संपूर्ण राज्यात सूत गिरण्या व यंत्रमाग या दोन्ही योजनेंतर्गत सहकारी संस्थांसाठी ५ टक्के अनुदानाची योजना राबवली जात आहे. तसेच अल्पसंख्याक संस्थांना आधुनिकीकरणासाठी कॅपिटल सबसिडीच्या स्वरूपाने १० टक्के अर्थसाहाय्य योजना राबवली जात आहे. याशिवाय राज्यात यंत्रमागांसाठी सुमारे १ हजार कोटी रुपयांची वीज सवलत दिली जाते. यंत्रमाग उद्योगात अल्पसंख्याक मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात कार्यरत असून त्यांना या वीज सवलत योजनेचा लाभ मिळत आहे.

**इर्शाद ल. बागवान**



# शेतकऱ्यांना लाभ.. रोजगारात वाढ

वस्त्रोद्योग विभागाच्या www.mahatextile.maharashtra.gov.in संकेतस्थळाचे उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री आणि वस्त्रोद्योग मंत्री नसीम खान.

# वस्त्रोद्योग


महाराष्ट्राचा विकास हा फक्त पुणे–मुंबई पट्ट्यापुरता मर्यादित न राहता तो विदर्भ, मराठवाडा, खानदेश या विभागापर्यंतही पोहोचायला हवा. वस्त्रोद्योग धोरणाच्या निर्मितीमध्ये मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पूर्ण मंत्रिमंडळाने स्पष्ट भूमिका घेतली आहे. वस्त्रोद्योग धोरण हे महाराष्ट्राच्या द्रष्टेपणाचे एक महत्त्वाचे उदाहरण ठरले आहे.

या धोरणाचे वर्णन ' समतोल आणि सर्वंकष' या शब्दांत करता येईल. या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू असून नामवंत उद्योजकांनी राज्यात मोठी गुंतवणूक केली आहे.

### २३ हजार लोकांना रोजगार

राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी, विकासाचा असमतोल दूर व्हावा, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव मिळावा तसेच विदर्भ परिसरात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात असा व्यापक उद्देश नवीन वस्त्रोद्योग धोरणाचा आहे.

राज्यात वस्त्रोद्योग धोरणांतर्गत ३८४ वस्त्रोद्योग प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून, यातून सुमारे ४ हजार ६९६ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. तसेच यातून सुमारे २३ हजार ६१० बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. ७ नामवंत उद्योग समूहांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याबाबत इरादापत्र दिले असून यातून साधारण १८०० कोटी रुपयांची नवीन गुंतवणूक होणार आहे. याशिवाय सुमारे तीन ते चार हजार कोटी रुपये इतक्या किंमतीचे प्रस्ताव वित्तीय संस्था व केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी विचाराधीन आहेत.



- राज्यात उत्पादित होणाऱ्या संपूर्ण कापसावर राज्यातच प्रक्रिया व्हावी यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरणाची आखणी.
- या धोरणाच्या माध्यमातून राज्यात येत्या पाच वर्षात सुमारे ४० हजार कोटी रुपयांची नवी गुंतवणूक अपेक्षित.
- या नवीन धोरणामुळे सुमारे ११ लाख नव्या रोजगाराची निर्मिती. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसालाही यामुळे वाढीव भाव मिळेल.



### खाजगी उद्योजकांना सवलती

या धोरणात सहकाराबरोबरच खाजगी उद्योजकांनाही गुंतवणुकीसाठी सवलती देण्यात आल्या आहेत. कापूस उत्पादित होणाऱ्या विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या क्षेत्रात प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी १० टक्के भांडवली सवलत व केंद्र शासनाकडून मिळणारी व्याज सवलत धरून १० ते १२.५ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत असा दुहेरी लाभ दिला जात आहे. उर्वरित महाराष्ट्रात प्रक्रिया उद्योग उभारल्यास व्याज सवलत दिली जाणार आहे. याशिवाय शासनाच्या उद्योग धोरणांतर्गत दिल्या जाणाऱ्या सवलतींचाही संबंधित वस्त्रोद्योग घटकांना लाभ मिळणार आहे.

### कापसापासून कापडापर्यंत

जिनिंग, प्रेसिंग, विव्हिंग, निटिंग, डाईंग, यंत्रमाग, हातमाग, टेक्निकल टेक्स्टाईल, रेडिमेड गारमेंट आदी सर्व प्रकारच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देऊन 'कापसापासून कापडापर्यंत' सर्व प्रक्रिया राज्यातच करून उद्योग आणि रोजगार वाढविणारे हे महत्त्वाकांक्षी धोरण आहे.

**धोरणाची ठळक वैशिष्ट्ये :**

- सर्व सहकारी व खाजगी औद्योगिक घटकांना या धोरणातील सवलतींचा लाभ.
- केंद्र शासनाच्या टफ योजनेशी धोरण संलग्न.
- खाजगी, सहकारी दोन्ही क्षेत्रांसाठी दीर्घ मुदती कर्जावर व्याज सवलत योजना लागू.
- व्याजयोजनेचे ऑनलाइन नियंत्रण.
- विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या कापूस उत्पादक क्षेत्रांना प्राधान्य.
- सहकारी सूत गिरण्यांना व यंत्रमागांना अर्थसाहाय्याची सध्याची पद्धती पूर्वीप्रमाणेच लागू.
- योजनेंतर्गत १० टक्के + २ टक्के असे व्याज अनुदान विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील सर्व सहकारी, खाजगी सूतगिरण्या, यंत्रमाग प्रकल्पांना लागू.
- महाराष्ट्रातील इतर क्षेत्रात योजनेप्रमाणे १० ते १२ टक्के व्याज अनुदान.
- अल्पसंख्याकांसाठी अल्पसंख्याक विकास विभागाकडून संपूर्ण राज्यात सूत गिरण्या व यंत्रमाग या दोन्ही योजनेंतर्गत सहकारी संस्थांसाठी ५ टक्के अनुदान.

## वस्त्रोद्योग प्रकल्पांतून ४ हजार ६९६ कोटींची गुंतवणूक, २३,६१० बेरोजगारांना रोजगार




**वस्त्रोद्योग धोरणाच्या माध्यमातून, जास्तीत जास्त गुंतवणूक महाराष्ट्रातील कापूस उत्पादक क्षेत्रात आणण्यासाठी प्रभावी प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून अहमदाबाद येथे मागच्या वर्षी वस्त्रोद्योजकांची एक परिषद घेऊन त्यात राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणाचे सादरीकरण करण्यात आले. या धोरणाने प्रभावित होऊन गुजरातेतील अनेक नामवंत उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यात स्वारस्य दाखविले आहे. मुंबई येथेही अशी परिषद घेण्यात आली होती.**

➲ विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या कापूस उत्पादक क्षेत्रांतील नवीन सहकारी, खाजगी वस्त्रोद्योग संस्थांना १० टक्के सबसिडी.

➲ अनुसूचित जाती, जमातीसाठी असलेली अर्थसाहाय्याची योजना पूर्वीप्रमाणेच सुरू.

➲ अनुसूचित जाती, जमाती व अल्पसंख्याक यांच्या संस्थांना आधुनिकीकरणासाठी कॅपिटल सबसिडीच्या स्वरूपाने १० टक्के अर्थसाहाय्य.

➲ ही योजना हातमाग संस्था आणि उद्योजकांनासुद्धा लागू.

➲ नवीन येणाऱ्या वस्त्रोद्योगांसाठी लागणारे प्रशिक्षित कामगार व मनुष्यबळ पुरवण्यासाठी आयटीआयमध्ये वस्त्रोद्योगाशी संबंधित नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार.

➲ वस्त्रोद्योग कामगारांसाठी सवलतीच्या दराने विमा योजना राबवण्यात येणार.

➲ वस्त्रोद्योग कामगारांसाठी घरकूल योजना राबवण्यात येणार.

राज्यात उत्पादित होणाऱ्या सुमारे ९२ लाख गाठी कापसापैकी फक्त ४५ लाख गाठी वस्त्रनिर्मितीसाठी वापरल्यास ३ हजार ८२५ दश लक्ष चौरस मीटर कापडाचे उत्पादन होऊ शकेल., राज्यात ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होईल., ११ लाख नवीन लोकांना रोजगार मिळेल.

**योजनेची विशेष उपलब्धी**

➲ कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव.

➲ त्यांच्या मुलाबाळांना रोजगाराची उपलब्धता.

➲ अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्याक व अन्य सर्व समाजाच्या लोकांसाठी आर्थिक स्वावलंबन व उत्कर्षाचे एक नवीन पर्व.

**धोरणाचा लाभ घेऊन महाराष्ट्रात गुंतवणूक केलेले उद्योजक**

सियाराम सिल्क मिल्स लि., रेमंड लि., सिल्कॉन सिंथेटिक्स, रेमंड युको डेनिम प्रा. लि., तिरुपती नॉनवुव्हन प्रा. लि., कपील रेयॉन (इंडिया) प्रा. लि., पी.व्ही.टेक्स्टाईल्स लि., अरविंद डाईंग अँड ब्लिचिंग मिल्स, श्री. दक्षज्योत सिल्क मिल्स प्रा. लि., निर्वाण सिल्क मिल्स प्रा. लि., टोटल टेक्सटाइल सोल्युशन प्रा. लि., सुदर्शन जिन्स प्रा. लि., ध्रुव कॉटेक्स प्रा. लि., मोरारजी टेक्सटाइल लि., हरिप्रिया सिन्टेक्स प्रा. लि., करिश्मा एक्स्पोर्टस्, विठ्ठल कॉर्पोरेशन लि., झिरकॉन कॉटेक्स प्रा. लि., वेल्सवून सिन्टेक्स लि. इत्यादी ३८४ वस्त्रोद्योजकांना वस्त्रोद्योग धोरणातील विविध तरतुदींचा लाभ मिळाला आहे.

..............................................

**अल्पसंख्याक विकास विभागाचे निर्णय**

➲ नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांमधील अल्पसंख्याकबहुल भागांमध्ये पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी १० ते २० लाखांपर्यंत अनुदान देण्याची योजना यशस्वी. २०१२-१३ मध्ये १२६ महापालिका, नगरपालिकांना लाभ. यासाठी १४.४० कोटी रुपये खर्च.

➲ या योजनेची व्याप्ती आता अल्पसंख्याकबहुल ग्रामीण भागापर्यंत. अल्पसंख्याकबहुल ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी १० लाख रुपयांच्या निधीची योजना मंजूर.

➲ यंदा राज्यातील ४४० ग्रामपंचायतींना या योजनेतून प्रत्येकी १० लाख रुपयांचा निधी देण्यात येणार असून यासाठी ४४ कोटी रुपयांची तरतूद.

➲ औरंगाबाद येथे हज हाऊस बांधण्यासाठी मंजुरी. यासाठी निधीची तरतूद आणि जागेची उपलब्धता.

➲ अल्पसंख्याकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन (क्रमांक १८००२२५७८६).

**इर्शाद ल. बागवान**

# उपेक्षेकडून प्रतिष्ठेकडे



हसन मुश्रीफ
मंत्री, कामगार आणि विशेष साहाय्य

राज्यातील संघटित व असंघटित कामगारांची संख्या ५ कोटींपेक्षा अधिक आहे. त्यामध्ये असंघटित कामगारांची संख्या साडेतीन कोटी आहे. सर्व घटकांची मंडळे स्थापन करून कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी शासन कल्याणकारी योजना राबवत आहे. महाराष्ट्र शासनाने बांधकाम कामगार, माथाडी कामगार, सुरक्षा रक्षक व घरेलू कामगार मंडळाची स्थापना करुन त्यांच्यासाठी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुरू केली आहे.

बांधकाम कामगार मंडळ, माथाडी कामगार मंडळ आणि सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत कामगारांच्या ५ वी ते १० वीपर्यंत शिकणाऱ्या मुलामुलींना टॅब्लेट व १० वीच्या पुढे उच्चशिक्षण व व्यवसाय शिक्षण घेत असलेल्या मुलामुलींना लॅपटॉप मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला. नोंदणीकृत प्रत्येक कामगाराच्या दोन मुलांना हा लाभ दिला जाईल. साहित्याचे लवकरात लवकर वितरण केले जाईल. कामगारांच्या मुलांनी शिकून स्पर्धा परिक्षेमध्ये यश मिळवावे, आयएएस, आयपीएस, डॉक्टर, इंजिनीअर व्हावे, यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

### बांधकाम साहित्य खरेदीस साहाय्य

बांधकाम कामगारांना वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागते. त्यांना ऊन, वारा, पाऊस, थंडी, डास, इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांचा हा त्रास कमी करण्यासाठी प्रत्येक बांधकाम कामगारास ५ हजार रुपयांच्या मर्यादेत जेवणाचा डबा (टिफीन), मच्छरदाणी, ब्लँकेट व दोन चादरी हे साहित्य देण्यात येणार आहे.



### घरेलू कामगारांना सन्मानधन

घरेलू कामगार कल्याण मंडळात नोंदणीकृत असलेल्या ५५ वर्षांवरील घरेलू कामगारांना १० हजार रुपये सन्मानधन देण्याचा निर्णय झाला. यासाठी सुमारे ९ कोटी रुपये खर्च होणार आहेत. सध्या याचे वितरण सुरू आहे. १ ऑगस्ट २०१३ रोजी ५५ वर्षे पूर्ण करणारे घरेलू कामगार यासाठी पात्र आहेत. राज्यात सुमारे २ लाख १३ हजार घरेलू कामगार नोंदणीकृत असून त्यापैकी सुमारे ९ हजार १०९ कामगार ५५ वर्षांवरील आहेत.

संबंधित घरेलू कामगाराच्या बँक खात्यावर किंवा धनादेशाद्वारे रक्कम जमा केली जाते.

### बांधकाम कामगारांना विम्याचे संरक्षण

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात जुलै २०१३ अखेर नोंद झालेल्या १ लाख ३३ हजार ७३३ कामगारांना विम्याचे मोफत संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे. या मंडळाच्या नोंदीत असलेल्या सर्व बांधकाम कामगारांचा कुटुंब आरोग्य विमा (मेडिक्लेम) व वैयक्तिक अपघात विमा उतरवण्यात आला आहे.

या सर्व कामगारांचा विमा उतरवण्यासाठी न्यू इंडिया इन्श्युरन्स कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून पहिल्या वर्षाच्या प्रिमिअमची (हप्ता) रक्कम या कंपनीस अदा करण्यात आली आहे. कुटुंब आरोग्य विमा योजनेंतर्गत बांधकाम कामगार आणि त्याच्या कुटुंबाला (पत्नी, २ मुले, आई, वडील) दरवर्षी प्रति कुटुंब २ लाख रुपयांपर्यंतचा मेडिक्लेम मिळेल. यात सर्व दुर्धर आजारांवरील उपचारांचा समावेश आहे.

वैयक्तिक अपघात विमा योजनेंतर्गत सर्व बांधकाम कामगारांचा अपघात विमा उतरविण्यात आला आहे. बांधकाम कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला १ लाख रुपयांची भरपाई मिळेल. जखमी झाल्यास त्याला ५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत भरपाई दिली जाणार आहे. १८ ते ६० वर्षापर्यंतचे नोंदीत बांधकाम कामगार या योजनेसाठी पात्र आहेत.

या दोन्ही विमा योजनांचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगाराला स्वत: प्रिमिअम (हप्ता) भरण्याची गरज नाही. मंडळामार्फत हा प्रिमिअम कंपनीस अदा केला जाणार आहे.

### रोहयो कामगारांची नोंदणी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या पात्र कामगारांची नोंदणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात करण्यात येत आहे. या निर्णयामुळे या मंडळामार्फत राबवल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा लाभ रोहयोवरील पात्र कामगारांनाही मिळत आहे.

- घरेलू कामगार कल्याण मंडळात नोंदणी असलेल्या ५५ वर्षांवरील घरेलू कामगारांना १० हजार रुपये सन्मानधन.
- कुटुंब आरोग्य विमा योजनेंतर्गत बांधकाम कामगाराला दरवर्षी २ लाख रुपयांपर्यंत मेडिक्लेमची सुविधा.
- कामगार कायद्याच्या सुलभीकरणासाठी ऑनलाइन 'कामगार व्यवस्थापन प्रणाली' पद्धती काही जिल्ह्यांमध्ये पथदर्शी तत्त्वावर सुरू.



## राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना २७ जिल्ह्यांमध्ये कार्यरत. १८ लाख कुटुंबांचा समावेश

**विदेशी भाषेच्या शिक्षणाचे वर्ग**

कामगार कल्याण मंडळाद्वारे कामगारांच्या मुलांसाठी इंग्रजी तसेच इतर विदेशी भाषेच्या शिक्षणाचे वर्ग सुरू करण्यात येत आहेत. या मंडळाकडे नोंद झालेल्या लाभार्थ्यांव्यतिरिक्त या योजनेचा लाभ इतर मंडळातील नोंद झालेल्या लाभार्थ्यांच्या पाल्यांनासुद्धा मिळेल. इंग्रजीचे क्लास लहान व मोठ्या मुलांसाठी वेगवेगळे चालवले जातील. याशिवाय जर्मन, फ्रेंच, रशियन व जपानी विदेशी भाषेचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय झाला आहे. राज्य कामगार मंडळ सध्या संगणकाशी संबंधित एमएससआयटी प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवत आहे.

यंत्रमाग कामगारांच्या मंडळासाठी समिती

राज्यातील यंत्रमाग कामगारांचे कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठी समिती नियुक्त केली होती, त्याचा अहवाल तयार झाला आहे. राज्यातील रिक्षाचालक मंडळासाठी समिती नियुक्त केली आहे. ऊसतोड मजूर व शेत मजुरांची मंडळे स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**हॉटेल कामगारांसाठी**

हॉटेलमध्ये काम करणारे कामगार, वर्तमानपत्र विक्रेते व वर्तमानपत्रे घरोघरी जाऊन वाटप करणाऱ्या व्यक्ती, वीडी कामगार, चांदी व सोने गाळणारे कामगार, काचा, फडकी व भंगार गोळा करणाऱ्या व्यक्ती इ. सर्व संबंधित घटकांसाठी मंडळे स्थापन करण्याचा शासनाचा मानस आहे.

**दुकाने, आस्थापनांच्या वेळेमध्ये सूट**

दुकाने, आस्थापना उघडण्याच्या तसेच बंद करण्याच्या वेळेमध्ये सूट मिळवण्याची प्रक्रिया सुटसुटीत करण्यात आली आहे. नवीन तरतुदीनुसार दुकाने किंवा आस्थापना अधिक वेळ उघडी ठेवण्यासाठी महापालिका, कामगार आयुक्त इत्यादींकडे अर्ज करून शासनाची मंजुरी घेण्यापेक्षा आता थेट शासनाकडेच मंजुरीसाठी अर्ज करता येतो.

**महत्त्वपूर्ण निर्णय**

➲ राज्यातील अनेक कंपन्यांच्या व्यवस्थापनासोबत झालेल्या बैठकांमध्ये संप संपुष्टात आणून काम पूर्ववत सुरू ठेवणे, निलंबित कामगारांना पुन्हा कामावर घेणे, कामगारांचे वेतन करार, मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई मंजूर करणे, किमान वेतन दराप्रमाणे वेतन अदा करणे, कामगार कायद्याची अंमलबजावणी.

➲ कामगार विभागाने आपला सर्व कारभार ऑनलाइन करण्याचा निर्णय घेतला आहे. कामगार विभागाचे संकेतस्थळ (www.mahashramm.gov.in) निर्माण करण्यात आले आहे.

➲ कामगार कायद्याच्या अंमलबजावणीचे सुलभीकरण होण्याच्या दृष्टीने 'कामगार व्यवस्थापन प्रणाली' नावाची एक ऑनलाइन पद्धती काही जिल्ह्यांमध्ये पथदर्शी तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे.

➲ कामगार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली बांधकाम कामगार कल्याण मंडळाची स्थापना.

➲ घरेलू कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापना.

➲ माथाडी कामगारांकडून ५० किलोपेक्षा जास्त वजनाची चढ-उतार किंवा हाताळणी करून घेण्यास मज्जाव करणारा निर्णय घेण्यात आला आहे.

➲ विविध दुकाने, आस्थापना, कारखाने, कंपन्या या ठिकाणी कार्यरत सर्व कामगारांचे वेतन बँकेमार्फत किंवा धनादेशाद्वारे देण्याबाबत निर्णय.

➲ राज्यातील बंद पडलेल्या गिरण्या, कंपन्या, कारखाने यांच्या जमीनीची विक्री, विकास किंवा हस्तांतरण करताना तसेच एमआयडीसीतील उद्योगांचे हस्तांतरण किंवा विक्री करताना कामगारांची सर्व देणी अदा करून देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक.

➲ बालकामगार प्रथेच्या निर्मूलनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क




**ग्रामीण भागातील १८ ते ५९ वयोगटातील भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारकांसाठी आम आदमी विमा योजना राबवली जाते. या कुटुंबांना विम्याद्वारे संरक्षण तसेच कुटुंबातील नववी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या दोन मुलांना प्रति विद्यार्थी प्रति महिना १०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेसाठी आवश्यक २०० रुपये इतका विम्याचा हप्ता राज्य व केंद्र शासनामार्फत भरला जातो. त्यामुळे लाभार्थ्यास कोणत्याही प्रकारचा विमा हप्ता भरण्याची गरज पडत नाही. आम आदमी विमा योजनेतून लाभार्थ्यांचा विमा उतरवण्यासाठी शासनाने २०१३-१४ साठी ३४.२९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या योजनेंतर्गत भारतीय आयुर्विमा महामंडळामार्फत आतापर्यंत सुमारे ३६ लाख लाभार्थ्यांचा विमा उतरवण्यात आला असून सुमारे २.४९ लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. आयुर्विमा महामंडळाने १६ हजार ७८६ लाभार्थ्यांचे सुमारे ५३ कोटी रुपयांचे दावे अदा केले आहेत. योजनेच्या लाभासाठी ऑनलाइन नोंदणीकरता खास सॉफ्टवेअरही तयार करण्यात आले आहे.**

फोर्स. दुकाने, कारखान्यांवर धाडी टाकून बालकामगार मुक्त करून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येत आहे.

**निराधार, वृद्ध, अपंग, विधवांना निवृत्ती वेतन**

विशेष साहाय्य विभागामार्फत निराधार, वृद्ध, अपंग, विधवा यांना पेन्शन देण्यात येते. निराधारामध्ये अनाथ मुले, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे लोक, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा, घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या महिला, घटस्फोटित महिला, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला यांचा समावेश आहे.

अविवाहित महिला, तृतीयपंथीय यांचाही समावेश यात आहे. तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कुटुंब प्रमुखाची पत्नी, ३५ वर्षे व त्यावरील अविवाहित महिला, तृतीयपंथीय यांचाही समावेश करण्यात आला आहे.

**काझीचे शपथपत्र ग्राह्य**

मुस्लीम महिलेच्या वास्तव्याच्या परिसरातील मस्जिदमधील काझीने त्या महिलेच्या घटस्फोटासंदर्भात तहसिलदारासमोर दाखल केलेले शपथपत्र योजनेच्या लाभासाठी गृहीत धरले जाईल. किंवा त्या गाव-शहरातील मुस्लीम समाजासाठी धार्मिक कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेने ठराव करून दिल्यास त्या आधारेही संबंधित घटस्फोटित मुस्लीम महिलेस पेन्शन योजनेचा लाभ देण्यात येईल.

प्रति लाभार्थी ६०० रुपये पेन्शन

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना आदी योजनांच्या माध्यमातून या सर्व दुर्बल घटकांना पेन्शन तथा थेट अनुदान दिले जाते. केंद्र व राज्य शासनामार्फत या योजनांमधून प्रति लाभार्थी ६०० रुपये पेन्शन दिली जाते.

मागील चार वर्षांत राज्य शासनाने या योजनांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक होण्यासाठी बायोमेट्रिक पद्धतीचा अवलंब केला आहे. सध्या ही योजना राज्यातील ठाणे, कोल्हापूर, बीड व नांदेड या ४ जिल्ह्यांमध्ये प्रयोगिक तत्त्वावर राबविली जाते.

**मुले असणाऱ्या वृद्धांना लाभ**

इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेमध्ये निकष पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना मुले असली तरी लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पूर्वी मुले असणाऱ्या वृद्ध लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नव्हता.

**१२ जिल्ह्यांमध्ये थेट लाभ योजना**

मुंबई शहर, मुंबई उपनगर, रत्नागिरी, पुणे, जळगाव, नंदुरबार, औरंगाबाद, जालना, नांदेड, अमरावती, वर्धा व गोंदिया या १२ जिल्ह्यांमध्ये केंद्र शासनाच्या डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत १.१९ लाख लाभार्थ्यांचे ६.२४ कोटी रुपये इतके अर्थसाहाय्य थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा करण्यात आले.

लाभार्थ्यांना दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अनुदान देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत.

लाभार्थ्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या वारसाला ३० हजार रुपये, अपघाती मृत्यू झाल्यास वारसाला ७५ हजार रुपये, अपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यास ७५ हजार रुपये, अपघातामुळे दोन्ही डोळे किंवा दोन्ही पाय गमावल्यास ७५ हजार रुपये तसेच अपघातामुळे एक डोळा किंवा एक पाय गमावल्यास ३७ हजार ५०० रुपये आम आदमी विमा योजनेतून दिले जातात.



**विशेष साहाय्य विभागाच्या विविध योजनांसाठी २०१३-१४ मध्ये राज्य शासनामार्फत १ हजार ११३ कोटी रुपयांची तर केंद्र शासनामार्फत १ हजार ५१३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे ६.१८ लाख तर श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेचे १४.५० लाख लाभार्थी आहेत. केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेचे ११.२२ लाख, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेचे २६ हजार २२७ तर इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेचे ५ हजार १८६ इतके लाभार्थी आहेत.**

**राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेतून अर्थसाहाय्य**

विशेष साहाय्य विभागामार्फत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनाही राबवली जात आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमवत्या व्यक्तीचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयास या योजनेतून एक रकमी २० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य दिले जाते. या योजनेसाठी ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**इर्शाद ल. बागवान**

# सुदृढ महाराष्ट्र

# आरोग्य




सुरेश शेट्टी

मंत्री, सार्वजनिक आरोग्य व
कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार


आरोग्यसंपन्न राज्य अशी महाराष्ट्राची देशात ओळख आहे. सामान्य नागरिकाला निरोगी जीवन मिळावे यासाठी आरोग्य विभागामार्फत सातत्याने विविध अभिनव योजना सुरू करून त्यांची यशस्वी अंमलबजावणी केली जात आहे.

वैद्यकीय सेवांबरोबरच आरोग्य विभागातील रिक्त पदांची भरती, बदल्या आणि औषध खरेदीची प्रक्रिया ऑनलाइन करून आरोग्यमंत्री सुरेश शेट्टी यांनी राज्यमंत्री फौजिया खान यांच्या सहकार्याने गेल्या चार वर्षांत विभागाची कार्यपद्धती गतिमान आणि पारदर्शक केली आहे.

**बृहत आराखडा**

२००१ च्या लोकसंख्येवर आधारित, अस्तित्वात असलेल्या विविध आरोग्य संस्थांमधील अंतर आणि जमिनीचा उंच सखलपणा इत्यादी गोष्टी विचारात घेऊन राज्यात नव्याने १ हजार २५७ विविध आरोग्य संस्था स्थापन करणे, अस्तित्वात असलेल्या एकूण ५५ आरोग्य संस्थाचे श्रेणीवर्धन करणे आणि त्यासाठी १ हजार ९१६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांसहित एकूण १९ हजार २३६ पदांची निर्मिती करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे राज्यात आरोग्य यंत्रणांचे जाळे अधिक घट्ट व भक्कम होण्यास मदत होणार आहे.



**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना**

सामान्य नागरिकाला गंभीर आजारांवर महागडे वैद्यकीय उपचार घेणे सुलभ व्हावे यासाठी १ जुलै २०१२ मध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना प्रायोगिक तत्त्वावर गडचिरोली, अमरावती, नांदेड, सोलापूर, धुळे, रायगड, मुंबई उपनगर आणि मुंबई शहर या ८ जिल्ह्यांत कार्यान्वित केली आहे. लवकरच ही योजना राज्यभर राबवण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील (पिवळे शिधापत्रधारक) व दारिद्र्यरेषेवरील परंतु वार्षिक उत्पन्न रुपये १ लाखांपेक्षा कमी (केशरी शिधापत्राधारक) अशा कुटुंबाना वैद्यकीय सेवा उपलब्ध असून या योजनेंतर्गत प्रतिवर्ष प्रतिकुटुंब रुपये १.५० लाख इतके विमा संरक्षण मिळणार आहे. आतापावेतो एक लाखाच्या आसपास रुग्णांनी या योजनेचा फायदा घेतला आहे.


आरोग्य सेवेच्या बळकटीकरणासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याचीही प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे.

गरजू रुग्णांना वेळेवर आणि योग्य दरात रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने जीवन अमृत सेवा योजना, ब्लड ऑन कॉल सुरू करण्यात आली आहे. प्रायोगिक तत्त्वावर राज्यात सातारा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ही योजना सुरू असून मुंबईसह अन्य जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्यात ही योजना सुरू करण्यात येणार आहे.

– गेल्या तीन वर्षात राज्यात सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्र यांच्या तपासणीची धडक मोहीम घेण्यात आली. बेकायदेशीर गर्भपरीक्षण / कायद्याचा तरतुदीचा भंग करणाऱ्या सोनोग्राफी केंद्रावर कार्यवाही करण्यात येऊन या केंद्रांना टाळे लावण्यात आले आहेत. तसेच त्यांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. गर्भपात केंद्र, सोनाग्राफी केंद्रावरील कार्यवाहीची माहिती जनतेसाठी प्रदर्शित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यात सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यासाठी मोहीम राबवण्यात आली. ३० जून २०१३ अखेर एकूण ८,८८१ सोनोग्राफी केंद्रांपैकी ७०१३ केंद्रांची तपासणी करण्यात आली.

राज्यातील समुचित प्राधिकाऱ्यांकडून पीसीपीएनडीटी कायद्याच्या तरतुदींचा भंग करणाऱ्यांविरुद्ध एकूण ४७७ दावे न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत. त्यांपैकी अंतिम केलेल्या २१३ प्रकरणांमध्ये ५४ जणांना शिक्षा झाली. ३८ जणांना सश्रम कारावासाची शिक्षा करण्यात आली. या कायद्यानुसार दोषींना शिक्षा करण्यात यशस्वी ठरलेले महाराष्ट्र हे

- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ एक लाख रुग्णांना
- रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे म्हणून जीवन अमृत सेवा योजना (ब्लड ऑन कॉल)
- आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी महाराष्ट्राला राष्ट्रीयस्तरावरचे चार पुरस्कार



## स्त्री भ्रूण हत्येबाबत तक्रार करण्यासाठी वेबसाइट www.amchimulgi.gov.in

देशातील एकमेव राज्य ठरले आहे.

– स्त्री-भ्रूण हत्येस आळा बसू शकेल, पर्यायाने लिंग गुणोत्तर प्रमाण वाढण्यास मदत होईल यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले जात आहे. या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी, सरकारी वकील, स्वयंसेवी संस्था, डॉक्टर्स आणि माध्यम प्रतिनिधींना या वर्षापासून पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय आरोग्यमंत्र्यांनी घेतला आहे.

– स्त्री-भृण हत्येबाबत तक्रारीसंबंधीच्या शंकेचे निरसन करण्यासाठी १८००२३३४४७५ टोल- फ्री दूरध्वनी उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्त्री भ्रूण हत्येसंदर्भात माहिती देण्याऱ्यास त्या घटनेची सत्यता स्पष्ट झाल्यानंतर रु.२५,०००/- देण्याचे शासनाने घोषित केले आहे.

**आरोग्य सल्ला व संपर्क केंद्र :** रुग्णास चांगल्याप्रकारे व वेळीच योग्य रुग्णसेवा देणे शक्य व्हावे या दृष्टिकोनातून पूर्णवेळ (२४x७) मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी पुणे येथे सल्ला केंद्र सुरु केले आहे. दूरध्वनी क्रमांक १०४ वर कोणत्याही दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधल्यास आरोग्य कार्यक्रम, वैद्यकीय सल्ला तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन व सल्ला आदी माहिती या केंद्रावर २४ तास उपलब्ध आहे.

**आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्प –** कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये जसे आग, पूर, बॉम्बस्फोट, अपघात, हृदयविकार, अवघड बाळंतपणे इत्यादी, आपद्ग्रस्ताना पहिल्या सुवर्ण तासामध्ये (Golden Hour) तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ९३७ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सेवा पुरवठादाराची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

**जननी-शिशू सुरक्षा कार्यक्रम :** या कार्यक्रमात प्रसूतीपूर्व वेदनेच्या काळात व प्रसूतीसाठी निवासस्थानापासून रुग्णालयात, एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात, प्रसूतीनंतर रुग्णालयातून माता व नवजात बालकांना निवासस्थानी पोहोचवण्यासाठी तसेच गंभीर आजारी बाळ (० ते ३० दिवस) यांना निवासस्थान ते रुग्णालय अशी मोफत सेवा उपलब्ध करून देण्यात येते. राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये जननी- शिशू सुरक्षा कार्यक्रमांतर्गत रेफरल ट्रान्सपोर्ट कार्यक्रमांतर्गत सेवा देण्यात येत आहे.

**माहेर योजना –** आदिवासी भागातील अशा गरोदर महिलांच्या सुरक्षित प्रसूतीसाठी ९ जिल्ह्यांतील ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रात 'माहेर घर' बांधले आहे. अशा माहेर घरांमध्ये महिला प्रसूतीपूर्व एक आठवडा राहू शकते.




**शालेय विद्यार्थ्यांची संपूर्ण आरोग्य तपासणी कार्यक्रम, शालेय शिक्षण विभागाच्या समन्वयाने सुरू करण्यात आला आहे. यात राज्यातील जिल्हा परिषदांकडील प्राथमिक शाळा (खाजगी व शासकीय), माध्यमिक शाळा (अनुदानित व विनाअनुदानित), आश्रम शाळा, वस्तिशाळा, पर्यायी शिक्षण केंद्रे, समाजकल्याणमार्फत चालविण्यात येणाऱ्या विशेष शाळा, अपंग विद्यार्थी शाळा इत्यादींचा समावेश आहे. शालेय आरोग्य तपासणी उपक्रमाची दखल केंद्र शासनाने घेऊन ही योजना राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम म्हणून संपूर्ण देशात राबवण्यास सुरूवात केली आहे. या योजनेच्या शुभारंभासाठी महाराष्ट्रातील पालघर तालुक्याची निवड करण्यात आली.**

### मानवी अवयव प्रत्यारोपण

या अधिनियमाची प्रभावी अमंलबजावणी होण्यासाठी आणि दान केलेले अवयव गरजू रुग्णांना त्वरित उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. इच्छुक दात्यांना अवयव दान करण्यासंदर्भात तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर राज्य शासनाने अलीकडेच अवयव दानाबाबची प्रक्रिया सुलभ करण्याबाबत निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर अवयवदान मोहिमेबाबत विशेष जनजागृतीदेखील करण्यात येत आहे. वाहनचालकांना वाहन परवाना देतांना त्यांच्याकडून अवयवदान संमती पत्र भरून घेण्याची मोहीम मुंबईत सुरू करण्यात आली आहे. त्यालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अवयवदानाबाबत जागृती व्हावी यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत. या वर्षी पावसाळी अधिवेशन काळात विधिमंडळ सदस्यांसाठीही अवयदानाबाबत जाणीवजागृती मोहीम राबवण्यात आली.

### दंतशल्य चिकित्सक सेवेचे विस्तारीकरण

दंतक्षय, दाताचे आजार यासंदर्भात दंतशल्य सेवेचे विस्तारीकरण करण्यात आले असून ती ग्रामीण रुग्णांलयापर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यासाठी दंतशल्य चिकित्सेकरिता १ हजार ६३ विविध पदे निर्माण करण्यात आली आहेत.

### स्त्री रुग्णालये

प्रत्येक जिल्हयात १०० खाटांचे स्त्री रुग्णालय सुरु करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

**अजय जाधव**



डॉ. नितीन राऊत
मंत्री, रोजगार हमी आणि जलसंधारण

# परिवर्तनाचे नवे पर्व

गोरगरीब जनतेला सन्मानाने जगता यावे यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत शासनाने ३६५ दिवस म्हणजे वर्षभर कामाची हमी दिली आहे. केंद्र शासनाने केवळ १०० दिवस कामाची दिली. यावरून राज्यातील गोरगरीब जनतेसाठी असलेली शासनाची आस्था स्पष्ट होते.

विभागामार्फत २ हजार पाचशे कोटी रुपयांची कामे या वर्षात करण्याचा संकल्प शासनाने केला आहे. मंत्री डॉ. नितीन राऊत आणि राज्यमंत्री सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाची वाटचाल सुरू आहे. या संकल्प कृतीसाठी रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. राज्यातील गरिबांच्या सर्वांगीण विकासास संजीवनी देणारा विभाग अशी रोजगार हमी विभागाची नवी ओळख निर्माण होऊ लागली आहे.

**सर्वांगीण विकास**

या विभागात जलसंधारण, जलसंवर्धन , जलसिंचन, रस्ते, दुष्काळ प्रतिबंधक कामे अगदी वनीकरण व वृक्ष लागवड त्याचप्रमाणे वैयक्तिक लाभाची कामे मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. एवढेच नव्हे तर राजीव गांधी सेवा केंद्रदेखील आहेत. नक्षलग्रस्त जिल्हा व गावपातळीवर खेळाची मैदाने तयार करण्याची कामे या योजनेतून साकारली गेली. केंद्र शासनाशी सल्लामसलत करून राज्य शासनाने ठरवलेली कामेही यात आहेत. गावांचा सर्वांगीण भौतिक विकास याद्वारे साकारण्यात येत आहे.



पारंपरिक कामांसोबतच राज्याच्या विविध भागांचा भौगोलिक, सामाजिक विचार करून काही नवीन कामे यात समाविष्ट करण्यात आली. कृषी संदर्भातील नाडेप कंपोस्टिंग, गांडूळखत तयार करणे, जैविक खत तयार करणे अशी वैयक्तिक लाभाची कामे आहेत. पशुधन संदर्भातील कामांमध्ये प्रामुख्याने कुक्कुटपालनासाठी शेड, शेळ्याबकऱ्यांसाठी शेड, कोबा करणे, गुरांकरिता युरिन टँक, चारा साठवण्याची व्यवस्था, अझोलापूरक पशुखाद्य देण्याची व्यवस्था अशी वैयक्तिक लाभाची कामे आहेत. मत्स्यव्यवसाय व अनुषंगिक कामांमध्ये सार्वजनिक जमिनीवर मत्स्यव्यवसाय, मासे सुकवण्यासाठी क्षेत्र आणि बेल्ट व्हेजिटेशन ही कामे आहेत.

ग्राम स्वच्छता व पिण्याच्या पाण्यासंबंधातील कामांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी साठवण खड्डे, पुनर्भरण खड्डे या कामांचा समावेश आहे. ग्रामीणस्वच्छते संदर्भात वैयक्तिक घरगुती शौचालय, अंगणवाडी व शाळेतील शौचालय व घनकचरा व्यवस्थापन या कामांचा समावेश नवीन कामांमध्ये मे २०१२ पासून करण्यात आला आहे.

पंचायत युवा क्रीडा आणि खेळ अभियानांतर्गत खेळाची मैदाने तयार करण्याचे काम समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे राज्यात या पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे महत्त्वाचे कार्य 'रोजगार हमी योजनेतून' मोठ्या प्रमाणात झाले.

## रोजगार हमी योजना

**सकारात्मक बदल**

या योजनेमुळे (नरेगा) राज्याच्या विविध भागात सकारात्मक बदल घडले आहेत. तेथील गरिबांचे सामाजिक जीवन, आर्थिक स्थैर्य, आरोग्य उंचावले आहे. मेळघाटसारख्या भागातील स्थलांतर रोखणेही यशस्वी झाले.

**पारदर्शकता आणली**

या योजनेला गती देण्यासाठी पारदर्शकता व अचूकता महत्त्वाची वाटली त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृतीही सुरू झाली. त्याचा महत्त्वाचा भाग म्हणजे रोजगार हमीवरील मजुरांची नोंदणी आणि जॉब कार्ड, त्यांना दिले जाणारे वेतन हे बँक अथवा पोस्टाद्वारे देणे, साप्ताहिक वेतन देणे, मशिनरी व कॉन्ट्रॅक्टरला बंदी, हजेरी पटांची पडताळणी आणि सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता होय.

**सामाजिक अंकेक्षण**

योजनेच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता व सामाजिक उत्तरदायित्व राखण्यासाठी सामाजिक अंकेक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या योजनेत प्रत्यक्ष काम करणारे मजूर तसेच गावातील इतर नागरिक हे शासकीय यंत्रणेच्या सहभागाशिवाय स्वतंत्ररीत्या गावात झालेल्या कामांची तपासणी करतात. थोडक्यात योजनेतील लाभार्थीच स्वत: त्या

- रोजगार हमीच्या कामांचा आवाका पूर्वी ३०० कोटींचा होता तो आता २,५०० कोटी म्हणजे आठपटीने वाढला.
- योजनेंतर्गत २०१३-१४ या वर्षात राज्यात ७.९५ लाख कुटुंबांना कामे पुरवण्यात येऊन २८५.०२ लाख मनुष्यदिवस निर्मिती.
- पुढील वर्षी ३ हजार कोटींच्या कामांचे नियोजन.



# रोहयोचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी स्वतंत्र सामाजिक अंकेक्षण संचालनालय.

योजनेचे मूल्यमापन करतात.

गावपातळीवर झालेल्या कामांचे प्रत्येक सहा महिन्यांतून एक वेळा सामजिक अंकेक्षण करणे केंद्र शासनाने अनिवार्य केले आहे. ही नवीन संकल्पना असल्यामुळे यासाठी केंद्र शासनाने हैदराबाद येथे कार्यशाळा आयोजित केली होती. त्या कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींच्या मदतीने महाराष्ट्रात सामाजिक अंकेक्षणाचा पथदर्शी प्रकल्प पहिल्या टप्प्यात कोकण विभागातील रायगड जिल्ह्याच्या मोखाडा तालुक्यातील व रायगड जिल्ह्याच्या रोहा तालुक्यातील एकूण पंधरा ग्रामपंचायती क्षेत्राच्या ४१ गावात,



या वर्षी राज्यावर दुष्काळाचे मोठे सावट आले होते. शासनाने विविध माध्यमांद्वारे दुष्काळाचा मुकाबला करण्याचा प्रयत्न केला. त्यात प्रामुख्याने रोजगार हमी योजना विभागाचे मोठे योगदान आहे. योजनेने दुष्काळग्रस्त लोकांना नवजीवन दिले. कृषी संदर्भातील कामे (वैयक्तिक लाभार्थी) पशुसंवर्धनातील कामे (वैयक्तिक लाभार्थी), मत्स्यव्यवसायातील आनुषंगिक कामे, ग्रामक्षेत्रात पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील कामे इत्यादी कामे नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत.

अमरावती विभागातील अमरावती जिल्ह्याच्या धारणी तालुक्यातील सहा ग्रामपंचायती क्षेत्राच्या १३ गावात, पुणे विभागातील सोलापूर जिल्ह्याच्या सांगोला तालुक्यातील एका ग्रामपंचायती क्षेत्राच्या १० गावात, नाशिक विभागातील नंदुरबार जिल्ह्याच्या अक्कलकुवा तालुक्यातील पाच ग्रामपंचायती क्षेत्राच्या १० गावात, औरंगाबाद विभागातील नांदेड जिल्ह्याच्या भोकर तालुक्यातील पाच ग्रामपंचायती क्षेत्राच्या सात गावात, नागपूर विभागातील गोंदिया, वर्धा, नागपूर जिल्ह्याच्या गोंदिया, देवळी व समुद्रपूल आणि काटोल तालुक्यातील २१ ग्रामपंचायती क्षेत्राच्या २३ गावात हे सामाजिक अंकेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. त्याचा अहवाल केंद्र व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला आहे.

सामाजिक अंकेक्षणाची ही प्रक्रिया सर्व जिल्ह्यांमध्ये राबवणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे ही प्रकिया गतिमान करण्यासाठी राज्यात स्वतंत्र सामाजिक अंकेक्षण संचालनालय स्थापन करण्यास राज्य मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार कार्यालय स्थापन करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. पहिल्या टप्प्यात धुळे जिल्ह्यातील चार तालुक्यात सामाजिक अंकेक्षण सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्या अनुभवाच्या आधारे नंतर ही प्रक्रिया संपूर्ण राज्यात सुरू करण्यात येईल.

**नवे मानदंड**

➲ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ३ ऑक्टोबर २०१३ पर्यंत एकूण ७०.५४ लाख कुटुंबांना जॉबकार्ड वितरित करण्यात आले. यापैकी २३.१२ लाख इतक्या जॉबकार्डांचे नूतनीकरण करण्यात आले आहे.

➲ नरेगा योजनेवर २०१२-१३ या वर्षात राज्यात २,१८७.७२ कोटी रुपये इतका खर्च झाला असून २०१३-१४ या वर्षात (३ ऑक्टोबर २०१३पर्यंत) ६७४.७७ कोटी रुपये इतका खर्च झाला आहे.

➲ योजनेंतर्गत२०१२-१३ या वर्षात राज्यात १६.२१ लाख कुटुंबांना कामे पुरवण्यात आली. त्यातून ८७०.२२ लाख मनुष्यदिवस निर्मिती झाली.

➲ योजनेअंतर्गत सन २०१३-१४ (३ ऑक्टोबर २०१३ पर्यंत) या वर्षात राज्यात ७.९५ लाख कुटुंबांना कामे पुरवली. त्यातून २८५.०२ लाख मनुष्यदिवस निर्मिती झाली.

**ठळक वैशिष्ट्ये**

➲ राज्यातील १८ वर्षावरील प्रौढ व्यक्तींना वर्षभर अकुशल रोजगाराची हमी.

➲ कामाची व्याप्ती पूर्वीच्या ३४५ कोटी (२०१०-२०१२) वरून २५०० कोटी (२०१३-२०१६) पर्यंत वाढवली.

➲ नरेगा (NREGA) साठी नागपूर येथे स्वतंत्र आयुक्तालय उभारले असून त्यांच्यामार्फत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

➲ सामाजिक सर्वेक्षणास सुरुवात.

**प्रस्तावित कार्यक्रम (नियोजित)**

➲ भविष्यात या योजनेंतर्गत ३००० कोटी रुपयांची कामे एका वर्षात करण्याचा मानस असून त्यामुळे लाखो लोकांना त्याचा लाभ मिळेल.

**आकड्यांपलीकडचे परिवर्तन**

राज्यातील गरीब जनतेला सन्मानाने जगता येईल अशी ही योजना आहे. उपरोक्त कामांचा आवाका व विस्तार पाहता या योजनेने राज्याच्या विकासात निश्चितच महत्त्वाचा वाटा उचलला आहे. भविष्यात या योजनेमुळे झालेल्या विकास कामाचा आढावा घेताना केवळ काम आणि पैसा याचीच आकडेवारी विचारात न घेता योजनेमुळे ग्रामीण भागातील गरिबांत झालेले सामाजिक, आर्थिक परिवर्तन विचारात घ्यावे लागेल.

**राजू पाटोदकर**



# क्रीडा संस्कृतीची नवी दिशा

पद्माकर वळवी
मंत्री, क्रीडा व युवक कल्याण

## क्रीडा व युवक कल्याण

देशात क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. खेळाडू हा केंद्रबिंदू मानून सन १९९६ मध्ये सर्वप्रथम क्रीडा धोरण तयार करण्यात आले. या क्रीडा धोरणाची फलश्रुती व क्रीडा विकासाची दिशा लक्षात घेऊन राज्याचे नवीन क्रीडा धोरण १४ जून, २०१२ रोजी जाहीर करण्यात आले.

क्रीडा धोरणातंर्गत क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन करण्यासाठी गाव तेथे क्रीडागंण व व्यायामशाळा, क्रीडापीठ व क्रीडा प्रबोधिनी संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य क्रीडा विकास निधीची स्थापना, क्रीडा विकासासाठी विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर क्रीडा संकुल उभारून तेथे क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे तसेच गाव पातळीवर खेळाच्या किमान सुविधा उपलब्ध करून देण्याचे धोरण राबवण्यात येत आहे. उदयोन्मुख व प्रतिभावान खेळाडू घडविणे, बालकांमध्ये बालवयातच खेळाची आवड निर्माण करणे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करणे हे क्रीडा धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. क्रीडा सुविधांबरोबरच अद्ययावत तंत्रज्ञान आणि त्या अनुरूप प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची उपाययोजना क्रीडा धोरणात अंतर्भूत आहे.

### पायाभूत क्रीडा सुविधा

खेळाडूंकरिता ग्रामीण व नागरी भागात राज्य आणि राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यात विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडासंकुलाची स्थापना करण्यात येत आहे. तालुका क्रीडा संकुलासाठी रु.१ कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी रु.८ कोटी व विभागीय क्रीडा संकुलासाठी रु.२४ कोटीची तरतूद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

### पंचायत युवा, क्रीडा व खेळ अभियान

केंद्र शासनाच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यामध्ये पंचायत युवा, क्रीडा व खेळ अभियान हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात येत आहे. या अभियानाद्वारे ग्रामीण भागात क्रीडाविषयक उपक्रम राबवून तसेच खेळाच्या किमान सुविधा विकसित करून क्रीडा जागृती करण्याचे शासनाचे धोरण आहे.

बांधकाम सुरू असलेल्या तालुका क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल व विभागीय क्रीडा संकुलाची कामे विविध कालमर्यादेत पूर्ण करणे हे भविष्यकाळातील क्रीडा विभागाचे उद्दिष्ट आहे.

राज्यात क्रीडा व खेळांच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या एकविध खेळाच्या जिल्हा, राज्य संघटना, क्रीडा संस्था, क्रीडा मंडळे तसेच इतर कार्यक्रमाबरोबर क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून आर्थिक साहाय्य देण्यात येते.

क्रीडापीठ संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणी अंतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी साहाय्यक अनुदान उपलब्ध करून देणे, खेळाडूंच्या कामगिरीत वाढ करण्यासाठी अत्याधुनिक साहित्य, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन मिळविणे यासाठी मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार रु.५.०० लक्ष मर्यादेत अर्थसाहाय्य देण्यात येते.

- गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण ठेवण्याचा निर्णय.
- खेळाडूंकरिता ग्रामीण व नागरी भागात राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यात विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुले.
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडू घडवण्यासाठी राज्यक्रीडा विकास निधीची स्थापना



### खेळाडूंसाठी नोकरीत आरक्षण

गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच गट अ गट ब या सेवेत खेळाडूंना थेट नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार अनेक खेळाडूंना थेट नियुक्ती दिली आहे. इ. १० व १२ वी तील अनुत्तीर्ण खेळाडूंना त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी २५ विशेष गुण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा फायदा राज्यातील अनेक विद्यार्थ्यांना झाला आहे.

### क्रीडा संकुले

क्रीडा विभागाची महत्त्वांकाक्षी योजना म्हणजेच क्रीडा संकुल बांधकाम योजना आहे.

### खेळाडूंसाठी अत्याधुनिक सुविधा

क्रीडा सुविधा विकसित करणारे महाराष्ट्र देशातील अग्रक्रमावरील राज्य असून विभाग व



## खेळाडूंची शिष्यवृत्ती, वयोवृद्ध खेळाडू आणि महाराष्ट्र केसरी योजनेच्या मानधनात वाढ.

तालुकास्तरावर अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. या सुविधांचा जिल्ह्यातील खेळाडूंना फायदा होत असून त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षणाठी राज्यात १५३ क्रीडा मार्गदर्शकांची पदे मंजूर करण्यात आली आहेत.

**खेळाडूंचा गौरव**

राज्याच्या क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती तसेच खेळाडू यांचा यथोचित गौरव करण्यासाठी शासनातर्फे खालील क्रीडा पुरस्कार दिले जातात.

१. शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, २. क्रीडा मार्गदर्शकांसाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू, संघटक, कायकर्ते), ४. राज्य साहसी क्रीडा पुरस्कार, ५. एकलव्य क्रीडा पुरस्कार, ६. महिला संघटक / कायकर्ते यांस जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, ७. जिल्हा क्रीडा पुरस्कार.

**राज्यक्रीडा विकास निधी**

क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन परिणामकारक करण्याच्या दृष्टीने राज्यात क्रीडा सुविधा निर्माण करणे, दर्जेदार खेळाडूंना परदेशी क्रीडा मार्गदर्शकांची सेवा उपलब्ध करून देणे, नावाजलेल्या खेळाडूंना अर्थसाहाय्य करणे, काही गुणवान खेळाडू संघ दत्तक घेऊन त्यांच्याद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडू घडवण्यासाठी राज्य क्रीडा विकास निधीची स्थापना करण्यात आली आहे. या निधीतून आतापर्यन्त राज्यातील प्रतिभावान व उदयोन्मुख खेळाडूंना अर्थसाहाय्य देण्यात आले आहे.

शिक्षण पद्धतीचा एक घटक म्हणून राष्ट्रीय छात्र सेना हा केंद्र सरकार तथा राज्यसरकार यांना जोडणारा एक जबाबदार दुवा म्हणून कार्य करते.

माध्यमिक शाळांच्या इ. ८, ९, १० वी. साठी बालवीर व वीरबाला हा ऐच्छिक विषय म्हणून सुरू आहे. बालवीर व वीरबाला ही महाराष्ट्र स्काऊट व गाईडस्, मुंबई या संस्थेमार्फत राबवली जाते. मुलामुलींच्या चारित्र्याचा तसेच त्यांच्या शारीरिक, मानसिक, नैतिक व आध्यात्मिक शक्तीचा विकास करणे व समाजासाठी त्यांच्या सेवेचा उपयोग व्हावा यासाठी चांगले नागरिक घडवणे हे महाराष्ट्र स्काऊट व गाईडस् यांचे प्रमुख ध्येय आहे.

**युवा धोरण २०१२**

राज्यातील सामाजिक परिस्थिती, भौगोलिक वैविध्यता तसेच स्थानिक स्थरावर उपलब्ध व विकसित होऊ शकणाऱ्या संधी व शाश्वत विकास लक्षात घेऊन शासनाने युवा धोरण २०१२ तयार केले आहे. यात प्रामुख्याने युवा प्रशिक्षण केंद्र, जिल्हा व राज्यस्तरावर युवा पुरस्कार, युवा वसतिगृह, युवा आदान-प्रदान कार्यक्रम, सुविधा केंद्र उभारणी अशा अनेक हितावह योजना या धोरणद्वारे राबवण्यात येणार आहेत.

केंद्र शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र शासन व भारतीय ॲथेलॅटिक्स महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३ ते ७ जुलै, २०१३ या कालावधीत २० व्या एशियन अजिंक्यपद मैदान स्पर्धांचे आयोजन शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले. या स्पर्धेत आशिया खंडातील ४३ देशांच्या खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी भरघोस यश संपादन करून एकूण १७ पदके प्राप्त केली. आजतागायत झालेल्या आशिया स्पर्धेत यावेळी भारताची कामगिरी उंचावली आहे. महाराष्ट्र शासनाने अल्प कालावधीमध्ये २० व्या एशियन अजिंक्यपद स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे तसेच भारताचे नाव क्रीडाजगतात जागतिक स्तरावर उंचावले आहे.

**राहुल भालेराव**



**राज्यातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू तयार व्हावेत यासाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील खेळ, परंपरा, उपलब्ध क्रीडा सुविधा व अंत:सामर्थ्य यांचा सारासार विचार करून पुणे, कोल्हापूर, नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर, गडचिरोली, अकोला, औरंगाबाद, प्रवरानगर (जि.अहमदनगर) व सांगली अशा ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्यात आल्या आहेत. या सर्व प्रबोधिनींवर देखरेख ठेवणारी तसेच उच्चतम दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण देणारी मध्यवर्ती क्रीडा संस्था शिवछत्रपती क्रीडानगरी बालेवाडी, पुणे येथे कार्यरत आहे. यासाठी महाराष्ट्रातील ८ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमुलींची निवड भारतीय क्रीडा प्राधिकरणाने संशोधित केलेल्या निवड चाचण्याद्वारे (बॅटरी ऑफ टेस्ट) करण्यात येते. अशा खेळाडूंना संबंधित खेळाचे विशेष प्रशिक्षण व शालेय शिक्षणाची सुविधा शासनाच्या संपूर्ण खर्चाने उपलब्ध करून देण्यात येते.**



# महिला विकासाचा जाहीरनामा


वर्षा गायकवाड
मंत्री, महिला व बाल विकास


## महिला व बालकल्याण

महिलांच्या विकासाला पूर्ण संधी मिळाली तर ५० टक्के मनुष्यबळ प्रत्यक्ष विकासकामासाठी उपलब्ध होणार आहे. ही बाब गृहीत धरून महिलांचे सबळीकरण, सक्षमीकरण, त्यांच्यावर होणारे अन्याय - अत्याचार निवारण महत्त्वाचे ठरते. समाजात महिलांना प्रतिष्ठेची, समतेची व सन्मानाची वागणूक यासाठी तिसऱ्या महिला धोरणाचा मसूदा शासनाने जनतेच्या अवलोकनार्थ ठेवला आहे. तिसऱ्या महिला धोरणाचे वैशिष्ट्य असे की, तृतीयपंथी आणि जोगते या उपेक्षित घटकांसाठी त्यात विशेष अध्यायाचा समावेश करण्यात आला आहे. त्यांच्यासाठी कल्याणकारी मंडळ, शिक्षण, आरोग्य व रोजगार यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दुसरा घटक हा बालकांचा आहे. बालकांच्या विकासातून राज्य आणि देश यांचा विकासाचा पाया घातला जातो. त्यासाठी एकात्मिक बाल विकास (आयसीडीएस), कुपोषण निर्मूलनासाठी राजमाता माता-बाल आरोग्य व पोषण मिशनची पुनर्रचना शासनाने केली आहे. बालकांच्या हक्कांचे संरक्षण व विकास हे मुद्दे लक्षात घेवून दुसरे बाल धोरणही अंतिम टप्प्यात आहे.

या सर्वच बाबींचा विचार करून गेल्या चार वर्षात महिला व बालकांच्या विकासासाठी शासनाने जे महत्त्वाचे निर्णय घेवून अंमलबजावणी सुरू केली आहे.

महिला व बालकांवरील वाढते लैंगिक अत्याचार ही बाब शरमेची आहे. पण गुन्हेगारांना कठोर शासन आणि पीडितांचे पुनर्वसन या दोन्ही बाजूंवर शासनाचे प्रयत्न सुरू असून महिलांचा सन्मान व प्रतिष्ठा जपण्याबरोबरच त्यांच्यावर अन्याय होणार नाही आणि त्यांना मुक्तपणे त्यांच्या क्षमतांचा विकास करता येईल, असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.

विकृत मानसिकतेला आळा घालण्याबरोबरच बलात्कारास बळी पडलेल्या महिला, लैंगिक अत्याचारास बळी पडलेली बालके आणि ॲसिड हल्ल्यात आत्मविश्वास गमावून बसलेल्या तरुणी यांना पुन्हा त्यांचा आत्मविश्वास, प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी शासन कणखरपणे पीडितांच्या पाठीशी उभे आहे. यासाठी शासनाने 'मनाधैर्य'नावाची योजना २ ऑक्टोबरपासून राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

'सुकन्या' ही योजना येत्या जानेवारीपासून राज्यात सुरू केली जाणार असून त्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुलींच्या जन्मवर्षात शासन २१,२०० रुपयांचा विमा उतरवून वयाच्या १८ वर्षाला त्यांना रु.१ लाख रुपये देणार आहे. यातून बालविवाहासारखे गैरप्रकार रोखले जातील त्याचबरोबर मुलगी कुटुंबाचा आधार बनणार आहे. कुटुंबप्रमुखाचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रु.३०,०००, अपघातामुळे मृत्यू वा कायमचे अपंगत्व आल्यास रु.७५,००० आणि दोन डोळे अथवा एक डोळा व एक अवयव अपघातामुळे निकामी झाल्यास रु.७५,००० आणि एक डोळा वा एक अवयव निकामी झाल्यास रु.३७,५०० इतकी रक्कम दिली जाणार आहे. त्यामुळे मुलींकडे पाहण्याचा समाजातील दृष्टिकोन सकारात्मक होईल यात शंका नाही.

स्त्रियांना तहसिलदार, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त ते महिला व बाल विकास मंत्री यांच्या दरबारात प्रत्यक्षात जाऊन दाद मागता यावी यासाठी संपूर्ण राज्यात महिला लोकशाही दिनाचे आयोजन केले जात आहे. तिसऱ्या महिला धोरणानुसार ही योजना राबवण्यात येत आहे.

अलीकडील काळात कुपोषण, बालमृत्यू हे चिंतेचे विषय ठरले आहेत ही बाब विचारात घेता १२ नोव्हेंबर, २०१० ला राजमाता जिजाऊ माता-बाल, आरोग्य व पोषणामिशन पुनर्रचना करण्यात आली. या मिशनद्वारे सर्व ग्रामीण, आदिवासी, शहरी, एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पांतर्गत हे मिशन पुढील ५ वर्ष चालू ठेवण्यात आले आहेत. ३३ जिल्ह्यात हा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी पहिल्या टप्प्यात रु.

- ब्रूस लीच्या मुलीकडून मुलींच्या मानसिक व शारीरिक क्षमतेसाठी प्रशिक्षण.
- गरीब कुटुंबातील ५० मुलींना आयआयटीत प्रवेश मिळावा म्हणून आयआयटीएन-पेस योजनेस प्रारंभ.
- बालगृहांची मान्यता तसेच नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात पाळावयाचे शिष्टाचार
- महिलांच्या तक्रारींसाठी १०५ समुपदेशन केंद्रांना मान्यता.
- बालवाड्यांमधून मातृभाषेचे शिक्षण देण्याचा निर्णय





२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. सबला योजनेच्या माध्यमातून ११ ते १८ वर्ष वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी पोषण आहार, मुलींना औपचारिक/अनौपचारिक शिक्षण देऊन आरोग्य व जीवन कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. ही योजना ११ जिल्ह्यात राबविली जात असून २०७ प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. मुलींच्या प्रशिक्षणासाठी रु.७.८६ कोटी व आहारासाठी रु.१४२ कोटी खर्च करण्यात येत आहेत. अंगणवाडीमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त अल्पसंख्याक समाजाची मुले असल्यास त्यांना मराठीबरोबर उर्दू व हिंदी भाषेतही शिक्षण देण्याचा निर्णय १८ मे २०११ ला विभागाने घेतला आहे.

■ पूरक पोषण आहार आणि घरपोच आहाराच्या दरात १ रुपयाने वाढ. (२६ सप्टेंबर व २९ ऑक्टोबर २०११.)

■ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम २००६. दि.२६ ऑक्टोबर, २०१२ पासून अंमल सुरू. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी संरक्षण अधिकाऱ्यांची ३० पदांची भरती.

■ कुपोषण निर्मूलनासाठी राजमाता जिजाऊ कुपोषण मुक्त ग्राम पुरस्कार योजना ३० मे, २०१२ पासून ३३ जिल्ह्यात राबवण्याचा निर्णय. अभियानाद्वारे कुपोषणमुक्त होणाऱ्या गावांना पुरस्कार देऊन या कुपोषणमुक्ती कार्यक्रमास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न.



**महिला व बालकांवरील वाढते लैंगिक अत्याचार ही बाब लाजिरवाणी आहे. पण गुन्हेगारांना कठोर शासन आणि पीडितांचे पुनर्वसन या दोन्ही बाजूंवर शासनाचे प्रयत्न सुरु असून महिलांना सन्मान, प्रतिष्ठा जपण्याबरोबरच त्यांच्यावर अन्याय होणार नाही आणि त्यांना मुक्तपणे त्यांच्या क्षमतांचा विकास करता येईल असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.**

गेल्या चार वर्षात महिला व बाल विकास विभागाने अनेक निर्णय घेतले आहेत. यातील काही असे.

■ एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, अंमलबजावणी व संनियंत्रण समितीच्या भरारी पथकाची स्थापना.

■ शासकीय व स्वयंसेवी संस्था संचालित बालगृहात किमान ५ टक्के बाल कामगारांना प्रवेश. (१९ सप्टेंबर, २०११)

■ शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शन सूचनांनुसार महिलांच्या तक्रार निवारणासाठी समित्यांची स्थापना. (७ ऑगस्ट, २०१२.)

■ खाजगी क्षेत्रात महिलांची लैंगिक सतावणूक होऊ नये म्हणून महिलांच्या तक्रारी निवारण्यासाठी यंत्रणा तयार करण्याची कामगार आयुक्तांना सूचना.

■ नाशिक जिल्ह्यातील ६०० अंगणवाडी केंद्राचे बांधकाम Prefabricated strncture Technology चा वापर करण्यास प्रशासकीय मान्यता. (२५ सप्टेंबर,२०१२.)

■ महिला निवासी संस्था तपासणी करिता समिती स्थापन (५ ऑक्टोबर, २०१२.)

■ अंगणवाड्यांमधील आहाराची महिन्यातून किमान एकदा तपासणी करण्यासाठी माता समितीची स्थापना (३१ ऑक्टोबर, २०१२.)

■ अनाथ, निराधार मुलांमध्ये सांघिक भावना निर्माण करण्यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सवास मान्यता, (४ डिसेंबर, २०१२.)

■ अंगणवाडी सेविका, मदतनीस व यांच्या मानधनात वाढ व २०१२-१३ वितीय वर्षाकरिता भाऊबीज रु.१०००.( १७ नोव्हेंबर, २०१२.)

■ स्तनांच्या कर्करोगांसंबंधी महिला जागृतीसाठी पिंकथॅन इंटरनॅशनलच्या १० कि.मी. मुंबई दौडसाठी शासनातर्फे अनुदान, (१६ डिसेंबर, २०१२.)

■ ३ ते १२ जानेवारी, २०१३ या कालावधीत राजमाता जिजाऊ आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जाणीव जागृती अभियान. त्याचप्रमाणे महिला अत्याचार विरोधी सार्वजनिक गणेश मंडळांनी सजावट करून जाणीव जागृती करण्यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर पुरस्कार.

महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, बालहक्क संरक्षण आयोग या माध्यमातून महिला व मुलांसाठी काम सुरूच आहे. त्याचप्रमाणे, देवदासींचे पुनर्वसन, अनाथ मुलांचे पुनर्वसन, केंद्रीय महिला व बालकांसाठी असणाऱ्या योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. उज्ज्वला योजना, सल्ला योजना, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना, सबला योजना, इंदिरा गांधी मातृत्वसहभोग योजना; शुभमंगल सामूहिक व नोंदणीकृत विवाह योजना आदि योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत.

आकाश जगधने



# गतिमान बदलांचा कालखंड

मधुकरराव चव्हाण
मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय

**पशुसंवर्धन**
**दुग्धव्यवसाय मत्स्यव्यवसाय**

पशुसंवर्धन, दुग्ध विकास आणि मत्स्य व्यवसाय विभाग हा ग्रामीण भागातील पशुपालक, दुधउत्पादक शेतकरी आणि मत्स्य व्यवसाय करणारे बांधव यांच्यासाठी स्वयंरोजगार पुरवणारा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाने दूध व्यवसायाच्या जोडधंद्याने शेतकऱ्यांना दुष्काळात जगण्याची ताकद पुरवली आहे. पशुधन ही शेतकऱ्यांची संपत्ती असून, तिचे संरक्षण करण्यासाठी दर्जेदार पुशवैद्यक, पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारती, छावण्यांमध्ये जनावरांच्या आरोग्याची देखभाल महत्त्वाची ठरते. त्यासाठी गेल्या चार वर्षांत पशुधन विकास अधिकारी यांची रिक्त पदे भरणे आणि पशु वैद्यकीय दवाखान्यांच्या इमारती बांधणे या बाबींना प्राधान्य देण्यात आले.

मत्स्यव्यवसायासाठी सागरी तटावर बंदर व जेट्टी उभारणे व नागरी क्षेत्रामध्ये मासळी विक्रीसाठी मासळी बाजार उभारणे असे मूलभूत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, महिला, दारिद्र्यरेषेखालील व अनुसूचित जाती- जमाती व महिला गट इत्यादी लाभार्थ्यांकरिता उत्पन्नाचे स्रोत मिळाले.

### सहा दुधाळ जनावरांचे वाटप

सुशिक्षित बेराजगार, शेतकरी, महिला, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे, अनुसूचित जाती व जमातीचे घटक इत्यादी घटकांना निश्चित उत्पन्नाचे साधन मिळावे व ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सहा दुधाळ जनावरांचे वाटप, हा उपक्रम जुलै २०११ मध्ये राबवण्यात आला. या योजनेत सहा जनावरे प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना दिली जात आहे. त्यांना लागणारा गोठा, चारा कटाई यंत्र, पशुखाद्य, साठवणूक, विमा इत्यादींची प्रकल्प किंमत ही रू. ३ लाख, ३५ हजार १८४ आहे. त्यासाठी शासन सर्वसाधारण लाभार्थ्यांस ५० टक्के व अनुसूचित जाती व जमाती या घटकातील लाभार्थ्यांस ७५ टक्के इतके अनुदान देत आहे. २०११-१२ मध्ये १,५०३ व २०१२-१३ मध्ये १,३०२ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला. २०१२-१३ मध्ये ही योजना दूध उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण नसलेल्या जिल्ह्यांमध्ये राबवण्यात आली. दुष्काळग्रस्त जिल्ह्यात मात्र चारा आणि पाणी टंचाईमुळे राबवण्यात आली नाही.

दुसरी महत्त्वाची योजना म्हणजे शेळी व मेंढी गट वाटप योजना. या योजनेमध्ये दहा शेळ्या व एक बोकड किंवा दहा मेंढ्या आणि एक मेंढा घेण्यासाठी शासन हे अनुदान देते. २०११-१२ मध्ये ३,०६४ व २०१३-१३ मध्ये ते आतापावेतो ३,२५३ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला. राज्यातील अवर्षणप्रवण ग्रामीण भागातील जनतेला शेळी पालनाचा व्यवसाय करण्याकरिता प्रोत्साहित करण्यासाठी विशेष कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

### अंडी उबवण संयंत्राचे वाटप

ग्रामीण भागातील महिलांना सुरक्षित रोजगार मिळावा यासाठी ४०० अंडी उबवण संयंत्राचे वाटप महिला बचत गटांना करण्यात येते. या योजनेंतर्गत २७४ बचत गटांना ७५ टक्के अनुदानावर ही संयंत्रे वाटप करण्यात आली. दारिद्र्यरेषेखालील शेतकरी कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रथिनयुक्त आहार मिळावा म्हणून १०० टक्के अनुदानावर परसातील कुक्कुट विकास योजना ३ डिसेंबर २०१२ पासून राबवण्यात येत आहे. दारिद्र्यरेषेखालील व अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना ४५ पक्षी १०० टक्के अनुदानावर दिले जात आहेत. त्याचप्रमाणे ज्या भागात मानव विकास निर्देशांक सर्वात कमी आहे त्या जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी १००० मांसल कुक्कुट पक्षीपालनाची योजना राबवण्याचा निर्णय शासनाने १४ फेब्रुवारी २०१३ ला घेतला आहे.

- कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी १००० मांसल कुक्कुट पक्षीपालनाची योजना कार्यान्वित.
- पशुधनाची संख्या ३००असलेल्या गावात कामधेनू दत्तक ग्राम योजना कार्यान्वित.
- नागरी क्षेत्रातील ४६ ठिकाणी अद्ययावत मासळी बाजार उभारण्यासाठी नगरपालिका व महानगरपालिकांना अर्थसाहाय्य.




### कामधेनू दत्तक ग्राम योजना

पशुपालन हा ग्रामीण भागातील महत्त्वाचा जोडधंदा आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाने कामधेनू दत्तक ग्राम योजना सुरू केली. यात पशूंचे रोगनिदान, लसीकरण औषधोपचार, गोचीड, गोमाशा निर्मूलन, वैरण विकास, जनावरांची निगा, दूधस्पर्धा याबाबत प्रशिक्षण व प्रात्यक्षिक घेण्यात येते. ज्या गावामध्ये पशुधनाची संख्या ३०० आहे त्या गावात ही



## दुधाची गुणप्रत टिकून राहण्यासाठी ग्रामीण पातळीवर शीतसाखळींची निर्मिती

योजना राबवली जाते. त्यासाठी प्रत्येक निवडलेल्या गावासाठी १ लाख, ५० हजार खर्च केले जातात. २०११-१२ मध्ये १३९ तर २०१२-१३ मध्ये ३२७२ गावांना या योजनेचा लाभ देण्यात आला.

जागतिक पशुधनाची संख्या पाहता भारतात पशुधनाची संख्या सर्वाधिक आहे. तथापि, दूध उत्पादकतेमध्ये आपली जनावरे कमी पडतात. यासाठी गायी-म्हशींची उत्पादकता वाढवण्यासाठी आनुवंशिकता सुधारणा हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेतला. या कार्यक्रमांतर्गत चांगल्या दूध देणाऱ्या गायींची नोंद करणे, त्यांच्यात उच्च वंशावळीच्या वळूच्या गोठीत रेतमात्राद्वारे कृत्रिम रेतन करणे, त्यांच्यापासून जन्मलेल्या वासराचे शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन करणे इत्यादी कार्यक्रम हाती घेतले जातात.

### वैरण विकास

पशूंना दुष्काळातही चारा पुरवता यावा यासाठी वैरण विकासाचा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. २०१२-१३ मध्ये मका, ज्वार, लुसर्न, बरसीम अशा वैरणीच्या प्रजातीसाठी ९६० मेट्रिक टन प्रमाणित बियाणांचे वाटप करण्यात आले. पोषणमूल्य टिकवण्यासाठी तसेच हिरव्या चाऱ्याच्या साठवणुकीसाठी मुरघास युनिट तयार करण्यासाठी प्रति लाभार्थी १ लाख ५ हजार रुपयांचे अनुदान शासन देत आहे. टंचाईग्रस्त जिल्ह्यांमध्ये ९५० व इतर भागात ९२२ युनिटकरिता शासनाने अनुदान दिले आहे.



**कोकण, मराठवाडा व विदर्भ भागात दूध व्यवसायाला गती देण्यासाठी एकात्मिक दुग्धशाळा प्रक्षेत्र उपवन प्रकल्प योजना राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार या भागातील २३ जिल्ह्यात ४६ डेअरी फार्म उभारण्यात आले. प्रत्येक डेरी फार्ममध्ये ७५ टक्के अनुदानावर १०० दुधाळ गायी, गायींसाठी निवारा, वैरण गोडाऊन, वैयक्तिक सेवा, विमा इत्यादीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. दूध उत्पादनात वाढ आणि दूध भुकटींवरील निर्यात बंदी यामुळे अतिरिक्त दुधाचा प्रश्न निर्माण झाला होता. यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये व त्यांचे अतिरिक्त दूध, दूधभुकटी प्रकल्पांनी घ्यावी यासाठी प्रकल्पधारकांना प्रतिलीटर दुधासाठी रु. २ प्रमाणे अनुदान दिले. १५ एप्रिल ते जून २०१२ या कालावधीसाठी शासनाने २९ कोटी रूपये अनुदानापोटी देऊन शेतकऱ्यांना एक प्रकारे मदतच केली आहे.**

### विदर्भ व मराठवाड्यासाठी विशेष प्रयत्न

विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये उपलब्ध पशुधनाची उत्पादन क्षमतेत वृद्धी, संघटित पद्धतीने दूध संकलन यासाठी न्यू जनरेशन को ऑपरेटिव्ह धर्तीवर संकलन व्यवस्था निर्माण करण्यात येईल. यासाठी राष्ट्रीय दुग्धविकास मंडळासमवेत सामंजस्य करार करण्यात येणार आहे. या कराराद्वारे विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांची कंपनी स्थापन करण्यात येईल. या कंपनीद्वारे गाव पातळीवर उत्पादित दूध संकलित करण्यासाठी शेतक-यांचे छोटे गट तयार करण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाद्वारे मराठवाडा व विदर्भात शास्त्रोक्त पद्धतीने पशुधनाची दूध उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. यामुळे या विभागांमध्ये सक्षम संकलन व्यवस्था निर्माण करणे, उत्पादित दुधाला चांगला दर देणे,संकलित दुधावर प्रक्रिया करणे इत्यादी बाबी सुलभ होतील.

मुंबई व त्या शेजारील उपनगरातील ग्राहकांना स्वच्छ व सकस दूध व दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी राष्ट्रीय दुग्धविकास मंडळसंचलित मदर डेअरी फ्रुट ॲण्ड व्हेजिटेबल लि. या कंपनीमार्फत रु.१५० कोटी इतकी गुंतवणूक करून प्रतिदिन ५ लाख लीटर्स क्षमतेचे अद्ययावत दूध प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात येईल.

### वेगवर्धक दुग्ध विकास कार्यक्रम

दुग्धव्यवसायाचा विकास करण्यावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहेत. त्यासाठी दुधाची गुणप्रत टिकून राहण्यासाठी ग्रामीण पातळीवर प्राथमिक सहकारी संस्थांच्या स्तरावर शीतसाखळी निर्माण करण्यात येईल. दूध संघाच्या स्तरावर प्रक्रिया प्रकल्प अद्ययावत करणे व त्याची साठवणूक क्षमता वाढवणे यासाठी वेगवर्धक दुग्ध विकास कार्यक्रम राबवण्यात येईल. महानंदकडे जमा होणाऱ्या दुधावर योग्य प्रक्रिया करण्याकरिता व त्याची साठवणूक करण्याकरिता गोरेगाव, मुंबई येथे १.०४ लाख लीटर्स प्रति दिन क्षमतेचा रु.४९.४६ कोटीचा टेट्रा फिनो व टेट्रा ब्रिक पॅकिंग प्रकल्प उभारण्यात येईल. टेट्राफिनो प्रकल्प १५ फेब्रुवारी २०१३ ला कार्यान्वित झाला. टेट्राब्रिक पॅकिंग प्रकल्पही सुरू होण्याच्या प्रक्रियेत आहे. पूरक प्राथिने अभियानांतर्गत दूध भुकटी प्रकल्पाचे काम पूर्ण

झाले आहे.

**मत्स्योत्पादन**

भूजलाशयीन क्षेत्रामध्ये मत्स्योत्पादन घेण्यास मोठ्या प्रमाणात वाव आहे. ही बाब लक्षात घेऊन, जलाशय/तलावामध्ये मासेमारी करण्याकरिता सुधारित तलाव ठेका धोरणास मंत्रिमंडळाने ३० सप्टेंबर, २०१३ रोजी मान्यता दिली.

**बंदर व जेट्टी उभारणी**

मासेमारी व्यवसायापासून अनेकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. या मासेमारी क्षेत्रात रोजगाराच्या प्रचंड क्षमता आहेत म्हणून या व्यवसायाचा विकास महत्त्वाचा आहे. हे लक्षात घेऊन शासनाने बंदर व जेट्टी उभारणीचा मोठा कार्यक्रम राष्ट्रीय कृषीविकास योजनेंतर्गत हाती घेतला आहे. मच्छिमारांना मूलभूत सुविधा पुरविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असून पहिल्या टप्प्यात १९ ठिकाणी जेट्टी उभारण्यात येतील. ग्रामीण पायाभूत विकास कार्यक्रमांतर्गत नाबार्डकडून कर्ज घेऊन २० ठिकाणी जेट्टी उभारल्या जातील. १७२ कोटी रुपयांच्या मंजूर कार्यक्रमातून ३९ ठिकाणी जेट्टी बांधण्यात येत आहेत. वरळी व माहूल येथील जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे तर उर्वरित ३३ ठिकाणची जेट्टींचे कामे प्रगतिपथावर आहे.

मासळी किनाऱ्यावर उतरविणे, साठवणुकीसाठी कोल्ड स्टोअरेज, खरेदी विक्री, व्यवहारासाठी निवारा व इतर मूलभूत सुविधांसह अद्ययावत सुसज्ज मासेमारी बंदरे उभारण्याचा कार्यक्रम शासन राबवत आहे. रायगड जिल्ह्यातील करंजा, ठाणे जिल्ह्यातील अर्नाळा या ठिकाणी मासेमारी बंदर उभारण्यात येणार आहे.

पिंजरा पद्धतीने जलाशयात मत्स्योत्पादन घेण्याचा आणखी महत्त्वाचा कार्यक्रम राबवला जात आहे. पहिल्या टप्प्यात वर्धा जिल्ह्यातील बोर, अहमदनगर जिल्ह्यातील मुळा व सातारा जिल्ह्यातील तारळी या ठिकाणच्या जलाशयात हा उपक्रम राबवण्यात आला आहे.

**अद्ययावत मासळी बाजार**

उत्तम दर्जाची व सुस्थितीत असलेली मासळी लोकांना उपलब्ध व्हावी यासाठी नागरी क्षेत्रातील ४६ ठिकाणी सुसज्ज व अद्ययावत मासळी बाजार उभारण्यासाठी नगरपालिका व महानगरपालिका यांना राष्ट्रीय मत्स्यविकास बोर्डामार्फत अर्थसाहाय्य



उपलब्ध करून देण्यात आले आहे. १२ ठिकाणी मासळी बाजार स्थापण्याचे काम अंतिम टप्प्यात असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत.

मत्स्यव्यवसायातील जोखीम लक्षात घेता मच्छीमारांना अद्ययावत गट विमा, बोटी, जाळी, रॉकेल खरेदीवर अनुदान दिले जात आहे.

पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग हा गरीब कोळी बांधव, अनुसूचित जाती-जमाती, महिला बचत गट आदी घटकांना स्वयंरोजगाराची संजीवनी देणारा ठरला आहे. दूध उत्पादक शेतकरी व पशुपालक यांना मदतीचा हात देऊन त्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवले आहे.

**आकाश जगधने**

# सहकाराचे सामर्थ्य

(पान ४१ वरून)

**सहयोगी-विद्युतनिर्मिती प्रकल्प**

उसाच्या चिपाडावर आधारित सहयोगी विद्युतनिर्मितीचे लक्ष्य १,००० मेगावॅट ठेवून धोरण तयार केले गेले. यानुसार शासनाचे रु. १०८ कोटींच्या रकमेचे ५ टक्के भाग भांडवल ३४ सहकारी साखर कारखान्यांना वितरित केले गेले. २०११-१२ आणि २०१२-१३ च्या गळित हंगामात अनुक्रमे १८०.१९ कोटी आणि १३६.४२ कोटी युनिट विद्युतनिर्मिती करण्यात आली.

**ऊस क्षेत्रात वाढ**

राज्यातील ठिबक सिंचनाखालील उसाचे क्षेत्र वाढवण्याची मोहीम राबवली जाईल. येत्या ३ ते ५ वर्षांत राज्यातील ६ ते ७ लाख हेक्टर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्यात येईल. यामुळे पाण्याची बचत होऊन ते पाणी इतर पिकांना देणे शक्य होईल.

सहकार चळवळीला काही समस्या भेडसावत असल्या तरी सहकारक्षेत्राची एकंदरीत स्थिती निराशाजनक नाही. सर्वसामान्यांच्या जीवनात महत्त्वाचा सहभाग असलेल्या सहकार क्षेत्राला सक्षम व बळकट करण्यासाठी जनतेच्या सहकार्याने शासन प्रयत्नशील आहे.



**शांताराम शेरवाडे**



# पर्यावरण रक्षण-संस्कृती संवर्धन

संजय देवतळे
मंत्री, पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य




- शास्त्रीय संगीतास प्रोत्साहन देण्यासाठी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या नावे नवीन योजना.
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयोगात्मक कलांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गुणवंत व गरजू कलावंतांना आर्थिक मदत.
- खाजगी संस्था/व्यक्ती यांच्याकडील ऐतिहासिकदृष्ट्या व पुरातत्त्वदृष्ट्या मौल्यवान व जतनयोग्य वस्तूंकरिता वस्तुसंग्रहालय उभे करण्यासाठी अर्थसाहाय्य.

कोणत्याही समाजाची संस्कृती, ही त्या समाजाचे खरे वैभव असते, तर समतोल पर्यावरण त्याच्या भौगोलिक श्रीमंतीचे द्योतक असते. विविधतेने नटलेल्या व समृद्ध सांस्कृतिक आणि पर्यावरणीय वारसा लाभलेल्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्राचे पर्यावरण राखणे व पर्यावरणाची संस्कृती रुजविणे, या दोन बाबी परस्परपूरक पण वरकरणी भिन्न! एकात मन, भावना, बुद्धी असलेला मानव केंद्रस्थानी तर दुसऱ्यात पंचमहाभूतांनी बनलेला निसर्ग केंद्रस्थानी. या दोन्हींची उत्तम सांगड घालत आपले विविधांगी सांस्कृतिक व पर्यावरणीय वैभव वृद्धिंगत करण्याचे प्रयत्न, संजय देवतळे यांच्या नेतृत्वाखाली हे दोन्ही विभाग करीत आहेत.

### संस्कृती संवर्धन

राज्यातील लोककला, शास्त्रीय संगीतासारख्या अभिजात कला व नाटक, चित्रपटसारख्या आधुनिक कला व कलावंताच्या, ऐतिहासिक वास्तू, गड-किल्ले, दुर्मीळ हस्तालिखित पोथ्या, शिवकालीन आज्ञापत्रे, दस्तवेज, गॅझेटिअर, नाटयसंहिता इ.चे जतन आणि संवर्धनाचे काम या विभागामार्फत केले जाते. सांस्कृतिक कार्य संचालनालय, चित्रनगरी इ. अधीनस्त कार्यालये या विभागांतर्गत येतात. यातील काही योजना, प्रकल्प पुढीलप्रमाणे आहेत.

राज्य शासनाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून जाहीर करण्यात आलेल्या राज्य सांस्कृतिक धोरणाची अंमलबजावणी १ जुलै, २०१० पासून सुरू करण्यात आली. या धोरणातील निर्णयानुसार शास्त्रीय संगीतास प्रोत्साहन देण्यासाठी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या नावे नवीन योजना दि. ३० जानेवारी, २०१३ पासून सुरू करण्यात आली आहे.

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन शास्त्रीय गायन व वादन या २ क्षेत्रांचा या योजनेंतर्गत विचार करण्यात आला. त्यानुसार या नवीन योजनेंतर्गत खालील ४ उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

* भारतरत्न पं.भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजना * भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सव * भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार * भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीतातील नोंदणीकृत संस्थांना साहाय्यक अनुदान.



## पर्यावरणविषयक संशोधनासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

दादासाहेब फाळके चित्रनगरी महामंडळ आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ (NFDC) यांच्या दरम्यान ४ सप्टेंबर, २०१३ रोजी करार करण्यात आला. या करारानुसार दर्जेदार मराठी चित्रपट संहितांची (NFDC) ने गठीत केलेल्या तज्ज्ञ समितीमार्फत निवड करून अशा दोन संहितांवर दरवर्षी चित्रपट निर्मितीसाठी अर्थसाहाय्य करण्यात येईल. या योजनेंतर्गत NFDC आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी महामंडळ या राज्य शासनाच्या उपक्रमामार्फत प्रत्येकी रु. ५० लाख एवढे अर्थसाहाय्य चित्रपट निर्मात्याला उपलब्ध करून दिले जाईल. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

**इतर प्रकल्प**

■ लुप्त होणाऱ्या दुर्मीळ प्रयोगात्मक कलांचे तसेच वाद्यांचे जतन व संवर्धनाचे उपक्रम राबवणाऱ्या संस्थांना गुणवत्तेनुसार अर्थसाहाय्य. ■ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयोगात्मक कलांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गुणवंत व गरजू कलावंतांना आर्थिक मदत. ■ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त कलावंतांचा सत्कार. ■ प्रयोगात्मक कलाक्षेत्रात मूलभूत संशोधन करणाऱ्या गरजू संस्था/व्यक्तींना गुणवत्तेनुसार आर्थिक मदत. ■ खाजगी संस्था/व्यक्ती यांच्याकडील ऐतिहासिकदृष्टया व पुरातत्त्वदृष्ट्या मौल्यवान व जतनयोग्य वस्तूंकरिता वस्तुसंग्रहालय उभे करण्यासाठी अर्थसाहाय्य ■ संनियंत्रण समितीच्या मान्यतेने इतर महत्त्वाच्या प्रयोजनांसाठी अर्थसाहाय्य ■ गरज भासल्यास तात्काळ उद्‌भवणाऱ्या बाबींसाठी सांस्कृतिक कार्यमंत्री तथा अध्यक्ष, सनियंत्रण समिती यांच्या मान्यतेने निधीचा विनियोग करणे व त्यास सनियंत्रण समितीच्या आगामी बैठकीत कार्योत्तर मान्यता घेणे.


■ महाराष्ट्र भूषण पु.ल.देशपांडे यांच्या जयंतीनिमित्त कालावधीत महाराष्ट्र युवा महोत्सवाचे आयोजन ■ नाटक, चित्रपट/टी.व्ही. , लोककला, द्रककला, संगीत व नृत्य या सहा कलाविष्कारांसाठी प्रत्येक कलाविष्कारावर ३ दिवसांचा महोत्सव आयोजित ■ दर्शनिका विभागामार्फत नांदेड जिल्हा गॅझेटिअरचे प्रकाशन. सातारा जिल्हा गॅझेटिअर प्रकाशनासाठी तयार.

पुराभिलेख संचालनालय येथे सन १६३० पासूनचे ऐतिहासिक दस्तवेज जतन करण्यात आले आहेत. या कागदपत्रांचे सूक्ष्मचित्रीकरण व स्कॅनिंग करण्याची कार्यवाही या संचालनालयामार्फत करण्यात येते. यासाठी २०१२-१३ या वित्तीय वर्षात ४ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता तसेच सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात रु. ७ कोटीइतकी तरतूद करण्यात आली आहे.

**पर्यावरण संवर्धनाची 'व्हिजन २०२०'**

राज्यातील जैव विविधतेची जपणूक करणे तसेच पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पर्यावरण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. त्यातील काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे–

■ पर्यावरणपूरक विकास, सर्वसमावेशक स्थायी विकास कायद्यांची व योजनांची अंमलबजावणी व पर्यावरणविषयक निश्चित. धोरण ठरवण्यासाठी या विभागाने व्हिजन २०२० अर्थात दृष्टिवेध २०२० हे प्रारूप प्रस्तावित केले आहे. जिल्हानिहाय पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल, जिल्हास्तरीय कृती आराखडा, सरोवर संवर्धन, नदीकृती योजना, पर्यावरण साक्षर समाज, पर्यावरण सजग युवापिढी, हरित ग्राम/ शहर/परिसर /संकुलाची निर्मिती, पर्यावरणीय पायाभूत सुविधा, पर्यावरणीय सेवा व्यवस्थापन व देखभालीसाठी प्रशिक्षित मनुष्य वैशिष्ट्यपूर्ण परिसंस्थांचे संरक्षण व संवर्धन, पर्यावरणीय उपकरणांच्या संशोधन विकासास चालना. सक्षम क्षेत्रीय पर्यावरण यंत्रणेचा विकास, लोकाभिमुख पर्यावरणविषयक अनुमती प्रक्रिया, समग्र कचरा/सांडपाणी व्यवस्थापन, नैसर्गिक संसाधनांच्या पर्यायाबाबत संशोधन व विकास, पर्यावरणीय समस्यांचे स्थानिक जनसहभागातून निराकरण, सागरतटीय व्यवस्थापन आराखडा, व्यवस्था व अंमलबजावणी, उद्योगनिहाय प्रदूषण नियंत्रक प्रणालीचे विकसन, प्रदूषण नियंत्रक व पर्यावरण बाबीविषयी सुलभ संहिता, पश्चिमघाट क्षेत्रातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या माहितीचा ज्ञानकोश विकसित करणे या २० बाबी प्रारूपात प्रस्तावित करण्यात आल्या असून त्यावर जनतेकडून सूचना/अभिप्राय/मते मागविण्यात आली आहेत. लवकरच अंतिम धोरण निश्चित करण्यात येणार आहे.■ लहान वयातच नागरिकांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने पर्यावरण सेवा योजना सुरू करण्यात आली आहे. वर्ग ७ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी विविध पर्यावरणविषयक उपक्रम आयोजित करण्यात येतात. ■ सृष्टिमित्र व वसुंधरा पुरस्कार – राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून पर्यावरण विषयक जनजागृती करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सृष्टिमित्र व वसुंधरा हे पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. ■ पर्यावरणपूरक सण-उत्सव साजरे करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध जनजागृती व प्रोत्साहनपर उपक्रमांचे आयोजन. ■ खारफुटी संरक्षण समितीची स्थापना.




- पर्यावरणविषयक मंजुरी व CRZ मंजुरीसाठी संगणकीकरण करणारा, देशातील पहिला पर्यावरण विभाग
- हवामान बदलाचा अंदाज घेण्यासाठी टेरी (The Energy & Resource Institute) सोबत करार-सन २०३०, २०५० व २०७० पर्यंतच्या हवामान बदलाचा वेध घेण्यात येणार आहे.
- बांधकाम क्षेत्रात ग्रीन बिल्डिंग संकल्पना राबवण्यासाठी पर्यावरण तज्ज्ञ व वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांची समिती.

मीनल जोगळेकर



दिलीप सोपल
मंत्री, पाणीपुरवठा आणि स्वच्छता

# सुजल आणि निर्मल

## पाणी पुरवठा, स्वच्छता

राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठ्यात सर्वंकष सुधारणा करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा कार्यक्रम राबवला जात आहे. पाणीपुरवठा योजनांबरोबरच जलस्रोतांच्या शाश्वततेसाठी उपाययोजना, बाधित गावे तसेच वाड्यांसाठी आवश्यक योजना तसेच पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत २०१३-१४ आणि २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी १३ हजार २३७ गावे, वाड्या व वस्त्यांचा समावेश करण्यात आलेला असून २०१३-१४ साठी ५ हजार ६६ गावे आणि वाड्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. २०१३-१४ साठी १ हजार ४९६.४८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

राज्यातील १४ हजार ४५३ अंशत: हाताळण्यात आलेल्या वाड्या, वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाणीपुरवठा योजना राबवण्यात येणार आहेत. त्यासाठी २०१३-१४ च्या कृती आराखड्यास मान्यता देण्यात येऊन कामांना सुरुवात करण्यात आली आहे.

### पाणी योजनांची शाश्वतता

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी करण्यात येत असलेल्या एकूण तरतुदींच्या १० टक्के रक्कम शाश्वततेसाठी राखून ठेवण्यात येईल. या निधीतून पेयजल शाश्वततेचा कार्यक्रम व्यापक स्वरूपात राबवण्यास सुरुवात झाली आहे. २०१३-१४ च्या कृती आराखड्यानुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत (शाश्वतता) २ हजार ३०३ गावे, वाड्यांमध्ये स्रोत बळकटीकरणाच्या ६ हजार ७०० उपाययोजना प्रस्तावित आहेत. २०१३ -१४ करिता ४ हजार ५१९ उपाययोजनांचे भौतिक उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून सप्टेंबर २०१३ अखेर ८७७ उपाययोजना पूर्ण झाल्या व ३५३ उपाययोजना प्रगतिपथावर आहेत.



### दरडोई खर्चाच्या निकषात वाढ

ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीसाठी वापरल्या जाणाऱ्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील अनेक प्रलंबित पाणीपुरवठा योजना मार्गी लागणार आहेत.

### सुरक्षित पाणी

राज्यात केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता व संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमाला 'सुरक्षित जल अभियान' असे नाव देण्यात आले आहे. त्याचे बोधवाक्य 'सुरक्षित पाण्याची शक्ती रोगराईपासून मुक्ती' असे आहे.

ग्रामीण भागातील सर्व पाणीस्रोतांचे गुणवत्ता संनियंत्रण देखरेख, दुरुस्ती व सर्वेक्षणामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे, ग्रामपंचायतींना या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करणे व त्यांना सक्षम बनवणे, सोप्या पद्धतीने पाणी तपासणीच्या संचाचा वापर करून गावातल्या गावात पाण्याची तपासणी करणे, लोकांमध्ये स्वच्छ व सुरक्षित पाणी पुरवठ्याबाबत तसेच अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत जनजागृती वाढवणे अशी या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

### सुजल आणि निर्मल

नागरी भागासाठी, महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान आणि नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना अशा दोन योजना राबवण्यात येत आहेत. राज्यातील सर्व नागरिकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सर्व व्यापक सुविधा उपलब्ध करणे हा महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या योजनेसाठी नागरी संस्थांना अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. २० लाखापेक्षा अधिक लोकसंख्येच्या महानगरपालिकांना (बृहन्मुंबई वगळून) ५० टक्के अनुदान, ४० टक्के कर्ज तर १० टक्के नागरी संस्थांचा सहभाग याप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जातो. उर्वरित महानगरपालिकांना ७० टक्के अनुदान, २० टक्के कर्ज तर १० टक्के नागरी संस्थांचा सहभाग याप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जातो. या अभियानांतर्गत आतापर्यंत विविध नागरी स्थानिक संस्थांच्या २२२ पाणीपुरवठा व मलनि:सारण योजनांमधील भांडवली व सुधारणा कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. ३२ शहरांच्या पाणीपुरवठा योजनांमधील सुधारणा कामे पूर्ण झाली आहेत.

- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी १३,२३७ गावे, वाड्या व वस्त्यांचा समावेश.
- ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीसाठी वापरल्या जाणाऱ्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढीचा निर्णय.
- ९ हजार ५२३ ग्रामपंचायती व ११ पंचायत समित्यांना निर्मलग्राम पुरस्कार. देशात सर्वाधिक.



## घनकरा व सांडपाणी व्यवस्थापन २०१२-०१३ साठी १,०२५ ग्रामपंचायतींची निवड

**नागरी दलितवस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता**

महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकामधील कुटुंबीयांना खाजगी नळजोडणी व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून देण्यासाठी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना राबवली जात आहे. या योजनेसाठी खाजगी नळजोडणी व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून देताना खाजगी नळजोडणीसाठी ४ हजार रुपये प्रती कुटुंब आणि वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी १२ हजार रुपये प्रती कुटुंब याप्रमाणे अनुदान दिले जाते. या योजनेंतर्गत आतापर्यंत १२२ नागरी स्थानिक संस्थांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये ६६ हजार ९३७ खाजगी नळजोडण्या आणि ८७ हजार १६६ वैयक्तिक शौचालयांचा समावेश आहे.



**ग्रामीण भागात मागणी आधारित व लोकसहभागातून प्रत्येक गावाला व गावातल्या प्रत्येकाला शुद्ध व पुरेसे पाणी सातत्याने समूह शक्तीतून प्राप्त होण्यासाठी आणि स्वच्छ परिसर, निर्मळ शरीर व आरोग्यदायी जीवनासाठी जलस्वराज्य प्रकल्प २००३ पासून जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात आला. त्यामध्ये ३ हजार ७ ग्रामपंचायती समाविष्ट होत्या. त्यामधील २ हजार ९५६ ग्रामपंचायतीमध्ये पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. या जलस्वराज्य प्रकल्पाचे यश लक्षात घेऊन जलस्वराज्य-२ कार्यक्रम राबवण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. हा कार्यक्रमदेखील लोकसहभागातून आणि मागणी आधारित तत्त्वावर राबवण्यात येईल.**

**शिवकालीन पाणी पुरवठा योजना**

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या अनेक योजना घेऊनही उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवते. त्यामुळे पेयजलाच्या उद्भवांची शाश्वतता राखणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे शासनाने शिवकालीन पाणी साठवण योजना राज्यात सुरू केली. २००२ पासून आतापर्यंत राज्यात ९ हजार ५६४ गावे, वाड्यात २५ हजार १३७ स्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. परिणामी जवळ जवळ ३ हजार गावे, वाड्यांना थेट फायदा होऊन पाणीटंचाईच्या वर्षात टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज पडली नाही.

**महिला बचतगटांकडून देखभाल, दुरुस्ती**

ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत नळ पाणीपुरवठा योजना गावातील महिला बचतगटांकडे सोपवण्यात येत आहेत. गावामध्ये नळ पाणीपुरवठा योजना महिला बचतगटांद्वारे चालवण्यासाठी ग्रामपंचायतींशी लेखी करार करण्यात आले. प्रशिक्षणाद्वारे त्यांना देखभाल दुरुस्ती संदर्भातील सर्व घटकांची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे महिलांना गावातच उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले.

**दुष्काळात महत्त्वाची भूमिका**

दुष्काळाच्या कालावधीत जनतेला दिलासा देण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने महत्त्वाची भूमिका बजावली. दुष्काळी भागात गावोगावी, वाड्या-वस्त्यांवर आणि दुर्गम भागात टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला.

**संपूर्ण राज्य सुजल, निर्मल करण्याचे ध्येय**

निर्मल ग्राम पुरस्कार योजनेंतर्गत लोकसहभागातून स्वच्छ व सुंदर झालेल्या ९ हजार ५२३ ग्रामपंचायती व ११ पंचायत समित्यांना निर्मलग्राम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. देशात सर्वात जास्त निर्मल ग्राम पुरस्कार मिळवण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे.

**निर्मल भारत अभियान**

निर्मल भारत अभियान या कार्यक्रमामध्ये दारिद्र्यरेषेवरील सर्व मागासवर्गीय कुटुंबांना, सर्व आदिवासी, अल्पभूधारक, महिलाप्रमुख असलेल्या कुटुंबांना, अपंग यांना यात प्रोत्साहन अनुदान दिले जात आहे. निर्मल भारत अभियानातून दारिद्र्यरेषेखालील सर्व कुटुंबांना आणि निवडक दारिद्र्यरेषेवरच्या कुटुंबांना ४ हजार ६०० रुपये (दुर्गम आणि पर्वतीय भागात ही रक्कम ५ हजार १०० रु. असेल) प्रोत्साहन निधी म्हणून दिले जात आहे. त्याचप्रमाणे रोजगार हमी कायदा मधून ४ हजार ५०० रु.पर्यंत मजुरी मिळू शकेल.

**सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन**

वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच संपूर्ण ग्रामीण भागातील घनकऱ्याचे व सांडपाण्याचे व्यवस्थापन होण्यासाठी निर्मल भारत अभियानांतर्गत कुटुंबसंख्येच्या आधारावर अर्थसाहाय्यची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार १५० पर्यंत कुटुंबसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी ७ लाख रुपये, ३०० पर्यंत कुटुंबसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी १२ लाख रुपये, ५०० पेक्षा अधिक कुटुंबसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी २० लाख रुपयांपर्यंत तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यामध्ये २०१२-१३ या वर्षासाठी १ हजार २५ ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली आहे.

**इर्शाद ल. बागवान**



# आपली कृष्णा:आपले पाणी

शशिकांत शिंदे
मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ)

कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार महाराष्ट्राच्या वाट्यास आलेल्या पाण्याचा वापर पूर्णपणे करण्याच्या दृष्टीने, प्रकल्पांच्या कामांना चालना देण्यासाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची निर्मिती १९९६ मध्ये करण्यात आली. महामंडळाचे कार्यक्षेत्र पुणे, सोलापूर,कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यात पूर्णपणे आहे. अहमदनगर, उस्मानाबाद व बीड या जिल्ह्यात ते अंशत: विभागले गेले आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ स्थापनेच्यावेळी ३५ मोठे, ७३ मध्यम व ८१८ लघुबंधारे आणि एकूण ९२६ प्रकल्पांतर्गत ५८५ अब्ज घनफूट (१६५६७ दलघमी) पाणी प्रकल्प उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यातील पूर्ण झालेले प्रकल्प वगळता उर्वरित २७ मोठे, ३९ मध्यम व ३५५ लघुपाटबंधारे असे एकूण ४११ प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महामंडळाच्या स्थापनेच्या वेळी महामंडळासमोर होते. सद्य:स्थितीत एकूण ५६० अब्ज घनफूटपाणीसाठा करणे व २५ अब्ज घनफूट पुन:उदयातून असा एकूण ५८५ अब्ज घनफूट पाणी वापर हे महामंडळाचे उद्दिष्ट आहे. या महामंडळामार्फत पुढील कामे केली जातात.

१. मोठे, मध्यम, व लघु प्रकल्प व उपसा सिंचन योजनांची बांधकामे पूर्ण करून पाणीसाठा निर्मिती व सिंचन क्षमता निर्मिती करणे.




२. पूर्ण झालेल्या मोठ्या, मध्यम, लघू व उपसा सिंचनप्रकल्पांवरील सिंचन व्यवस्थापन करणे.

मीनल जोगळेकर

३. भिमा उपखोऱ्यातील (नीरा, कुकडी या उपखोऱ्यासहित व भिमा खोरे पुण्यापासून राज्य सीमेपर्यंत) पूर नियंत्रण करणे.

या प्रदेशाचे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे आहे:

१ पुणे (अंशत:)– जुन्नर, शिरूर, आंबेगाव, २ अहदमनगर (अंशत:) – पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, अहदमनगर, ३ सोलापूर– उत्तर सोलापूर, द. सोलापूर, मंगळवेढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, बार्शी, सांगोला, ४. सातारा (अंशत:) – सातारा, वाई, कोरेगाव, माण, खटाव, पाटण, फलटण, खंडाळा, जावळी, कराड, ५. उस्मानाबाद (अंशत:)– परांडा, उमरगा, लोहारा, तुळजापूर, उस्मानाबाद, कळंब, भूम ६. बीड (अंशत:) – आष्टी, पाटोदा, ७. सांगली (अंशत:)– वाळवा, पलुस, कडेगांव, खानापूर, तासगांव, कवठे महाकाळ, मिरज, जत.

**मोठे प्रकल्प**

१, निरा देवघर, ता. भोर, जि. पुणे, २. चासकमान, ता. खेड, जि. पुणे, ३. टेमघर, ता. मुळशी, जि. पुणे, ४. गुंजवणी, ता. वेल्हे, जि. पुणे, ५. भामा आसखेड ता. खेड, जि. पुणे, ६. जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना, ता. दौंड, जि. पुणे.



# प्रगतीचे मानदंड



**रणजीत कांबळे**
( पाणीपुरवठा आणि स्वच्छता, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, पर्यटन आणि सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री)

## अन्न व नागरी पुरवठा

➲ अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेची माहिती घेण्यासाठी तसेच तक्रारी नोंदवण्यासाठी १८००२२४९५०/ १८००२२२२६२ या टोल फ्री क्रमांकाची हेल्पलाइन सुरू.




➲ ग्राहकांना त्यांच्या समस्येबाबत अपेक्षित असलेली माहिती व मार्गदर्शन मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन भाषांमधून उपलब्ध.

➲ केरोसिन वितरणातील गैरव्यवहार दूर करण्यासाठी केरोसिनवरील अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात.

➲ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी निर्धारित दराने योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशीररीत्या उपलब्ध होईल, याची हमी देणारी सुधारित धान्य वितरण पद्धत राबवणार.

➲ सवलतीच्या दराने पामतेल वितरणाच्या योजनेंतर्गत पामतेलाचा पुरवठा ५० रु.प्रतिलिटर दराने.

**पाणी पुरवठा व स्वच्छता**

➲ सुरक्षित जल अभियान सुरू. राज्यात केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता व संनियंत्रण सर्वेक्षण कार्यक्रम सुरू.

➲ देशात प्रथमच पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची १०० टक्के रासायनिक तपासणी करणारे अभियान महाराष्ट्रात.

➲ राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत २०१३-१४ व २० १४-१५ या आर्थिक वर्षासाठी १३ हजार गांवे, २३७ वाड्या व वस्त्यांचा समावेश.

➲ शिवकालीन पाणीपुरवठा योजनेंतर्गत आतापर्यंत ९,५६४ गांवे, वाड्यांत २५,हजार १३७ स्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना राबवल्या.

➲ जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन व गट संसाधन केंद्राच्या कर्मचाऱ्यांची भरती व प्रशिक्षण प्रक्रिया पूर्ण करणारे देशातील पहिले राज्य.

**सार्वजनिक बांधकाम व पर्यटन**

➲ राज्यातील पर्यटन स्थळांचे चित्रीकरण डिस्कव्हरी टीएलसी या वाहिनीवर देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध देशात सहा भागात प्रक्षेपित.

➲ भारतातील एकमेव व पहिले सी वर्ल्ड निर्माण करण्याचा प्रकल्प पर्यटन महामंडळाकडून सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबवण्यात येणार.

➲ केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत ६,७०३ कि.मी. रस्ते लांबीची सुधारणा,६९ मोठ्या पुलांचे बांधकाम पूर्ण. २०१३-२०१४ करिता सुमारे रु.२,५०० कोटींची अंदाजित कामे प्रस्तावित

➲ राज्यातील प्रमुख २३ शहरांना खाजगीकरणाच्या माध्यमातून चौपदरी रस्त्यांनी जोडणार.

➲ रस्ते विकासासाठी ग्रामीण पायाभूत विकास निधी नाबार्डकडे २०१३-२०१४ मध्ये सुमारे ६५० रु. कोटी किंमतीची कामे प्रस्तावित.

➲ नवी दिल्ली येथे नवीन महाराष्ट्र सदनाचे बांधकाम पूर्ण.



**सचिन अहिर**
(गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधारणा, घर दुरुस्ती व पुनर्बांधणी, नागरी जमीन कमाल धारणा, खनीकर्म, पर्यावरण, संसदीय कार्य, परिवहन उद्योग राज्यमंत्री)

## गृहनिर्माण

➲ महाराष्ट्र गृहनिर्माण नियमन व विकास अधिनियम २०११ च्या प्रारुपास मान्यता देऊन गृहनिर्माण नियामक प्राधिकरण व अपीलिय प्राधिकरण संपूर्ण राज्याकरिता स्थापन करणार.

➲ मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीमधील सुमारे १५ लाख रहिवाशांना पाच लाख रुपयांच्या अपघाती विम्याचे संरक्षण.

➲ मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला शासनाकडून मिळणाऱ्या रुपये वार्षिक १०० कोटींच्या अनुदानाची रक्कम वाढवून २०० कोटी करण्याचा निर्णय.

➲ मुंबईतील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासासाठी मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (५)अंतर्गत तीन चटईक्षेत्र निर्देशांक देण्याचा निर्णय. त्यामुळे म्हाडाच्या जुन्या वसाहतीतील सुमारे ३,७०० इमारतींच्या पुनर्वसनाचा मार्ग सुकर.

➲ सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) अंतर्गत प्रिमियमऐवजी विकासकांकडून तयार घरे



(गृहसंचय)घेण्याचा निर्णय.

➲ म्हाडाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गृहनिर्मिती. सर्वसामान्यांना जास्तीत जास्त परवडणारी घरे उपलब्ध करून देणार. त्यासाठी म्हाडाच्या अतिक्रमित जमिनीवर असलेल्या झोपडपट्ट्यांचा, गलिच्छ वस्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एस.आर.ए.) च्या धर्तीवर पुनर्विकास .

➲ मुंबईतील प्रत्येक झोपडपट्टीवासीयांचे जीवनमान उंचावण्याकरिता म्हाडाच्या माध्यमातून १५० कोटी रुपयांपर्यंतचे अनुदान देण्याची तरतूद. त्याअंतर्गत झोपडपट्टीवासीयांकरिता काही मूलभूत सुविधा पुरवण्याचा प्रकल्प राबवणार.

➲ गरीब आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत यासाठी विकासकांवर बंधन. हा निर्णय महानगरांसोबतच राज्यातील सर्वच महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट.

➲ म्हाडाची घरे पाच वर्षे भाडयाने न देण्याची अट शिथील.

➲ धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर-५ मधील पुनर्विकासाचे काम सुरू. पहिल्या टप्प्यातील स्टिल्ट + १८ मजल्याच्या एका इमारतीचे बांधकाम सुरू.

➲ समूह विकास योजनेंतर्गत भेंडी बाजार पुनर्विकास प्रकल्पाला मान्यता.

➲ मुंबईतील गिरणीकामगारांकरिता बांधण्यात आलेल्या ६,९४८ सदनिकांसाठी सोडत काढण्यात आली. या सोडतीमध्ये पात्र ठरलेल्या कामगारांपैकी १,५०० गिरणीकामगारांना घरांचा ताबा.

➲ रमाई योजनेंतर्गत अनुसूचित जातींच्या व्यक्तींकरिता सव्वा लाख घरांचे बांधकाम पूर्ण.

**परिवहन विभाग**

**स्कूल बस धोरण :**

राज्याने स्कूल बस धोरण मार्च २०११ मध्ये तयार केले असून हे धोरण राज्यात सर्वत्र राबवण्यात येत आहे. अशा प्रकारचे धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य. एकूण १३,८८९ स्कूल बसेस राज्यात नोंदविल्या गेल्या आहेत.




**सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण**

परिवहन विभागाच्या अंतर्गत असलेल्या २२ सीमा तपासणी नाक्यांचे इलेक्ट्रॉनिक वजन काटा, संगणक, आधुनिक इमारती, व्हिडिओ कॅमेरा तसेच केंद्रीय संगणकाशी संलग्नता इत्यादी आधुनिक सुविधांसह आधुनिकीकरण करण्याचा निर्णय. सर्व सीमा तपासणी नाक्यांवर राज्याच्या सीमा पार करणाऱ्या सर्व वाहनांची तपासणी करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा उपयोगात आणली गेली. सीमेपेक्षा अधिक भार वाहून नेणाऱ्या वाहनांमधून माल खाली उतरवून घेण्यासाठी सुविधा पुरविण्यात आली आहे. तीन ठिकाणी आधुनिकीकरणाचे काम सुरू त्यापैकी दोन नाक्यांचे (दापचेरी-ठाणे आणि नांदणी-सोलापूर) काम पूर्ण.

**टॅक्सी आणि ऑटोरिक्शांना इलेक्ट्रॉनिक मीटर्स**

यांत्रिक मीटर्समधील अफरातफर आणि बोगस दरपत्रकाच्या वापरातून होणाऱ्या प्रवाशांच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी सर्व टॅक्सी आणि ऑटोरिक्शांना इलेक्ट्रॉनिक मीटर्स बसविणे सक्तीचे. मुंबई महानगर प्रदेशातील ऑटो रिक्शा (१,६२,०००) आणि टॅक्सी (४२,०००) यांना इलेक्ट्रॉनिक मीटर्स बसविण्यात आले आहेत.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरक्षेत्रातील ऑटोरिक्शांना व राज्यातील उर्वरित महानगरपालिकांच्या व अ वर्ग नगरपालिकांच्या क्षेत्रात ऑटोरिक्शांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसवण्याची अंमलबजावणी.

**परवाने आणि नोंदणी प्रमाणपत्रांचे टपालाद्वारे वितरण**

विभागाने टपाल आणि तार विभागाशी दिनांक २० ऑक्टोबर २०११ रोजी अर्जदारांना त्यांच्या परवाने आणि नोंदणी प्रमाणपत्रांचे टपालाद्वारे वितरण करण्यासाठी करार केला. यामुळे कार्यालयातील अर्जदारांची ये-जा कमी झाली. वाहनधारकांची होणारी छळवणूकही कमी झाली असून अर्जदाराच्या पत्त्याची स्वयंचलित खात्रीही पटविली जात

आहे.

**पर्यावरण मैत्रीपूर्ण करप्रणाली**

➲ पर्यावरण संरक्षणासाठी मोटार वाहनांचे कर प्रणाली धोरण पुन्हा निर्धारित केले आहे.

➲ बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांसाठी आता पूर्ण करमाफी देण्यात आली असून सीएनजी/एलपीजी वापरणाऱ्या वाहनांसाठी अगोदर प्रचलित मोटार वाहन कराच्या दरावर २ टक्के सवलत देण्यात आली आहे. याचप्रमाणे पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या मोटार वाहनांवर अनुक्रमे २ टक्के आणि ४ टक्के अतिरिक्त कर लागू केला गेला आहे.

**कर देण्यासाठी ई-पेमेंट सुविधा**

➲ अर्थ विभागाने तयार केलेल्या ऑनलाइन पेमेंट प्रणालीचा वापर परिवहन विभाग करीत आहे. ही व्यवस्था १५ कार्यालयांमध्ये उपलब्ध असून याद्वारे आजवर रु. १,१२० कोटी जमा करण्यात आले आहेत. या प्रणालीमुळे कामाचा ताण हलका झाला असून महसुलाच्या हिशेबाची यंत्रणा सुधारली आहे. वाहनधारकांचा त्रास कमी झाला आहे.

**मिडी बसेसचा ताफा**

➲ गेल्या दोन वर्षांत यशवंती या नावाने ५९५ मिडी बसेस सामील करण्यात आल्या आहेत. या वाहनांमधून राज्यातील ग्रामीण आणि पहाडी क्षेत्रातील जनतेला उत्तम वाहतूक व्यवस्था दिली जात आहे.

➲ गेल्या एक वर्षात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपल्या ताफ्यात दोन मल्टी ॲक्सल ए सी व्होल्वो (अश्वमेध) गाड्यांचा समावेश केला असून या बसेस व्यस्त अशा दादर-पुणे मार्गावर धावत आहेत. आता महामंडळाने आणखी अशा एसी बसेस समाविष्ट करण्याचे काम सुरू केले आहे.




➲ गेल्या काही वर्षात महामंडळाने बीओटी तत्त्वावर बस स्थानकांची पुनर्बांधणी केली असून सिन्नर, इंदापूर आणि दादर येथील वातानुकूलित बसस्थानक गेल्या २ वर्षात उभारली गेली आहेत. याचप्रमाणे गेल्या काही वर्षात ५० बस स्थानकांचा दर्जासुधार पूर्ण करण्यात आला आहे.

➲ बस स्वच्छतेसाठी अत्याधुनिकीकरण जेट मशिन्स १६८ आगारांना पुरवण्यात आल्या. उर्वरित ८० बस आगारांना पुढील वर्षी जेट मशिन्स पुरवणार.

➲ मानवविकास योजनेंतर्गत विद्यार्थिनींसाठी ६२ निळ्या रंगाच्या बसेस वाहतुकीसाठी आणल्या.

➲ अर्जदाराची संगणकाद्वारे चाचणी घेऊन पारदर्शीपणे शिकाऊ अनुज्ञप्ती देण्याकरिता राज्यातील २२ परिवहन कार्यालयात संगणकीकृत चाचणी यंत्रणेची उभारणी.

➲ हकीम समितीच्या शिफारसीनुसार मुंबई महानगरातील टॅक्सी / रिक्शांच्या भाडयात सुधारणा .

**उद्योग**

➲ राज्याचे नवीन औद्योगिक धोरण २०१३ जाहीर. त्याद्वारे २० लाख रोजगारनिर्मिती शक्य. राज्याच्या स्थूल उत्पन्नात (जीडीपी) उत्पादन क्षेत्रात २८ टक्के पर्यंत वाढ आणि दरवर्षी उत्पादन क्षेत्रात १२ ते १३ टक्के वाढ साध्य करण्याचे उद्दिष्ट.

शांताराम शेरवाडे



**फौजिया खान**

सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि अल्पसंख्याक विकास (औफाकसह) राज्यमंत्री

**अल्पसंख्याक विकास विभाग**

➲ नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिकामधील अल्पसंख्याकबहुल भागांमध्ये पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी १० ते २० लाखांपर्यंत अनुदान देण्याची योजना यशस्वी. २०१२-१३ मध्ये १२६ महापालिका, नगरपालिकांना लाभ. यासाठी १४.४० कोटी रुपये खर्च.




➲ या योजनेची व्याप्ती आता अल्पसंख्याकबहुल ग्रामीण भागापर्यंत. अल्पसंख्याकबहूल ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी १० लाख रुपयांच्या निधीची योजना मंजूर.

➲ यंदा राज्यातील ४४० ग्रामपंचायतींना या योजनेतून प्रत्येकी १० लाख रुपयांचा निधी देण्यात येणार असून यासाठी ४४ कोटी रुपयांची तरतूद.

➲ अल्पसंख्याकाच्या मदतीसाठी हेल्पलाइन (क्रमांक १८००२२५७८६). कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत हेल्पलाइनवरून अल्पसंख्याकांना विविध योजनांची माहिती, तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण.

➲ अल्पसंख्याकाच्या विकासासाठी स्वतंत्र प्रशासकीय विभाग.

➲ अल्पसंख्याकाच्या शिक्षणाच्या

सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण योजना कार्यान्वित.

➲ अल्पसंख्यांकांची शासकीय आणि पोलीस विभाग सेवेतील संख्या वाढवणार. या योजनेतून या वर्षी राज्यातील सनदी सेवा तसेच यूपीएससी परीक्षांसाठी १,००० उमेदवारांना प्रशिक्षण.

➲ राज्य अल्पसंख्याक आयोगाला देण्यात आलेल्या वाढीव अधिकारांमुळे आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांच्या बाबतीतील कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्याबद्दल त्यांना देण्यात आलेल्या सनदी न्यायालयाच्या अधिकारामुळे अल्पसंख्याकांच्या आत्मविश्वासात वाढ.

➲ मौलाना आझाद अल्पसंख्याक वित्तीय विकास महामंडळ अधिक सक्षम.

➲ महामंडळाच्या सर्व जिल्हा कार्यालयांच्या कर्मचाऱ्यांसाठी मंजुरी प्रदान.

**महिला आणि बालविकास**

➲ 'सुकन्या' योजना येत्या जानेवारीपासून राज्यात सुरू केली जाणार असून त्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुलींच्या जन्मवर्षात शासन २१,२०० रुपयांचा विमा उतरवून वयाच्या १८ वर्षाला त्यांना रु.१ लाख रुपये देणार आहे.




➲ विविध अत्याचार पीडित महिला आणि बालकांच्या आर्थिक साहाय्य आणि पुनर्वसनासाठी मनोधैर्य योजना कार्यान्वित.

➲ एकात्मिक बाल विकास (आयसीडीएस), कुपोषण निर्मूलनासाठी राजमाता माता-बाल आरोग्य व पोषण मिशनची पुनर्रचना.

➲ बालकांच्या हक्कांचे संरक्षण व विकास हे मुद्दे लक्षात घेऊन दुसरे बालधोरण अंतिम टप्प्यात.

➲ गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी व तिही शक्य तितक्या लवकर व्हावी यासाठी २५ विशेष जलदगती न्यायालयांची स्थापना.



➲ स्त्रियांना तहसिलदार, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त ते महिला व बालविकास मंत्री यांच्या दरबारात प्रत्यक्षात जाऊन दाद मागता यावी यासाठी संपूर्ण राज्यात महिला लोकशाही दिनाचे आयोजन.

➲ एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंमलबजावणी व संनियंत्रण समितीच्या भरारी पथकाची स्थापना.

➲ पूरक पोषण आहार आणि घरपोच आहाराच्या दरात १ रुपयाने वाढ.

➲ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाची २६ ऑक्टोबर, २०१२ पासून अंमलबजावणी सुरू. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ३० संरक्षण अधिकाऱ्यांची भरती.

➲ शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार महिलांच्या तक्रार निवारणासाठी समित्यांची स्थापना.

➲ अंगणवाड्यांमधील आहाराची महिन्यातून किमान एकदा तपासणी करण्यासाठी माता समितीची स्थापना.

➲ अनाथ, निराधार मुलांमध्ये सांघिक भावना निर्माण करण्यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सवास मान्यता.

➲ महिलांच्या तक्रारींसाठी १०५ समुपदेशन केंद्रांना मान्यता.

➲ बालवाड्यांमधून मातृभाषेचे शिक्षण देण्याचा निर्णय.

**शालेय शिक्षण विभाग**

➲ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबद्दल विशेष पटपडताळणी मोहीम

➲ शिक्षणसेवकांच्या मानधनात वाढ व पदनामात बदल

➲ ५००० शाळांच्या मूल्यांकनास मान्यता

➲ वाढीव तुकड्यांना मान्यता

➲ कॉपीमुक्ती अभियान

➲ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा




➲ प्रत्येक तालुक्यापर्यंत व्हिडीओ कॉन्फरसिंगची व्यवस्था

➲ राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार अभ्यासक्रमाची मांडणी

➲ इ.११ वी ऑनलाइन प्रवेश पद्धतीमधील त्रुटी दूर करणे

**आरोग्य विभाग**

➲ राज्यात असलेल्या १२,९१७

विविध शासकीय आरोग्य संस्थांचे भक्कम जाळे राज्यभर.

➲ गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी.

➲ राज्यात सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यासाठी धडक मोहीम. ३० जून २०१३ अखेर राज्यातील एकूण ८,८८१ सोनोग्राफी केंद्रांपैकी ७०१३ केंद्रांची तपासणी.

➲ राज्यातील समुचित प्राधिकाऱ्यांकडून 'पीसीपीएनडीटी' कायद्याच्या तरतुदींचा भंग करणाऱ्यांविरुद्ध एकूण ४७७ खटले न्यायालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी अंतिम केलेल्या २१३ प्रकरणांमध्ये ५४ जणांना शिक्षा. ३८ जणांना सश्रम कारावासाची शिक्षा आहे. या कायद्यानुसार दोषींना शिक्षा देण्याकामी यशस्वी ठरलेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य.

➲ मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ ची प्रभावी अंमलबजावणी

➲ दंतशल्य चिकित्सक सेवेचे विस्तारीकरण

➲ प्रत्येक जिल्हयात १०० खाटांची स्त्री रुग्णालये सुरू करण्याबाबत निर्णय.

➲ राजीव गांधी जीवनदायी योजनेची पहिल्या टप्प्यातील सहा जिल्हयांमध्ये यशस्वी अंमलबजावणी. सुमारे १ लाख रुग्णांवर योजनेंतर्गत शस्त्रक्रिया.

➲ इमर्जन्सी मेडिकल सेवा राज्यात लवकरच सुरू करणार

**पारितोषिके आणि सन्मान :** या सर्व प्रयत्नांमुळे विभागाच्या कामाची राष्ट्रीय पातळीवर दखल तसेच पारितोषिके आणि सन्मान यांच्या रूपाने प्रशंसा केली गेली असून त्यामधील महत्त्वाची पारितोषिके खालीलप्रमाणे आहेत:

➲ नवजात शिशू मृत्युदर कमी करण्यासंदर्भातील राष्ट्रीय पारितोषिक : देशात प्रथम

➲ सुरक्षित प्रसूती सुधारणेसाठी राष्ट्रीय पारितोषिक : देशात सर्वप्रथम

➲ ५ वर्षांखालील बालकांचा मृत्युदर कमी करण्यासंदर्भातील राष्ट्रीय पारितोषिक : देशात दुसरे

➲ अर्भक मृत्युदर (आयएमआर) कमी करण्यासंदर्भातील राष्ट्रीय पारितोषिक : देशात तिसरे

➲ विभागातील चार परिचारिकांना राष्ट्रपतींच्या हस्ते फ्लॉरेन्स नाइटिंगेल पारितोषिक

➲ ई-गव्हर्नन्स उत्कृष्टता पारितोषिक - अपंगत्व संगणक कार्यक्रमासाठी कांस्य पदक

➲ ई-गव्हर्नन्स उत्कृष्टता पारितोषिक 'आशा' कार्यक्रमाच्या उपयोजितेबद्दल प्रशस्ती प्रमाणपत्र

➲ ई-गव्हर्नन्स उत्कृष्टता पारितोषिक : राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमधील नागरिक सेवा केंद्र उत्कृष्ट सेवा पूर्तीसाठी रौप्य पारितोषिक

➲ ई-गव्हर्नन्स उत्कृष्टता पारितोषिक : आयटी गव्हर्नन्सच्या नावीन्यपूर्ण उपयोगासाठी आरोग्य सल्ला कॉल सेंटरला सुवर्ण पदक

➲ ई-गव्हर्नन्स उत्कृष्टता पारितोषिक : आयटी गव्हर्नन्सच्या नावीन्यपूर्ण उपयोगासाठी एनआरएचएमच्या ई कार्यालयाला प्रशस्ती प्रमाणपत्र

**माहिती व जनसंपर्क**

➲ शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधीमधून जुने विकार, अपघात यासाठी पत्रकारांना मदत. हा निधी ५ कोटीइतका वाढवण्यात आला आहे. मागील तीन वर्षांत गरजू पत्रकारांना २० लाख रुपयांचे साहाय्य.

➲ महाराष्ट्राच्या स्थापनेपासून विविध कार्यक्रमांमधील दुर्मीळ छायाचित्रांचे डिजिटायझेशन करण्याचे काम सुरू. आजवर ६ लाख २५ हजार छायाचित्रांचे काम पूर्ण.

➲ जुन्या वृत्तपट आणि अनुबोधपटांचा पुनर्स्थापित (रिस्टोरेशनचा) प्रकल्प सुरू.

➲ लोकराज्यच्या जुन्या व दुर्मीळ अंकांचे डिजिटायझेशन पूर्ण. १,५०० अंक http://dgipr.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध.

➲ पत्रकार अॅक्रिडेशनसाठी ऑनलाइन अर्जाची सुविधा.

➲ महान्यूज वेबपोर्टल नव्या रूपात.

**अजय जाधव**



**सतेज पाटील**
(गृह (शहरे व ग्रामीण), ग्रामविकास आणि अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री)

➲ ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व २५ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींना एक समान संगणक, बहुउद्देशीय प्रिंटर उपलब्ध करून देण्यात आले.

➲ १ हजार लोकसंख्येवरील सर्व ग्रामपंचायतीस एक संगणक चालक व १ हजार पेक्षा कमी लोकसंख्येखालील ३ ग्रामपंचायती मिळून एक याप्रमाणे संगणक परिचालक उपलब्ध करून देण्यात आले.

➲ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे सॉफ्टवेअर इंजिनिअर व प्रत्येक पंचायत समितीस एक याप्रमाणे संगणक तज्ज्ञ उपलब्ध करून देण्यात आले .




➲ प्रत्येक जिल्हा परिषद व्हिडिओ कॉन्फरन्स यंत्रणेद्वारे मंत्रालयाला जोडण्यात आली आहे. प्रत्येक पंचायत समितीपर्यंत व्हिडिओ कॉन्फरन्स घेता येणे शक्य झाले आहे.

➲ ई-पंचायत प्रकल्पांतर्गत आतापर्यंत एकूण १० सॉफ्टवेअर ऑनलाइन वापरासाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्यांच्या वापराबाबत महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे.

➲ ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामाचे डिजिटायझेशन करण्यासाठी (१ ते २७ नमुने) संग्राम सॉफ्टवेअर विकसित केले असून १ एप्रिल, २०१३ पासून राज्यात पंचायती राज संस्थांकडून देण्यात येणारे सर्व दाखले १ एप्रिल, २०१३ पासून संगणकीकृत स्वरूपात देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

➲ २०१२-१३ मध्येही ई-पंचायत प्रकल्प अंमलबजावणीमध्ये संपूर्ण देशात महाराष्ट्र अग्रेसर.

➲ इंटरनेट कनेक्टिव्हिटी - राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

➲ ई-टेंडरिंगबाबतचे प्रशिक्षण सर्व पंचायतराज स्तरावर सुरू करण्यात आले.

**गृह विभाग**

**महिलांची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उचललेली पावले**

➲ पीएडब्ल्यू (महिलांवरील अत्याचार प्रतिबंध) कक्ष- महाराष्ट्र शासन (गृह विभाग) यांनी सुरुवातीला राज्याच्या पोलीस मुख्यालयात एक पीएडब्ल्यू (महिलांवरील अत्याचार प्रतिबंध) कक्ष स्थापन केला आहे. हा कक्ष सध्या राज्य गुन्हे अन्वेषण कार्यालय संगम ब्रिज, पुणे येथे कार्यरत.

➲ महिला पोलीस कक्ष (महिला मदत कार्यासन) महिला पोलीस अधिकारी आणि पोलीस कॉन्स्टेबल यांच्या उपलब्धतेनुसार त्यांना या कक्षात नियुक्ती. असे एकूण ९७५ कक्ष आजपावेतो स्थापित.

➲ **महिला सुरक्षा समिती :** या समित्या ४५ पोलीस एककांच्या सर्व मुख्यालयांमध्ये आणि पोलीस ठाण्यांमध्ये स्थापित.

➲ **सामाजिक सुरक्षा कक्ष :** पोलीस मुख्यालयांमध्ये सामाजिक सुरक्षा कक्ष कार्यरत. ही पथके महिलांविरुध्दच्या गुन्ह्यांसंबंधी प्रकरणांचे अन्वेषण करतात. असे ३३ कक्ष स्थापित.

➲ **खास समुपदेशन केंद्रे :** आजपावेतो ९० खास समुपदेशन केंद्रे पोलीस ठाण्यांच्या जागेत कार्यरत. ही केंद्रे महिला आणि बाल कल्याण विभागाच्या समन्वयाने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यरत. या केंद्रांमार्फत आपत्तीत असलेल्या महिलांना आणि कौटुंबिक भाडणांमध्ये साहाय्य. अशा ५४ नवीन केंद्रांना मान्यता.

➲ **एस.टी. स्थानकांवर मदत केंद्रे :** महिला आणि बालकांच्या अनैतिक व्यापाराला प्रतिबंध करण्यासाठी न्यायमूर्ती धर्माधिकारी समितीच्या शिफारशीनुसार एस. टी. स्थानकांवर ३३० मदत केंद्रे स्थापन .

➲ गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निवड प्रतिबंध) अधिनियम-१९९४. वैद्यकीय प्रसूती खंडित करणे अधिनियम-१९७१ यांच्या परिणामकारक अमलासाठी उप-पोलीस अधीक्षक/साहाय्यक पोलीस अधीक्षक यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती.

➲ **हेल्पलाइन :** आपत्तीमधील महिलांना मदत करण्यासाठी मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई पोलीस पथकांमध्ये १०३ हा टोल फ्री क्रमांक सुरू. राज्यातील इतर ठिकाणी १०९१ हा टोल फ्री क्रमांक उपयोगात.

➲ **खास बालगुन्हेगार (ज्युव्हेनाइल) पोलीस पथक आणि बाल कल्याण अधिकारी :** आपत्तीमध्ये असलेल्या मुलांचे संरक्षण आणि त्यांची काळजी घेण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये बाल कल्याण समिती आणि ज्युव्हेनाइल मंडळांची निर्मिती. ४५ पोलीस पथकांची स्थापना. १,०२८ पोलीस ठाण्यांमध्ये एका पोलीस अधिकाऱ्याची बाल कल्याण अधिकारी म्हणून नियुक्ती.

➲ **खास आणि जलदगती न्यायालये:** महिलांविरुध्दचे गुन्हे त्वरित निकालात काढण्यासाठी अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बुलढाणा, बीड, जळगाव, नागपूर, यवतमाळ, ठाणे, पुणे आणि कोल्हापूर येथे खास न्यायालये कार्यरत.

➲ महिला आणि मानसिक अपंग मुलींवरील अत्याचारासंबंधीची गुन्हा प्रकरणे निकालात काढण्यासाठी २५ खास जलद गती न्यायालये प्रस्तावित.

➲ **हुंडाबळी प्रतिबंधक कारवाई :** राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा सतर्कता कक्षाची स्थापना.

➲ कामाच्या ठिकाणी तक्रार समित्या: सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या समित्या ४५ पोलीस पथक मुख्यालयांमध्ये तसेच राज्य सीआयडी मुख्यालय, पुणे येथे स्थापन.

➲ **महिलांच्या तक्रारींबाबत पोलीस अधिकारी आणि पोलीस यांची संवेदनाक्षमता:** महाराष्ट्र पोलीस ॲकॅडेमी, नाशिक येथील पोलीस अधिकाऱ्यांच्या मूलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रमात महिला आणि बालकांविरुध्दचे गुन्हे आणि लिंग प्रश्न अंतर्भूत आहेत.

**राहुल भालेराव**



**राजेंद्र मुळक**
(वित्त, ऊर्जा, नियोजन, जलसंपदा, संसदीय कार्य आणि राज्य उत्पादन शुल्क राज्यमंत्री)

## जलसंपदा

➲ गेल्या ५ वर्षात (२००७-०८ ते २०११-१२) ५.९५ लाख हेक्टर अतिरिक्त जलसिंचन क्षमता तयार केली गेली. गेल्या ३ वर्षात ५०० हून अधिक प्रकल्प पूर्ण.

➲ जल व्यवस्थापनाच्या बाबतीत शासनाने घेतलेल्या उपक्रमांमुळे निर्मित जलसिंचन क्षमतेच्या प्रत्यक्ष उपयोगाचे प्रमाण ६७ टक्केपर्यंत वाढवले गेले .




➲ राज्यासाठीचे जलधोरण तयार करणे, जलसंबंधी लेखापरीक्षणाचा सक्षम निर्देशांक दाखल करणे, महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरण तसेच महाराष्ट्र जलसिंचन प्रणाली शेतकरी व्यवस्थापन या कायद्यांची निर्मिती.

➲ २८६ प्रकल्पामधील धरण सुरक्षितता कामांसोबतच २३५ प्रकल्पांमधील ६.४५ लाख हेक्टर प्रभावित क्षेत्र पुनर्स्थापित करण्यासाठी महाराष्ट्र शासन जागतिक बँकेच्या रु. १,८६० कोटींच्या साहाय्यामधून महाराष्ट्र जलक्षेत्र सुधारणा प्रकल्प राबवत आहे.

➲ राज्य शासनाला केंद्रीय साहाय्यता/ केंद्रीय कर्ज साहाय्यता यामधून ६९ मोठे-मध्यम प्रकल्प/ प्रकल्प घटक आणि १८६ लघु पाटबंधारे

प्रकल्पांसाठी एआयबीपी अंतर्गत रु. ११,०६९.५८ कोटींचा निधी प्राप्त आतापावेतो ४० मोठे-मध्यम जलसिंचन प्रकल्प/प्रकल्प घटक आणि ११० एमआय प्रकल्प पूर्ण झाले असून या कार्यक्रमांतर्गत ६.४३ लाख हेक्टर जलसिंचन क्षमता निर्माण केली गेली आहे.

**ऊर्जा**

➲ क्षमतावृद्धी, गळती कमी करणे आणि मागणीच्या दिशेने व्यवस्थापन यासंबंधात सुधारणा आणि कृषी पुरवठ्याचे विभक्तीकरण आणि मागणीच्या दिशेने व्यवस्थापन यासंबंधीतील सिंगल फेजिंग योजना असे विविध उपक्रम राबवण्यात आले.




➲ मोठ्या प्रमाणावर मीटर बदलणे, अधिक तोटा होणाऱ्या भागात निवेशावर आधारित वितरण विशेष हक्क प्रणाली राबवणे, फीडरनुसार लोडशेडिंग, चोरी शोधासाठी विशेष पोलीस ठाण्यांसह विशेष पथकांचे मोठ्या प्रमाणावर संचालन तसेच पायाभूत सुविधा विकास योजना राबवणे आणि विविध माहिती तंत्रज्ञान उपक्रमांचा उपयोग हे उपक्रम राबवण्यात आले.

➲ येत्या ५ वर्षातील मागणी भागवू शकेल अशा रीतीने महाजेन्को, केंद्रीय क्षेत्र आणि खाजगी विद्युतनिर्माते यांच्याकडून वीज घेऊन क्षमतावृद्धी केली जात आहे. या उपक्रमाचे परिणाम दिसू लागले असून महाराष्ट्र आता जवळजवळ लोडशेडिंग मुक्त असे राज्य झाले आहे.

➲ कॅपेक्स योजना/इन्फ्रा योजना यशस्वीरीतीने राबवल्या गेल्यामुळे एमएसईडीसीएल यांना आपले वितरण जाळे शक्तिशाली करता आले आहे. याचा परिणाम म्हणून ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होण्याचा दर आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये १६ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०१२-१३ मधील ७ टक्क्यांपर्यंत कमी करता आला आहे.

➲ फीडरप्रमाणे वितरण व्यावसायिक तोटा मूल्यमापन कल्पना राबवण्यास सुरुवात केली गेली असून यामध्ये वसुली कमी आणि तोटा अधिक असलेल्या क्षेत्रात अधिक लोडशेडिंग केले जाते.

➲ उद्योगांना आता २४ तास विद्युतपुरवठा केला जात असून औद्योगिक फीडर्सवर कोणतेही लोड शेडिंग केले जात नाही.

➲ कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास आणि रात्री १० तास असा वीजपुरवठा आळीपाळीने केला जातो.

➲ गेल्या ५ वर्षांमध्ये वीज मागणी-पुरवठा तफावत ही १८ टक्क्यांवरून ३ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र आज किंमत देऊ इच्छिणाऱ्या सर्वांना वीजपुरवठा करू शकत आहे.

**वित्त**

➲ विक्रीकर विभागाने व्हॅट कर देणाऱ्यांसाठी सोप्या, गतिमान आणि सहज घेता येईल अशा ई-सेवांचा फायदा देण्यासाठी पुढाकार घेतला.

➲ स्वयंचलित यंत्रणेव्यतिरिक्त ई-सेवांची सुरुवात, इलेक्ट्रॉनिक रिटर्नस्, ई-पेमेंट, सीए यांचे ई-लेखा अहवाल, अर्जाची ई-नोंदणी, असे काही बदल केले गेले.


➲ संकेतस्थळावर अधिनियम, नियम आणि अधिसूचनांसह, परिपत्रके आणि कार्यप्रणाली पुस्तिका इत्यादी सर्व माहिती पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सेवा सर्व ई- सेवा करदात्यांना उपलब्ध आहेत.

➲ इलेक्ट्रॉनिक सादरीकरणामुळे खर्च, वेळ आणि त्रास वाचला आहे.



डी. पी. सावंत

(वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, विशेष साहाय्य आणि अपारंपरिक ऊर्जा राज्यमंत्री)




➲ राज्यातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेता यावे यासाठी शिक्षण संस्थांशी करार, याद्वारे उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास साहाय्य.

➲ नवीन संशोधनाला प्राधान्य देण्यासाठी विद्यापीठात अत्याधुनिक पायाभूत सुविधांची उपलब्धता.

➲ आदिवासी क्षेत्रात २८ शासकीय निवासी शाळांचे निवासी व्यवसाय प्रशिक्षण आश्रमशाळांत रूपांतर.

➲ नांदेड व जालना जिल्हयात डिजिटल ग्रंथालये सुरू.

**कौशल्य विकास मोहीम**

➲ नोकरीच्या संधींसाठी सुधारित कौशल्यांचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम. राष्ट्रीय कौशल्य विकासाच्या आधारे कौशल्य मागणी पुरवठा अभ्यास पूर्ण.

➲ मॉड्युलर एम्प्लॉयेबल स्किल्स कार्यक्रमांतर्गत ९५७ व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबवले गेले आहेत. या सोबतच स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना, हुनर से रोजगार योजना व अंतर्गत विविध अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबवले गेले आहेत.

➲ पहिले करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशन केंद्र गडचिरोली येथे १५ डिसेंबर २०१२ रोजी स्थापन केले गेले.

➲ २८ आदिवासी निवासी शाळांचे निवासी व्यावसायिक आश्रमशाळांमध्ये (मिनी आयटीआय) रूपांतर. १०० गुणवत्ता केंद्रे कार्यरत.

➲ सार्वजनिक खाजगी भागीदारीतून २५० हून अधिक आयटीआय स्थापन. ९५ आयटीआयमध्ये स्मार्ट क्लासरूम.

➲ अतिथी सेवाक्षेत्रात टाटा समूहाच्या इंडियन हॉटेल्सच्या भागीदारीत दूर शिक्षणाद्वारे ई-लर्निंगची सुरुवात.

➲ ७ शासकीय नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या निर्मितीसाठी जमीन हस्तांतरण कार्यवाही प्रगतिपथावर.

➲ शासकीय दंत व वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयांमध्ये ४४६६ परिचर्या संवर्गातील पदांची निर्मिती. राज्यात पॅरामेडिकल व परिचर्या मंडळाची स्थापना.

➲ निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात वाढ.

➲ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमबीबीएस प्रवेशाच्या २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून एकूण ४०० जागांची वाढ



राजेंद्र गावित
(आदिवासी विकास, कामगार, पाणलोट क्षेत्र विकास आणि फलोत्पादन राज्यमंत्री)

## आदिवासी विकास

➲ आदिवासी विभागात केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट योजना) या योजनेंतर्गत प्रति लाभार्थी अनुदान मर्यादेत रू. १५,००० वरून रुपये ५०,००० वाढ.

➲ शासकीय आश्रमशाळांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य पुरवठा करण्यास मान्यता.



➲ आदिवासींना सेवा पुरविण्यास सुलभता यावी याकरिता ५ नवीन प्रकल्प कार्यालयांची निर्मिती व कर्मचारी संख्येत वाढ.

➲ शासकीय वसतिगृहांच्या प्रवेशासाठी ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही पद्धती लागू.

➲ वसतिगृहाबाहेरील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून निर्वाह भत्ता मंजुरी प्रस्तावित

**फलोत्पादन**

दुष्काळग्रस्त १८ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत फळबाग पुनर्जीवनासाठी रु. ६५६ कोटीचे शेतकऱ्यांना वाटप. शेतकऱ्यांना प्रति हेक्टर रू.३०,००० प्रमाणे आर्थिक मदत.

कृषी व फलोत्पादन व इतर क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल महाराष्ट्राचा राष्ट्रीय स्तरावर सन्मान.

२०१३-१४ मध्ये राज्यातील दुष्काळामुळे संपूर्ण जळालेल्या फळबागांना रोजगार हमी योजनेशी निगडित पुनर्लागवड कार्यक्रम राबवण्याबाबत दुष्काळग्रस्त पुणे, सोलापूर, अहमदनगर, सातरा, सांगली, धुळे, जळगाव, औरंगाबाद, परभणी, जालना, बीड, उस्मानाबाद, बुलढाणा या क्षेत्रातील २०,००० हेक्टरला मंजुरी.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातर्गत २०१२-१३ पर्यंत ६४९० सामूहिक शेततळी पूर्ण.

२०११-१२ पासून नारळ पिकासाठी स्वतंत्र फळपीक विमा योजना कार्यान्वित.

२०१३-१४ मध्ये सर्वसाधारण घटकांकरिता ३०,४९६ हेक्टर क्षेत्रावर पीक संरक्षण कार्यक्रम मंजूर.

**कामगार**

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकरिता २०१३-१४ वर्षाकरिता रु. १७.७५ कोटींची तरतूद.

नोंद झालेल्या स्त्री लाभार्थी घरेलू कामगारास रु. ५,००० प्रसूती लाभ (दोन अपत्यांपर्यंत)

**विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती**

आदिवासी विद्यार्थ्यांमधील शाळा सोडण्याचे प्रमाण कमी व्हावे या हेतूने सुवर्ण जयंती आदिवासी शिष्यवृत्ती योजना राबवली जात आहे. इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांना वार्षिक रु. १,०००, इयत्ता ५ ते ७ च्या विद्यार्थ्यांना वार्षिक रु. १,५०० आणि इयत्ता ८ ते १० च्या विद्यार्थ्यांना वार्षिक रु. २,००० अशी शिष्यवृत्ती दिली जाते. आदिवासी उपयोजनेंतर्गत या योजनेसाठी वर्ष २०१३ -२०१४ मध्ये रु. २०३.६८ कोटींची रक्कम मंजूर केली गेली आहे. या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ ११ लाख विद्यार्थ्यांना होत आहे.

आकाश जगधने



सुरेश धस
महसूल, पुनर्वसन व मदतकार्य, भुकंप, पुनर्वसन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग, जलसंधारण, रोजगार हमी योजना राज्यमंत्री

➲ उत्तराखंड येथील आपत्तीनंतर तातडीने भेट देऊन तेथे अडकलेल्या महाराष्ट्रातील भाविकांना सुखरूप परत आणण्यासाठी व आवश्यक ती मदत पुरवण्यासाठीच्या कार्याचे प्रभावी संनियंत्रण

**मदत व पुनर्वसन**

➲ खरीप २०११, रब्बी २०११-१२, खरीप २०१२ हंगामातील शेतकऱ्यांना २१८३.०४ कोटी रु. निधीचे वाटप.

➲ अतिवृष्टी बाधित जिल्ह्यात आपादग्रस्तांना निधीचे तत्काळ वाटप.

**सहकार**

➲ आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने सहकारी चळवळीतील उत्कृष्ट कार्याबद्दल सहकार महर्षी, सहकारभूषण, सहकारनिष्ठ पुरस्कारांचे वितरण




➲ महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहे.

➲ सहकारी संस्था स्थापनेच्या अधिकाराला घटनेच्या मूलभूत अधिकाराचा दर्जा देणारी ९७वी घटना दुरुस्ती मंजूर. या दुरुस्तीन्वये सहकारी संस्था अधिनियम १९६० यामध्ये बदल.

➲ साखर उद्योगाला विविध सवलती जाहीर

➲ दुष्काळी परिस्थिती असतानाही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतर्फे उद्दिष्टापेक्षा जास्त रकमेचे वाटप

➲ शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असलेल्या जिल्ह्यांमध्ये सहकारी पतसंस्थांनी केलेल्या वाढीव कृषी कर्ज वाटप आणि वाढीव

कृषी कर्जाची वसुली याबद्दल प्रोत्साहनपर बक्षिसे

**डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना**

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना ६ टक्के वार्षिक व्याज दराने पीक कर्ज देण्याचे धोरण तयार केले आहे. परंतु डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेमुळे रु. १ लाखापर्यंत पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना मूळ कर्ज रकमेवर ३ टक्के सवलत (इन्सेन्टिव्ह) मिळते आणि १ लाखाहून अधिक आणि ३ लाखांपर्यंत कर्ज रकमेवर २ टक्के सवलत मिळते.

केंद्र शासनाच्या व्याजासंबंधीच्या शासकीय आर्थिक अनुदानाचा विचार करता ज्या शेतकऱ्यांनी कर्जरक्कम वेळेवर परत केली आहे अशांना पीक कर्ज शून्य टक्के व्याजदराने मिळते. गेल्या वर्षात राज्य शासनाने या योजनेखाली राज्यात रु. १४५ कोटींची रक्कम वितरित केली.

**दुष्काळप्रवण जिल्ह्यांमधील पीक कर्जाचे रूपांतरण**

राज्यातील १६ दुष्काळप्रवण जिल्ह्यांमधील एकूण रु. ७,५८८ कोटींच्या पीक कर्जाचे (खरीप ७,१४५ कोटी आणि रब्बी ४४३ कोटी) रूपांतर मध्यम अवधी कर्जामध्ये केले गेले आहे. यामुळे या जिल्ह्यांमधील शेतकरी आता २०१३-१४ मध्ये पीक कर्ज मिळविण्यासाठी पात्र झाले आहेत.

**पणन**

➲ बाजार समित्यांची संख्या २९५ वरून ३०२ झाली.

➲ राज्य शासनाच्या पाठपुराव्यामुळे केंद्राने कांदा निर्यात बंदी मागे घेतली.

➲ मुंबई टर्मिनल मार्केट खाजगी भागीदार निवड तर नागपूरकरिता जागा हस्तांतरण प्रक्रिया अंतिम टप्प्यात.

➲ शेतमाल तारण योजनेंतर्गत रु. २० कोटीचे अर्थसाहाय्य.



उदय सामंत

(नगरविकास, मराठी भाषा विभाग, विधी व न्याय विभाग, क्रीडा व युवक कल्याण, वने, बंदरे, खार- जमीन, माजी सैनिक कल्याण व मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री)

**मुंबई महानगर प्रदेश विकास**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशात पायाभूत सुविधांचे विविध प्रकल्प कार्यान्वित.



➲ १७ फ्लायओव्हर्स वाहतुकीसाठी खुले.

➲ ३६ स्कायवॉक पादचाऱ्यांसाठी खुले.

सुमारे २५ हजारांवर शौचालयांची निर्मिती.

**नजीकच्या काळातील प्रकल्प**

➲ विस्तारित मुंबई नागरी सुविधा प्रकल्प- अंदाजे २७५ कि.मी. लांब रस्ते निर्मिती. अपेक्षित खर्च रु २,६०० कोटी, १४ फ्लायओव्हर, ३ खाडीपूल, २ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणार

➲ कुलाबा- बांद्रा -सिप्झ मेट्रो रेल्वे कॉरिडॉर, अंतर- ३३.५ कि.मी, अपेक्षित खर्च रु २४,३४० कोटी. उत्तर - दक्षिण मुंबई जोडली जाणार

➲ विरार- अलिबाग कॉरिडॉर, अंतर- १२६ कि.मी. खर्च -१२,९७५ कोटी.

➲ मुंबई ट्रान्स हार्बर लिंक- अंतर -२२ कि.मी, खर्च- ९,६३० कोटी. आंतरराष्ट्रीय विमानतळ नवी मुंबईशी थेट जोडले जाणार.

➲ बृहन्मुंबईतील कोळीवाड्याच्या पुनर्विकासासाठी गावठाणांच्या धर्तीवर २.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबत अधिसूचना निर्गमित.

➲ मोबाइल टॉवर उभारणीसाठीचे धोरण प्रारूप प्रसिद्ध. त्यास अंतिम स्वरूप देण्याची कार्यवाही सुरू आहे.

➲ नवी मुंबई, पुणे व नागपूर मेट्रो रेल प्रकल्पांना तत्त्वत: मंजुरी

**न्यायाला जोड तंत्रज्ञानाची**

➲ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती व इतर न्यायमूर्ती यांनी १५ ऑगस्ट २०१३ पासून ई-कोर्ट हे प्रायोगिक तत्त्वावर सुरू केले. उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेमध्ये कंपनी ॲक्ट १९५६ च्या सेक्शन ३९१ खाली येणारी कंपनी पिटीशन्सची प्रकरणे ५ ऑगस्ट २०१३ पासून ई-फाईलिंगद्वारे स्वीकारण्याचा निर्णय. अशा प्रकरणांमध्ये वकील आणि प्रतिवादी व्यक्ती यांना मूळ सॉफ्ट कॉपीज पेन ड्राइव्हवरून किंवा कॉम्पॅक्ट डिस्कमधून मूळ शाखेच्या नोंदणी शाखेमध्ये सादर करता येणार आहेत. याशिवाय लिखित दस्तऐवजसुध्दा देता येईल. ई-कोर्ट मुळे वकील व प्रतिवादींना न्यायिक कार्यवाहीमध्ये सुलभता शक्य. ई-कोर्ट मुळे न्यायालयीन कामकाज कागदपत्रविरहित होईल. शासनामार्फत कागदपत्रांचे प्रतिमांकन (डिजीटायझेशन) केले जात आहे. आतापर्यंत ६४,००० प्रलंबित नस्त्यांचे प्रतिमांकन करण्यात आले. त्यामुळे न्यायालयामधील कर्मचारी वर्गाला कागदपत्रे त्वरेने व सहजतेने उपलब्ध होतील.

➲ ई-कोर्टाची स्थापना केल्यामुळे इंटिग्रेटेड इलेक्ट्रॉनिक लिटिगेशन पद्धतीद्वारे वकील व प्रतिवादी यांचा वेळ, अर्थ व प्रयत्न याची मोठ्या प्रमाणात बचत शक्य.

➲ केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे स्थापन केलेली १०० जलदगती न्यायालये मुदत संपल्यानंतर राज्य शासनाच्या खर्चाने पुढील ५ वर्षे चालू ठेवण्याचा निर्णय. अंमलबजावणी १ एप्रिल २०११ पासून करण्यात आली.




➲ जलदगती न्यायालयात मागासवर्गीयांवरील व महिलांवरील अत्याचार/ बलात्कार, भ्रष्टाचार, मोटार अपघात दाव्यांची भरपाई, न्यायालयीन बंदी व भूसंपादन

यासारखी गंभीर स्वरूपाची प्रकरणे आणि जास्त प्रमाणात प्रलंबित असलेली प्रकरणे प्राथम्याने व गतीने चालवण्याकरिता जलदगती न्यायालयांकडे वर्ग करावीत, असे स्पष्ट सूचित करण्यात आले आहे.

➲ राज्यात केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सी.बी.आय) यांनी दाखल केलेली प्रकरणे निकाली काढण्यासाठी मुंबई-४, नागपूर-३, पुणे- अमरावती येथे प्रत्येकी १ याप्रमाणे विशेष न्यायालये स्थापन.

➲ या विशेष न्यायालयांमध्ये केवळ केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सी.बी.आय.) यांनी दाखल केलेली प्रकरणे चालवली जातात. याव्यतिरिक्त अन्य कोणतीही प्रकरणे चालविण्यात येत नाहीत.

**वन विभाग**




➲ ६४८ चौरस किलोमीटर्स क्षेत्र व्यापणारी १० नवी वन्यप्राणी अभयारण्ये जाहीर केली गेली असून यामुळे राज्यातील संरक्षित क्षेत्रांची संख्या वाढून ५० झाली आहे.

➲ नागझिरा नवीन, नवेगाव नवीन, उरमेड-कऱ्हांडला, ताम्हणी, कोलामार्क ही पाच नवीन वन्यजीव अभयारण्ये घोषित.

➲ संरक्षित क्षेत्रांमधील खेडयांचे पुनर्वसन.

➲ वाघ संरक्षण आणि संवर्धनासाठी राबवण्यात आलेल्या विविध उपाययोजनांमुळे महाराष्ट्रातील वाघांच्या संख्येत १७० वरून २०० एवढी वाढ.

➲ सुप्रसिद्ध एनजीओ सँक्च्युअरीमार्फत महाराष्ट्राचा 'सर्वोत्कृष्ट व्याघ्र राज्य २०१३' म्हणून गौरव.

**जैवविविधता**

➲ महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ स्थापन केले गेले असून त्याचे मुख्यालय नागपूर येथे आहे. हे मंडळ जैवविविधता याद्या तयार करणे, वारसा ठिकाणे जाहीर करणे, सूक्ष्म योजना तयार करणे तसेच जागरूकता कार्यक्रम निर्मितीसाठी वेगवेगळया जैवविविधता समित्या स्थापन करण्याचे काम करीत आहे.

**क्रीडा व युवक कल्याण**

➲ क्रीडा धोरण जाहीर

➲ विभागीय/जिल्हा/तालुका क्रीडा संकुलाची निर्मिती

➲ क्रीडापटूंना शासकीय नोकरी

मीनल जोगळेकर



संजय सावकारे
( कृषी, पशुसंवर्धन व दुग्धविकास, सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती कार्य, विमुक्त आणि भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण, रोजगार-स्वयंरोजगार राज्यमंत्री)

**कृषी**

➲ कृषी विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेताना शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात २०० ते २५० प्रयोगशील शेतकऱ्यांशी चर्चा.

➲ हवामान आधारित पीक विमा योजना, सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना.

➲ कृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली कृषी हवामान विभागानुसार अभ्यासगटांची स्थापना, कोरडवाहू शेती अभियान, स्वयंचलित हवामान केंद्र उभारणी, सूक्ष्म सिंचन योजनेची ऑनलाइन उभारणी आणि अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा, जिल्हास्तरावर रासायनिक खतांचा बफर स्टॉक.

**मृद् आरोग्य सुधार कार्यक्रम**

➲ मातीचे आरोग्य सुधारणे तसेच खतांचा सर्वोत्तम वापर होऊन पीक उत्पादकता वाढावी या हेतूने, राज्यातील १४,००० गावांतील मातीच्या कसाचा निर्देशांक तयार केला गेला आहे.

➲ शेतकऱ्यांना ९.८० लाख मृद् आरोग्य पत्रके वितरित करण्यात आली असून यासाठी रु. १०.९८ कोटींचा खर्च केला गेला आहे.

**ई-परवाना**

➲ शेतीसाठी लागणाऱ्या विविध मालाचा पुरवठा करणाऱ्या विक्रेत्यांना ऑनलाईन परवाने देण्यासाठी एक संगणक कार्यक्रम विकसित केला गेला आहे. यामुळे यासाठीच्या अर्जांचा त्वरित निपटारा करण्यात मदत झाली असून या कामात पारदर्शिकताही आली आहे. या योजनेला राज्य स्तरावरील ई-गव्हर्नन्ससाठीचा गुणग्राहकता पुरस्कार मिळाला आहे.

**सामाजिक न्याय**

➲ समाजातील दुर्बल घटकातील मुला-मुलींना चांगले शिक्षण घेता यावे यासाठी १०० नवीन वसतिगृहे सुरू.




➲ मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना वेळेवर मिळावी व प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी ही योजना ऑनलाइन करण्यात आली शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा.

➲ सन २०१३-१४ सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन तसेच शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन करण्याचे निश्चित.

➲ व्यसनमुक्तीच्या कार्यक्रमाबाबत महिलांमध्ये जागृती व्हावी यासाठी समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांची ब्रॅन्ड ॲम्बॅसिडर म्हणून नेमणूक.

➲ अपंगांच्या शाळांना १०० टक्के अनुदान.

**पशुसंवर्धन व दुग्धविकास**

➲ सहा दुधाळ जनावरे वाटप कार्यक्रम : या कार्यक्रमांतर्गत २०१२-१३ मध्ये १३०२ लाभार्थ्यांना अनुदान वाटप.

➲ ग्रामीण भागातील महिलांना सुरक्षित रोजगार मिळावा यासाठी, बचतगटाकडून कुक्कुटपालन स्वयंरोजगार योजना राबवण्यात येत आहे. योजनेवर ३.३७ कोटी रुपये इतका निधी खर्च.

➲ वैरण विकास- टंचाईच्या परिस्थितीत पशुधनाला मुबलक पशुखाद्य उपलब्ध व्हावे यासाठी वैरण उत्पादनाच्या विविध योजना कार्यान्वित.

(पान ४३ वरून)

करून देणे, या संदर्भातील धोरण सुटसुटीत करण्याची विदर्भातील जनतेची दीर्घ काळापासून मागणी होती. २०११ च्या हिवाळी अधिवेशनादरम्यान या संदर्भातील धोरण मंजूर करण्यात आले. सुधारित धोरणांतर्गत भाडेपट्ट्यांमध्ये भरीव सवलत देण्यात आली. हस्तांतरणाच्या परवानगीची पद्धत सोपी करण्यात आली असून हस्तांतरणासाठीचे शुल्क वाजवी करण्यात आले. भाडेपट्टाधारकास भोगवट्याने जमीन मिळण्याचा अधिकार उपलब्ध करून देण्यात आला.

**भूमिधारी ते भूमिस्वामी**

विदर्भातील भूमिधारी शेतकऱ्यांचे भूमिस्वामी शेतकऱ्यांत रूपांतर करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत आहे.

**महानगरपालिका क्षेत्रात अकृषक परवानगी**

महानगरपालिका क्षेत्रातील अकृषक परवानगी देण्याच्या प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी आणि अकृषिक परवानगी देण्याची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याअंतर्गत ज्या ठिकाणी विकास आराखडा शासनाने मंजूर केला आहे, जो भाग निवासी क्षेत्र म्हणून विकास आराखडयात आरक्षित आहे, ज्या प्रकरणी महानगरपालिकेने बांधकाम प्रस्ताव मान्य करून बांधकाम सुरु करण्यास परवानगी दिली आहे, अशा प्रकरणांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक ती अकृषक परवानगी, दोन दिवसांच्या कालावधीत देण्याची दक्षता घ्यावी असा शासनाने निर्णय घेतला आहे.

**वाळू लिलावासाठी ई टेंडरिंग**

वाळू लिलावात अधिकाधिक पारदर्शकता यावी यासाठी ई टेंडरिंग पद्धती प्रत्येक विभागाच्या एका जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आली. पुढील वर्षापासून राज्यात सर्वत्र वाळू लिलावासाठी ई टेंडरिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**मुद्रांक शुल्क कार्यालयांचे अद्ययावतीकरण**

मुद्रांक शुल्कापोटी सुमारे १७ हजार कोटी रुपये राज्याच्या तिजोरीत जमा होतात. खरेदी विक्री व्यवहार व इतर कामांसाठी सामान्य जनतेचा मुद्रांक शुल्क व नोंदणी कार्यालयाशी नियमित संपर्क येतो. जनतेस उत्तम सेवा व सुविधा मिळाव्यात या हेतूने राज्यातील सर्व मुद्रांक शुल्क व नोंदणी कार्यालयांच्या सुशोभिकरणास प्रारंभ झाला आहे. मुद्रांक शुल्क व्यवहारात गतिमानता आणि पारदर्शकता यावी यासाठी जमीन खरेदी विक्रीचे व्यवहारही संपूर्णत: संगणकीकृत करण्यात आले आहेत. इंटरनेटचा वापर करून मुद्रांक शुल्क अदा करणे, नोंदणीसाठीची वेळ निश्चित करणे, हे प्रकल्प राबवले आहेत.

**नविन उपविभागांची निर्मिती**

क्षेत्रीय स्तरावरील महसूल कार्यालयाची पुनर्रचना व सक्षमीकरण करण्यासाठी राज्यात दोन तालुक्यांचे एक उपविभागीय कार्यालय याप्रमाणे ६७ नवीन उपविभाग निर्माण करण्यात आले अहोत.

**अर्चना शंभरकर**

# लोकराज्य एका क्लिकवर




लोकराज्य हे केवळ नियतकालिक नाही तर तो आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा साथीदार आहे. गेल्या सहा दशकातील महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहासात अभूतपूर्व ठरलेली सारी परिवर्तने–आवर्तने यांचे प्रतिबिंब लोकराज्यमधून उमटलेले दिसून येते. लोकराज्यचे संदर्भमूल्य मोठे आहे. म्हणूनच लोकराज्यच्या जुन्या अंकांची नेहमीच मागणी होत असते. संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी यांना लोकराज्य नेहमीच खुणावत आला आहे. तत्कालीन घटना–घडामोडी–निर्णयाचा अचूक संदर्भ लागण्यासाठी हे अंक मोलाची मदत करतात. असे असूनही लोकराज्यचे सर्व जुने अंक सर्वांपर्यंत पोहचणे शक्य नव्हते. मात्र माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरीत हा प्रश्न सोडविला आहे. लोकराज्यचे सर्व अंक डिजिटाइज्ड रूपात जतन करून ते संकेतस्थळाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहचवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेऊन तो पूर्ण करण्यात आला आहे. आता माऊसच्या एका क्लिकसरशी आपण हवा तो अंक ऑनलाइन वाचू शकतो.




एवढेच नाही तर तो डाऊनलोड करून कायमस्वरूपी सॉफ्ट स्वरूपात स्वत:कडे ठेवू शकतो.

लोकराज्यचे जुने अंक म्हणजे महाराष्ट्राचा वैभवशाली वारसा आहे. हा वारसा आता कायमस्वरूपी जतन झाला आहे. लोकराज्यच्या स्थापना वर्षापासून म्हणजे १९४७ पासूनचे हे अंक आहेत. यानिमित्ताने वाचकांना आणि अभ्यासकांना स्मृतीची कितीतरी पाने चाळता येतील.




माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संकेतस्थळ dgipr.maharashtra.gov.in यावर हे अंक उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर प्रकाशने शाखा या कॉलममध्ये गेल्यावर डिजिटाइज्ड लोकराज्यवर क्लिक केल्यास लो रेझोल्युशन लोकराज्य आणि हाय रेझोल्युशन लोकराज्य असे दोन पर्याय पाहायला मिळतील. आपण हवा तो पर्याय निवडू शकतो. शिवाय आपणास आवश्यक असलेल्या पानांची प्रिंटदेखील काढू शकतो.

माहिती जनसंपर्क महासंचालनालयाने प्राधान्यक्रमाने हाती घेतलेला डिजिटायजेशन ऑफ लोकराज्य हा प्रकल्प पुणे येथील सी-डॅक संस्थेच्या मदतीने मूर्त रूपात आला आहे. लोकराज्यचे जुने अंक सोबतच अनेक दुर्मीळ विशेषांक वाचण्याची संधी आता उपलब्ध झाली आहे. वाचक, अभ्यासक आणि संशोधकांसाठी ही मोठी पर्वणी आहे.

**किरण केंद्रे**




# ई-गव्हर्नन्स




➲ सर्वसमावेशक असे ई-गव्हर्नन्स धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य. धोरणातील ८० टक्क्यांहून अधिक बाबींची ठरवलेल्या कालावधीअगोदरच अंमलबजावणी.

**यूआयडी (आधार)**

➲ यूआयडी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या बाबतीत राज्य देशात अग्रेसर. ७.७ कोटींहून अधिक रहिवाशांची नावनोंदणी पूर्ण. ६.६ कोटी रहिवाशांसाठी यूआयडीची निर्मिती.

➲ सिंधुदुर्ग आणि परभणी या जिल्ह्यांव्यतिरिक्त इतर सर्व ३३ जिल्ह्यांची यूआयडीशी संलग्न एलपीजी अनुदानातील थेट लाभ योजनेसाठी निवड.

➲ सध्या यूआयडीशी संलग्न एलपीजी अनुदानातील थेट लाभ योजनेमध्ये वर्धा (८५ टक्के) आणि अमरावती (४५ टक्के) काम पूर्ण.

➲ वर्धा आणि अमरावतीमध्ये आजपर्यंत रु. १२ कोटी इतकी रक्कम



यूआयडीशी संलग्न एलपीजी अनुदानातील थेट लाभ योजनेंतर्गत अदा.

➲ राज्य रहिवासी माहिती केंद्र (एसआरडीएच) सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य. हे केंद्र म्हणजे यूआयडी अंतर्गत माहिती, लोकसंख्याविज्ञान आणि छायाचित्र यांचा एक आतिशय सुरक्षित कोश आहे. शासनाने हा माहितीकोश सुधारित केला आहे. माहिती बीजारोपणासाठी हाच कोश व्यापकरित्या उपयोगात आणला जातो.

➲ यूआयडीएआय अंतर्गत आपली स्वत:ची प्रमाणीकरण यंत्रणा उभारणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य .

➲ यूआयडीशी संलग्न असे एसएडीएम (अपंगत्वाची चाचणी घेणारा संगणकीय कार्यक्रम) सारखे विविध उपक्रम सुरू. केंद्र शासनामार्फत हे उपक्रम देशात कार्यान्वित करण्यासाठी स्वीकृत.

**ई-ऑफिस**

➲ प्रशासनात कागदविरहित कार्यालयाची सुविधा देण्यासाठी ई-ऑफिस प्रणाली राबवण्यास प्रारंभ.

➲ महाराष्ट्र शासनाने मुंबई येथे एक अत्याधुनिक डाटा केंद्र स्थपित केले आहे.

➲ शासकीय क्लाऊड यंत्रणेचा उपयोग करणारे हे देशातील एकमेव केंद्र असून यामुळे राज्याच्या ई-गव्हर्नन्स योजना राबवण्यामधील वेळ आणि खर्च यांची भरपूर बचत.

**ई- निविदा प्रक्रिया**

➲ शासनाने रु. १० लाखांच्या वरील सर्व निविदांसाठी ई-निविदा प्रक्रियेचा उपयोग अनिवार्य केला आहे.

➲ आजवर ई-निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून रु. ४२,००० कोटींपेक्षा अधिक मूल्याच्या २७,००० निविदांचे व्यवहार केले गेले.

**नागरी सेवा**

➲ राज्यात आजपावेतो ३५,००० हून अधिक नागरिक सेवा केंद्रे सुरु.

➲ जानेवारी २०१३ पासून आजपावेतो १८.८८ कोटी ई-व्यवहार पार पाडले गेले.

➲ महत्त्वाच्या १६ नागरिक सेवा आणि त्यामधील ८० टक्क्यांहून अधिक व्यवहार हे संपूर्ण इलेक्ट्रॉनिक पद्धतीने केले जात आहे. यामध्ये येणारी प्रपत्रे, प्रक्रिया, निर्गमित प्रमाणपत्रे, देय रक्कम प्रक्रिया तसेच आवश्यक दस्तऐवज सोपे केले आहे.

➲ राज्य शासन स्थानिकीकरणावर महत्त्वपूर्ण भर देत असून शासनाच्या सर्व संकेतस्थळावरील (वेबसाइट) मुखपृष्ठ मराठी भाषेत आहेत. याशिवाय राज्य शासनाने सी-डॅक सोबत मराठी भाषेसाठी एक गुणवत्तेचे केंद्र स्थापित केले आहे. त्याद्वारे सर्व शासकीय वेबसाइटचे आणि उपयोगांचे स्थानिकीकरण, फाँटचे प्रमाणीकरण, युनिकोडमध्ये माहितीची निर्मिती आणि प्रशिक्षण तसेच क्षमता वाढविणे अंतर्भूत आहे.

➲ माहिती तंत्रज्ञान आणि ई-गव्हर्नन्सच्या विविध बाबींमध्ये गेल्या वर्षात २५,००० हून अधिक लोकांना प्रशिक्षित करण्यात आले.

➲ व्हर्च्युअल आयटी संवर्ग स्थापित करण्यात आला असून याद्वारे विविध विभागांमध्ये काम करणारे कर्मचारी माहिती तंत्रज्ञान (आयटी) तसेच ई-गव्हर्नन्समध्ये अधिक लक्ष केंद्रित करतील. यासाठी कर्मचाऱ्यांना त्यांच्या आधारभूत पगाराच्या १० टक्के अधिक रक्कम दिली जाईल.

**पारितोषिके आणि मान्यता**

➲ राज्य शासनाने ई-गव्हर्नन्समध्ये देशातील अग्रणी स्थान कायम ठेवले असून गेल्या ३ महिन्यात ५ मान्यवर अशा व्यासपीठांवरून ४३ पारितोषिके मिळवली आहेत. यात दिल्ली येथील ३३ व्या स्कोच (एसकेओसीएच) शिखर परिषदेतील विक्रमी १८ पारितोषिकांसह अतिशय मानाच्या अशा 'सर्वाधिक पारितोषिके मिळविणारे राज्य', या पारितोषिकाचाही समावेश आहे.

➲ राज्य शासनाने गेल्या काही वर्षात विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर एकूण १०३ पारितोषिके मिळविली आहेत.

➲ याशिवाय इतर काही प्रतिष्ठेच्या पारितोषिकांमध्ये राज्याचे माहिती तंत्रज्ञान सचिव यांना पंतप्रधानांच्या हस्ते २०१२ मध्ये देण्यात आलेल्या यूआयडीमधील नावीण्यपूर्ण राष्ट्रीय पुरस्काराचा समावेश आहे.

➲ माहिती तंत्रज्ञान विभागाच्या यूआयडी, राज्य डाटा केंद्र, क्लाऊड राबविणे, ई-कार्यालय, क्षमता, वृद्धी इत्यादी सर्व महत्त्वाच्या उपक्रमांनी गेल्या दोन वर्षात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर ५० पारितोषिके मिळविली आहेत.

**टीम लोकराज्य**



मुंबई शहराच्या आणि महानगराच्या पायाभूत गरजा पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे. यामध्ये ४५० कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग, १०० कि.मी. लांबीचे मोनो मार्ग, ८ मार्गिका असणारा १२६ कि.मी. लांबीचा विरारपासून अलिबागपर्यंतचा बहुउद्देशीय मार्ग, २२ कि. मी. लांबीचा मुंबई पोरबंदर प्रकल्प, मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (१,२ आणि ३), मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प आणि विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, नद्यांचा विकास, स्कायवॉक्स, जलस्रोत विकास आणि तळोजा येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अशा विविध प्रकल्पांचा त्यात समावेश आहे.

# महानगर

## प्रगतीच्या नव्या वळणावर





मुंबई शहरासह महानगर प्रदेशाची झपाट्याने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकानुसार प्रगती होत आहे. त्यानुसार सहज आणि सोपे दळणवळण, परवडणारी घरे, स्वच्छ पाणी, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने (एमएमआरडीए) मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाद्वारे अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. शंभराहून अधिक नव्या उपनगरीय रेल्वे गाड्या आल्या आहेत. नव्या बसेसची खरेदी करण्यात आली.

गेल्या दीडएक दशकामध्ये एमएमआरडीएसह वेगवेगळ्या शासकीय संस्थांनी अनेक उड्डाणपूल बांधले, शेकडो किलोमीटर लांबीचे रस्ते बांधले, विकसित केले, रेल्वे ओलांडणी पुलांबरोबरच मुक्तमार्ग बांधले. त्यामुळे या भागातील वाहतूक मोठ्या प्रमाणात गतिमान आणि सुरळीत झाली. मात्र हे सारे प्रयत्न आज अपुरे वाटतात कारण वाहनांची संख्या अविरतपणे वाढतेच आहे. दरदिवशी शहरामध्ये ४०० हून अधिक नव्या गाड्यांची नोंदणी होत असल्याने, वाहतुकीची कोंडी झाल्याचे दिसून येते. त्यामुळेच शासनामार्फत नवीन पायाभूत सुविधा प्रकल्प राबवण्यात येत आहेत.

**मोनोरेल यंदा धावणार**

वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा ११.४ कि.मी.लांबीचा मेट्रो मार्ग आणि चेंबूर-वडाळा-संत गाडगे महाराज चौकपर्यंतचा २० कि.मी.चा मोनो मार्ग हा मुंबईकरांसाठी आरामदायक मार्ग आहे. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो मार्ग आणि चेंबूर ते वडाळापर्यंतचा मोनोरेलचा टप्पा यावर्षी धावताना दिसणार आहे.

काही महिन्यांपूर्वी वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला पूर्व मुक्तमार्ग दक्षिण मुंबईकडे जाणाऱ्यांसाठी वरदान



ठरला आहे. या पूर्व मुक्तमार्गामुळे दक्षिण मुंबईपासून चेंबूरपर्यंतचा प्रवास आता केवळ २० मिनिटांत करता येणे शक्य होत आहे. मिलन सब-वे रेल्वे ओलांडणी पुलामुळे दरवर्षी पावसाळामध्ये पाणी साचून होणाऱ्या वाहतूक कोंडीवर कायमचा तोडगा सापडला आहे. याचप्रमाणे ११ उड्डाणपूल २ रेल्वे ओलांडणी पूल महानगर प्रदेशामध्ये उभारण्यात आले. ४ उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले करण्यात आले. अंतरराष्ट्रीय विमानतळाकडे थेट घेऊन जाणारा सहार उन्नतमार्गसुद्धा यावर्षी पूर्ण होणार आहे. सांताक्रुझ-चेंबूर जोड रस्ता आणि अमर महल जंक्शन येथील उड्डाणपुलाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मुंबई महानगर प्रदेशात जवळपास ३०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचा विकास प्रगतिपथावर आहे.

**वाहतूक व्यवस्थेवर ताण**

सर्वंकष वाहतूक अभ्यासामध्ये सुचवल्याप्रमाणे आज असलेली २.२ कोटी लोकसंख्या २०३१ पर्यंत ३.४ कोटींच्या घरात जाणार आहे, नोकरदारांची संख्या ७५ लाखहून १.५ कोटी पर्यंत जाणार आहे. कार्यालयात बसून काम करणाऱ्यांची संख्या २० लाखाहून ६० लाखावर जाणार असून औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या १० लाखांवरुन ४० लाखापर्यंत पोहोचणार आहे. केवळ या आकडेवारीवर नुसती नजर टाकली तर यापुढील काळामध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक व्यवस्था, घरे, पाणी आणि घनकचरा व्यवस्थापनाची आवश्यकता लागेल, याची कल्पना येऊ शकते.

**शासनाचे प्रयत्न**

या समस्येवर मात करण्यासाठी शासनस्तरावर सुयोग्य असे नियोजन करण्यात आले आहे. रेल्वे गाड्यांमध्ये आज एका चौरस मीटरमध्ये १६ व्यक्ती उभ्या राहून प्रवास करतात. ही संख्या ७ व्यक्तींपर्यंत आणून चाकरमान्यांचा प्रवास सहज सोपा करण्याकडे सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. शहरामध्ये बसेस किमान २० तर इतर वाहने किमान ३० कि.मी. प्रति तास या वेगाने धावण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू आहेत. मुंबई आणि महानगर प्रदेशात इप्सित ठिकाणापर्यंत कुठूनही केवळ एका तासात पोहोचता यावे या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. २४ तास अखंड विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, १०० टक्के सांडपाणी व्यवस्था, १०० टक्के घनकचरा व्यवस्थापन, पूरसदृश परिस्थिती हाताळण्याची संपूर्ण यंत्रणा आणि पर्यावरणाशी जवळीक साधणारी व्यवस्था उपलब्ध असेल असा झोपडपट्टीरहित महानगर प्रदेश साकारण्याचे सरकारचे स्वप्न आहे.

दरवर्षी किमान दीड लाख घरांची आवश्यकता भासते. त्यामुळे भाडे तत्त्वावरील घरे प्रकल्पासाठी उत्तेजन मिळते. बंदरे आणि विमानतळ विकास यामुळे गुंतवणुकीसाठी अनेक संधी उपलब्ध होतात त्याचबरोबर जमिनींचा विकासही होतो.

सरकारच्या विचाराधीन असलेले प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या तत्त्वानुसार करण्यात येत आहेत. शहराचा आणि महानगराचा विकास झाला तर त्याचे फायदे केवळ लोकांनाच नव्हे तर खाजगी क्षेत्रालाही मिळणार आहेत.

एकेकाळी मुंबईची वाहतूकव्यवस्था अत्यंत सक्षम मानली जाई. औद्योगिक विकासामुळे शहराला आर्थिक स्थैर्यही लाभले होते. मात्र,



वाढत्या लोकसंख्येमुळे अपुऱ्या ठरत जाणाऱ्या पायाभूत सुविधा, उद्योगांना इतर राज्यांकडे जाण्यास प्रवृत्त करीत आहेत. हा मुद्दा केंद्रानेही मान्य केला आहे आणि खाजगी क्षेत्रानेही मान्य करणे आवश्यक आहे. राज्याने योग्य दिशेने पावले उचलली आहेत.

**पूर्ण झालेले प्रकल्प**

■ १७ उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले केले गेले., ■ ३६ स्कायवॉक प्रवाशांसाठी खुले केले गेले., ■ मुंबई महानगर प्रदेशा (एमएमआर) विभागात १२ रस्ते, पश्चिम द्रुतगती मार्ग आणि पूर्व द्रुतगती मार्ग बांधण्यात आले., ■ एमएमआर विभागात २५,००० हून अधिक स्वच्छतागृह बांधली गेली., ■ बांद्र -कुर्ला कॉम्प्लेक्स आणि पवई येथे आवाज निरोधक बसविण्यात आले.

**राबवण्यात येत असलेले प्रकल्प**

■ **वर्सोवा–अंधेरी–घाटकोपर मेट्रो कॉरिडॉर :** ११.४ किलोमीटर्स–रु. २,३६५ कोटी...वर्सोवा ते घाटकोपर दरम्यान प्रवासाला लागणारा वेळ ७० मिनिटांपासून २० मिनिटांवर येईल. पूर्व–पश्चिम जोडणी होईल. ४ डब्बे असलेल्या मेट्रोद्वारे १,१७८ प्रवासी क्षमता असेल. याची चाचणी यशस्वी रीतीने सुरू आहे. मेट्रो कॉरिडॉर या वर्षाच्या अखेरीपर्यंत कार्यान्वित होणार आहे.

■ **चेंबूर–वडाळा–गाडगे महाराज चौक मोनो कॉरिडॉर :** २० किलोमीटर्स : रु. २,४६० कोटी. या कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्याच्या ८.८० किलोमीटर्स लांबीच्या चेंबूर–वडाळा भागाची चाचणी यशस्वीपणे पार पडली. सर्व ७ स्थानकांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मोनो रेल्वे दररोज ८ लाख प्रवाशांची वाहतूक करील. पहिला टप्पा या वर्षाच्या अखेरपर्यंत कार्यान्वित होईल. ११.२० किलोमीटर्स लांबीच्या वडाळा ते गाडगे महाराज चौक या दुसऱ्या टप्प्याचे काम वेगाने सुरू असून हा टप्पा ऑगस्ट २०१४ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

■ **पूर्व मुक्तमार्ग :** १६.४ किलोमीटर्स टप्पा -१ ऑरेंज गेट ते आणिक : ९.२९ किलोमीटर्स,१३ जून २०१३ रोजी वाहतुकीला खुला करण्यात आला आहे. (रु. ७२२ कोटी). टप्पा–२– आणिक ते पांजरपोळ– ४.३ किलोमीटर्स १३ जून २०१३ रोजी वाहतुकीला खुला करण्यात आला आहे. (रु. २२१.६४ कोटी). टप्पा–३ पांजरपोळ ते घाटकोपर २.८१ किलोमीटर्स डिसेंबर २०१३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे (रु. २९३.८७ कोटी).

■ **सहार उन्नत मार्ग** : २ किलोमीटर्स (रु. ३७७.५९ कोटी). या उन्नत मार्गामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळ सरळ पश्चिम द्रुतगती मार्गाला दोन्ही बाजूंच्या वाहतुकीने जोडला जाईल. बोगद्याचे काम ८५ टक्के पूर्ण. हा मार्ग नोव्हेंबर २०१३ मध्ये खुला होणे अपेक्षित.

■ **मिलन रेल्वे उड्डाणपूल** : ७०० मीटर्स – रु. ८४ कोटी. मिलन रेल्वे उड्डाणपूल २४ मे २०१३ रोजी वाहतुकीला खुला करण्यात झाला. या ७०० मीटर्सच्या रेल्वे उड्डाण पुलामुळे पूर्व–पश्चिम जोडणी शक्य झाली. या उड्डाणपुलामुळे प्रत्येक पावसाळ्यात पाणी भरल्यामुळे होणाऱ्या प्रदीर्घ वाहतूक कोंडी प्रश्नांवर कायमचा तोडगा निघाला.

■ **सांताक्रुझ-चेंबूर जोड मार्ग** : ३.५ किलोमीटर्स - रु. ४२८ कोटी. या मार्गामुळे पूर्व-पश्चिम जोडणी मिळेल. हा मार्ग ५० हजाराहून अधिक वाहनांसाठी मदत करील. ११० मीटर्स लांबीच्या रेल्वे उड्डाणपुलाचे काम प्रगतिपथावर. ४ हजार प्रकल्पग्रस्त कुटुंबांना पुनर्स्थापित करुन त्यांचे पुनर्वसन केले गेले. हा प्रकल्प मार्च २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित.

■ **अमर महाल जंक्शन उड्डाणपूल** : १,०९६ मीटर्स - रु. ७६ कोटी. हा उड्डाणपूल सांताक्रुझ-चेंबूर जोड मार्ग ते पूर्व द्रुतगती मार्गावरील सर्व वाहतुकीसाठी मार्गदर्शक ठरेल. यावर जाणाऱ्या आणि येणाऱ्या वाहतुकीसाठी प्रत्येकी दोन लेन असतील. मार्च २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित.

■ **विस्तारित मुंबई उरण पायाभूत प्रकल्प** : रु. २,६०० कोटी. या प्रकल्पामध्ये २७५ किलोमीटर्सहून अधिक लांबीचे रस्ते विकसित केले जातील. यात १४ उड्डाणपूल, ३ खाडी पूल आणि २ रेल्वे उड्डाणपूल बांधण्यात येतील. या प्रकल्पातील पनवेल, वाघबीळ, मानपाडा, पाटलीपाडा हे उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत.

**भविष्यकाळात राबवले जाणारे प्रकल्प**

**कुलाबा-बांद्रा-सीप्झ मेट्रो रेल कॉरिडॉर** : ३३.५ किलोमीटर्स-रु. २४,३४० कोटी. या प्रकल्पामधून उत्तर-दक्षिण जोडणी मिळेल. याशिवाय रेल्वेवर आधारित जोडणी नसलेल्या क्षेत्रांनाही जोडणी मिळेल. उपनगरी रेल्वे, मेट्रो आणि मोनो रेल यांना ही सेवा पूरक ठरेल.

**विरार-अलिबाग कॉरिडॉर** : १२६ किलोमीटर्स- रु. १२,९७५ कोटी. टप्पा-१- विरार (नवघर) ते चिरनेर (जेएनपीटी) ७९ किलोमीटर्स- रु. ९,३२६ कोटी. ८ वाहिका असलेल्या या कॉरिडॉरमध्ये बीआरटीएस, मेट्रो, मोटारवाहतूक आणि बिगर-मोटार वाहतुकीसाठी स्वतंत्र वाहिका (लेन) असतील. यामधून एनएच-८, एनएच-१३, एनएच-४, एनएच-४बी आणि एनएच यांना जोडणी मिळू शकेल. यात २० उड्डाणपूल, ४५ भूमिगत मार्ग आणि १५ अदलाबदल (इंटरचेंजेस) मार्ग असतील. या प्रकल्पाचा विस्तृत अहवाल पूर्ण झाला आहे.

■ **मुंबई ट्रान्स हार्बर लिंक** : २२ किलोमीटर्स- रु. ९,६३० कोटी. हा मार्ग थेट आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई यांना जोडेल. यामुळे पुणे एक्स्प्रेस महामार्ग तसेच पुढे दक्षिण भारताकडे जाण्याचा सुलभ मार्ग उपलब्ध होईल. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात विकासाला चालना मिळेल.

■ **तळोजा एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन** : रु. ३,००० कोटी. हा प्रकल्प तळोजा येथे विकसित केला जाईल. ६ नागरी स्थानिक संस्थांमधील घनकचऱ्याची या प्रकल्पाद्वारे वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावली जाईल. यासाठी हक्काधिकारी नेमला गेला आहे.

■ **जल साधन विकास** : रु. १,१०० कोटी. सूर्या नदीच्या पाण्याचा वसई-विरार, मीरा-भायंदर महानगरपालिकांना मोठ्या प्रमाणावर पाणी पुरवठा. ८८ किलोमीटर्स लांबीच्या जलवाहिनीची गरज आहे. या प्रकल्पाचा विस्तृत अहवाल पूर्ण करण्यात आला आहे.

■ **बांद्रा-कुर्ला ते चुनाभट्टी जोडणी** : १.६ किलोमीटर्स - रु. ४०० कोटी. यामधून दोन्ही बाजूंच्या वाहतुकीसाठी प्रत्येकी दोन लेन उपलब्ध होतील. हा मार्ग मिठी नदी, एलबीएस मार्ग तसेच मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गांना ओलांडून जाईल. यामुळे अंतर ३ किलोमीटर्सने कमी होईल आणि प्रवासाला लागणारा वेळ ३० मिनिटांनी कमी होईल. यामुळे सायन-धारावी विभागातील प्रदूषणाची मात्रा कमी होईल.

**खेरवाडी उड्डाणपूल** : ५८० मीटर्स रु. २२ कोटी. यामधून दोन्ही बाजूंच्या वाहतुकीसाठी प्रत्येक तीन लेन उपलब्ध होती. सी -लिंकवरून होणाऱ्या वाहतुकीला पूरक ठरेल.

**दिलीप कवठकर**





# आघाडी आणि प्रगती




- १०० कोटी वृक्षारोपणाचे लक्ष्य.
- व्यसनमुक्तीसाठी देशात प्रथमच राज्यस्तरीय साहित्य संमेलन.
- कृषी विभाग आणि भारत संचार निगम लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना दूरसंचार सुविधा. एकूण १५ लाख सभासद. या सभासदांमध्ये आपसातील संवाद मोफत. ५०० कॉल आणि ४०० एसएमएस मोफत.
- २०६० महसूल वृत्तांमध्ये स्वयंचलित हवामान स्थानके.
- गावपातळीवर कमी किमतीत खतांचा पुरवठा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतावर थेट खतांचा पुरवठा. खरीप २०१२ मध्ये १,८३,२१६ मेट्रिक टन खत ४,१६,५१० शेतकऱ्यांना उपलब्ध. खरीप २०१२ मध्ये ३,०५,५७७ मेट्रिक टन खत ८,४४,९४५ शेतकऱ्यांना उपलब्ध.
- गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी नवीन गोंडवन विद्यापीठाची स्थापना.
- रत्नागिरी, नाशिक, गडचिरोली, नांदेड आणि अमरावती येथे अतिरिक्त पाच नागरी सेवा परीक्षा (आयएएस) पूर्व प्रशिक्षण केंद्रे प्रस्तावित.
- महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या आधुनिकीकरणासाठी नवीन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम.
- फक्त महिलांविरुद्धच्या अपराधांची प्रकरणे चालविण्यासाठी १३ खास न्यायालये.
- महिला सक्षमीकरणासाठी मनोधैर्य आणि सुकन्या योजना
- अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींच्या अंतर्गत अपराधांची प्रकरणे चालविण्यासाठी ६ खास न्यायालये.
- जागतिक दर्जाच्या न्यायसंस्था प्रशिक्षण संस्थेची उत्तन, जिल्हा ठाणे येथे स्थापना.
- महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१३ जाहीर. मोठ्या प्रमाणावर रोजगाराची निर्मिती, कुशल मानवशक्तीची उणीव भरून काढणे तसेच विभागीय विकासाच्या समतोलाला उत्तेजन देणे यावर धोरणात भर.
- देशात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक (एफ.डी.आय.) राज्याकडे आकर्षित. राष्ट्रीय गुंतवणुकीचा २३ टक्के हिस्सा महाराष्ट्रात.
- पंचायत सक्षमीकरण आणि उत्तरदायित्व योजना राबवणारे देशातील पहिले राज्य. या क्षेत्रातील उत्कृष्ट गुणवत्तेसाठी महाराष्ट्र शासनाला केंद्र शासनाचा रु.२.५ कोटींचा पुरस्कार.
- मालवणी आणि मालाड येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बांधणार
- औरंगाबाद व नागपूर येथे न्याय व विधी विद्यापीठ







R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, November 2013.
Date of Publication : 10th of every Month

# घरोघरी लोकराज्य




सुमारे चार लाख प्रतींचा खप असणारे देशातील एकमेव मासिक

जाणकारांचे लेख
यशस्वितांच्या कथा
तज्ज्ञांच्या मुलाखती
उपयुक्त सूचना

संग्राह्य विशेषांक :
एखाद्या विषयाचा
सर्वांगीण आढावा घेणारे

संपूर्ण रंगीत छपाई
आणि आकर्षक मांडणी

वार्षिक वर्गणी
रु.१००

# लोकराज्य

आज आणि उद्यासाठीही
केवळ अधिकृतच नव्हे तर
उपयुक्त व वाचनीय माहिती

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From
दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे